# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद
## महापालिका सचिव विभाग

**मा.प्रशासक यांच्या कार्यकाळातील घेण्यात आलेले प्रस्ताव व ठराव क्र.335 ते ठराव क्र.505**

**<u>प्रस्ताव क्रमांक 335/2022:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.04.04.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, ज्या अर्थी, जागतिक आरोग्य संघटनेने कोरोना (कोविड-19) या विषाणुमुळे पसरत असलेला आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणून घोषीत केलेला आहे. तसेच कोरोना विषाणुचा प्रसार भारतात, महाराष्ट्रातील शहरात वेगाने पसरत असल्याचे निर्दशनास आले आहे. राज्य शासनाने कोरोना विषाणुचा प्रार्दुभाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदे 1897 दिनांक 13 मार्च 2020 पासून लागु करुन त्याबाबतची नियमावली तयार केली आहे. कोरोना बाधित रुग्णांची संख्या औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रात मोठया प्रमाणात वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे. त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व विषाणूच्या संसर्गात आधिक वाढ होऊ न देता तात्काळ उपाय योजना करणे आवश्यक आहे.

औरंगाबाद शहरात साथीच्या नियंत्रणासाठी व लढा देण्याकरिता कोविड-19 एमआयडीसी मार्फत मेल्ट्रॉनची जागा डीसीएचसी म्हणून उपलब्ध करुन देण्यात आलेली होती. 350 खाटांचे मेल्ट्रॉन डीसीएचसी म्हणून दि.11.6.2020 पासून कार्यान्वीत करण्यात आलेले होते. कोविड-19 अंतर्गत दि.1.3.2022 ते 8.3.2022 रुग्ण संख्या तपशील खालील प्रमाणे आहे.

| दिनांक | पॉझीटीव्ह रुग्ण संख्या | बरे झालेले रुग्ण संख्या | मृत्यू संख्या | सक्रीय रुग्ण संख्या |
|---|---|---|---|---|
| 1.3.2022 | 5 | 16 | 1 | 173 |
| 2.3.2022 | 7 | 112 | 0 | 68 |
| 3.3.2022 | 16 | 13 | 0 | 71 |
| 4.3.2022 | 13 | 22 | 0 | 62 |
| 5.3.2022 | 4 | 9 | 0 | 57 |
| 6.3.2022 | 0 | 9 | 0 | 48 |
| 7.3.2022 | 2 | 8 | 0 | 42 |
| 8.3.2022 | 3 | 6 | 0 | 39 |

कोविड-19 रुग्ण संख्या पाहता मेल्ट्रॉन हॉस्पीटल येथे ओपीडी सेवा, प्रसूती व कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया सेवा सुरु करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. तसेच मेल्ट्रॉन हॉस्पीटल येथे सिटी स्कॅन व एक्स-रे सोय उपलब्ध आहे. सदरील सेवा देखील नागरिकांना उपलब्ध करुन द्यावयाच्या आहेत. मेल्ट्रॉन हॉस्पीटल येथे खालील प्रमाणे सेवा उपलब्ध सर्वसामान्य नागरिकांना उपलब्ध करुन द्यावयाच्या आहेत.

- सर्वसाधारण बाहयरुग्ण सेवा
- कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया
- सीटी स्कॅन सेवा
- क्ष-किरण सेवा

**संदर्भ क्र.3** महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण 2013/प्र.क्र.462/भाग 2/आरोग्य 3 दिनांक 28.12.2015 अन्वये सिटी स्कॅन करिता शासकीय रुग्णालयामध्ये तक्तामध्ये रकाना क्र.3 मध्ये नमूद केल्यानुसार रुग्ण शुल्क आकारणी करण्यात येते. (पृष्ठ क्र.13) महानगरपालिकेतर्फे आकारणी करावयाचे दर रकाना क्र. 4 मध्ये नमूद आहे.

| अ. क्र. | रुग्णसेवा / सुविधा | शासनाचे रुग्ण सेवेकरिता मंजूर दर | मनपा तर्फे प्रस्तावित रुग्ण सेवेकरिता दर |
|---|---|---|---|
| **01** | **02** | **03** | **04** |
| 01 | सीटी स्कॅन ब्रेन प्लेन | रु.300/- | रु.700/- |

| | | | |
|---|---|---|---|
| 02 | सीटी स्कॅन इतर कुठलाही भाग-प्लेन (एक भाग एका वेळेस)(उदा.चेस्ट,पी.एन.ए.स.ऑरविट,टेम्पोरल बोन,नेक,ॲबडॉमिन,पेलव्हीस,एचआरटी, हात/पाय इ) | रु.400/- | रु.700/- |
| 04 | सीटी स्कॅन कॉन्ट्रास्ट स्टडी कुठल्याही भागाचा (एक अथवा अनेक) एका वेळेस | रु.100/- | रु.1000/- |
| 05 | सीटी स्कॅन हायर फंक्शन/स्पेशल स्टडी (बोन डेन्सिटोमिट्री/डेक्सास्कॅन/थ्रीडीस्कॅन/ॲनजिओग्राफी/ ब्रॉन्कोग्राफी/एन्टरोक्लायसीस/कोलोनास्कोपी/डेंटल सीटी/सीटी गायडेस बायोस्पी/परफ्यूजन स्टडी इ.) | रु.700/- | रु.1500/- |

- **रेडीऑलॉजी (क्ष-किरण शास्त्र) (पृष्ठ क्र.12)**

| अ. क्र. | रुग्णसेवा/सुविधा | शासनाचे रुग्ण सेवेकरिता मंजूर दर | मनपा तर्फे प्रस्तावित रुग्ण सेवेकरिता दर |
|---|---|---|---|
| **01** | **02** | **03** | **04** |
| 01 | एक्स-रे डिजीटल- सीआरओडी (प्रति एक्स-रे शुट) | रु.75/- | रु.100/- |

सदरील प्रमाणे सेवा शुल्क आकारणी करण्यासाठी मा.सर्वसाधारण सभा, मनपा औरंगाबाद ठराव क्र.322 दि.16.03.2022 नुसार उपरोक्त तक्ता मधील रकाना क्र.4 नुसार दर आकारणी करण्यासाठी मंजूरी देण्यात आलेली आहे. तसेच यापुढे नविन सेवा उपलब्ध करुन दिल्यानंतर महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक:संकीर्ण 2013/प्र.क्र.462/भाग 2/आरोग्य-3 दि.28.12.2015 नुसार रुग्णास शुल्क आकारणी करावी लागेल.

इनचार्ज वैद्यकीय अधिकारी, मनपा मेल्ट्रॉन हॉस्पीटल, औरंगाबाद यांचे पत्र दि.21.3.2022 नुसार विविध बाबींकरिता किती दर आकारणी करण्याबाबत विचारणा करण्यात आलेली आहे. प्राप्त आदेशानुसार महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक:संकीर्ण 2013/प्र.क्र.462/भाग-2/आरोग्य-3 दि.28.12.2015 नुसार रुग्णास शुल्क आकारणी करण्यात येते.

| अ. क्र. | रुग्णसेवा / सुविधा | शासनाचे रुग्ण सेवेकरिता मंजूर दर | मनपा तर्फे प्रस्तावित रुग्ण सेवेकरिता दर |
|---|---|---|---|
| **01** | **02** | **03** | **04** |
| 1 | बाहय रुग्ण 7 दिवसाकरिता | रु.10/- | रु.10/- |
| 2 | ए.आर.व्ही. पेपर | रु.10/- | रु.10/- |
| 3 | ड्रेसिंग **(प्रति ड्रेसिंग)** | रु.10/- | रु.10/- |
| 4 | तातडीने सेवा केस पेपर | रु.10/- | रु.10/- |
| 5 | आंतररुग्ण शुल्क प्रतिदिन | रु.20/- | रु.50/- |
| 6 | अतिदक्षता विभाग **(प्रतिदिन)** | रु.200/- | रु.200/- |
| 7 | रुग्णवाहिका शुल्क **(प्रति कि.मी.)** | रु.15/- | रु.15/- |
| 8 | प्रतिक्षा शुल्क **(8 तासाच्या पुढे प्रतितास)** | रु.75/- | रु.75/- |
| 9 | सर्वसाधारण कक्ष: साईड रुम | रु.100/- प्रतिदिन | रु.150/-प्रतिदिन |
| 10 | नर्सिग होम **(वातानुकुलित नसलेली)** | रु.150/- प्रतिदिन | रु.150/- प्रतिदिन |
| 11 | नर्सिग होम **(वातानुकुलित असलेली)** | रु.500/-प्रतिदिन | रु.500/-प्रतिदिन |
| 12 | हिमोग्लोबीन | रु.20/- | रु.20/- |
| 13 | टिएलसी | रु.20/- | रु.20/- |
| 14 | डिएलसी | रु.20/- | रु.50/- |
| 15 | ईएसआर | रु.20/- | रु.50/- |

| | | | |
|---|---|---|---|
| 16 | ब्लड ग्रुपींग व आरएच टायपिंग | रु.30/- | रु.50/- |
| 17 | युरीन/लघवी **(रुटीन व मायक्रोस्कोपी)** | रु.35/- | रु.35/- |
| 18 | युरीन/लघवी शुगर व प्रोटीन | रु.30/- | रु.30/- |
| 19 | ब्लड शुगर **(उपाशी पोटी आणि जेवणानंतर)** | रु.50/- | रु.50/- |
| 20 | ब्लड शुगर रॅन्डम | रु.30/- | रु.50/- |
| 21 | किडनी फंक्शन टेस्ट **(युरिया / क्रियाटिनिन/ सोडीयम आणि पोटॅशियम)** | रु.80/- | रु.100/- |
| 22 | सीरम सोडीयम | रु.30/- | रु.50/- |
| 23 | सीरम पोटॅशियम | रु.30/- | रु.50/- |
| 24 | सीरम इलेक्ट्रोलाईट **(सोडीयम/ पोटॅशियम)** | रु.40/- | रु.40/- |
| 25 | सीरएम क्रियाटिनिन | रु.30/- | रु.30/- |
| 26 | सीरएम कॅल्शियम | रु.30/- | रु.50/- |
| 27 | सीरएम युरिक ॲसीड | रु.40/- | रु.50/- |
| 28 | ब्लड युरिया | रु.30/- | रु.30/- |
| 29 | बिलरुबीन **(टोटल व इनडायरेक्ट)** | रु.30/- | रु.50/- |
| 30 | एस.जी.ओ.टी. | रु.30/- | रु.30/- |
| 31 | एस.जी.पी.टी | रु.30/- | रु.30/- |
| 32 | सिरम टोटल प्रोटीन | रु.30/- | रु.30/- |
| 33 | सिरम अल्काईन फॉस्फटेज | रु.30/- | रु.30/- |
| 34 | सिरम कोलेस्ट्रॉल | रु.30/- | रु.30/- |
| 35 | सिरम ट्रायग्लीसराईड | रु.40/- | रु.40/- |
| 36 | सिरम अमायलेज | रु.50/- | रु.50/- |
| 37 | सिरम किटोन बॉडीज | रु.40/- | रु.40/- |
| 38 | सिरम फॉस्फरस | रु.40/- | रु.40/- |
| 39 | एल.डी.एच. | रु.100/- | रु.100/- |
| 40 | लिव्हर फंक्शन टेस्ट **(एलएफटी)** | रु.150/- | रु.150/- |
| 41 | लिपीड प्रोफाईल | रु.200/- | रु.200/- |
| 42 | एलडीएल डायरेक्टर | रु.150/- | रु.150/- |
| 43 | सिरम मॅगनेशियम | रु.30/- | रु.30/- |
| 44 | सिरम आर्यन **(लोह)** | रु.30/- | रु.30/- |
| 45 | फेरेटीन | रु.200/- | रु.200/- |
| 46 | व्हिडाल | रु.30/- | रु.30/- |
| 47 | आरए फॅक्टर | रु.30/- | रु.30/- |
| 48 | व्हीडीआरएल / आपीआर | रु.30/- | रु.30/- |
| 49 | एच आय व्ही ॲन्टी बॉडी टेस्ट प्रति चाचणी | नि:शुल्क | नि:शुल्क |
| 50 | डेंग्यु एलिझा | रु.150/- | रु.150/- |
| 51 | एचबीएसजी रॅपीड टेस्ट | रु.75/- | रु.75/- |
| 52 | सेंट्रल लाईन | रु.50/- | रु.50/- |
| 53 | फोलेज कॅथटेर टाकणे | रु.50/- | रु.50/- |
| 54 | ईसीजी | रु.50/- | रु.100/- |
| 55 | व्हेन्टीलेटर सपोर्ट प्रत्येक दिवसासाठी | रु.200/- | रु.200/- |
| 56 | ऑक्सीजन प्रत्येक दिवसासाठी | रु.100/- | रु.100/- |

| | | | |
|---|---|---|---|
| 57 | आयव्ही लाईन | रु.25/- | रु.25/- |
| 58 | सेंट्रल लाईन | रु.50/- | रु.50/- |
| 59 | व्हेनसलाईन | रु.25/- | रु.25/- |
| 60 | पेडीएॅट्रीक ईईजी | रु.200/- | रु.200/- |
| 61 | मॅमोग्राफी | रु.500/- | रु.500/- |

वरील प्रमाण सेवा व दर लागू करण्याच्या मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक 335/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कोविड-19 चिकलठाणा एमआयडीसी मार्फत मेल्ट्रॉन येथे डीसीएचसी म्हणून अधिग्रहीत करण्यात आलेले होते. सध्याची रुग्ण संख्या पाहता सदरील ठिकाणी नागरिकांना सर्वसाधारण बाहयरुग्ण सेवा, सीटी स्कॅन सेवा क्ष-किरण सेवा सुरु करण्यास करण्यात आलेली आहे. अ.क्र.1 ते 61 मध्ये मनपा प्रस्तावित रुग्णसेवेचे दर लागू करण्यास व या व्यतिरिक्त नविन सेवा देण्यास सुरुवात केल्यास प्रस्तावात दर्शविण्यात शासन निर्णयानुसार दर आकारण्यास मान्यता देण्यात येते. सर्वानुमते मंजूरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 336/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.07.4.2022)**

आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, औरंगाबाद स्मार्ट सिटी (ASCDCL) मार्फत स्मार्ट बसेस (100) चालु करण्यात आलेले आहेत. या बसेस करीता लागणारे इंधन रु.22.61 प्रति लिटर कमी दराने महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळा मार्फत घेण्यात येत होते. परंतु, राज्य परिवहन मंडळातर्फे होत असलेला डिझेलचा पुरवठा दरवाढी मुळे बंद करण्यात येत असल्याबाबत आगारा तर्फे औरंगाबाद स्मार्ट सिटीला कळविण्यात आले आहे. त्यानुषंगाने मुख्य कार्यकारी अभियंता (CEO) स्मार्ट सिटी औरंगाबाद यांनी जसवंतपुरा, सेंट्रलनाका रोड येथील प्रगती पेट्रोलियम मनपाच्या पेट्रोल पंपावरून स्मार्ट बसेस करीता लागणाऱ्या डिझेल दरामध्ये प्रति लिटर रु.1.00 प्रमाणे सुट देणे बाबत विनंती केली आहे. सदरील प्रस्तावामुळे महानगरपालिकेच्या पेट्रोल/डिझेल च्या खपामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होईल आणि मनपाच्या उत्पन्नात वाढ होईल. ही बाब विचारात घेऊन मनपाचे आर्थिक उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टिने स्मार्ट शहर बसेस करीता डिझेल मध्ये प्रति लिटर रु.1.00 सुट देणेचा प्रस्ताव 15 दिवस आगाऊ रक्कम भरण्याच्या अटी वर मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 336/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद स्मार्ट शहर बसेस करीता औरंगाबाद महानगरपालिकेच्या पेट्रोल पंपावरुन रु.1.00 प्रती लिटर सुट देण्याचा प्रस्ताव 15 दिवस आगाऊ रक्कम भरण्याच्या अटीवर मान्य करण्यात येत आहे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 337/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.07.04.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शुरवीर महाराणा प्रताप यांचा अश्वारुढ पुतळा महाराणा प्रताप उद्यान (कॅनॉट प्लेस सिडको) येथे उभारणे या कामाची निविदा मागविली असता, निविदेतील अटी व शर्ती नुसा मा.प्रशासक यांच्या आदेशानुसार या कामाकरीता दाखल निविदाधारकांनी निविदेसोबत दाखल केलेल्या पुतळ्याचे मॉडेलची पाहणी करुन त्यास पसंती योग्य पुतळ्याच्या मॉडेलची निश्चिती करणे व दराबाबात वाटाघाटी करुन निर्णय घेणे यासाठी कार्यकारी अभियंता (इमारत व उद्यान), मुख्यलेखाधिकारी, शहर अभियंता, अति.आयुक्त-1 यांची समिती नियुक्ती करण्यात आली. या समितीने दि.09.03.2022 रोजी पाहणी केली. पाहणी मध्ये समितीस पुतळ्याचे मॉडेल पसंतीस आलेले कंत्राटदार सोबत केलेली वाटाघाटी अंती अंतिम केलेले निविदा धारक/कंत्राटदार मे.मॉडेल आर्ट वर्क्स यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 12.20 % कमी दराने करुन घेण्यास व करार करण्यास मा.स्थायी समितीची मान्यता मिळणे बाबत.

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नाव | कार्यकारी अभियंता (इमारत व उद्यान) |
| 1. | कामाचे स्वरुप | शुरवीर महाराणा प्रताप यांचा अश्वारुढ पुतळा महाराणा प्रताप उद्यान (कॅनॉट प्लेस सिडको) येथे उभारणे. |
| 2. | पुर्वगणकपत्रक मान्य झाले आहे का असल्यास किती रक्कमेचे मान्यतेचा ठराव? | मा.सर्वसाधारण ठराव क्र.518/ दि.23.06.2009/1050/ दि.28.02.2019 व |

| | | |
|---|---|---|
| | | 133/11.05.2021 र.रु.77,50,000/- |
| | त्यापैकी किती रक्कमेचे टेंडर्र्स मागविण्यात आले | र.रु.77,50,000/- |
| 3. | ज्या वृत्तपत्रात टेंडर्स जाहिरात देण्यात आली होती त्यांचे नावे व प्रसिध्द दिनांक | महा-ई-टेंडर |
| 4. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | 01.07.2021 ते 03.09.2021 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | 07.01.2022 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आलेत? | पाच |

(त्यापैकी पात्र टेंडरदाराची माहिती खालील तक्त्यात द्यावी).

| **अ.क्र.** | **ठेकेदाराची नावे** | **टेंडर रक्कम रुपये** | **पुर्वगणनपत्राका पेक्षा टक्केवारी कमी/जास्त** |
|---|---|---|---|
| 1. | मे.ड्रास्टी आर्ट झोन | र.रु.77,50,000/ | 21.21 % कमी दराने |
| 2. | मे.शतकुंडा आर्टअॅण्ड मेटल फॉण्ड्री | र.रु.77,50,000/ | 10.11 % कमी दराने |
| 3. | मे.मॉडल आर्ट | र.रु.77,50,000/ | 10.00 % कमी दराने |
| 4. | मे.सरमद क्रिएशन | र.रु.77,50,000/ | 00.99 % कमी दराने |
| 5. | श्री.निलेश एस.खेडकर | र.रु.77,50,000/ | अनुभव प्रमाणपत्र नसल्यामुळे अपात्र |

| | | |
|---|---|---|
| 7. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रक्कमेचे मान्यतेचा ठराव? | होय |
| | अ) त्यापैकी किती रक्कमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | होय |
| | ज्या वृत्तपत्रात टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | होय |
| 8. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | शासन निर्णयानुसार |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | 07.01.2022 |
| 9. | क) निविदेची कितवी वेळ होती? | प्रथम |
| | एकुण किती टेंडर्स आली? | चार (पात्र) |
| 10. | पुर्वगणकपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रक्कमेचे? मान्यतेचा ठराव? | होय |

तरी विषयांकीत प्रकरणी चार (पात्र) निविदा प्राप्त असुन यामध्ये निविदेतील अटी व शर्तीनुसार या कामासाठी मा.प्रशासक यांच्या आदेशानुसार समिती गठीत करण्यात आली. या समितीने पाहणी करुन त्यांना पसंतीस आलेला पुतळ्याचे मॉडेलचे कंत्राटदार सोबत केलेली वाटाघाटी अंती अंतिम केलेले ठेकेदार मे. मॉर्डल आर्ट वर्क्स यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 12.20% कमी दराने करुन घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता मिळणे बाबत.

**ठराव क्रमांक 337/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नियोजित शुरवीर महाराणा प्रताप यांचा अश्वारुढ पुतळा महाराणा प्रताप उद्यान (कॅनॉट प्लेस सिडको) येथे उभारणे या कामासाठी समितीने पुतळ्याच्या मॉडेलला दिलेली पसंती व कंत्राटदारासोबत वाटाघाटी अंती निश्चित केलेल्या शिफारसीनुसार कमी दराचे निविदाधारक/कंत्राटदार मे.मॉर्डल आर्ट वर्क्स यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 12.20% कमी दराने करुन घेण्यास व करार करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 338/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.08.04.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कार्यालयीन आदेश् जा.क्र./मनपा/आस्था-1/2020/251 दि.20.02.2020 अन्वये कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा (वितरण) या पदाचा अतिरिक्त कार्यभार श्री.किरण धांडे, शाखा अभियंता तथा प्र.उपअभियंता, पाणी पुरवठा विभाग यांच्याकडे पुढील आदेशापर्यंत सोपविण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानअंतर्गत औरंगाबाद महानगरपालिके साठी पाणी पुरवठा प्रकल्पासाठी रु.1680.50 कोटीच्या योजनेस मंजुर केलेल्या योजनेची प्रभावी अंमलबजावणी साठी स्थापन केलेल्या प्रकल्प व्यवस्थापन युनिट (PMU) मध्ये कार्यकारी अभियंता म्हणुन काम

करण्यासाठी या विवक्षित कामाकरीता नियुक्त केलेले श्री.हेमंत कोल्हे, कार्यकारी अभियंता (सेवानिवृत्त) यांना आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2021/1590 दि.13.12.2021अन्वये दि.06.11.2021 पासून 06 महिन्यांच्या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

पाणी पुरवठा विभाग हा अत्यावश्यक सेवेतील विभाग आहे. तथापि, पाणी पुरवठा विभागामध्ये अभियंत्यांची संख्या अत्यंत अपुरी आहे. पाणीपुरवठा विभागात कार्यरत दोन्ही कार्यकारी अभियंते तसेच दोन उपअभियंते यांच्याकडे प्रभारी स्वरुपात कार्यभार सोपविण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत उन्हाळ्याचे दिवस असल्याने पाण्याची मागणी वाढलेली असून तक्रारीचे प्रमाण वाढत आहे. आवश्यक अधिकारी व कर्मचाऱ्यांअभावी तक्रारींचे निराकरण होत नसल्याने मोर्चे, आंदोलने होत आहेत.

श्री.हेमंत कोल्हे हे सेवानिवृत्तीपुर्वी कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) या पदावर कार्यरत होते. त्यामुळे त्यांना पाणी पुरवठा विभागाच्या कामाचा चांगला अनुभव आहे. सद्यस्थितीत श्री.हेमंत कोल्हे हे सेवानिवृत्तीनंतर विवक्षित कामासाठी औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये कार्यरत आहेत.

उक्त परिस्थिती लक्षात घेता व पाणी पुरवठा (वितरण) सुरळीत होण्यासाठी विशेष बाब म्हणुन श्री.हेमंत कोल्हे (सध्या करारपध्दीने कार्यरत) यांच्याकडे तात्पुरत्या स्वरुपात कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा (वितरण) या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्याबाबत तसेच त्यांना सदर पदाचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करण्याबाबत प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 338/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कार्यालयीन आदेश जा.क्र./मनपा/आस्था-1/2020/251 दि.20.02.2020 अन्वये कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा (वितरण) या पदाचा अतिरिक्त कार्यभार श्री.किरण धांडे, शाखा अभियंता तथा प्र.उपअभियंता, पाणी पुरवठा विभाग यांच्याकडे पुढील आदेशापर्यंत सोपविण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानअंतर्गत औरंगाबाद महानगरपालिके साठी पाणी पुरवठा प्रकल्पासाठी रु.1680.50 कोटीच्या योजनेस मंजुर केलेल्या योजनेची प्रभावी अंमलबजावणी साठी स्थापन केलेल्या प्रकल्प व्यवस्थापन युनिट (PMU) मध्ये कार्यकारी अभियंता म्हणुन काम करण्यासाठी या विवक्षित कामाकरीता नियुक्त केलेले श्री.हेमंत कोल्हे, कार्यकारी अभियंता (सेवानिवृत्त) यांना आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2021/1590 दि.13.12.2021अन्वये दि.06.11.2021 पासून 06 महिन्यांच्या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

पाणी पुरवठा विभाग हा अत्यावश्यक सेवेतील विभाग आहे. तथापि, पाणी पुरवठा विभागामध्ये अभियंत्यांची संख्या अत्यंत अपुरी आहे. पाणीपुरवठा विभागात कार्यरत दोन्ही कार्यकारी अभियंते तसेच दोन उपअभियंते यांच्याकडे प्रभारी स्वरुपात कार्यभार सोपविण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत उन्हाळ्याचे दिवस असल्याने पाण्याची मागणी वाढलेली असून तक्रारीचे प्रमाण वाढत आहे. आवश्यक अधिकारी व कर्मचाऱ्यां अभावी तक्रारींचे निराकरण होत नसल्याने मोर्चे, आंदोलने होत आहेत.

श्री.हेमंत कोल्हे हे सेवानिवृत्तीपुर्वी कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) या पदावर कार्यरत होते. त्यामुळे त्यांना पाणी पुरवठा विभागाच्या कामाचा चांगला अनुभव आहे. सद्यस्थितीत श्री.हेमंत कोल्हे हे सेवानिवृत्तीनंतर विवक्षित कामासाठी औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये कार्यरत आहेत.

उक्त परिस्थिती लक्षात घेता व पाणी पुरवठा (वितरण) सुरळीत होण्यासाठी विशेष बाब म्हणुन श्री.हेमंत कोल्हे (सध्या करारपध्दीने कार्यरत) यांच्याकडे तात्पुरत्या स्वरुपात कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा (वितरण) या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्याबाबत तसेच त्यांना सदर पदाचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 339/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.11.4.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेचे मुख्य प्रशासकीय इमारतीत प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे नामे मा.सर्वसाधारण सभेचे सभागृह स्थित आहे. सदर सभागृह सदर सभागृहाचे बांधकाम सन 1996 मध्ये झालेले असून सद्यस्थितीत सदर सभागृहाचे छताचे सिमेंटचे पत्रे जिर्ण झाले असून पावसाचे पाणी सिलिंगद्वारे आतमध्ये येऊन गळती निर्माण झाली आहे. या कारणाने सभागृहाचे फॉल सिलिंग ठिकठिकाणी नादुरुस्त झाले असून ते केव्हावी पडण्याची शक्यता आहे. तसेच सभागृहाची पुर्वीची बांधणी त्यावेळी सभासदांची असलेली संख्या व अधिकारी/कर्मचारी वर्ग विचारात घेऊन करण्यात आलेली होती. शिवाय जी आसन व्यवस्था सद्यस्थितीत अस्तित्वात आहे, त्याची मांडणी व बांधणी जी जुन्या सोफासेट स्वरुपाची असल्याने यासाठी अधिकची जागा खर्ची पडते, तसेच या टेबल व सोफासेट वर प्रत्येकी तीन सभासद

बसतील एवढीच जागा आहे. या व्यतिरिक्त सभागृहातील ध्वनी व्यवस्था व विद्युत व्यवस्था जुनी झालेली असल्याने ती वेळोवेळी नादुरुस्ती होते व त्यामुळे सभागृहाच्या कामाकाजात अडथळा निर्माण होतो.

उक्त बाबी व आगामी काळात सभासदांची वाढणारी संख्या विचारात घेता तसेच कोरोना सारख्या साथरोगाच्या काळात अधिक क्षमतेने सभागृहा वापरासाठी उपलब्ध व्हावे यासाठी अस्तित्वातील जागेत योग्य नियोजन करुन सभागृहातील आवश्यक दुरुस्ती करणे, त्यामध्ये छताची पत्रे बदलुन मजबुत व टिकाऊ स्वरुपाचे कलर कोटेड जी आय शिट टाकणे, विद्युत व्यवस्था व ध्वनी व्यवस्था अद्यावत करणे, मध्यवर्ती वातानुकूलीत यंत्रणा बसविणे, मा.महापौर व पदाधिकारी यांच्यासाठीची आसन व्यवस्था सुधारणे, अधिकारी वर्गासाठी आवश्यक लांबी रुंदीची व क्षमतेची आसन व्यवस्था तयार करणे, अग्निरोधक यंत्रणा उभारणे, नव्याने फॉल सिलिंगचे काम करुन त्यामध्ये एल.ई.डी.लाईटची व्यवस्था करणे, सभासद व अधिकारी वर्ग यांच्यासाठी स्त्री व पुरुषांसाठीचे स्वतंत्र स्वच्छतागृह बांधणे तसेच सभा कामकाज चालु असतांना उपहारगृहाची आवश्यकता भासल्यास त्यासाठीची व्यवस्था निर्माण करणे इ.कामे फर्निचरसह करणे आवश्यक आहे.

या कारणास्तव निविदेद्वारे तज्ञ वास्तुविशारद यांची नेमणुक करण्यात आली असून त्यांनी यासाठीचे विस्तृत नियोजन व अंदाजपत्रक सादर केले असून या अंदाजपत्रकात सभासदांची वाढीव संख्यानुसार 132 स.सभासद व पदाधिकारी तसेच 36 अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी टेबल व अद्यावत खुर्च्यांची व्यवस्था करणे, पत्रकारांसाठी ची गॅलरी अद्यावत करणे, छताचे पत्रे बदलणे, आसन व्यवस्था नव्याने क्षमता वाढवून करणे, मा.महापौर यांच्यासाठी ॲन्टीचेंबर बांधकाम करुन सुधारण करणे, पत्रकार गॅलरीमध्ये सुधारण करणे, मध्यवर्ती वातानुकूलीत यंत्रणा उभारणे, सभागृह चालू असतांना ध्वनी व्यवस्था योग्य राहणे यासाठी ॲकोस्टीक चे काम करणे, बाहेरील बाजुस छतावर किचनची व उपहारगृहाची व्यवस्था करणे, स्वच्छताग,हाचे बांधकाम करुन प्लबिंगची कामे करणे, लाईट व साऊंड रुम तयार करणे, सुरक्षिततेसाठी छतावर पॅरापेट वॉलचे बांधकाम करुन भिंतीची उंची वाढविणे, हेड रुमच्या वर पुरेशी पाण्याची व्यवस्था होणेसाठी पाण्याची टाकी बसविणे, आवश्यकतेनुसार फॅब्रिकेशनची कामे करणे तसेच अंतबाह्य रंगकाम करणे, आवश्यकतेनुसार किरकोळ पाडकाम करणे व अग्निरोधक यंत्रणा उभारणे या बाबींचा समावेश आहे. सदर कामासाठीचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम दरसुची सन 2021-22 नुसार तयार करण्यात आले असून यातील ज्या बाबींचे दर सार्वजनिक बांधकाम दरसुचीमध्ये नाही त्यासाठी किमान बाजारभाव विचारात घेण्यात आले आहेत. सदर कामासाठी अर्थसंकल्प सन 2022-23 मध्ये भांडवली खर्च प्रशासकीय इमारत या लेखाशिर्षकाखाली आवश्यक आर्थीक तरतुद करण्यात आलेली आहे.

तरी सादर अंदाजपत्रक रु.6,32,46,812/- यास प्रशासकीय मान्यता मिळणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 339/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अस्तित्वात असलेले सर्वसाधारण सभागृहात सुधारणा करुन त्याची श्रेणीवाढ करणे संलग्न व्यवस्थेअंतर्गत विद्युत व ध्वनी व्यवस्था अद्यावत करणे, सभागृहातील वाढणारी सदस्य संख्या विचारात घेऊन अद्यावत आसन व्यवस्था निर्माण करणे, मध्यवर्ती वातानुकूलीत यंत्रणा निर्माण करणे, छताचे पत्रे बदलणे, किचन व उपहारगृह बांधणे, स्वच्छतागृहाची अद्यावत व्यवस्था करणे, अग्निरोधक यंत्रणा बसविणे, ॲकोस्टिकचे काम करणे इ.सर्व बाबींचे समावेश असलेले अंदाजपत्रक रु.6,32,46,812/- यास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 340/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.12.04.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2020/251 दि.20.02.2020 अन्वये कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा (वितरण)या पदाचा अतिरीक्त कार्यभार श्री.किरण धांडे, शाखा अभियंता तथा प्र.उपअभियंता, पाणी पुरवठा विभाग यांच्याकडे पुढील आदेशापर्यंत सोपविण्यात आलेला आहे.

तसेच कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2021/822 दि.03.06.2021 अन्वये श्री.के.एल. फालक, प्र.कार्यकारी अभियंता यांच्याकडे कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा जायकवाडी (स्थापत्य) व श्री.डी.के.पंडीत, प्र.कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) यांच्याकडे कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा जायकवाडी (यांत्रिकी) या पदाचा अतिरिक्त कार्यभार पुढील आदेशापर्यंत सोपविण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानअंतर्गत औरंगाबाद महानगरपालिके साठी पाणी पुरवठा प्रकल्पासाठी रु.1680.50 कोटीच्या योजनेस मंजुर केलेल्या योजनेची प्रभावी अंमलबजावणीसाठी स्थापन केलेल्या प्रकल्प व्यवस्थापन युनिट (PMU) मध्ये कार्यकारी अभियंता म्हणुन काम

करण्यासाठी या विवक्षित कामाकरीता नियुक्त केलेले श्री.हेमंत कोल्हे, कार्यकारी अभियंता (सेवानिवृत्त) यांना आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2021/1590 दि.13.12.2021अन्वये दि.06.11.2021 पासून 06 महिन्यांच्या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

पाणी पुरवठा विभाग हा अत्यावश्यक सेवेतील विभाग आहे. तथापि, पाणी पुरवठा विभागामध्ये अभियंत्यांची संख्या अत्यंत अपुरी आहे. पाणी पुरवठा विभागात कार्यरत दोन्ही कार्यकारी अभियंते तसेच दोन उपअभियंते यांच्याकडे प्रभारी स्वरुपात कार्यभार सोपविण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत उन्हाळ्याचे दिवस असल्याने पाण्याची मागणी वाढलेली असून तक्रारींचे प्रमाण वाढत आहे. आवश्यक अधिकारी व कर्मचाऱ्यां अभावी तक्रारींचे निराकरण होन नसल्याने मोर्चे, आंदोलने होत आहेत. तसेच श्री.हेमंत कोल्हे हे सेवानिवृत्तीपुर्वी कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) या पदावर कार्यरत होते. त्यामुळे त्यांना पाणी पुरवठा विभागाच्या कामाचा चांगला अनुभव आहे. सद्यस्थितीत श्री.हेमंत कोल्हे हे सेवानिवृत्तीनंतर विवक्षित कामासाठी औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये कार्यरत आहेत. त्यानुषंगाने दि.08.04.2022 रोजीच्या प्रशासकीय ठराव क्र.338 अन्वये पाणी पुरवठा सुरळीत होण्यासाठी विशेष बाब म्हणुन श्री.हेमंत कोल्हे (सध्या करारपध्दतीने कार्यरत) यांच्याकडे तात्पुरत्या स्वरुपात कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा (वितरण) या पदाचा अतिरीक्त कार्यभार सोपविण्या बाबत तसेच त्यांना सदर पदाचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करण्याबाबत ठराव पारीत करण्यात आला होता. त्यानुसार कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2022/365 दि.08.04.2022 अन्वये आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

तथापि, प्रशासकीय कारणास्तव दि.08.04.2022 रोजीच्या प्रशासकीय ठराव क्र.338 व कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2022/365 दि.08.04.2022 मध्ये बदल करण्यात येत असून पाणी पुरवठा सुरळीत होण्यासाठी विशेष बाब म्हणुन श्री.हेमंत कोल्हे (सध्या करारपध्दतीने कार्यरत) यांच्या कडे तात्पुरत्या स्वरुपात कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा (वितरण), कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा जायकवाडी (स्थापत्य) व पाणी पुरवठा जायकवाडी (यांत्रिकी) या पदांचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्याबाबत तसेच त्यांना सदर पदांचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करण्याबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 340/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2020/251 दि.20.02.2020 अन्वये कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा (वितरण)या पदाचा अतिरीक्त कार्यभार श्री.किरण धांडे, शाखा अभियंता तथा प्र.उपअभियंता, पाणी पुरवठा विभाग यांच्याकडे पुढील आदेशापर्यंत सोपविण्यात आलेला आहे.

तसेच कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2021/822 दि.03.06.2021 अन्वये श्री.के.एल. फालक, प्र.कार्यकारी अभियंता यांच्याकडे कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा जायकवाडी (स्थापत्य) व श्री.डी.के.पंडीत, प्र.कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) यांच्याकडे कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा जायकवाडी (यांत्रिकी) या पदाचा अतिरिक्त कार्यभार पुढील आदेशापर्यंत सोपविण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानअंतर्गत औरंगाबाद महानगरपालिके साठी पाणी पुरवठा प्रकल्पासाठी रु.1680.50 कोटीच्या योजनेस मंजुर केलेल्या योजनेची प्रभावी अंमलबजावणीसाठी स्थापन केलेल्या प्रकल्प व्यवस्थापन युनिट (PMU) मध्ये कार्यकारी अभियंता म्हणुन काम करण्यासाठी या विवक्षित कामाकरीता नियुक्त केलेले श्री.हेमंत कोल्हे, कार्यकारी अभियंता (सेवानिवृत्त) यांना आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2021/1590 दि.13.12.2021अन्वये दि.06.11.2021 पासून 06 महिन्यांच्या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

पाणी पुरवठा विभाग हा अत्यावश्यक सेवेतील विभाग आहे. तथापि, पाणी पुरवठा विभागामध्ये अभियंत्यांची संख्या अत्यंत अपुरी आहे. पाणी पुरवठा विभागात कार्यरत दोन्ही कार्यकारी अभियंते तसेच दोन उपअभियंते यांच्याकडे प्रभारी स्वरुपात कार्यभार सोपविण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत उन्हाळ्याचे दिवस असल्याने पाण्याची मागणी वाढलेली असून तक्रारींचे प्रमाण वाढत आहे. आवश्यक अधिकारी व कर्मचाऱ्यांअभावी तक्रारींचे निराकरण होन नसल्याने मोर्चे, आंदोलने होत आहेत. तसेच श्री.हेमंत कोल्हे हे सेवानिवृत्तीपुर्वी कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) या पदावर कार्यरत होते. त्यामुळे त्यांना पाणी पुरवठा विभागाच्या कामाचा चांगला अनुभव आहे. सद्यस्थितीत श्री.हेमंत कोल्हे हे सेवानिवृत्तीनंतर विवक्षित कामासाठी औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये कार्यरत आहेत. त्यानुषंगाने दि.08.04.2022 रोजीच्या प्रशासकीय ठराव क्र.338 अन्वये पाणी पुरवठा सुरळीत होण्यासाठी विशेष बाब म्हणुन श्री.हेमंत कोल्हे (सध्या करारपध्दतीने कार्यरत) यांच्याकडे तात्पुरत्या स्वरुपात कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा (वितरण) या पदाचा अतिरीक्त

कार्यभार सोपविण्या बाबत तसेच त्यांना सदर पदाचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करण्याबाबत ठराव पारीत करण्यात आला होता. त्यानुसार कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2022/365 दि.08.04.2022 अन्वये आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

तथापि, प्रशासकीय कारणास्तव दि.08.04.2022 रोजीच्या प्रशासकीय ठराव क्र.338 व कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2022/365 दि.08.04.2022 मध्ये बदल करण्यात येत असून पाणी पुरवठा सुरळीत होण्यासाठी विशेष बाब म्हणुन श्री.हेमंत कोल्हे (सध्या करारपध्दतीने कार्यरत) यांच्या कडे तात्पुरत्या स्वरुपात कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा (वितरण), कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा जायकवाडी (स्थापत्य) व पाणी पुरवठा जायकवाडी (यांत्रिकी) या पदांचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्याबाबत तसेच त्यांना सदर पदांचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करण्यास मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 341/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.12.04.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, देशामध्ये व राज्यामध्ये कोव्हिड-19 या विषाणुचा प्रार्दुभाव झाल्यामुळे Pandemic ची साथ संपुर्ण जग, देश व राज्यामध्ये पसरली असून कोव्हिड-19 हा साथरोग नियंत्रित करण्याची आवश्यकता आहे.

औरंगाबाद शहरामधील कोव्हिड-19 विषाणु बाधित रुग्णांची सद्यस्थिती व त्यावरील उपाय योजना या बाबत प्रस्ताव सादर करीत आहेत की, सन 2021-22 या आर्थिक वर्षात आरोग्य विभागाअंतर्गत कोव्हिड-19 प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्यासाठी औरंगाबाद स्मार्ट सिटी डेव्हल्पमेंट कार्पोरेशन लि.औरंगाबाद तर्फे कोव्हिड रुग्ण, डॉक्टर व इतर यांच्या वाहतुकी करीता दि.15.03.2021 ते 07.06.2021 पर्यंतच्या कालावधीची देयके एकुण रु.75,34,320/- (अक्षरी पंच्चाहत्तर लक्ष चौतीस हजार तीनशे वीस रुपये फक्त) + सन 2020-2021 च्या देयकापोटी शिल्लक असलेली र.रु.8,26,662/- असा एकूण रु.83,60,982/- (अक्षरी त्र्याऐंशी लक्ष साठ हजार नऊशे ब्याऐंशी रुपये फक्त) एवढा खर्च झालेला आहे. दि.15.03.2021 ते 07.06.2021 पर्यंत पुरवलेल्या बसेसची देयके यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कालावधी | | तपशील | | |
|---|---|---|---|---|---|
| | पासून | पर्यंत | भाडे | जीएसटी | एकूण |
| 1. | 15.03.2021 | 31.03.2021 | 9,94,386/- | 1,78,990/- | 11,73,376/- |
| 2. | 01.04.2020 | 15.04.2021 | 12,73,489/- | 2,29,224/- | 15,02,713/- |
| 3. | 16.04.2021 | 30.04.2021 | 12,44,225/- | 2,23,964/- | 14,68,189/- |
| 4. | 01.05.2021 | 14.05.2021 | 11,85,303/- | 2,13,348/- | 13,98,651/- |
| 5. | 16.05.2021 | 31.05.2021 | 11,98,894/- | 2,15,802/- | 14,14,696/- |
| 6. | 01.06.2021 | 07.06.2021 | 4,88,725/- | 87,970/- | 5,76,615/- |
| | | **एकुण** | **63,85,022/-** | **11,49,298/-** | **75,34,320/-** |
| **सन 2020-21 देयकातील शिल्लक रक्कम** | | | **---** | **---** | **8,26,662/-** |
| | | | | **एकुण देय रक्कम रुपये** | **83,60,982/-** |

स्मार्ट शहर बस ही रा.प.महामंडळ व ए.एस.डी.सी.एल.च्या संयुक्त विद्यमाने सुरु केली असून सद्यस्थितीमध्ये स्मार्ट शहर बस रा.प.महामंडळास रु.62/- प्रति कि.मी.प्रमाणे रक्कम अदा करत आहे.

एकुण रु.83,60,982/- (अक्षरी त्र्याऐंशी कार्यालयाकडे एस.डी.आर.एफ.अंतर्गत निधीची मागणी करणे बाबत, निधी प्राप्त झाल्यानंतर ए.एस.डी.सी.एल.(स्मार्ट सिटी) यांना एकुण रु.83,60,982/- (अक्षरी त्र्याऐंशी लक्ष साठ हजार नऊशे ब्याऐंशी रुपये फक्त) अदा करणे बाबत व झालेल्या खर्चास मा.सर्वसाधारण सभेच्या कार्योत्तर मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**<u>ठराव क्रमांक 341/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन 2020-2021 या आर्थिक वर्षी कोव्हीड-19 प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्यासाठी आरोग्य विभागाअंतर्गत औरंगाबाद स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन लि.औरंगाबाद तर्फे कोव्हिड रुग्ण, डॉक्टर व इतर यांच्या वाहतुकीकरीता दि.15.03.2021 ते 07.06.2021 पर्यंतच्या कालावधीची देयक एकुण रु.83,60,982/-(अक्षरी त्र्याऐंशी लक्ष साठ हजार नऊशे ब्याऐंशी रुपये फक्त) अदा करावयाचे आहे.

स्मार्ट सिटी बस ही रा.प.महामंडळ व एएसडीसीएल च्या संयुक्त विद्यमाने सुरु केली असून सद्यस्थिती मध्ये स्मार्ट शहर बस रा.प.महामंडळास रु.62/-प्रती कि.मी.प्रमाणे रक्कम अदा करत आहे.

एकुण रु.83,60,982/-(अक्षरी त्र्यांऐशी लक्ष साठ हजार नऊशे ब्याऐंशी रुपये फक्त) खर्च झालेला असून सदर खर्चासाठी मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडे एस.डी.आर.एफ.अंतर्गत निधीची मागणी करणे बाबत, निधी प्राप्त झाल्यानंतर ए.एस.डी.सी.एल.(स्मार्ट सिटी) यांना एकुण रु.83,60,982/- (अक्षरी त्र्याऐंशी लक्ष साठ हजार नऊशे ब्याऐंशी रुपये फक्त) अदा करणे व झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 342/2022:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.18.04.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळ (CPCB) व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने (MPCB) औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील हवेची गुणवत्ता सुधारणे व उपाय योजना करणेस सन 2020-2021 या आर्थिक वर्षात रु.32.00 कोटी निधी वितरीत केला आहे. सदरील योजनेची अंमलबावणी विहित मुदतीत करण्यासाठी मा.अतिरीक्त आयुक्त महोदय यांच्या अध्यक्षतेखाली दि.09.03.2019 रोजी City Level Committee स्थापन होऊन त्यास मा.प्रशासक महोदयांची मान्यता झाली आहे. या कमिटी सोबतच Air Quality Management Cell ची देखील स्थापना झाली आहे.

या प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यासाठी नऊ सदस्यांची शहर कृती आराखडा (City Level Commitee) या कमिटीमध्ये डॉ. गितांजली कौशीक यांना समिती सदस्य व प्रकल्प व सल्लागार म्हणुन मान्यता झाली आहे. शहरातील हवेची गुणवत्ता सुधारणेसाठी या योजने अंतर्गत शहरात नवीन रस्ता दुभाजके तयार करून त्यात पर्यावरण पुरक झाडे लावणे, शहरात व्हर्टिकल गार्डनची उभारणी करणे, बंद अवस्थेतील जुन्या कारंजाचे नुतनीकरण करुन मुख्य चौकात नवीन कारंजाची उभारणी करणे, इ.कामे नियोजनानुसार विहित मुदतीत करणे आवश्यक आहे.

राष्ट्रीय शुध्द हवा कार्यक्रम (NCAP) या योजनेसाठी महाराष्ट्रातील व इतर राज्यातील अनेक ठिकाणी प्रकल्प सल्लागार डॉ.गितांजली कौशीक या योजनेचे काम पाहत आहेत. या प्रकल्पातील अंमलबजावणी करण्यासाठी सर्व विभागाशी समन्वय साधुन सर्व आवश्यक माहिती घेऊन केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळ (CPCB) कार्यालयाच्या विहित नमुन्यानुसार शहर कृती आराखडा (City Action Plan) व सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करुन त्यास सदरील कार्यालयाकडून शासन मंजुरी आणणे, योजेनेची कामे पुर्ण होईपर्यंत सदरील कार्यालयास वेळोवेळी लागणारी माहिती तयार करून देणे, कामात वेळोवेळी मार्गदर्शन करुन Utilization Certificate व इतर योजनेच्या प्रगती पथावरील प्रकल्पांशी अनुषंगीक कामे एकूण मंजुर प्रकल्प करण्यास एकूण र.रु.32.00 कोटीच्या 0.25% दराने मानधन या प्रकल्पाच्या स्वतंत्र खात्यातून अदा करता येईल.

करीता, प्रकल्प सल्लागार डॉ.गितांजली कौशीक यांची या कामे उक्त नमुद नुसार नियुक्ती करून करारनामा करुन घेणेस्तव प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 342/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहर कृती आराखडा (City Level Commitee) सदस्या व समितीने दिलेल्या मान्यतेनुसार डॉ.गितांजली कौशीक यांना एकूण प्रकल्प रक्कमेच्या म्हणजे रु.32.00 कोटी रक्कमेच्या 0.25 टक्के दराने प्राप्त निधीच्या स्वतंत्र खात्यातून मानधन म्हणुन करारनाम्यानुसार अदा करण्यास मान्यता देण्यात येते.

सदरील कामी त्यांनी केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळ (CPCB) कार्यालयाच्या विहित नमुन्यात शहर कृती आराखडा (City Action Plan) मंजुर करुन आणणे व प्रकल्पातील नियोजनानुसार सदरील कार्यालयास वेळोवेळी लागणारी माहिती तयार करणे व प्रकल्पातील नियोजनानुसार व कामाच्या प्रगतीनुसार प्रकल्प अंमलबजावणीसाठी स्थळावर वेळोवेळी मार्गदर्शन करणे ही कामे पुर्ण करणे आवश्यक आहेत. कामांच्या अनुषंगाने योग्य निर्णय घेणे त्यात बदल करणे यासाठीचे सर्व अधिकार मा.आयुक्त औरंगाबाद महानगरपालिका यांना प्रदान करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 343/2022:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.18.04.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो कि, १५ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनूसार औरंगाबाद महानगरपालिकेचा समावेश Million Pluse Cities मध्ये असल्याने सन २०२०-२१ या आर्थिक वर्षातील वातावरणातील हवेची गुणवत्ता (Air Quality) सुधारणेसाठी रु.३२ कोटी इतका निधी प्राप्त झाला आहे. या अनूषंगाने उद्यान विभागाशी संबंधीत राष्ट्रीय शुध्द हवा कार्यक्रमांतर्गत विविध ठिकाणी व्हर्टिकल गार्डनची उभारणी करणे प्रस्तावीत आहे.

सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात राष्ट्रीय शुध्द हवा कार्यक्रमांतर्गत विविध ठिकाणी व्हर्टिकल गार्डनची उभारणी करणे या कामासाठी असलेल्या शासन निधीतून लेखा विभागाने सां.बा.खात्याची राज्य दरसुची सन २०२०-२०२१ नूसार या प्रस्तावास तरतुद उपलब्ध करुन दिली आहे. या सर्व समाविष्ट उपांगासह कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु.९९,९५,८१६/- चे तयार करण्यात आले असून या कामाची ई-निविदा काढण्यात आली. निविदा उघडल्यानंतर सर्वात कमी निविदाधारक श्री.सिद्दीकी जलीसउद्दीन मोईनोद्दीन यांची निविदा अं.प.दरापेक्षा १९.८९ टक्के कमी दराची आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

संदर्भ : टेंडर Tender Id. 2021_AMCA__747839__1

| | | |
|---|---|---|
| १. | खात्याचे नाव | कार्यकारी अभियंता, इमारती व उद्याने |
| २. | कामाचे स्वरुप | राष्ट्रीय शुध्द हवा कार्यक्रमांतर्गत विविध ठिकाणी व्हर्टिकल गार्डन उभारणी करणे बाबत. |
| ३. | पुर्वगणकपत्रक मान्य झाले आहे काय ? असल्यास किती रक्कमेचे ? मान्यतेचा ठराव ? | सदरील प्रस्तावास तांत्रीक व प्रशासकिय मान्यता प्राप्त आहे. |
| | अ) त्यापैकी किती रक्कमेचे टेंडर्स मागविण्यात आले | रु. ८४,९९,८४४/- |
| ४. | ज्या वृतपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | १.दैनिक सकाळ -०३/०१/२०२२,<br>२.दै.भास्कर -०१/०१/२०२२,<br>३.दै.पुण्यनगरी -०१/०१/२०२२,<br>४.The Tribune -०३/०१/२०२२ |
| ५. | अ) टेंडर्स स्विकारण्याची दिनांक | १६.१२.२०२१ |
| | ब) टेंडर्स उघडण्याचा दिनांक | १९.०१.२०२२ |
| ६. | एकुण किती टेंडर्स आले ? | ४ (चार) |

(त्यापैकी पात्र टेंडरदाराची माहिती खालील प्रमाणे )

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | **सिद्दीकी जलीसउद्दीन मोईनोद्दीन** | रु. ८४,९९,८४४/- | **अं.प.दरापेक्षा १९.८९ % कमी दराने** |

| | | |
|---|---|---|
| २ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय ? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय ? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय ? | नाही |
| ३. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे ? ते शिर्षक नमूद करावे | १५ व्या वित्त आयोगातील प्राप्त शासन निधी नूसार |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय ? | केंद्र शासनाकडुन या योजनेसाठी औरंगाबाद महानगरपालिकेस निधी प्राप्त झाला आहे, लेखा विभागाने या योजनेचे स्वतंत्र खाते उघडले आहे. |
| 4. | सदरचे काम डिपॉझिट मधून करण्यात येणार आहे का ? | नाही |

| | | |
|---|---|---|
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा केली आहे काय (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | लागू नाही |
| 5. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषयपत्राचा नमूना जोडला आहे? | लागू नाही |
| या विषयांकित कामासाठी ठेकेदार **श्री.सिद्दीकी जलीसउद्दीन मोईनोद्दीन** यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकिय दरापेक्षा **१९.८९ टक्के कमी** दराने करुन घेणेस्तव व करार करण्यास मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत प्रस्ताव सादर | | |

**ठराव क्रमांक 343/2022:-**

प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे राष्ट्रीय शुध्द हवा कार्यक्रमांतर्गत विविध ठिकाणी व्हर्टिकल गार्डन उभारणी करणेसाठी श्री.सिद्दीकी जलीसउद्दीन मोईनोद्दीन यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकिय दरापेक्षा **१९.८९ टक्के कमी** दराने करुन घेण्यास मान्यता देण्यात येते वैधानीक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 344/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.18.04.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो कि, १५ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनूसार औरंगाबाद महानगरपालिकेचा समावेश Million Pluse Cities मध्ये असल्याने सन २०२०-२१ या आर्थिक वर्षातील वातावरणातील हवेची गुणवत्ता (Air Quality) सुधारणेसाठी रु.३२ कोटी इतका निधी प्राप्त झाला आहे. या अनूषंगाने उद्यान विभागाशी संबंधीत मनपाच्या प्रमुख उद्यानातील कारंजांचे नुतनीकरण करुन तीन वर्ष देखभाल दुरुस्ती करणे प्रस्तावीत आहेत.

सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षात राष्ट्रीय शुध्द हवा कार्यक्रमांतर्गत मनपाच्या प्रमुख उद्यानातील कारंजांचे नुतनीकरण करुन तीन वर्ष देखभाल दुरुस्ती करणे या कामासाठी असलेल्या शासन निधीतून लेखा विभागाने सां.बा.खात्याची दरसुची सन २०२०-२०२१ नूसार या प्रस्तावास तरतुद उपलब्ध करुन दिली आहे. या सर्व समाविष्ट उपांगासह कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु.१,९९,६२,६२५/- चे तयार करण्यात आले असून या कामाची ई-निविदा काढण्यात आली. निविदा उघडल्यानंतर सर्वात कमी निविदाधारक श्री.मुबारक पठाण यांची निविदा अं.प.दरापेक्षा ०७.२१ टक्के कमी दराची आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

संदर्भ : टेंडर Tender Id. 2021_AMCA__747815__1

| | | |
|---|---|---|
| १. | खात्याचे नाव | कार्यकारी अभियंता, इमारती व उद्याने |
| २. | कामाचे स्वरुप | राष्ट्रीय शुध्द हवा कार्यक्रमांतर्गत मनपाच्या प्रमुख उद्यानातील कारंजांचे नुतनीकरण करुन तीन वर्ष देखभाल दुरुस्ती करणे |
| ३. | पुर्वगणकपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रक्कमेचे ? मान्यतेचा ठराव? | सदरील प्रस्तावास तांत्रीक व प्रशासकिय मान्यता प्राप्त आहे. |
| | अ) त्यापैकी किती रक्कमेचे टेंडर्स मागविण्यात आले | रु.१,८८,४७,८४४/- |
| ४. | ज्या वृतपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | १.दैनिक सामना - ०३/०१/२०२२,<br>२. Lokmat Times - ०३/०१/२०२२ |
| ५. | अ) टेंडर्स स्विकारण्याची दिनांक | १६.१२.२०२१ |
| | ब) टेंडर्स उघडण्याचा दिनांक | १२.०१.२०२२ |
| ६. | एकुण किती टेंडर्स आले? | ३ (तीन) |

(त्यापैकी पात्र टेंडरदाराची माहिती खालील प्रमाणे )

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | **श्री.मुबारक पठाण** | रु.१,८८,४७,८४४/- | **अं.प.दरापेक्षा ०७.२१ % कमी दराने** |

| | | |
|---|---|---|
| २ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय ? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय ? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय ? | नाही |
| ३. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे ? ते शिर्षक नमूद करावे | १५ व्या वित्त आयोगातील प्राप्त शासन निधी नूसार |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय ? | केंद्रशासनाच्या या योजनेसाठी औरंगबाद महानगरपालिकेस निधी प्राप्त झाला आहे, लेखा विभागाने या योजनेचे स्वतंत्र खाते उघडले आहे. |
| 4. | सदरचे काम डिपॉझिट मधून करण्यात येणार आहे का ? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा केली आहे काय (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | लागू नाही |
| 5. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषयपत्राचा नमूना जोडला आहे ? | लागू नाही |
| | या विषयांकित कामासाठी ठेकेदार **श्री.मुबारक पठाण** यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकिय दरापेक्षा **०७.२१ टक्के कमी** दराने करुन घेणेस्तव व करार करण्यास मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत प्रस्ताव सादर | |

**ठराव क्रमांक 344/2022:-**

प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे राष्ट्रीय शुध्द हवा कार्यक्रमांतर्गत मनपाच्या प्रमुख उद्यानातील कारंजांचे नुतनीकरण करुन तीन वर्ष देखभाल दुरुस्ती करणेसाठी श्री.मुबारक पठाण यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकिय दरापेक्षा **०७.२१ टक्के कमी** दराने करुन घेण्यास मान्यता देण्यात येते वैधानीक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 345/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.18.04.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो कि, १५ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनूसार औरंगाबाद महानगरपालिकेचा समावेश Million Pluse Cities मध्ये असल्याने सन २०२०-२१ या आर्थिक वर्षातील वातावरणातील हवेची गुणवत्ता (Air Quality) सुधारणेसाठी रु.३२ कोटी इतका निधी प्राप्त झाला आहे. या अनूषंगाने उद्यान विभागाशी संबंधीत राष्ट्रीय शुध्द हवा कार्यक्रमांतर्गत शहरातील मुख्य चौकात कारंजांची उभारणी करुन तीन वर्ष देखभाल दुरुस्ती करणे बाबत करणे प्रस्तावीत आहेत.

सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षात राष्ट्रीय शुध्द हवा कार्यक्रमांतर्गत मनपाच्या प्रमुख उद्यानातील कारंजांचे नुतनीकरण करुन तीन वर्ष देखभाल दुरुस्ती करणे या कामासाठी असलेल्या शासन निधीतून लेखा विभागाने सां.बा.खात्याची दरसुची सन २०२०-२०२१ नूसार या प्रस्तावास तरतुद उपलब्ध करुन दिली आहे. या सर्व समाविष्ट उपांगासह कामाचे अंदाजपत्रक रक्कम

रु.२,९९,९९,०००/- चे तयार करण्यात आले असून या कामाची ई-निविदा काढण्यात आली. निविदा उघडल्यानंतर सर्वात कमी निविदाधारक श्री.मुबारक पठाण यांची निविदा अं.प.दरापेक्षा १५.१६ टक्के कमी दराची आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

संदर्भ : टेंडर Tender Id. 2021_AMCA__751619_1

| | | |
|---|---|---|
| १. | खात्याचे नाव | कार्यकारी अभियंता, इमारती व उद्याने |
| २. | कामाचे स्वरुप | राष्ट्रीय शुध्द हवा कार्यक्रमांतर्गत शहरातील मुख्य चौकात कारंजांची उभारणी करुन तीन वर्ष देखभाल दुरुस्ती करणे बाबत |
| ३. | पुर्वगणकपत्रक मान्य झाले आहे काय ? असल्यास किती रक्कमेचे? मान्यतेचा ठराव? | सदरील प्रस्तावास तांत्रीक व प्रशासकिय मान्यता प्राप्त आहे. |
| | अ) त्यापैकी किती रक्कमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | रु.२,२४,८०,६००/- |
| ४. | ज्या वृतपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | १. दैनिक वृत्त टाईम्स - ०३/०१/२०२२,<br>२. दैनिक प्रसार — ०३/०१/२०२२<br>३. दैनिक दिव्य मराठी - ०१/०१/२०२२<br>४. दैनिक आज का आनंद - ०३/०१/२०२२<br>५. The New Indian Express - ०३/०१/२०२२ |
| ५. | अ) टेंडर्स स्विकारण्याची दिनांक | २८.१२.२०२१ |
| | ब) टेंडर्स उघडण्याचा दिनांक | २४.०१.२०२२ |
| ६. | एकुण किती टेंडर्स आले ? | २ (दोन) |

(त्यापैकी पात्र टेंडरदाराची माहिती खालील प्रमाणे )

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | **श्री.मुबारक पठाण** | रु.२,२४,८०,६००/- | **अं.प.दरापेक्षा १५.१६ % कमी दराने** |

| | | |
|---|---|---|
| २ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| ३. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे | १५ व्या वित्त आयोगातील प्राप्त शासन निधी नूसार |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | केंद्रशासनाच्या या योजनेसाठी औरंगबाद महानगरपालिकेस निधी प्राप्त झाला आहे, लेखा विभागाने या योजनेचे स्वतंत्र खाते उघडले आहे. |
| ४. | सदरचे काम डिपॉझिट मधून करण्यात येणार आहे का ? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या | लागू नाही |

| | | |
|---|---|---|
| | कार्यालयात जमा केली आहे काय (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | |
| ५. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषयपत्राचा नमूना जोडला आहे? | लागू नाही |
| या विषयांकित कामासाठी ठेकेदार **श्री.मुबारक पठाण** यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकिय दरापेक्षा **१५.१६ टक्के कमी** दराने करुन घेणेस्तव व करार करण्यास मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत प्रस्ताव सादर. | | |

**ठराव क्रमांक 345/2022:-**

प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे राष्ट्रीय शुध्द हवा कार्यक्रमांतर्गत शहरातील मुख्य चौकात कारंजांची उभारणी करुन तीन वर्ष देखभाल दुरुस्ती करणेसाठी श्री.मुबारक पठाण यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकिय दरापेक्षा **१५.१६ टक्के कमी** दराने करुन घेण्यास मान्यता देण्यात येते वैधानीक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 346/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.19.04.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन 2020-21 साठी झोन निहाय वॉर्ड अभियंता यांचे नियंत्रणा खाली नाले साफसफाई करण्यात आलेली आहे. झोन क्र.1 अंतर्गत असलेल्या नाले साफसफाईसाठी वॉर्ड अभियंता, झोन क्र.1यांच्या मागणीनुसार खाजगी मशिनरी व वाहने किरायाने घेणेसाठी र.रु.22,53,644.00 एवढ्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करुन सर्व प्रशासकीय मान्यतेअंती नाले तसेच यंत्रसामुग्री पुरवठा कामी निविदा प्रक्रिया पार पाडून न्युनतम दराची निविदा मे.न्यु साधना इंजिनिअरींग वर्क्स, औरंगाबाद यांना नाले साफसफाईच्या कामासाठी यंत्रसामुग्री पुरविणे कामाचे कार्यादेश पारीत करण्यात आले.

नाले साफसफाईचे काम करीत असतांना वॉर्ड अभियंता, झोन क्र.1 यांचे वाढीव कामाच्या मागणी प्रमाणे नाले साफसफाईचे आवश्यक कामी मशिनरी व वाहने पुरविण्यात आली, यास्तव अंदाजपत्रकीय र.रु.22,53,644.00 ऐवजी प्रत्यक्षात रु.35,54,662.00 म्हणजेच अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा रु.13,01,018.00 एवढ्या रक्कमेचा जास्तीचा खर्च झालेला आहे. या संदर्भात झालेल्या वाढीव खर्चाबाबत वॉर्ड अभियंता, झोन क्र.1 यांनी लेखी अभिप्राय संचिकेत नमुद केलेला आहे.

करीता, वॉर्ड क्र.1 अंतर्गत नाले साफसफाईसाठी अंदाजपत्रकीय र.रु.22,53,644.00 सह अतिरीक्त वाढीव खर्च र.रु.13,01,018.00 असे एकूण र.रु.35,54,662.00 खर्चाचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या कार्यात्तर मान्यतेस्व सादर.

**ठराव क्रमांक 346/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन 2020-2021 मध्ये झोन क्र.1 अंतर्गत नाले साफसफाई साठी अंदाजपत्रकीय र.रु.22,53,644.00 सह अतिरीक्त वाढीव खर्च र.रु.13,01,018.00 असे एकूण र.रु.35,54,662.00 रक्कमेच्या खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 347/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.19.04.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन 2020-21 साठी झोन निहाय वॉर्ड अभियंता यांचे नियंत्रणा खाली नाले साफसफाई करण्यात आलेली आहे. झोन क्र.8 अंतर्गतअसलेल्या नाले साफ-सफाईसाठी वॉर्ड अभियंता, झोन क्र.8 यांच्या मागणीनुसार खाजगी मशिनरी व वाहने किरायाने घेणेसाठी र.रु.22,23,216.00 एवढ्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करुन सर्व प्रशासकीय मान्यतेअंती नाले तसेच यंत्रसामुग्री पुरवठा कामी निविदा प्रक्रिया पार पाडून न्युनतम दराची निविदा मे.न्यु साधना इंजिनिअरींग वर्क्स, औरंगाबाद यांना नाले साफसफाईच्या कामासाठी यंत्रसामुग्री पुरविणे कामाचे कार्यादेश पारीत करण्यात आले.

नाले साफसफाईचे काम करीत असतांना वॉर्ड अभियंता, झोन क्र.8 यांचे वाढीव कामाच्या मागणी प्रमाणे नाले साफसफाईचे आवश्यक कामी मशिनरी व वाहने पुरविण्यात आली, यास्तव अंदाजपत्रकीय र.रु.22,23,216.00 ऐवजी प्रत्यक्षात रु.28,18,194.00 म्हणजेच अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा रु.5,94,978.00 एवढ्या रक्कमेचा जास्तीचा खर्च झालेला आहे. या संदर्भात झालेल्या वाढीव खर्चाबाबत वॉर्ड अभियंता, झोन क्र.8 यांनी लेखी अभिप्राय संचिकेत नमुद केलेला आहे.

करीता, वॉर्ड क्र.8 अंतर्गत नाले साफसफाईसाठी अंदाजपत्रकीय र.रु.22,23,216.00 सह अतिरीक्त वाढीव खर्च र.रु.5,94,978.00 असे एकूण र.रु.28,18,194.00 च्या खर्चाचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या कार्यात्तर मान्यतेस्व सादर.

**ठराव क्रमांक 347/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन 2020-2021 मध्ये झोन क्र.8 अंतर्गत नाले साफसफाई साठी अंदाजपत्रकीय र.रु.22,23,216.00 सह अतिरीक्त वाढीव र.रु.5,94,978.00 असे एकूण र.रु.28,18,194.00 रक्कमेच्या खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 348/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.19.04.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन 2020-21 साठी झोन निहाय वॉर्ड अभियंता यांचे नियंत्रणा खाली नाले साफसफाई करण्यात आलेली आहे. झोन क्र.2 अंतर्गत असलेल्या नाले साफसफाईसाठी वॉर्ड अभियंता, झोन क्र.2 यांच्या मागणीनुसार खाजगी मशिनरी व वाहने किरायाने घेणेसाठी र.रु.23,01,048.00 एवढ्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करुन सर्व प्रशासकीय मान्यतेअंती नाले तसेच यंत्रसामुग्री पुरवठा कामी निविदा प्रक्रिया पार पाडून न्युनतम दराची निविदा मे.न्यु साधना इंजिनिअरींग वर्क्स, औरंगाबाद यांना नाले साफसफाईच्या कामासाठी यंत्रसामुग्री पुरविणे कामाचे कार्यादेश पारीत करण्यात आले.

नाले साफसफाईचे काम करीत असतांना वॉर्ड अभियंता, झोन क्र.2 यांचे वाढीव कामाच्या मागणी प्रमाणे नाले साफसफाईचे आवश्यक कामी मशिनरी व वाहने पुरविण्यात आली, यास्तव अंदाजपत्रकीय र.रु.23,01,048.00 ऐवजी प्रत्यक्षात रु.26,48,697.00 म्हणजेच अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा रु.3,47,649.00 एवढ्या रक्कमेचा जास्तीचा खर्च झालेला आहे. या संदर्भात झालेल्या वाढीव खर्चाबाबत वॉर्ड अभियंता, झोन क्र.2 यांनी लेखी अभिप्राय संचिकेत नमुद केलेला आहे.

करीता, वॉर्ड क्र.2 अंतर्गत नाले साफसफाईसाठी अंदाजपत्रकीय र.रु.23,01,048.00 सह अतिरीक्त वाढीव खर्च रु.3,47,649.00 असे एकूण रु.26,48,697.00 खर्चाचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या कार्यात्तर मान्यतेस्व सादर.

**ठराव क्रमांक 348/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन 2020-2021 मध्ये झोन क्र.2 अंतर्गत नाले साफसफाई साठी अंदाजपत्रकीय र.रु.23,01,048.00 सह अतिरीक्त वाढीव खर्च रु.3,47,649.00 असे एकूण रु.26,48,697.00 रक्कमेच्या खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 349/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.19.04.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 76 नुसार पडेगाव येथील श्री.हिरालाल वाणी यांची इमारत/खोली ज्याचे क्षेत्रफळ 18.58 चौ.मी. एवढ्या क्षेत्राची जागा महानगरपालिकेचा मालमत्ता कर वसुली केंद्रासाठी धारण करीत आहे. या जागेचे भाडे सिध्दशिघ्र गणकाप्रमाणे प्रती माह रु.5300/- प्रमाणे वार्षिक भाडे रु.63,600/- प्रमाणे वाटाघाटी नुसार निश्चित करण्यात आलेले आहे. त्यासाठी संबंधीताने सहमती दर्शविलेली असल्याने, वार्षिक भाडे रु.63,600/- आकारणी करुन सदर ठिकाणचे मालमत्ता कर इमारत मालकाने भरणा करणे आणि वसुली केंद्राच्या वापराचा विद्युत देयाकाचा खर्च महानगरपालिका करण्यासाठीच्या अटीस अधिन राहून जागा भाडेतत्वावर घेणेसाठीचा प्रशासकीय प्रस्ताव मान्यतेस्तव तथा मंजुरीस्तव सविनय सादर.

**ठराव क्रमांक 349/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 76 नुसार पडेगाव येथील श्री.हिरालाल वाणी यांची इमारत/खोली ज्याचे क्षेत्रफळ 18.58 चौ.मी. एवढ्या क्षेत्राची जागा महानगरपालिकेचा मालमत्ता कर वसुली केंद्रासाठी धारण करीत आहे. या जागेचे भाडे सिध्दशिघ्र गणकाप्रमाणे प्रती माह रु.5300/- प्रमाणे वार्षिक भाडे रु.63,600/- प्रमाणे वाटाघाटी नुसार निश्चित करण्यात आलेले आहे. त्यासाठी संबंधीताने सहमती दर्शविलेली असल्याने, वार्षिक भाडे रु.63,600/- आकारणी करुन सदर ठिकाणचे मालमत्ता कर इमारत मालकाने भरणा करणे आणि वसुली केंद्राच्या वापराचा विद्युत देयकाचा खर्च महानगरपालिका करण्यासाठीच्या अटीस अधिन राहून जागा भाडेतत्वावर घेणेसाठी मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 350/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.19.04.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, नवीन वाहने खरेदी या लेखाशिर्षातून महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना कार्यालयीन कामी वापरासाठी 02 नग Tata Tigor EV XZ+ ई-कार खरेदी करण्यासाठी टाटा

कंपनीचे शहरातील अधिकृत वितरक मे.सतिष मोटर्स प्रा.लि.यांच्याकडून प्रोफॉर्मा इन्वाईस मागविण्यात आले असता, खालीलप्रमाणे दर प्राप्त झालेले आहेत.

| **Sr.No.** | **Model** | **Qty** | **Rate** | **Amount** |
|---|---|---|---|---|
| 1. | Tata Tigor EV XZ+ (Ex Showroom Price) | 02 | 13,09,000/- | 26,18,000.00 |
| 2. | TCS % | 02 | 13,240/- | 26,480.00 |
| | | | **Total** | **26,44,480.00** |

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2021/613 दि.19.04.2021 अन्वये "औरंगाबाद महानगरपालिका सिध्दार्थ उद्यान प्राणी संग्रहालयातील वन्य प्राण्यांची निगा/देखभाल व औषधोपचार करण्यासाठी सल्लागार म्हणुन काम करणे" या विवक्षित कामाकरीता डॉ.भागवत सोपानराव नाईकवाडे, पशुसंवर्धन अधिकारी (सेवानिवृत्त) यांची सेवा विहित अटी वशर्तीच्या अधिन राहून प्रथ्मत: 06 महिन्यांच्या कालावधीकरीता करार पध्दतीने सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना दरमहा सेवानिवृत्तीपुर्वी मिळेत असलेल्या एकूण वेतनातून (मुळ वेतन व महागाई भत्ता धरुन) त्यांन आता मिळत असलेले एकूण निवृत्तीवेतन (महागाई भत्ता आणि अंशराशीकृत निवृत्ती वेतनासह) वजा केल्यानंतर होणारी रक्कम त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणुन निश्चित करण्यात येईल. परंतु या पारिश्रमिक रक्कमेची कमाल मासिक मर्यादा रु.40,000/- (रुपये चाळीस हजार फक्त) इतक्या मर्यादेत राहील या अटीवर घेण्यात आलेली आहे.

तथापि, दि.19.04.2021 रोजीच्या आदेशानुसार सदरची मुदत ही दि.18.10.2021 रोजी संपल्याने विभाग प्रमुख तथा उपआयुक्त यांनी संबंधीतांची उक्त कामासाठी आवश्यकता असल्याने त्यांना 06 महिन्यांची मुदतवाढ मिळण्यासाठी अभिप्राय दिलेला होता. त्यानुसार प्रशासकीय ठराव क्र.217 दि.16.11.2021 नुसार संबंधीतास कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2021/1514 दि.22.11.2021 अन्वये 02 दिवसांचा तांत्रिक खंड देऊन दि.22.10.2021 ते दि.21.04.2022 या कालावधीसाठी कार्यालयीन आदेश दि.19.04.2021 रोजीच्या आदेशात नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहून मुदतवाढ देण्यात आलेली होती.

तथापि, कार्यालयीन आदेश दि.22.11.2021 ची मुदत दि.21.04.2022 रोजी संपत असल्याने विभाग प्रमुख तथा उपआयुक्त यांनी संबंधीतांची उक्त कामासाठी आवश्यकता असल्याने त्यांना 06 महिन्याची मुदतवाढ मिळण्यासाठी अभिप्राय दिलेला आहे.

करीता, डॉ.भागवत सोपानराव नाईकवाडे, मुख्य पशुसंवर्धन अधिकारी तथा संचालक, प्राणी संग्रहालय (सेवानिवृत्त) यांना दोन दिवसांचा तांत्रिक खंड देऊन दि.25.04.2022 पासून सहा महिन्यांच्या कालावधीसाठी दि.19.04.2021 च्या आदेशात नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहून मुदतवाढ देण्याबाबत प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 371/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, डॉ.भागवत सोपानराव नाईकवाडे, पशुसंवर्धन अधिकारी तथा संचालक, प्राणी संग्रहालय (सेवानिवृत्त) यांची औरंगाबाद महानगरपालिका सिध्दार्थ उद्यान प्राणी संग्रहालयातील वन्य प्राण्यांची निगा/देखभाल व औषधोपचार करण्यासाठी सल्लागार म्हणुन काम करणे" या विवक्षित कामाकरीता कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/ आस्था-1/2021/1514 दि.22.11.2021 ची मुदतवाढ दि.21.05.2022 रोजी संपत असल्याने विभाग प्रमुख तथा उपआयुक्त यांनी संबंधीतांची उक्त कामासाठी आवश्यकता असल्याने त्यांना 06 महिन्याची मुदतवाढ मिळण्यासाठी अभिप्राय दिलेला आहे.

करीता, डॉ.भागवत सोपानराव नाईकवाडे, मुख्य पशुसंवर्धन अधिकारी तथा संचालक, प्राणी संग्रहालय (सेवानिवृत्त) यांना दोन दिवसांचा तांत्रिक खंड देऊन दि.25.04.2022 पासून सहा महिन्यांच्या कालावधीसाठी दि.19.04.2021 च्या आदेशात नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहून मुदतवाढ देण्याबाबतच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 372/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.11.05.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका आणि स्मार्ट सिटी विभागामार्फत शहराचे ड्रोन सर्व्हे करण्यात आला आहे. याद्वारे शहरातील सर्व इमारतींची GIS MAPPING करण्यात आले आहे. तसे याच प्रकल्पाअंतर्गत सर्वेक्षकांद्वारे प्रत्येक घरी जाऊन सर्वेक्षण करण्यात येत असून विहित नमुन्यात मालमत्ता कराची व पाणीपट्टीची माहिती संकलनाची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे. प्राप्त माहितीनुसार व आवश्यकतेनुसार प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन पुढील कार्यवाही करणे आवश्यक आहे.

त्यानुषंगाने प्रशासकीय ठराव क्र.298/2022 दि.16.02.2022 अन्वये कर विषयक बाबींमध्ये कामकाज करण्याचा अनुभव असणाऱ्या सेवानिवृत्त असलेल्या अधिकाऱ्यांची नेमणुक करण्यासाठी व निवड प्रक्रिया राबविण्यासाठी समिती गठीत करण्याबाबत ठराव पारीत करण्यात आला. त्यानुसार मालमत्ता कर आकारणी/पाणीपट्टी कर विषयक कामाकरिता सहाय्यक म्हणुन सेवानिवृत्त अधिकाऱ्याची सेवा करार पध्दतीने

नियुक्ती करण्यासाठी जाहिरात देऊन दि.11.03.2022 रोजी पात्र अधिकाऱ्यांना लेखी अर्जासह मुलाखतीसाठी बोलाविण्यात आले होते.

सदर मुलाखतीच्या वेळी एकुण 14 अधिकारी उपस्थित होते. त्यापैकी श्री.गणपत व्यंकटराव जाधव, उपआयुक्त (सेवानिवृत्त) महानगरपालिका परभणी यांना महानगरपालिकेमध्ये उक्त कामाचा प्रत्यक्ष अनुभव असल्याचे कागदपत्रे सादर केले. त्यामुळे संबंधीताच्या सेवेचा लाभ या कार्यालयास होऊ शकतो. तसेच उर्वरित अधिकारी हे अटी व शर्तीनुसार अपात्र ठरल्याबाबत गठीत केलेल्या समितीने ठरवले.

करीता, पाणीपट्टी कर निर्धारण अंतिम करण्यासाठी झोन अधिकारी यांना सहाय्य करणे या विवक्षित कामासाठी सहाय्यक म्हणुन श्री.गणपत व्यंकटराव जाधव, उपआयुक्त (सेवानिवृत्त) महानगरपालिका परभणी यांची सेवा विहित अटी व शर्तीच्या अधिन राहून प्रथमत:06 महिन्याच्या कालावधी करीता करार पध्दतीने सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना दरमहा सेवानिवृत्तीपुर्वी मिळत असलेल्या एकूण वेतनातून (मुळ वेतन व महागाई भत्ता धरुन) त्यांना आता मिळत असलेले एकूण निवृत्तीवेतन (महागाई भत्ता आणि अंशराशीकृत निवृत्तीवेतनासह) वजा केल्यानंतर होणारी रक्कम त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणुन निश्चित करण्यात येईल. परंतु या पारिश्रमिक रक्कमेची कमाल मासिक मर्यादा रु.40,000/- (रुपये चाळीस हजार फक्त) इतक्या मर्यादित राहील. या अटीवर घेण्याबाबत प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 372/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पाणीपट्टी कर निर्धारण अंतिम करण्यासाठी झोन अधिकारी यांना सहाय्य करणे या विवक्षित कामासाठी निवड प्रक्रिया राबविण्यासाठी गठीत समितीने ठरविल्यानुसार सदर कामासाठी श्री.गणपत व्यंकटराव जाधव, उपआयुक्त (सेवानिवृत्त) महानगरपालिका परभणी यांची सेवा विहित अटी व शर्तीच्या अधिन राहून प्रथमत:06 महिन्यांच्या कालावधीकरीता करार पध्दतीने सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना दरमहा सेवानिवृत्तीपुर्वी मिळत असलेल्या एकूण वेतनातून (मुळ वेतन व महागाई भत्ता धरुन) त्यांना आता मिळत असलेले एकूण निवृत्तीवेतन (महागाई भत्ता आणि अंशराशीकृत निवृत्तीवेतनासह) वजा केल्यानंतर होणारी रक्कम त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणुन निश्चित करण्यात येईल. परंतु या पारिश्रमिक रक्कमेची कमाल मासिक मर्यादा रु.40,000/- (रुपये चाळीस हजार) इतक्या मर्यादित राहील या अटीवर नियुक्ती देण्याबाबत मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 373/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि. .05.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत शहरातील हर्सुल येथील घनकचरा प्रक्रिया केंद्र उभारणेसाठी वाढीव कामास मंजुरी मिळणेसाठी दि.27 एप्रिल 2022 रोजी सकाळी 10.30 वा. मा.प्रशासक यांचे अध्यक्षतेखाली निविदा समितीची बैठक संपन्न झाली. सदरील बैठकीस खालील प्रमाणे अधिकारी आणि प्रकल्प सल्लागार यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

| अ.क्र. | नांव | पदनाम |
|---|---|---|
| 1. | श्री आस्तिक कुमार पाण्डेय | प्रशासक |
| 2. | श्री बी. बी. नेमाने | अतिरीक्त आयुक्त-1 |
| 3. | श्री एस. डी. पानझडे | शहर अभियंता |
| 4. | श्री संतोष वाहुळे | मुख्य लेखा व वित्त अधिकारी |
| 5. | श्री बी. डी. फड | कार्यकारी अभियंता |
| 6. | श्री सौरभ जोशी | घनकचरा विभाग प्रमुख |
| 7. | श्री निखिल सोनी | PMC यांचे प्रतिनिधी |

सदर बैठकीत सद्यस्थितीत प्रगतीपथावर असलेल्या हर्सुल येथील घनकचरा प्रक्रिया केंद्राच्या स्थापत्य विषयक कामांचा आढावा घेण्यात आला. शहरात निर्माण होणा-या घनकच-यावर प्रक्रिया करण्याच्या अनुषंगाने घनकचरा प्रक्रिया केंद्र उभारणेसाठी महाराष्ट्र शासनाकडून नियुक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (P.M.C.) मे. इको प्रो. इनव्हायरमेंटल सर्व्हीसेस प्रा.लि. इंदौर यांचेकडून सादर करण्यात आलेल्या रुपये 91.79 कोटीच्या रकमेच्या DPR ला मान्यता आहे.

सदर प्रस्तावात समाविष्ट बाबी संदर्भात एकूण 03 टप्पे असुन प्रथम टप्पा Immediate Plan मध्ये स्क्रिनींग मशीन, बेलींग मशीन, श्रेडर मशीन खरेदी करणे, माहिती व जनजागृती करणे या बाबींचा समावेश आहे. दुसरा टप्पा Short Term Plan नुसार कंपोस्ट पीट, एम.आर.एफ. सेंटर उभारणे, Grannular मशीन खरेदी करणे या बाबींचा समावेश असुन तिसरा टप्पा Long Term Plan नुसार वेब्रीज, वेब्रीज रुम, प्रिसॉर्टींग

शेड, विंड्रो प्लॅटफॉर्म, प्रोसेसिंग शेड, क्युरींग एरीया, लिचेट टँक, अंतर्गत रस्ते, ड्रेन, ऑफीस रुम, टॉयलेट इत्यादी बाबी उभारणे व बायोमिथेनेशन प्लांट, Brick Manufacturing Plant इत्यादी बाबींचा समावेश आहे.

सदर प्रस्तावातील Long Term Plan मधील बाबींनुसार पडेगांव, चिकलठाणा आणि हर्सुल येथील स्थापत्य विषयक कामासाठी रुपये 26.68 कोटी रकमेची निविदा कार्यवाही करण्यात येऊन मे. एन.के. कन्स्ट्रक्शन यांना ही कामे करणेस्तव कार्यादेश देण्यात आलेला आहे. सदर कार्यादेशानुसार कामे सुरु करण्यात आली असता, मुळ प्रस्तावातील एकाच ठिकाणी केंद्रीत पध्दतीने प्रक्रिया केंद्र उभारण्या ऐवजी विकेंद्रीत पध्दतीने शहरात एकूण 03 ठिकाणी म्हणजेच चिकलठाणा, पडेगांव व हर्सुल येथे प्रत्येकी 150 मे.टन प्रति दिन क्षमतेचे घनकचरा प्रक्रिया केंद्र उभारणे व कांचनवाडी येथे 30 मे.टन प्रति दिन क्षमतेचे बायोमिथेनेशन प्रकल्प उभारण्याचे नियोजन करणे बाबत मा. उच्च न्यायालयाद्वारे स्थापित मा. विभागीय आयुक्त यांचे अध्यक्षतेखालील सनियंत्रण समितीकडून सूचविण्यात आले व त्यानुसार मा. सनियंत्रण समिती मार्फत जागा निश्चित करण्यात आल्या.

सदरील नियोजनानुसार व आदेशानुसार घनकचरा प्रक्रिया केंद्राच्या स्थापत्य विषयक कामांची सुरुवात करण्यात आली असता, प्रस्तावातील विविध बाबींच्या परिमाणामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्याचे व त्याच प्रमाणे निविदेत समाविष्ट नसलेल्या ब-याच बाबी या अतिरिक्त बाबी म्हणुन कराव्या लागणार असल्याचे आढळुन आले. सदर वाढीव परिमाण व अतिरिक्त बाबी इत्यादींचा समावेश करुन सा.बा.वि.दरसूचि सन 2018-2019 च्या दरानुसार रुपये 148.79 कोटी रकमेचा सुधारीत प्रकल्प अहवाल PMC मार्फत तयार करुन घेऊन मा. आयुक्त यांचे मान्यतेने मा. सर्व साधारण सभेसमोर प्रस्ताव सादर करण्यात आला असता, सुधारीत प्रस्तावास मा. सर्व साधारण सभा ठराव क्रमांक-1001, दि.22/02/2019 नुसार खालील प्रमाणे मान्यता प्राप्त आहे.

**ठराव:-** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे घनकचरा व्यवस्थापन प्रक्रिया प्रकल्प उभारणे अंतर्गत चिकलठाणा, हर्सुल, पडेगांव व कांचनवाडी येथे प्रकल्प कार्यान्वीत करणेसाठी व प्रत्यक्ष कामे करीत असतांना ब-याच बाबींचा अंदाजपत्रकात समावेश नसल्याचे त्याच प्रमाणे परिमाण हे परिस्थितीनुसार जुळत नसल्याचे आढळुन आले असल्याने कामे पुर्ण होण्याचे दृष्टीने प्रत्यक्ष परिस्थितीनुसार अंदाजपत्रकात आवश्यक बाबी व परिमाण यानुसार सुधारणा करुन देणेसाठी तसेच शासन नियुक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे.एन.के.कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद व मायो वेसल्स ॲण्ड मशीनन्स प्रा.लि. यांनी रु.91.795 कोटी ऐवजी हर्सुल येथे कचरा प्रक्रिया केंद्र विकसीत करणे, कांचनवाडी येथे बायोमिथेनेशन प्रकल्प उभारणे, नारेगांव येथे जुन्या कच-यावर प्रक्रिया करणे, जनजागरण करणे तसेच अनुषंगिक कामांचा समावेश असुन प्रस्तावात दर्शविल्यानुसार ज्या कामाचे कार्यादेश वितरीत करण्यात आलेले आहेत अशी कामे वाढीव परिमाणासह संबंधित एजन्सी धारकाकडून करुन घेण्यासाठी घनकचरा व्यवस्थापन प्रक्रिया प्रकल्पाचा रुपये 148.790 कोटीचा सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवाल शासनाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

सदर सुधारीत प्रस्तावास शासन निर्णय क्र.स्वमअ-2019/प्र.क्र.143/नवि-34, दि.13.02.2020 अन्वये मान्यता मिळालेली आहे.

शहरातील कच-याच्या समस्येबाबत मा. उच्च न्यायालय आणि मा. उच्च न्यायालयाद्वारे स्थापित मा. सनियंत्रण समितीकडून होणारा दैनंदिन पाठपुरावा व मा. उच्च न्यायालयात महानगरपालिकेच्या वतीने सादर करण्यात आलेले शपथपत्र या अनुषंगाने घनकचरा प्रक्रिया केंद्राची कामे तातडीने पुर्ण करणे आवश्यक असल्याने व मा. सर्व साधारण सभा ठरावानुसार मान्यता असल्याने मुळ एजन्सी मे. एन. के. कन्स्ट्रक्शन यांचेकडून चिकलठाणा, पडेगांव व हर्सुल येथील प्रक्रिया केंद्राबाबतची कामे हाती घेऊन पुर्ण करणे आवश्यक आहे.

चिकलठाणा व पडेगांव येथील प्रत्येकी 150 मे.टन प्रति दिन क्षमतेच्या घनकचरा प्रक्रिया केंद्राची कामे पुर्ण करण्यात येऊन प्रकल्प कार्यान्वीत करण्यात आले आहेत. सदर ठिकाणी घनकच-यावर नियमितपणे प्रक्रिया सुरु आहे. मा. प्रशासक यांनी दि.17.06.2020 रोजी पडेगांव येथील घनकचरा प्रक्रिया केंद्राची पाहणी केली सदर केंद्राचे पाहणीचे वेळी हर्सुल येथील नियोजित घनकचरा प्रक्रिया केंद्राबाबत चर्चा करण्यात आली. हर्सुल येथील महानगरपालिकेच्या ताब्यातील उपलब्ध जागा अरुंद व अपुरी असल्याने या उपलब्ध जागेत फक्त 60 मे.टन प्रति दिन क्षमतेचा प्लांट उभारता येईल असा प्रस्ताव PMC यांनी दिला होता. परंतु भविष्यातील शहरात निर्माण होणा-या कच-याच्या समस्येचा विचार करता मा.प्रशासक यांनी 150 मे.टन प्रति दिन क्षमतेचा प्लांट उभारणेस व त्याबाबतचा आराखड्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार हर्सुल येथील उपलब्ध जागेवर मे.

एन. के. कन्स्ट्रक्शन यांचे मार्फत काम सुरु करण्यात आले असुन या ठिकाणी करण्यात आलेल्या भागश: कामाचे देयक देखील अदा करण्यात आलेले आहे.

हर्सुल येथील महानगरपालिकेच्या ताब्यात असलेली जागा अरुंद स्वरुपाची व अपुरी असल्यामुळे आणि भविष्यातील वाढीव कच-याची समस्या सोडविण्याच्या अनुषंगाने या ठिकाणी सुध्दा 150 मे.टन प्रति दिन क्षमतेचे प्रक्रिया केंद्र उभारण्याच्या आदेशानुसार महानगरपालिकेच्या जागे लगत असलेल्या नदीपात्राची जमीन, त्याच प्रमाणे लगतची खाजगी जमीन याप्रमाणे एकूण 05 एकर जमीन खाजगी वाटाघाटीने संपादन करणे बाबतची कार्यवाही मा.जिल्हाधिकारी यांच्या मंजुरीने करण्यात येऊन जमीन संपादनाच्या अनुषंगाने जमीनीचा आगाऊ ताबा घेण्यात आला आहे.

दि.26.01.2022 रोजी मा. पालकमंत्री, मा.जिल्हाधिकारी, मा. प्रशासक यांचे समवेत या जागेची पाहणी करण्यात आली. तदनंतर दि.31.01.2022 रोजी खाजगी वाटाघाटीने ताब्यात घेण्यात आलेल्या जागेची जायमोक्यावर आखणी करुन नकाशानुसार मा. पालकमंत्री यांच्या सूचनां प्रमाणे प्रत्यक्ष उर्वरित कामास सुरुवात करण्यात आलेली असुन सुमारे रु.2.00 कोटीचे काम करण्यात आले आहे. या कामाचे देयक प्रस्तावित करण्यात येत आहे.

हर्सुल येथील नियोजित प्रकल्पाची जागा ही खोलगट असल्याने त्यात मुरुम भरती करुन शेड उभारणीसाठी काम सुरु करण्यात आलेले आहे. हर्सुल येथील उर्वरित कामास सुरुवात केल्यानंतर कामासाठी नियुक्त PMC, स्ट्रक्चरल डिझायनर श्रीमती कमल राव, कार्यकारी अभियंता, उप अभियंता, ठेकेदार यांचेसह स्थळ पाहणी करण्यात आली. स्थळ पाहणी दरम्यान निदर्शनास आलेली परिस्थिती आणि आवश्यकतेनुसार आर.सी.सी. डिझायनर यांनी फाऊंडेशन डिझाईनमध्ये बदल करुन या ठिकाणी राफ्ट फाऊंडेशन, अंडर ग्राऊंड ट्रेंच व जागा खोलगट असल्याने करावयाच्या भरतीसाठी रिटेनिंग वॉलची आवश्यकता असल्याचे नमुद करुन सुधारीत डिझाईन व ड्रॉईंग सादर केलेले आहे.

या प्रकल्पाच्या कामासाठी नियुक्त राज्य शासनाद्वारे नियुक्त PMC यांनी उपरोक्त बाबींचा समावेश करुन सुधारीत अंदाजपत्रक सादर केले आहे. दरम्यान हर्सुल येथील कामासाठी वाढीव जमिन उपलब्ध होणेसाठी सुमारे दीड वर्षाचा कालावधी लोटल्याने सुधारीत एस.एस.आर. सन 2021-2022 नुसार आणि 12% ऐवजी 18% एवढा जी.एस.टी. गृहीत धरुन हर्सुल येथील उर्वरित कामे पुर्ण करण्यासाठी रुपये 57.05 कोटी एवढा खर्च अपेक्षित असल्याबाबत अहवाल दिलेला आहे.

मुळ निविदा रुपये 26.68 कोटी रकमेची होती. मा. सर्व साधारण सभा ठराव क्र.1001 तसेच सुधारीत प्रस्तावास शासन मान्यता, मा. सनियंत्रण समितीचा पाठपुरावा यानुसार यापुर्वीच चिकलठाणा व पडेगांव येथील कामे करुन घेण्यात आली आहेत. तसेच हर्सुल येथील महानगरपालिकेच्या ताब्यात असलेल्या जागेतील कामे मुळ एजन्सीकडून करुन घेण्यात येत आहेत व त्यावर आजपर्यंत रुपये 58.16 कोटी एवढा खर्च झालेला आहे. त्यामुळे हर्सुल येथील उर्वरित 150 मे.टन प्रति दिन क्षमतेच्या प्रक्रिया केंद्राचे काम पुर्ण करण्याच्या अनुषंगाने सांगोपांग चर्चा करण्यात आली. तसेच प्रकल्पाची उर्वरित कामे तसेच जागेच्या परिस्थितीनुसार वाढीव कामे सन 2021-2022 च्या एस.एस.आर च्या दरानुसार मुळ नियुक्त ठेकेदार मे. एन.के.कन्स्ट्रक्शन यांचेकडून मंजुर केलेल्या आराखड्यानुसार करुन घेण्यास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले. सदर समितीचे बैठकीचे इतिवृत्त संचिकेत उपलब्ध आहे.

करिता आज पावेतो प्रकल्पावर झालेला खर्च रुपये 58.16 कोटी आणि हर्सुल येथील उर्वरित कामे पुर्ण करण्यासाठी आवश्यक असलेला खर्च रु.57.05 कोटी या प्रमाणे एकूण रु.115.21 कोटी एवढ्या खर्चास व हर्सुल येथील प्रस्तावित वाढीव कामे सन 2021-2022 च्या दरसूचि नुसार करणेस तसेच वाढीव परिमाण व वाढीव कामे मुळ नियुक्त एजन्सी मे.एन.के.कन्स्ट्रक्शन यांचेकडून करुन घेणे आणि सदर वाढीव खर्च मंजुर डी.पी.आर.मधील इतर बाबींच्या बचतीमधुन उपलब्ध होणा-या रकमेतुन करणे बाबत मंजुरी प्रदान करणेसाठीचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्रमांक 373/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे आज पावेतो प्रकल्पावर झालेला खर्च रु.58.16 कोटी आणि हर्सुल येथील उर्वरित कामे पुर्ण करण्यासाठी आवश्यक असलेला खर्च रु.57.05 कोटी या प्रमाणे एकूण रु.115.21 कोटी एवढ्या खर्चास व हर्सुल येथील प्रस्तावित वाढीव कामे सन 2021-2022 च्या दरसूचि नुसार करणेस तसेच वाढीव परिमाण व वाढीव कामे मुळ नियुक्त एजन्सी मे.एन.के.कन्स्ट्रक्शन यांचेकडून करुन घेणेस आणि सदर वाढीव खर्च मंजुर डी.पी.आर.मधील इतर बाबींच्या बचतीमधुन उपलब्ध होणा-या रकमेतुन करणेस मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 374/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.11.05.2022)**

घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत शहरातील हर्सुल येथील घनकचरा प्रक्रिया केंद्र उभारणेसाठी वाढीव कामास मंजुरी मिळणेसाठी दिनांक 27 एप्रिल 2022 रोजी सकाळी 10.30 वाजता मा. प्रशासक यांचे अध्यक्षतेखाली निविदा समितीची बैठक संपन्न झाली. सदरील बैठकीस खालील प्रमाणे अधिकारी आणि प्रकल्प सल्लागार यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

| अ.क्र. | नांव | पदनाम |
|---|---|---|
| 1 | श्री आस्तिक कुमार पाण्डेय | प्रशासक |
| 2 | श्री बी. बी. नेमाने | अतिरीक्त आयुक्त-1 |
| 3 | श्री एस. डी. पानझडे | शहर अभियंता |
| 4 | श्री संतोष वाहुळे | मुख्य लेखा व वित्त अधिकारी |
| 5 | श्री बी. डी. फड | कार्यकारी अभियंता |
| 6 | श्री सौरभ जोशी | घनकचरा विभाग प्रमुख |
| 7 | श्री निखिल सोनी | PMC यांचे प्रतिनिधी |

सदर बैठकीत सद्यस्थितीत प्रगतीपथावर असलेल्या हर्सुल येथील घनकचरा प्रक्रिया केंद्राच्या स्थापत्य विषयक कामांचा आढावा घेण्यात आला. शहरात निर्माण होणा-या घनकच-यावर प्रक्रिया करण्याच्या अनुषंगाने घनकचरा प्रक्रिया केंद्र उभारणेसाठी महाराष्ट्र शासनाकडून नियुक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (P.M.C.) मे. इको प्रो.इनव्हायरमेंटल सर्व्हीसेस प्रा.लि. इंदौर यांचेकडून सादर करण्यात आलेल्या रु.91.79 कोटीच्या रकमेच्या DPR ला मान्यता आहे.

सदर प्रस्तावात समाविष्ट बाबी संदर्भात एकूण 03 टप्पे असुन प्रथम टप्पा Immediate Plan मध्ये स्क्रिनींग मशीन, बेलींग मशीन, श्रेडर मशीन खरेदी करणे, माहिती व जनजागृती करणे या बाबींचा समावेश आहे. दुसरा टप्पा Short Term Plan नुसार कंपोस्ट पीट, एम.आर.एफ. सेंटर उभारणे, Grannular मशीन खरेदी करणे या बाबींचा समावेश असुन तिसरा टप्पा Long Term Plan नुसार वेब्रीज, वेब्रीज रुम, प्रिसॉर्टींग शेड, विंड्रो प्लॅटफॉर्म, प्रोसेसिंग शेड, क्युरींग एरीया, लिचेट टँक, अंतर्गत रस्ते, ड्रेन, ऑफीस रुम, टॉयलेट इत्यादी बाबी उभारणे व बायोमिथेनेशन प्लांट, Brick Manufacturing Plant इत्यादी बाबींचा समावेश आहे.

सदर प्रस्तावातील Long Term Plan मधील बाबींनुसार पडेगांव, चिकलठाणा आणि हर्सुल येथील स्थापत्य विषयक कामासाठी रु.26.68 कोटी रकमेची निविदा कार्यवाही करण्यात येऊन मे. एन.के.कन्स्ट्रक्शन यांना ही कामे करणेस्तव कार्यादेश देण्यात आलेला आहे. सदर कार्यादेशानुसार कामे सुरु करण्यात आली असता, मुळ प्रस्तावातील एकाच ठिकाणी केंद्रीत पध्दतीने प्रक्रिया केंद्र उभारण्या ऐवजी विकेंद्रीत पध्दतीने शहरात एकूण 03 ठिकाणी म्हणजेच चिकलठाणा, पडेगांव व हर्सुल येथे प्रत्येकी 150 मे.टन प्रति दिन क्षमतेचे घनकचरा प्रक्रिया केंद्र उभारणे व कांचनवाडी येथे 30 मे.टन प्रति दिन क्षमतेचे बायोमिथेनेशन प्रकल्प उभारण्याचे नियोजन करणे बाबत मा. उच्च न्यायालयाद्वारे स्थापित मा. विभागीय आयुक्त यांचे अध्यक्षतेखालील सनियंत्रण समितीकडून सूचविण्यात आले व त्यानुसार मा. सनियंत्रण समिती मार्फत जागा निश्चित करण्यात आल्या.

सदरील नियोजनानुसार व आदेशानुसार घनकचरा प्रक्रिया केंद्राच्या स्थापत्य विषयक कामांची सुरुवात करण्यात आली असता, प्रस्तावातील विविध बाबींच्या परिमाणामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्याचे व त्याच प्रमाणे निविदेत समाविष्ट नसलेल्या ब-याच बाबी या अतिरिक्त बाबी म्हणुन कराव्या लागणार असल्याचे आढळुन आले. सदर वाढीव परिमाण व अतिरिक्त बाबी इत्यादींचा समावेश करुन सा.बा.वि.दरसूचि सन 2018-2019 च्या दरानुसार रु.148.79 कोटी रकमेचा सुधारीत प्रकल्प अहवाल PMC मार्फत तयार करुन घेऊन मा. आयुक्त यांचे मान्यतेने मा. सर्व साधारण सभेसमोर प्रस्ताव सादर करण्यात आला असता, सुधारीत प्रस्तावास मा. सर्व साधारण सभा ठराव क्रमांक-1001, दि.22.02.2019 नुसार खालील प्रमाणे मान्यता प्राप्त आहे.

**ठराव:-** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे घनकचरा व्यवस्थापन प्रक्रिया प्रकल्प उभारणे अंतर्गत चिकलठाणा, हर्सुल, पडेगांव व कांचनवाडी येथे प्रकल्प कार्यान्वीत करणेसाठी व प्रत्यक्ष कामे करीत असतांना ब-याच बाबींचा अंदाजपत्रकात समावेश नसल्याचे त्याच प्रमाणे परिमाण हे परिस्थितीनुसार जुळत नसल्याचे आढळुन आले असल्याने कामे पुर्ण होण्याचे दृष्टीने प्रत्यक्ष परिस्थितीनुसार अंदाजपत्रकात आवश्यक बाबी व परिमाण यानुसार सुधारणा करुन देणेसाठी तसेच शासन नियुक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार, मे.एन.के.कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद व मायो वेसल्स ॲण्ड मशीनन्स प्रा.लि. यांनी रुपये 91.795 कोटी ऐवजी हर्सुल येथे कचरा प्रक्रिया केंद्र

विकसीत करणे, कांचनवाडी येथे बायोमिथेनेशन प्रकल्प उभारणे, नारेगांव येथे जुन्या कच-यावर प्रक्रिया करणे, जनजागरण करणे तसेच अनुषंगिक कामांचा समावेश असुन प्रस्तावात दर्शविल्यानुसार ज्या कामाचे कार्यादेश वितरीत करण्यात आलेले आहेत अशी कामे वाढीव परिमाणासह संबंधित एजन्सी धारकाकडून करुन घेण्यासाठी घनकचरा व्यवस्थापन प्रक्रिया प्रकल्पाचा रुपये 148.790 कोटीचा सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवाल शासनाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

सदर सुधारीत प्रस्तावास शासन निर्णय क्र.स्वमअ-2019/प्र.क्र.143/नवि-34, दिनांक 13/02/2020 अन्वये मान्यता मिळालेली आहे.

शहरातील कच-याच्या समस्येबाबत मा.उच्च न्यायालय आणि मा. उच्च न्यायालयाद्वारे स्थापित मा. सनियंत्रण समितीकडून होणारा दैनंदिन पाठपुरावा व मा.उच्च न्यायालयात महानगरपालिकेच्या वतीने सादर करण्यात आलेले शपथपत्र या अनुषंगाने घनकचरा प्रक्रिया केंद्राची कामे तातडीने पुर्ण करणे आवश्यक असल्याने व मा. सर्व साधारण सभा ठरावानुसार मान्यता असल्याने मुळ एजन्सी मे. एन. के. कन्स्ट्रक्शन यांचेकडून चिकलठाणा, पडेगांव व हर्सुल येथील प्रक्रिया केंद्राबाबतची कामे हाती घेऊन पुर्ण करणे आवश्यक आहे.

चिकलठाणा व पडेगांव येथील प्रत्येकी 150 मे.टन प्रति दिन क्षमतेच्या घनकचरा प्रक्रिया केंद्राची कामे पुर्ण करण्यात येऊन प्रकल्प कार्यान्वीत करण्यात आले आहेत. सदर ठिकाणी घनकच-यावर नियमितपणे प्रक्रिया सुरु आहे. मा.प्रशासक यांनी दि.17.06.2020 रोजी पडेगांव येथील घनकचरा प्रक्रिया केंद्राची पाहणी केली सदर केंद्राचे पाहणीचे वेळी हर्सुल येथील नियोजित घनकचरा प्रक्रिया केंद्राबाबत चर्चा करण्यात आली. हर्सुल येथील महानगरपालिकेच्या ताब्यातील उपलब्ध जागा अरुंद व अपुरी असल्याने या उपलब्ध जागेत फक्त 60 मे.टन प्रति दिन क्षमतेचा प्लांट उभारता येईल असा प्रस्ताव PMC यांनी दिला होता. परंतु भविष्यातील शहरात निर्माण होणा-या कच-याच्या समस्येचा विचार करता मा. प्रशासक यांनी 150 मे.टन प्रति दिन क्षमतेचा प्लांट उभारणेस व त्याबाबतचा आराखड्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार हर्सुल येथील उपलब्ध जागेवर मे. एन. के. कन्स्ट्रक्शन यांचे मार्फत काम सुरु करण्यात आले असुन या ठिकाणी करण्यात आलेल्या भागश: कामाचे देयक देखील अदा करण्यात आलेले आहे.

हर्सुल येथील महानगरपालिकेच्या ताब्यात असलेली जागा अरुंद स्वरुपाची व अपुरी असल्यामुळे आणि भविष्यातील वाढीव कच-याची समस्या सोडविण्याच्या अनुषंगाने या ठिकाणी सुध्दा 150 मे.टन प्रति दिन क्षमतेचे प्रक्रिया केंद्र उभारण्याच्या आदेशानुसार महानगरपालिकेच्या जागे लगत असलेल्या नदीपात्राची जमीन, त्याच प्रमाणे लगतची खाजगी जमीन याप्रमाणे एकूण 05 एकर जमीन खाजगी वाटाघाटीने संपादन करणे बाबतची कार्यवाही मा. जिल्हाधिकारी यांच्या मंजुरीने करण्यात येऊन जमीन संपादनाच्या अनुषंगाने जमीनीचा आगाऊ ताबा घेण्यात आला आहे.

दि.26.01.2022 रोजी मा.पालकमंत्री, मा.जिल्हाधिकारी, मा.प्रशासक यांचे समवेत या जागेची पाहणी करण्यात आली. तदनंतर दि.31.01.2022 रोजी खाजगी वाटाघाटीने ताब्यात घेण्यात आलेल्या जागेची जायमोक्यावर आखणी करुन नकाशानुसार मा. पालकमंत्री यांच्या सूचनां प्रमाणे प्रत्यक्ष उर्वरित कामास सुरुवात करण्यात आलेली असुन सुमारे रु.2.00 कोटीचे काम करण्यात आले आहे. या कामाचे देयक प्रस्तावित करण्यात येत आहे.

हर्सुल येथील नियोजित प्रकल्पाची जागा ही खोलगट असल्याने त्यात मुरुम भरती करुन शेड उभारणीसाठी काम सुरु करण्यात आलेले आहे. हर्सुल येथील उर्वरित कामास सुरुवात केल्यानंतर कामासाठी नियुक्त PMC, स्ट्रक्चरल डिझायनर श्रीमती कमल राव, कार्यकारी अभियंता, उपअभियंता, ठेकेदार यांचेसह स्थळ पाहणी करण्यात आली. स्थळ पाहणी दरम्यान निदर्शनास आलेली परिस्थिती आणि आवश्यकतेनुसार आर.सी.सी.डिझायनर यांनी फाऊंडेशन डिझाईनमध्ये बदल करुन या ठिकाणी राफ्ट फाऊंडेशन, अंडर ग्राऊंड ट्रेंच व जागा खोलगट असल्याने करावयाच्या भरतीसाठी रिटेनिंग वॉलची आवश्यकता असल्याचे नमुद करुन सुधारीत डिझाईन व ड्रॉईंग सादर केलेले आहे.

या प्रकल्पाच्या कामासाठी नियुक्त राज्य शासनाद्वारे नियुक्त PMC यांनी उपरोक्त बाबींचा समावेश करुन सुधारीत अंदाजपत्रक सादर केले आहे. दरम्यान हर्सुल येथील कामासाठी वाढीव जमिन उपलब्ध होणेसाठी सुमारे दीड वर्षाचा कालावधी लोटल्याने सुधारीत एस.एस.आर. सन 2021-2022 नुसार आणि 12% ऐवजी 18% एवढा जी.एस.टी. गृहीत धरुन हर्सुल येथील उर्वरित कामे पुर्ण करण्यासाठी रु.57.05 कोटी एवढा खर्च अपेक्षित असल्याबाबत अहवाल दिलेला आहे.

मुळ निविदा रु.26.68 कोटी रकमेची होती. मा.सर्व साधारण सभा ठराव क्र.1001 तसेच सुधारीत प्रस्तावास शासन मान्यता, मा. सनियंत्रण समितीचा पाठपुरावा यानुसार यापुर्वीच चिकलठाणा व पडेगांव येथील कामे करुन घेण्यात आली आहेत. तसेच हर्सुल येथील महानगरपालिकेच्या ताब्यात असलेल्या जागेतील कामे मुळ एजन्सीकडून करुन घेण्यात येत आहेत व त्यावर आजपर्यंत रु.58.16 कोटी एवढा खर्च झालेला आहे. त्यामुळे हर्सुल येथील उर्वरित 150 मे.टन प्रति दिन क्षमतेच्या प्रक्रिया केंद्राचे काम पुर्ण करण्याच्या अनुषंगाने सांगोपांग चर्चा करण्यात आली. तसेच प्रकल्पाची उर्वरित कामे तसेच जागेच्या परिस्थितीनुसार वाढीव कामे सन 2021-2022 च्या एस.एस.आर च्या दरानुसार मुळ नियुक्त ठेकेदार मे.एन.के.कन्स्ट्रक्शन यांचेकडून मंजुर केलेल्या आराखड्यानुसार करुन घेण्यास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले. सदर समितीचे बैठकीचे इतिवृत्त संचिकेत उपलब्ध आहे.

करिता आज पावेतो प्रकल्पावर झालेला खर्च रु.58.16 कोटी आणि हर्सुल येथील उर्वरित कामे पुर्ण करण्यासाठी आवश्यक असलेला खर्च रु.57.05 कोटी या प्रमाणे एकूण रु.115.21 कोटी एवढ्या खर्चास व हर्सुल येथील प्रस्तावित वाढीव कामे सन 2021-2022 च्या दरसूचि नुसार करणेस तसेच वाढीव परिमाण व वाढीव कामे मुळ नियुक्त एजन्सी मे.एन.के.कन्स्ट्रक्शन यांचेकडून करुन घेणे आणि सदर वाढीव खर्च मंजुर डी.पी.आर.मधील इतर बाबींच्या बचतीमधुन उपलब्ध होणा-या रकमेतुन करणे बाबत मंजुर प्रदान करणेसाठीचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 374/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे आज पावेतो प्रकल्पावर झालेला खर्च रु.58.16 कोटी आणि हर्सुल येथील उर्वरित कामे पुर्ण करण्यासाठी आवश्यक असलेला खर्च रु.57.05 कोटी या प्रमाणे एकूण रु.115.21 कोटी एवढ्या खर्चास व हर्सुल येथील प्रस्तावित वाढीव कामे सन 2021-2022 च्या दरसूचि नुसार करणेस तसेच वाढीव परिमाण व वाढीव कामे मुळ नियुक्त एजन्सी मे.एन.के.कन्स्ट्रक्शन यांचेकडून करुन घेणेस आणि सदर वाढीव खर्च मंजुर डी.पी.आर.मधील इतर बाबींच्या बचतीमधुन उपलब्ध होणा-या रकमेतुन करणेस मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 375/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.11.05.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, Triota Ventures Pvt.Ltd., उस्मानपुरा, औरंगाबाद यांनी दि.17.01.2022 च्या विनंती अर्जाद्वारे प्लॉट नं.1-ए/1, एम.आय.डी.सी., चिकलठाणा पोच रस्त्यासाठी महानगरपालिकेचा विकास आराखडा रस्ता व साईड ड्रेन स्वखर्चाने करणे बाबत प्रस्ताव सादर केला आहे.

सदर विकास योना रस्ता व नव्याने विकसीत होत असलेल्या तारांकीत हॉटेलकडे जात आहे. या विकास योना रस्त्यावरून लगतच्या इतर भागाचाही भविष्यात सदर पोच रस्ता म्हणुन उपलब्ध होणार असल्याने या भागाचा विकास होण्यास चालना मिळणार आहे. यापुर्वी गट क्र.708/पी, चिकलठाणा येथील मे.सिमर प्राईड व्हेंचर यांनी माय वर्ल्ड या योजनेसाठी स्वयंविकास अंतर्गत पुर्ण केलेला रस्ता ज्या ठिकाणी संपतो, त्याच ठिकाणापासुन पुढे दक्षिण-उत्तर रस्ता करण्यासाठी विकासक इच्छुक आहे.

या ठिकाणी नमुद करण्यात येते की, माय वर्ल्ड ते नारायण पुष्प रेसिडेन्सी हा रस्ता करण्यासाठी मा.उच्च न्यायालयात जनहित याचिका क्र.153/2016 ही नारायण पुष्प च्या रहिवाश्यांनी केली असून सदर काम केल्यास ही याचिका देखील आपोआप देखिल निकाली निघणार आहे.

सदर विकास योजना रस्ता विकासक स्वयं विकास पध्दतीने (Self Development) परिपुर्णरित्या महानगरपालिकेच्या मंजुर स्पेसिफिकेशन नुसार विकसीत करुन देणार आहे. विकासकास या रस्त्यांच्या कामाच्या बदल्यात केलेल्या रस्त्याच्या कामाच्या खर्चाचे समायोजन दरवर्षी देय मालमत्ता करातून टप्प्याटप्प्याने करण्याचे प्रस्तावीत करण्यात आले आहे. तसेच सदर रस्ता विकसीत करतांना त्याची देखरेख (Supervision) महानगरपालिका झोन क्र.6 चे अभियंता करणार असल्याने त्यासाठी आवश्यकअंदाजपत्रकीय रक्कमेच्या 2% देखरेख शुल्क (Supervision Charges) महानगरपालिका फंडात भरणा करुन घेण्यात येणार आहे.

विकासकाच्या या नियोजीत इमारतीसाठी अंदाजे र.रु.30 लक्ष प्रतीवर्ष इतका मालमत्ता कर येईल. तो मालमत्ता कर रस्त्याच्या बांधकामासाठी झालेल्या खर्चातून म्हणजेच र.रु.3,66,58.085/- मधून प्रतीवर्ष वजा केल्यास साधारणपणे 13 वर्षे मालमत्ताकरात 100% सुट देऊन रस्त्याच्या खर्चाचे समायोजन करता येईल. तथापि, अर्जदाराने 25% मालमत्ता कर हा दरवर्षी नियमितपणे महानगरपालिकेकडे भरणा करावा आणि प्रकल्पावर जेवढा खर्च होईल त्या खर्चाचे 100% समायोजन होई पर्यंत अर्जदारास मालमत्ता करात 75% सुट देण्यात येईल.

चिकलठाणा औद्योगिक वसाहत ही शहराचा एक महत्वाचा विकसनशील भाग असुन वाढत्या औद्योगिकरणामुळे या भागात अनेक नागरी वसाहती, हॉटेल्स इ. झपाट्याने विकसित होत आहे. महानगरपालिकेचा विकास योजना रस्त्यांच्या विकास करण्यासाठी आर्थिक तरतुद करण्यासाठी आर्थिक अडचणीमुळे अधिक कालावधी लागतो. तसेच मोठी आर्थिक गुंतवणूक करावी लागते. औरंगाबाद महानगरपालिका विकास प्राधिकरण असल्याने वीज, पाणी, ड्रेनेज इ.अत्यावश्यक सुविधेला प्रथम प्राधान्य द्यावे लागते. त्यामुळे आर्थिक तरतुदी अभावी महानगरपालिकेकडून मोठ्या विकास योजना रस्त्यांची कामे करण्यास मर्यादा येते व त्यामुळे विकास योजना रस्ते विकासासाठी विलंब होतो. सद्यस्थितीत महानगरपालिकेची आर्थिक स्थिती सुदृढ नाही. सदर प्रस्ताव मान्य केल्यास या भागाचा विकास लवकर होण्यास मदत होईल आणि या विकसित झालेल्या विविध मालमत्तांमुळे महानगरपालिकेला मोठ्या प्रमाणात मालमत्ता कराद्वारे दरवर्षी नियमित उत्पन्न मिळण्यास सुरुवात होईल.

विकासकाने दिलेल्या प्रस्तावानुसार सदर विकास रस्ते राष्ट्रीय मानकानुसार विकसित करावयाचे असून विकास योजना रस्ता विकसित करणे, रस्त्यालगत साईड ड्रेन बांधणे, फुटपाथ तयार करणे, रस्त्याच्या मध्यभागी दुभाजक बांधणे, त्यात वृक्षारोपण करणे, विद्युत पोल उभारणे इ.कामांचा समावेश आहे.

तरी विकासकाने सादर केलेल्या प्रस्तावास खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून मंजुरी प्रदान करण्याचे प्रस्तावीत करण्यात येत आहे.

1. सदर रस्ता विकसित करतांना त्याची देखरेख (Supervision) महानगरपालिका झोन क्र.6 चे अभियंता करणार असल्याने त्यासाठी आवश्यक अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 2% देखरेख शुल्क (Supervision Charges) रु.7,33,162/- महानगरपालिका फंडात भरणा करणे आवश्यक राहील.
2. सदरचा प्रकल्प पुर्ण झाल्यानंतर विकासकास पहिली पाच वर्षे किंवा रस्त्याच्या खर्चाचे 100% समायोजन होईपर्यंत जो कालावधी जास्त असेल त्या कालावधीपर्यंत या रस्त्याची सर्व देखभाल दुरुस्ती दोष दायित्व कालावधी म्हणुन विनामुल्य त्यांचे खर्चाने करावी लागेल.
3. या 24 मीटर रुंद विकास रस्त्यावर उपस्थित असलेली सर्व प्रकारची कच्ची/पक्की अतिक्रमणे हटविण्याची जबाबदारी विकासक यांची असेल.
4. विकासकास रस्ता प्रकल्प पुर्ण झाल्यानंतर महानगरपालिकेकडे रस्त्याचे हस्तांतरण करावे लागेल. तसेच सदर रस्ता सार्वजनिक वाहतूकीसाठी खुला राहील.
5. विकासकास या रस्ता प्रकल्पात समाविष्ट सर्व प्रकारची कामे महानगरपालिकेने दिलेल्या स्पेसिफिकेशन नुसार पुर्ण करावी लागतील. यासाठी महानगरपालिका निर्देशीत करेल. त्यानुसार रस्ता कामासाठी वापरण्यात येणाऱ्या बांधकाम साहित्य व अनुषंगीक सर्व आवश्यक बाबींच्या चाचण्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्रयोग शाळेतून विकासकाला स्वखर्चाने करुन देणे बंधकनकारक राहील.
6. विकासकास सदरच्या रस्त्याचे काम सुरु करण्यापुर्वी प्रत्यक्ष जागेवर सक्षम कार्यालयाकडून रस्त्याची आखणी करुन घेणे बंधनकारक राहील.
7. भविष्यात कोणत्याही कारणाने प्रकल्प रद्द झाल्यास किंवा स्थगित झाल्यास त्यास महानगरपालिका जबाबदार राहणार नाही. तसेच विकासकास कोणतीही नुकसान भरपाई महानगरपालिका देणार नाही.
8. रस्त्याचे काम पुर्ण झाल्यानंतर झालेल्या खर्चाची तपासणी करुन शहर अभियंता झालेला खर्च प्रमाणीत करतील.
9. अर्जदाराने दरवर्षी एकुण मालमत्ता कराच्या 25% मालमत्ता कर महानगरपालिकेकडे नियमितपणे भरणा करावा. रस्त्याच्या या प्रकल्पावर शहर अभियंता यांच्याकडून प्रमाणीत केल्याप्रमाणे जेवढा खर्च होईल त्या खर्चाचे 100% समायोजन होईपर्यंत अर्जदारास मालमत्ता करात 75% सुट देण्यात येईल.

करीता उक्त अटी/शर्तीस अधिन राहून अर्जदार Triota Ventures Pvt.Ltd., उस्मानपुरा औरंगाबाद यांच्या प्लॉट नं.1-ए/1, एम.आय.डी.सी.चिकलठाणा पोच रस्त्यासाठी महानगरपालिकेचा विकास आराखडा 24 मीटर विकास योजना रस्ता, साईड ड्रेन, फुटपाथ, रस्ता दुभाजक, स्ट्रीट लाईटची कामे इ.कामांच्या अंदाजपत्रकांना मंजुरी देऊन कामासाठी लागणारा खर्चाचे समायोजन दरवर्षी देय मालमत्ता करातून टप्प्याटप्प्याने करण्यास मंजुरी देणे करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभा यांच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 375/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, Triota Ventures Pvt.Ltd., उस्मानपुरा औरंगाबाद यांच्या प्लॉट नं.1-ए/1,एम.आय.डी.सी.चिकलठाणा पोच रस्त्यासाठी महानगरपालिकेचा विकास आराखडा 24 मीटर विकास

योजना रस्ता, साईड ड्रेन, फुटपाथ, रस्ता दुभाजक, स्ट्रीट लाईटची कामे इ.कामांच्या रु.3,66,58,085/- अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. सदर कामासाठी विकासक यांच्याकडून करण्यात येणारा खर्च शहर अभियंता यांनी प्रमाणित केल्यानंतर प्रकल्पावर जेवढा खर्च होईल त्या खर्चाचे 100% समायोजन होईपर्यंत अर्जदारास मालमत्ता करात 75% सुट देण्यात येईल. अर्जदाराने उर्वरित 25% मालमत्ता कर हा दरवर्षी नियमितपणे भरणा करावा यासह प्रस्तावात नमुद केलेल्या अ.क्र.1 ते 9 च्या अटी व शर्तीस अधिन राहून कार्यवाहीचे संपुर्ण वैधानिक अधिकार आयुक्त/प्रशासक, महानगरपालिका औरंगाबाद यांना देण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 376/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.13.05.2022)**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद मा.सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव सादर करीत आहेत की, सर्व्हे नं.12/पैकी, शहानुरवाडी येथील 10 हजार चौ.मी.क्षेत्र बी.ओ.टी.तत्वावर युरोपियन मार्केट करणे व आठवडी बाजारासाठी मे.श्रीहरी असोसिएट प्रा.लि. यांच्या समवेत दि.01.08.2012 रोजी करारनामा करण्यात आलेला आहे. प्रकल्पातील करारनाम्यातील अटी/शर्तीनुसार संबंधीत विकासकाने दि.01.02.2013 ते दि.31.01.2014 या एक वर्षाचा भाडेपट्टा र.रु.30,60,000/- (अक्षरी रुपये तीस लक्ष आठ हजार केवळ) चा भरणा दि.19.05.2015 रोजी केलेला आहे. दि.09.02.2013 पासून सदर जागेचा उपभोग विकासक घेत असून त्याचा व्यावसायीक वापर करीत आहेत. सदरील जागेचा वापर खाजगी वाहतुकीसाठी वाहनतळ, प्रदर्शने, मेळावे आणि आठवडी बाजारासाठी होत असून विकासकास उत्पन्न प्राप्त होत आहे.

तथापि महानगरपालिकेने वेळोवेळी पाठपुरावा करुन देखील संबंधीत विकासकांनी 30 वर्षाचा भाडे पट्टा करारनामा केला नाही आणि सदरील जागा ताब्यात दिल्यापासून केवळ एक वर्षाचेच भाडे अदा केले आहे. तसेच दि.02.04.2014 नंतर रु.5 लक्षच्या बँक गॅरंटीचे नुतनीकरण करुन दिले नाही. यानुसार विकासक श्रीहरी असोसिएट बेकायदेशी रित्या जागेचा भोगवटा करत आसून यांच्याकडे सन-2015 मध्ये भरणा केलेली रक्कम वजा जाता प्रति वर्ष भाडे व निविदेप्रमाणे दर वर्ष 12% भाडेवाढीसह दि.08.02.2022 पर्यंत मुळ भाडे र.रु.3,41,01,714/- (अक्षरी तीन कोटी एक्केचाळीस लक्ष एक हजार सातशे चौदा केवळ) इतक थकीत आहे.

याप्रकरणी तोडगा निघावा या दृष्टिने आयुक्त दालनात संबंधीतांसमवेत वेळोवेळी बैठका घेण्यात आल्या तसेच सर्व समावेशक निर्णय घेण्यात आले होते. तथापि, संबंधीतांनी घेण्यात आलेल्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही केली नाही.

सर्व बाबींची शहानिशा करुन संबंधीतास दि.05.01.2022 रोजी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 81-ब नुसार नोटिस देण्यात आली होती. सदरील नोटीसचा खुलासा असमाधानकारक असल्याचे माझे मत झाले असून अधिनियमातील प्राप्त अधिकारानुसार संबंधीताकडून सदरील जागा महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्यात यावी आणि प्रत्यक्ष ताबा मिळेपर्यंत देय असलेली भाडे रक्कम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 81 ब (क) नुसार वसुल करावी. असा प्रस्ताव मान्यतेस्तव सविनय सादर.

**ठराव क्रमांक 376/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सर्व्हे नं.12/पैकी, शहानुरवाडी येथील बी.ओ.टी.तत्वावर देण्यात आलेली जागा मे.श्रीहरी असोसिएट यांच्याकडून महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्यासाठी आणि थकबाकी असलेली रक्कम वसुल करण्याचा प्रस्ताव मान्य करण्यात येतो. यानुषंगाने आयुक्त महानगरपालिका यांनी अधिनियमा तील तरतुदीनुसार पुढील कार्यवाही करावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 377/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.13.05.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-2715/प्र.क्र.100/13 दि.17 डिसेंबर 2016 नुसार आयुक्त औरंगाबाद महानगरपालिका हे औरंगाबाद महानगरपालिकेची पाणी पुरवठा वितरण सुविधा सुरळीत करणे या विवक्षित कामाकरीता खालील पदांसाठी सेवानिवृत्त अधिक्षक, अभियंता, कार्यकारी अभियंता (स्थापत्य), उपअभियंता (स्थापत्य) व सहाय्यक अभियंता/ कनिष्ठ अभियंता, (स्थापत्य) संवर्गातील अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने घेण्याकरीता पात्र सेवानिवृत्त अधिकाऱ्यां कडून अर्ज मागविण्यात आले होते. तसेच संबंधीत अधिकाऱ्यांची दि.10.05.2022 रोजी सकाळी 11.00 वा. लेखी अर्ज व आवश्यक कागदपत्रांसह डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र, आमखास मैदानाजवळ, महानगरपालिका औरंगाबाद येथे मुलाखत आयोजित करण्यात आली होती.

| अ.क्र. | पदाचे नाव | पदसंख्या | अर्हता |
|---|---|---|---|
| 1) | अधिक्षक अभियंता | 01 | शासन सेवेतील पाणीपुरवठ्याच्या कामाशी संबंधीत समकक्ष पदांचे दिर्घ अनुभव |

| | | | |
|---|---|---|---|
| 2) | अधिक्षक अभियंता (स्थापत्य) | 01 | शासन सेवेतील पाणीपुरवठ्याच्या कामाशी संबंधीत समकक्ष पदांचे दिर्घ अनुभव |
| 3) | उप अभियंता (स्थापत्य) | 09 | शासन सेवेतील पाणीपुरवठ्याच्या कामाशी संबंधीत समकक्ष पदांचे दिर्घ अनुभव |
| 4) | सहाय्यक अभियंता/ कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | 09 | शासन सेवेतील पाणीपुरवठ्याच्या कामाशी संबंधीत समकक्ष पदांचे दिर्घ अनुभव |

त्यानुषंगाने उक्त मुलाखतीसाठी व मुलाखतीस येणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांची निवड करण्यासाठी खालील प्रमाणे निवड समिती गठीत करण्यात आली होती.

1) मा.आयुक्त तथा प्रशासक - अध्यक्ष
2) अतिरिक्त आयुक्त - सदस्य
3) शहर अभियंता - सदस्य
4) मुख्य लेखा व वित्त अधिकारी - सदस्य
5) उपआयुक्त (आस्थापना) - सदस्य

सदर मुलाखतीसाठी स्थापत्य व यांत्रिकी संवर्गामधील शाखा अभियंता, उपअभियंता, कार्यकारी अभियंता, (सेवानिवृत्त) असलेले एकूण 11 अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते. पाणी पुरवठा विभागामध्ये पाणी पुरवठा स्थापत्य व यांत्रिकी असे दोन्ही स्वरुपाचे काम आहे. तसेच यांत्रिकी शाखेतील उपस्थित सेवानिवृत्त अभियंत्यांनी प्रत्यक्ष पाणी पुरवठ्याशी संबंधीत कामकाज केलेले असल्यामुळे सेवानिवृत्त यांत्रिकी शाखेतील अभियंत्याच्या अनुभवाचा फायदा होईल असे समितीचे मत आहे. मुलाखतीस प्रत्यक्ष उपस्थित असलेल्या 11 सेवानिवृत्त अभियंत्यामधून खालील सेवानिवृत्त अभियंत्यांची समितीने निवड करण्यासाठी शिफारस केलेली आहे.

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचाऱ्यांचे नाव | सेवानिवृत्त झालेल्या पदाचे पदनाम |
|---|---|---|
| 1. | श्री.सगीर अहमद खान | कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) |
| 2. | श्री.विलास शेवाळकर | उपअभियंता (स्थापत्य) |
| 3. | श्री.देविदास पुरकर | उपअभियंता (स्थापत्य) |
| 4. | श्री.शशिकांत पद्माकर ढवळे | उपअभियंता (यांत्रिकी) |
| 5. | श्री.पटेल मोहम्मद समी उल हक | शाखा अभियंता (स्थापत्य) |
| 6. | श्री.गंगाधर होंदरणे | शाखा अभियंता (स्थापत्य) |
| 7. | श्री.अब्दुल हमीद अब्दुल समद | शाखा अभियंता (यांत्रिकी) |
| 8. | श्री.पद्माकर जोशी | सहाय्यक अभियंता (स्थापत्य) |

करीता, औरंगाबाद महानगरपालिकेची पाणी पुरवठा वितरण सुविधा सुरळीत करणे या विवक्षित कामासाठी उक्त अधिकाऱ्यांची सेवा विहित अटी व शर्तीच्या अधिन राहून प्रथमत: 06 महिन्यांच्या कालावधीकरीता करार पध्दतीने नियुक्ती करणे बाबत प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे. तसेच उक्त सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचाऱ्यांना अशा नियुक्तीच्या वेळी महागाई भत्त्यासह मिळत असलेल्या निवृत्तीवेतनाएवढी रक्कम (अंशराशीकृत निवृत्तीवेतन वगळून) त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणुन निश्चित करण्यात येईल. करीता, उक्त प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 377/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेची पाणी पुरवठा वितरण सुविधा सुरळीत करणे या विवक्षित कामासाठी उक्त अधिकाऱ्यांची सेवा विहित अटी व शर्तीच्या अधिन राहून प्रथमत: 06 महिन्यांच्या कालावधीकरीता करार पध्दतीने नियुक्ती करुन त्यांना अशा नियुक्तीच्या वेळी महागाई भत्त्यासह मिळत असलेल्या निवृत्तीवेतनाएवढी रक्कम (अंशराशीकृत निवृत्तीवेतन वगळून) त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणुन निश्चित करण्याबाबत मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 378/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.13.05.2022)**

आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, शासन निर्णय क्र. संकीर्ण-2020/प्र.क्र.33/अजाक, दि. 06 मे 2021 अन्वये महाराष्ट्र राज्यातील गावांची, वस्त्यांची व रस्त्यांची जातीवाचक नावे बदलुन नवीन नावे देण्याबाबतच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी शासन निर्णय पारीत झालेला आहे. त्यानुसार मा.विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समीती स्थापन करण्यात आलेली आहे. या समितीच्या

वेळोवेळी बैठका होत असून शासन निर्णयाप्रमाणे महानगरपालिका, औरंगाबाद क्षेत्रातील वस्त्यांची व रस्त्यांची जातीवाचक नावे बदलण्याबाबत गठित समितीने वेळोवेळी आदेशीत केलेले आहे.

उक्त शासन निर्णयाच्या अनुषंगाने महानगरपालिका स्तरीय ज्या वस्त्यांची, रस्त्यांची जातीवाचक नावे आहेत, अशा वस्त्यांची व रस्त्यांची माहिती वार्ड अधिकारी व वार्ड अभियंता 01 ते 09 यांच्या कडुन घेण्यात आलेली आहे. त्या आधारे अंतीम करण्यात आलेली यादी जाहिर प्रगटनाव्दारे दि.24/12/2021 रोजी सर्व वार्ड कार्यालयातील एकूण 54 वस्त्यांची जातीवाचक नावांची यादी प्रसिध्द करण्यात आली होती. त्याअनुषंगाने एकूण 1044 हरकती/सुचना प्राप्त झाल्या आहेत. यामधील 1040 आक्षेपकाने उपरोक्त शासन निर्णयास आक्षेप घेतला असुन महानगरपालिकेने पूर्ण अभ्यास न करता मनमानी पध्दतीने कुठलाही कायदेशीर सल्ला न घेता आयुक्तांनी जाहिरात आणि यादी अंतिम केल्याचे नमुद आहे. तथापी ही यादी प्रारुप असल्याने सदरील आक्षेप निकाली काढण्याचे प्रस्तावीत करण्यात येते. तसेच महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांनी नावे सुचवावीत या हेतुने प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिर प्रगटनापुर्वी आणि तद्नंतर हरकती व सुचना नुसार संपुर्ण शहानिशा करुन कार्यवाही अंतीम करण्याचे प्रस्तावीत करण्यात येते. आक्षेपामध्ये उर्वरीत तीन आक्षेप धारकांनी यादीमधील काही वस्त्यांची नावे बदलणे बाबत आक्षेप घेतला आहे. तसेच एक सुचना प्राप्त आहे. आक्षेपानुसार नमुद नावे जातिशी संबंधीत नाहीत. याप्रमाणे जाहीर प्रगटनाद्वारे प्रसिद्ध केलेल्या शहरातील 54 वस्त्यांची नावे बदलण्याची कार्यवाहि रद्द करावी अशी मागणी केली आहे.

त्याअनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रारंभीक खंड (3 अ)मध्ये नमुद केलेल्या नागरीकांचा मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्गीय, विशेष मागासवर्गीय, अनुसुचीत जाती व जमाती सुधारणा कायदा 1976 मधील परिशीष्ट 01 मधील भाग 09 मधील नमुद केलेल्या जाती प्रमाणे व खुल्या प्रवर्गातील जातीच्या नावानुसार प्रसिध्द केलेल्या जातीच्या अनुषंगाने आणि प्राप्त आक्षेपानुसार जातीवाचक रस्त्यांची व वस्त्यांची नागरीकांनी सुचवीलेल्या नावाच्या अनुषंगाने पुढील प्रमाणे प्रकरण सादर करण्यात येत आहे.

प्रसिद्ध करण्यात आलेल्या यादीमध्ये वार्ड कार्यालयाला नागरीकांनी एकूण 46 जातीवाचक वस्त्यांना पर्यायी नावे सुचवलेली आहेत. तसेच जाहिर प्रगटनानंतर एका व्यक्तींचे पर्यायी नाव नागरीकांनी सुचविलेले आहे. त्यापैकी काही पर्यायी जातीवाचक नावा करीता जास्त नावे सुचविण्यात आले आहेत आणि 04 जातीवाचक वस्त्याच्या नावा करीता एकहि पर्यायी नांव सुचविण्यात आले नाही.

करीता ज्या ठिकाणी ज्या जातीवाचक वस्त्या करीता एकच प्रस्तावीत नाव दिले आहे ते नावे प्रस्तावीत करण्यात येत आहे. तसेच जेथे एकापेक्षा जास्त नावे प्राप्त आहेत त्या ठिकाणी एक नाव घेण्यात येते.

1. प्रभाग क्र. 12, "**कुंभार गल्ली**" या वस्तीस नागरीकांनी सुचवलेले मत/प्रस्तावीत नाव "**गोरोबा काका गल्ली**"हे अंतीम करण्याचे प्रस्तावीत करण्यात येते.
2. प्रभाग क्र. 12, "**ब्राम्हण गल्ली**" या वस्तीस नागरीकांनी सुचवलेले मत/प्रस्तावीत नाव "**जगदंब गल्ली**" हे अंतीम करण्याचे प्रस्तावीत करण्यात येते.
3. प्रभाग क्र. 12, "**मल्लावपुरा**" या वस्तीस नागरीकांनी सुचवलेले मत/प्रस्तावीत नाव "**सावता गल्ली**" हे अंतीम करण्याचे प्रस्तावीत करण्यात येते.
4. प्रभाग क्र. 13, "**भिल्ल गल्ली**" या वस्तीस नागरीकांनी सुचवलेले मत/प्रस्तावीत नाव "**एकलव्यनगर**" हे अंतीम करण्याचे प्रस्तावीत करण्यात येते.
5. प्रभाग क्र. 16, "**भंगीवाडा**" या वस्तीस नागरीकांनी सुचवलेले मत/प्रस्तावीत नाव "**वाल्मिकीनगर**" हे अंतीम करण्याचे प्रस्तावीत करण्यात येते.
6. प्रभाग क्र. 16, "**मांगवाडा**" या वस्तीस नागरीकांनी सुचवलेले मत/प्रस्तावीत नाव "**मुक्ताईनगर**" हे अंतीम करण्याचे प्रस्तावीत करण्यात येते.
7. प्रभाग क्र. 16, "**चांभारवाडा**" या वस्तीस नागरीकांनी सुचवलेले मत/प्रस्तावीत नाव "**संत रोहिदास गल्ली**" हे अंतीम करण्याचे प्रस्तावीत करण्यात येते.
8. प्रभाग क्र. 18, "**बौध्दवाडा**" या वस्तीस नागरीकांनी सुचवलेले मत/प्रस्तावीत नाव "**सारनाथ गल्ली**" हे अंतीम करण्याचे प्रस्तावीत करण्यात येते.
9. प्रभाग क्र. 49, "**माळीवाडा**" या वस्तीस नागरीकांनी सुचवलेले मत/प्रस्तावीत नाव "**सावतानगर**" हे अंतीम करण्याचे प्रस्तावीत करण्यात येते.
10. प्रभाग क्र. 07, "**गोंधळीवाडा**" या वस्तीस नागरीकांनी सुचवलेले मत/प्रस्तावीत नाव "**जगदंबानगर**" हे अंतीम करण्याचे प्रस्तावीत करण्यात येते.

11. प्रभाग क्र. 01, "**धनगर गल्ली**" या वस्तीस नागरीकांनी सुचवलेले मत/प्रस्तावीत नाव "**होळकरनगर**" हे अंतीम करण्याचे प्रस्तावीत करण्यात येते.
12. प्रभाग क्र. 48, "**रंगार गल्ली**" या वस्तीस नागरीकांनी सुचवलेले मत/प्रस्तावीत नाव "**हिंगलाज नगर**" हे अंतीम करण्याचे प्रस्तावीत करण्यात येते.
13. प्रभाग क्र. 03, "**सोनार गल्ली**" या वस्तीस नागरीकांनी सुचवलेले मत/प्रस्तावीत नाव "**प्रेरणानगर**" हे अंतीम करण्याचे प्रस्तावीत करण्यात येते.
14. प्रभाग क्र. 02, "**मांगवाडा**" या वस्तीस नागरीकांनी सुचवलेले मत/प्रस्तावीत नाव "**लहूजीनगर**" हे अंतीम करण्याचे प्रस्तावीत करण्यात येते.
15. प्रभाग क्र. 01, "**कैकाडी गल्ली**" या वस्तीस नागरीकांनी सुचवलेले मत/प्रस्तावीत नाव "**जाधववाडा**"हे अंतीम करण्याचे प्रस्तावीत करण्यात येते.
16. प्रभाग क्र. 01, "**चांभार गल्ली**" या वस्तीस नागरीकांनी सुचवलेले मत/प्रस्तावीत नाव "**एकतानगर**" हे अंतीम करण्याचे प्रस्तावीत करण्यात येते.
17. प्रभाग क्र. 01, "**सोनार गल्ली**" या वस्तीस नागरीकांनी सुचवलेले मत/प्रस्तावीत नाव "**राधास्वामी कॉलनी**" हे अंतीम करण्याचे प्रस्तावीत करण्यात येते.
18. प्रभाग क्र. 03, "**कोळीवाडा**" या वस्तीस नागरीकांनी सुचवलेले मत/प्रस्तावीत नाव "**विश्वासनगर**" हे अंतीम करण्याचे प्रस्तावीत करण्यात येते.
19. प्रभाग क्र. 35, "**भाटनगर**" या वस्तीस नागरीकांनी सुचवलेले मत/प्रस्तावीत नाव "**संपतसिंगनगर**" हे अंतीम करण्याचे प्रस्तावीत करण्यात येते.
20. प्रभाग क्र. 89, "**धनगरवाडा**" या वस्तीस नागरीकांनी सुचवलेले मत/प्रस्तावीत नाव "**अहिल्याबाई होळकरनगर**" हे अंतीम करण्याचे प्रस्तावीत करण्यात येते.
21. प्रभाग क्र. 89, "**बौध्दवाडा**" या वस्तीस नागरीकांनी सुचवलेले मत/प्रस्तावीत नाव "**गौतम बौध्दनगर**" हे अंतीम करण्याचे प्रस्तावीत करण्यात येते.
22. प्रभाग क्र. 89, "**सुतारवाडा**" या वस्तीस नागरीकांनी सुचवलेले मत/प्रस्तावीत नाव "**आयोध्यानगर**" हे अंतीम करण्याचे प्रस्तावीत करण्यात येते.
23. प्रभाग क्र. 89, "**माळी गल्ली**" या वस्तीस नागरीकांनी सुचवलेले मत/प्रस्तावीत नाव "**महात्मा फुलेनगर**" हे अंतीम करण्याचे प्रस्तावीत करण्यात येते.
24. प्रभाग क्र. 89, "**कुंभारवाडा**" या वस्तीस नागरीकांनी सुचवलेले मत/प्रस्तावीत नाव "**संत गोरोबानगर**" हे अंतीम करण्याचे प्रस्तावीत करण्यात येते.
25. प्रभाग क्र. 89, "**ब्राम्हण गल्ली**" या वस्तीस नागरीकांनी सुचवलेले मत/प्रस्तावीत नाव "**परशुरामनगर**" हे अंतीम करण्याचे प्रस्तावीत करण्यात येते.
26. प्रभाग क्र. 89, "**चांभारवाडा**" या वस्तीस नागरीकांनी सुचवलेले मत/प्रस्तावीत नाव "**संत रोहिदासनगर**" हे अंतीम करण्याचे प्रस्तावीत करण्यात येते.
27. प्रभाग क्र. 88, "**कुरेशी मोहल्ला**" या वस्तीस नागरीकांनी सुचवलेले मत/प्रस्तावीत नाव "**सय्यद सादात मोहल्ला**" हे अंतीम करण्याचे प्रस्तावीत करण्यात येते.
28. प्रभाग क्र. 59, "**बौध्दवाडा**" या वस्तीस नागरीकांनी सुचवलेले मत/प्रस्तावीत नाव "**लुंबिनीनगर**" हे अंतीम करण्याचे प्रस्तावीत करण्यात येते.
29. प्रभाग क्र. 113, "**वैदूवाडा**" या वस्तीस नागरीकांनी सुचवलेले मत/प्रस्तावीत नाव "**जय दुर्गानगर**" हे अंतीम करण्याचे प्रस्तावीत करण्यात येते.
30. प्रभाग क्र. 70, "**मोची मोहल्ला**" या वस्तीस नागरीकांनी सुचवलेले मत/प्रस्तावीत नाव "**बाबा रामदेवनगर**" हे अंतीम करण्याचे प्रस्तावीत करण्यात येते.

ज्या ठिकाणी ज्या जातीवाचक वस्त्या करीता एकापेक्षा जास्त नावे प्राप्त आहेत त्या ठिकाणी एक नाव प्रस्तावीत करण्यात येते.

1. प्रभाग क्र. 23 चेलीपुरा येथील "**धोबिघाट**" येथील तीन पर्याय प्राप्त झाले असुन "**संत गाडगेबाबा घाट**" असे नांव देण्याचे प्रस्तावीत करण्यात येत आहे.
2. प्रभाग क्र. 46 नवाब पुरा येथील "**तेलंगवाडा**" याठिकाणी दोन पर्यायी नावे सुचविण्यात आले असुन "**बिरसा मुंडा मोहल्ला**" हे पर्यायी नाव कायम करण्याचे प्रस्तावीत आहे.

3. प्रभाग क्र. 46 नवाबपुरा येथील"**गवळीपुरा**"या ठिकाणी दोन पर्यायी नावे सुचविण्यात आले असुन "**विकासपुर**" हे पर्यायी नाव कायम करण्याचे प्रस्तावीत आहे.
4. प्रभाग क्र. 48 "**कुंभारवाडा**" या ठिकाणी सहा पर्यायी नावे सुचविण्यात आले असुन "**तुळसीबाग**" हे पर्यायी नाव कायम करण्याचे प्रस्तावीत आहे.
5. प्रभाग क्र. 48 "**जोहरीवाडा**" या ठिकाणी तीन पर्यायी नावे सुचविण्यात आले असुन "**पारसनगर**" हे पर्यायी नाव कायम करण्याचे प्रस्तावीत आहे.
6. प्रभाग क्र. 51 "**भोईवाडा**" या ठिकाणी सहा पर्यायी नावे सुचविण्यात आले असुन "**गंगापुत्र कॉलनी**" हे पर्यायी नाव कायम करण्याचे प्रस्तावीत आहे.
7. प्रभाग क्र. 51 "**पारधीपूरा**" या ठिकाणी दोन पर्यायी नावे सुचविण्यात आले असुन "**जीवकनगर**" हे पर्यायी नाव कायम करण्याचे प्रस्तावीत आहे.
8. प्रभाग क्र. 53 "**बौध्दवाडा**" या ठिकाणी पाच पर्यायी नावे सुचविण्यात आले असुन "**किरणनगर**" हे पर्यायी नाव कायम करण्याचे प्रस्तावीत आहे.
9. प्रभाग क्र. 67"**कैकाडीवाडा**" या ठिकाणी दोन पर्यायी नावे सुचविण्यात आले असुन "**शास्वतनगर**" हे पर्यायी नाव कायम करण्याचे प्रस्तावीत आहे.
10. वार्ड क्र. 04"**चांभारगल्ली**" या ठिकाणी दोन पर्यायी नावे सुचविण्यात आले असुन "**रोहिदास गल्ली**" हे पर्यायी नाव कायम करण्याचे प्रस्तावीत आहे.

या व्यतिरिक्त चार ठिकाणी चार जातीवाचक नावे असलेल्या मोहल्ल्यांना नाव सुचविलेले नाही. तसेच हरकती/सुचना मध्ये देखील या नावाकरीता प्रस्ताव अथवा मत प्राप्त नाही. करीता उपरोक्त नागरीकांनी दिलेल्या प्रस्तावीत नावा पैकीच या मोहल्ल्यांना नाव देण्याचे प्रस्तावीत करण्यात येत आहे. हि नावे एकापेक्षा जास्त प्रस्तावीत केलेल्या पर्यायामधुन अंतीम करण्यात येत आहे.

1. प्रभाग क्र. 22 "**मोमीनपुरा**" याला "**सुलतानपुरा**"हे नाव प्रस्तावीत करण्यात येत आहे.
2. प्रभाग क्र. 68 "**भोईवाडा**" याला "**उदय कॉलनी**"हे नाव प्रस्तावीत करण्यात येत आहे.
3. वार्ड क्र. 04 "**ब्राम्हणगल्ली**" याला "**उन्नतीनगर**"हे नाव प्रस्तावीत करण्यात येत आहे.
4. प्रभाग क्र. 89 चिकलठाणा येथील "**तेलीगल्ली**" याला "**अमृतनगर**"हे नाव प्रस्तावीत करण्यात येत आहे.
5. प्रभाग क्र. 75 येथील "**बौध्दवाडा**" याला "**आनंदनगर**"हे नाव प्रस्तावीत करण्यात येत आहे.
6. प्रभाग क्र. 12 "**डिंबरगल्ली**" जातीच्या यादीत नावनाही, तसेच याच कारणामुळे या गल्लीचे नांव बदलण्यास विरोध आहे. करीता आक्षेप आणि यादीच्या अनुषंगाने हे नांव बदलण्याचा प्रस्ताव रद्द करण्यात येतो.
7. प्रभाग क्र. 47 राजाबाजार येथील "**बोहरी कठडा**" या मोहल्याचे / वस्तीचे जातीच्या यादीत नांव नाही. करीता आक्षेप आणि यादीच्या अनुषंगाने हे नांव बदलण्याचा प्रस्ताव रद्द करण्यात येतो.
8. प्रभाग क्र. 67 "**सिल्लीखाना**" या मोहल्याचे / वस्तीचे जातीच्या यादीत नांव नाही. करीता आक्षेप आणि यादीच्या अनुषंगाने हे नांव बदलण्याचा प्रस्ताव रद्द करण्यात येतो.
9. प्रभाग क्र. 35 वप्रभाग क्र. 37 "**पटेलनगर**" या मोहल्याचे / वस्तीचे जातीच्या यादीत नांव नाही. करीता आक्षेप आणि यादीच्या अनुषंगाने हे नांव बदलण्याचा प्रस्ताव रद्द करण्यात येतो.
10. प्रभाग क्र. 37 "**शहानगर**" या मोहल्याचे / वस्तीचे जातीच्या यादीत नांव नाही. करीता आक्षेप आणि यादीच्या अनुषंगाने हे नांव बदलण्याचा प्रस्ताव रद्द करण्यात येतो.
11. प्रभाग क्र. 37 "**चौधरी कॉलनी**" या मोहल्याचे / वस्तीचे जातीच्या यादीत नांव नाही. करीता आक्षेप आणि यादीच्या अनुषंगाने हे नांव बदलण्याचा प्रस्ताव रद्द करण्यात येतो.
12. प्रभाग क्र. 89 कामगार कॉलनी येथील "**मुल्ला गल्ली**" या मोहल्याचे / वस्तीचे जातीच्या यादीत नांव नाही. करीता आक्षेप आणि यादीच्या अनुषंगाने हे नांव बदलण्याचा प्रस्ताव रद्द करण्यात येतो.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रारंभीक खंड (3 अ) मधील जातींच्या यादी नुसार आणि खुल्या प्रवर्गातील जातींच्या नावांप्रमाणे नागरीकांनी सुचवीलेले नावे अंतीम करण्यात येत असून ज्या वस्तीला एकापेक्षा जास्त पर्यायी नावे सुचवण्यात आली त्यापैकी एक पर्यायीनाव अंतिम करुन ज्या मोहल्यांना / वस्त्यांना नागरीकांनी नांव प्रस्तावीत केले नाही त्यांना प्राप्त प्रस्तावामध्ये सुचविलेल्या उर्वरीत नावापैकी नांव देण्याचे आणिमहाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रारंभीक खंड (3 अ) मधील जातीच्या यादीमध्ये नमुद नसलेल्या नावांना पर्यायी नांव न देता जे नांव आहे तेच नांव कायम ठेवण्याचे प्रस्तावीत करण्यात येत आहे आणि आक्षेप

निकाली काढण्यात येत आहे. त्यानुसार पुढीलप्रमाणे जातीवाचक रस्त्यांची व वस्त्यांची नावे बदलुन नागरीकांनी सुचविलेल्या पर्यायी प्रस्तावानुसार बदल करण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभे समोर सादर करण्यात येत आहे. करीता प्रस्ताव विचारार्थ तसेच मान्यतेस्तव सविनय सादर.

विभागाचे नांव – औरंगाबाद जिल्हाचे नांव - औरंगाबाद

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| **अ. क्र** | **क्षेत्र** | **जातीवाचक नावे असलेल्या वस्तीचे पुर्वीचे नाव** | **शासन निर्णयानुसार नविन दिलेले वस्तीचे नाव** |
| १ | प्रभाग क्र.१२ | कुंभार गल्ली | गोराबा काका गल्ली |
| २ | प्रभाग क्र.१२ | ब्राम्हण गल्ली | जगदंब गल्ली |
| ३ | प्रभाग क्र.१२ | मल्लावपुरा बेगमपुरा | सावता गल्ली |
| ४ | प्रभाग क्र.१३ | भिल्ल गल्ली भिमनगर (उत्तर) मस्जिद जवळ | एकलव्य नगर |
| ५ | प्रभाग क्र. १६ | भंगीवाडा (साठेनगर जवळ) | वाल्मिकी नगर |
| ६ | प्रभाग क्र. १६ | मांगवाडा (भावसिंगपुरा गांव) | मुक्ताई नगर |
| ७ | प्रभाग क्र. १६ | चांभारवाडा (भिमनगर, भवसिंगपुरा गांव) | संत रोहिदास गल्ली |
| ८ | प्रभाग क्र. १८ | बौध्दवाडा (छोटी मस्जिदच्या मागे) | सारनाथ गल्ली |
| ९ | प्रभाग क्र. २२ | मोमीनपुरा, लोटाकारंजा | सुलतानपुरा |
| १० | प्रभाग क्र. ४९ | माळीवाडा (बारुदगर नाला) | सावता नगर |
| ११ | प्रभाग क्र.२३ चेलीपुरा | धोबीघाट (काचीवाडा) | संत गाडगेबाबा धोबी घाट |
| १२ | प्रभाग क्र.४६ नवाबपुरा | तेलंगवाडा | बिरसा मुंडा मोहल्ला |
| १३ | प्रभाग क्र.४६ नवाबपुरा | गवळीपुरा. | विकासपुर |
| १४ | प्रभाग क्र. ४८ गुलमंडी | कुंभारवाडा | तुळसी बाग |
| १५ | प्रभाग क्र. ४८ गुलमंडी | जोहरीवाडा | पारस नगर |
| १६ | प्रभाग क्र. ४८ गुलमंडी | रंगार गल्ली. | हिंगलाज नगर |
| १७ | प्रभाग क्र. ५१ नागेश्वरवाडी | भोईवाडा. | गंगापुत्र कॉलनी |
| १८ | प्रभाग क्र. ५१ नागेश्वरवाडी | पारधीपुरा | जीवक नगर |
| १९ | प्रभाग क्र. ५३ औरंगपुरा | बौध्दवाडा (पैठणगेट) | किरण नगर |
| २० | प्रभाग क्र.६७ सिल्लेखाना | कैकाडीवाडा | शास्वत नगर |
| २१ | प्रभाग क्र. ६८ समर्थ नगर | भोईवाडा | उदय कॉलनी |
| २२ | प्रभाग क्र.७, मयुर पार्क | गोंधळीवाडा | जगदंबा नगर |
| २३ | प्रभाग क्र.१, हर्सुल प्रभाग | धनगर गल्ली | होळकर नगर |
| २४ | प्रभाग क्र.३, हर्सुल प्रभाग | सोनार गल्ली | प्रेरणानगर |
| २५ | प्रभाग क्र.२, हर्सुल प्रभाग | ब्राम्हण गल्ली | उन्नतीनगर |
| २६ | प्रभाग क्र.२, हर्सुल प्रभाग | मांगवाडा | लहुजी नगर |
| २७ | प्रभाग क्र.१, हर्सुल प्रभाग | कैकाडी गल्ली | जाधव वाडा |
| २८ | प्रभाग क्र.१, हर्सुल प्रभाग | चांभार गल्ली | एकता नगर |
| २९ | प्रभाग क्र.१, एकतानगर | सोनार गल्ली. | राधास्वामी कॉलनी |
| ३० | प्रभाग क्र.३, एकतानगर | कोळीवाडा | विश्वासनगर |
| ३१ | प्रभाग क्र.१, एकतानगर | चांभार गल्ली | रोहीदास गल्ली |
| ३२ | प्रभाग क्र. ३५ नारेगांव | भाटनगर (गल्ली) | संपतसिंग नगर |
| ३३ | प्रभाग क्र. ८९ कामगार कॉलनी चिकलठाणा | धनगर वाडा | अहिल्याबाई होळकर नगर |
| ३४ | प्रभाग क्र. ८९ कामगार कॉलनी | साठेनगर (मांग वाडा) | आण्णाभाऊ साठे नगर |

| | | | |
|---|---|---|---|
| | चिकलठाणा | | |
| ३५ | प्रभाग क्र. ८९ कामगार कॉलनी चिकलठाणा | बौध्दवाडा | गौतम बौध्द नगर |
| ३६ | प्रभाग क्र. ८९ कामगार कॉलनी चिकलठाणा | सुतार वाडा | आयोध्या नगर |
| ३७ | प्रभाग क्र. ८९ कामगार कॉलनी चिकलठाणा | माळी गल्ली | महात्मा फुले नगर |
| ३८ | प्रभाग क्र. ८९ कामगार कॉलनी चिकलठाणा | कुंभारवाडा | संत गोरोबा नगर |
| ३९ | प्रभाग क्र. ८९ कामगार कॉलनी चिकलठाणा | तेली गल्ली | अमृतनगर |
| ४० | प्रभाग क्र. ८९ कामगार कॉलनी चिकलठाणा | ब्राम्हण गल्ली | परशुराम नगर |
| ४१ | प्रभाग क्र. ८९ कामगार कॉलनी चिकलठाणा | चांभार वाडा. | संत रोहिदास नगर |
| ४२ | प्रभाग क्र.८८ कामगार कॉलनी | कुरेशी मोहल्ला | सय्यद सादात मोहल्ला |
| ४३ | प्रभाग क्र. ५९ दक्षिणबायजीपुरा | बौध्दवाडा (गोधडीपुरा) | लुंबिनी नगर |
| ४४ | प्रभाग क्र. ११३ भारत नगर | वैदुवाडा (वैदु मंदिराजवळ) | जय दुर्गा नगर |
| ४५ | प्रभाग क्र. ७० पदमपुरा | मोची मोहल्ला | बाबा रामदेवनगर |
| ४६ | प्रभाग क्र. ७५ बौध्दवाडा, उत्तमनगर | बौध्दनगर | आनंद नगर |

करीता प्रस्ताव विचारार्थ तसेच मान्यतेस्थव सविनय सादर.

**ठराव क्रमांक 378/2022:-**

शासन निर्णय क्र. संकीर्ण-2020/प्र.क्र.33/अजाक, दि. 06 मे 2021 अन्वये महाराष्ट्र राज्यातील गावांची, वस्त्यांची व रस्त्यांची जातीवाचक नावे बदलुन नवीन नावे देण्याबाबत उक्त शासन निर्णयाच्या अनुषंगाने महानगरपालिका स्थरीय ज्या वस्त्यांची, रस्त्यांची जातीवाचक नावे आहेत, अशा वस्त्यांची व रस्त्यांची नावे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रारंभीक खंड (3 अ) मधील जातींच्या यादी नुसार आणि खुल्या प्रवर्गातील जातींच्या नावांप्रमाणे नागरीकांनी सुचवीलेले नावे अंतीम करण्यात येते.

| **अ.क्र** | **क्षेत्र** | **जातीवाचक नावे असलेल्या वस्तीचे पुर्वीचे नाव** | **शासन निर्णयानुसार नविन दिलेले वस्तीचे नाव** |
|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** |
| १ | प्रभाग क्र.१२ | कुंभार गल्ली | गोराबा काका गल्ली |
| २ | प्रभाग क्र.१२ | ब्राम्हण गल्ली | जगदंब गल्ली |
| ३ | प्रभाग क्र.१२ | मल्लावपुरा बेगमपुरा | सावता गल्ली |
| ४ | प्रभाग क्र.१३ | भिल्ल गल्ली भिमनगर (उत्तर) मस्जिद जवळ | एकलव्य नगर |
| ५ | प्रभाग क्र. १६ | भंगीवाडा (साठेनगर जवळ) | वाल्मिकी नगर |
| ६ | प्रभाग क्र. १६ | मांगवाडा (भावसिंगपुरा गांव) | मुक्ताई नगर |
| ७ | प्रभाग क्र. १६ | चांभारवाडा (भिमनगर, भवसिंगपुरा गांव) | संत रोहिदास गल्ली |
| ८ | प्रभाग क्र. १८ | बौध्दवाडा (छोटी मस्जिदच्या मागे) | सारनाथ गल्ली |
| ९ | प्रभाग क्र. २२ | मोमीनपुरा, लोटाकारंजा | सुलतानपुरा |
| १० | प्रभाग क्र. ४९ | माळीवाडा (बारुदगर नाला) | सावता नगर |
| ११ | प्रभाग क्र.२३ चेलीपुरा | धोबीघाट (काचीवाडा) | संत गाडगेबाबा धोबी घाट |
| १२ | प्रभाग क्र.४६ नवाबपुरा | तेलंगवाडा | बिरसा मुंडा मोहल्ला |

| | | | |
|---|---|---|---|
| १३ | प्रभाग क्र.४६ नवाबपुरा | गवळीपुरा. | विकासपुर |
| १४ | प्रभाग क्र. ४८ गुलमंडी | कुंभारवाडा | तुळसी बाग |
| १५ | प्रभाग क्र. ४८ गुलमंडी | जोहरीवाडा | पारस नगर |
| १६ | प्रभाग क्र. ४८ गुलमंडी | रंगार गल्ली. | हिंगलाज नगर |
| १७ | प्रभाग क्र. ५१ नागेश्वरवाडी | भोईवाडा. | गंगापुत्र कॉलनी |
| १८ | प्रभाग क्र. ५१ नागेश्वरवाडी | पारधीपुरा | जीवक नगर |
| १९ | प्रभाग क्र. ५३ औरंगपुरा | बौध्दवाडा (पैठणगेट) | किरण नगर |
| २० | प्रभाग क्र.६७ सिल्लेखाना | कैकाडीवाडा | शास्वत नगर |
| २१ | प्रभाग क्र. ६८ समर्थ नगर | भोईवाडा | उदय कॉलनी |
| २२ | प्रभाग क्र.७, मयुर पार्क | गोंधळीवाडा | जगदंबा नगर |
| २३ | प्रभाग क्र.१, हर्सुल प्रभाग | धनगर गल्ली | होळकर नगर |
| २४ | प्रभाग क्र.३, हर्सुल प्रभाग | सोनार गल्ली | प्रेरणानगर |
| २५ | प्रभाग क्र.२, हर्सुल प्रभाग | ब्राम्हण गल्ली | उन्नतीनगर |
| २६ | प्रभाग क्र.२, हर्सुल प्रभाग | मांगवाडा | लहुजी नगर |
| २७ | प्रभाग क्र.१, हर्सुल प्रभाग | कैकाडी गल्ली | जाधव वाडा |
| २८ | प्रभाग क्र.१, हर्सुल प्रभाग | चांभार गल्ली | एकता नगर |
| २९ | प्रभाग क्र.१, एकतानगर | सोनार गल्ली. | राधास्वामी कॉलनी |
| ३० | प्रभाग क्र.३, एकतानगर | कोळीवाडा | विश्वासनगर |
| ३१ | प्रभाग क्र.१, एकतानगर | चांभार गल्ली | रोहीदास गल्ली |
| ३२ | प्रभाग क्र. ३५ नारेगांव | भाटनगर (गल्ली) | संपतसिंग नगर |
| ३३ | प्रभाग क्र. ८९ कामगार कॉलनी चिकलठाणा | धनगर वाडा | अहिल्याबाई होळकर नगर |
| ३४ | प्रभाग क्र. ८९ कामगार कॉलनी चिकलठाणा | साठेनगर (मांग वाडा) | आण्णाभाऊ साठे नगर |
| ३५ | प्रभाग क्र. ८९ कामगार कॉलनी चिकलठाणा | बौध्दवाडा | गौतम बौध्द नगर |
| ३६ | प्रभाग क्र. ८९ कामगार कॉलनी चिकलठाणा | सुतार वाडा | आयोध्या नगर |
| ३७ | प्रभाग क्र. ८९ कामगार कॉलनी चिकलठाणा | माळी गल्ली | महात्मा फुले नगर |
| ३८ | प्रभाग क्र. ८९ कामगार कॉलनी चिकलठाणा | कुंभारवाडा | संत गोरोबा नगर |
| ३९ | प्रभाग क्र. ८९ कामगार कॉलनी चिकलठाणा | तेली गल्ली | अमृतनगर |
| ४० | प्रभाग क्र. ८९ कामगार कॉलनी चिकलठाणा | ब्राम्हण गल्ली | परशुराम नगर |
| ४१ | प्रभाग क्र. ८९ कामगार कॉलनी चिकलठाणा | चांभार वाडा. | संत रोहिदास नगर |
| ४२ | प्रभाग क्र.८८ कामगार कॉलनी | कुरेशी मोहल्ला | सय्यद सादात मोहल्ला |
| ४३ | प्रभाग क्र. ५९ दक्षिणबायजीपुरा | बौध्दवाडा (गोधडीपुरा) | लुंबिनी नगर |
| ४४ | प्रभाग क्र. ११३ भारत नगर | वैदुवाडा (वैदु मंदिराजवळ) | जय दुर्गा नगर |
| ४५ | प्रभाग क्र. ७० पदमपुरा | मोची मोहल्ला | बाबा रामदेवनगर |
| ४६ | प्रभाग क्र. ७५ बौध्दवाडा, उत्तमनगर | बौध्दनगर | आनंद नगर |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रारंभीक खंड (3 अ) मधील जातीच्या यादीमध्ये नमुद नसल्याने वॉर्ड कार्यालयामार्फत नावात बदल करण्याबाबत सुचवण्यात आलेले एकूण 54 जातीवाचक नावांपैकी एकूण 08 वस्त्यांचे व रस्त्यांची नावे वगळण्यात येत असून त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | क्षेत्र | वॉर्ड कार्यालयामार्फत जाती वाचक नावे नसलेल्या वस्तीचे नाव |
|---|---|---|
| 1. | प्रभाग क्र.12 | डिंबर गल्ली |
| 2. | प्रभाग क्र.47, राजाबाजार | बोहरी कठडा |
| 3. | प्रभाग क्र.35, नारेगाव | पटेलनगर |
| 4. | प्रभाग क्र.37 | शाहनगर |
| 5. | प्रभाग क्र.37 | पटेलनगर |
| 6. | प्रभाग क्र.37 | चौधरी कॉलनी |

| | | |
|---|---|---|
| 7. | प्रभाग क्र.89 कामगार कॉलनी, चिकलठाणा | मुल्ला गल्ली |
| 8. | प्रभाग क्र.67 | सिल्लेखाना |

प्रस्ताव मध्ये दर्शविल्याप्रमाणे मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाहि व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 379/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.13.05.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, देशामध्ये व राज्यामध्ये कोव्हिड-19 या विषाणुचा प्रार्दुभाव झाल्यामुळे Pandemic ची साथ संपुर्ण देश व राज्यामध्ये पसरली असून कोव्हिड-19 हा साथरोग नियंत्रित करण्याची आवश्यकता आहे. औरंगाबाद शहरामधील कोव्हिड-19 विषाणु बाधीत रुग्णांची सद्यस्थिती व त्यावरील उपाय योजना करण्यात येत आहे. त्याअंतर्गत रॅपिड ॲन्टिजन टेस्ट किट खरेदी करीता अंदाजित र.रु.1,12,000/- (अक्षरी रुपये एक कोटी बारा लक्ष फक्त) करीता Tender ID No.2021_AMCA_ 744905_2 अन्वये निविदा मागविण्यात आलेली आहे.

उपरोक्त प्रमाणे मागविण्यात आलेल्या निविदेस मा.सर्वसाधारण सभेच्या कार्योत्तर मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**<u>ठराव क्रमांक 379/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कोव्हिड-19 प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्यासाठी आरोग्य विभागाअंतर्गत कोव्हिड-19 हा साथरोग नियंत्रित करण्यासाठी अंदाजित र.रु.1,12,000/- (अक्षरी रुपये एक कोटी बारा लक्ष फक्त) करीता Tender ID No.2021_AMCA_ 744905_2 अन्वये मागविण्यात आलेल्या निविदेस कार्योत्तर मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 380/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.13.05.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, 17 व्या जिम्नॅस्टिक जागतिक अजिंक्यपद स्पर्धा जीमरिस-पोर्तुगाल येथे दि.16 ते 18 जुन 2022 पर्यंत आयोजित करण्यात आलेली आहे. एरोबीक जिम्रॅस्टीक स्पर्धेसाठी भारतीय संघात औरंगाबाद शहरातील युवा खेळाडू श्री.विजय शेषराव इंगळे यांची निवड झालेली आहे. या होतकरु खेळाडूस स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आर्थिक मदतीची गरज आहे.

अशा उदयोन्मुख खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी औरंगाबाद महानगरपालिकेने अंशदाने लेखाशिर्षा अंतर्गत अर्थसंकल्पात तरतुद केलेली असून यापुर्वी शहरातील खेळांडुंना आर्थिक मदत केलेली आहे.

औरंगाबाद शहरातील खेळाडू आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भारताचे प्रतिनिधीत्व करतो आहे ही शहरवासीयां साठी अभिमानाची बाब आहे. श्री.विजय इंगळे यांस स्पर्धेत सहभागी होण्याकरीता रु.1,23,250/-(अक्षरी रुपये एक लक्ष तेवीस हजार दोनशे पन्नास फक्त) इतका खार्च अपेक्षित आहे. करीता, संबंधीत खेळाडूस वर नमुद केल्याप्रमाणे आंतरराष्ट्रीय एरोबीक जिम्नॅस्टिक स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आर्थीक मदत देण्याबाबतचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 380/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जीमरीस-पोर्तुगाल येथे दि.16 ते 18 जुन 2022 या कालावधीत होणाऱ्या 17 व्या जिम्नॅस्टिक जागतिक अजिंक्यपद स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झालेला औरंगाबाद शहरातील युवा जिम्नॅस्टिक खेळाडू श्री.विजय शेषराव इंगळे यास या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी महानगरपालिका औरंगाबाद तर्फे र.रु.1,23,250/- (अक्षरी रुपये एक लक्ष तेवीस हजार दोनशे पन्नास फक्त) आर्थिक मदत देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 381/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.13.05.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद रेल्वेस्टेशन येथे रेल्वे विभागाने महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळास शहर वाहतूक बस संचलन करण्यासाठी मुख्य रस्त्यालगत असलेली विविक्षित आकाराची जागा औरंगाबाद महानगरपालिकेस Pay & Use तत्वावरील शौचालय BOT बेसीसवर बांधण्यासाठी उपलब्ध करुन दिली आहे.

सदर जागेवर मा.आयुक्त यांनी मंजुरी दिल्यानुसार BOT बेसीसवर नागरीकांच्या सार्वजनिक वापरा करीता Pay & Use तत्वावर शौचालय बांधणे बाबत मे.सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हिसेस ऑर्गनायझेशन मुख्य कार्यालय मुंबई यांना प्रदान करण्यात आली आहे.

करीता, त्यानुसार उपरोक्त नमुद जागेत Pay & Use तत्वावरील शौचालय सार्वजनिक वापराकरीता बांधणे, संपुर्ण खर्चासह संचलन, व्यवस्थापन व दुरुस्ती यासाठी आगामी 30 वर्षाकरीता देणेबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 381/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद रेल्वेस्टेशन येथील रेल्वे विभागाच्या जागेत दर्शविलेल्या ठिकाणी BOT बेसीसवर Pay & Use पध्दतीवर चालविले जाणारे शौचालय सार्वजनिक वापराकरीता बांधणे, त्याची देखभाल दुरुस्ती करणे आगामी 30 वर्षे यासह संपुर्ण स्वखर्चाने त्याचे संचलन व व्यवस्थापन करणे यासाठी मे.सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हिस ऑर्गनायझेशन, मुंबई यांना देणे बाबत मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 382/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.17.05.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.89 चिकलठाणा भारतनगर ते पुष्पक गार्डन पर्यंत 450 मी.मी.व्यासाची जलनि:स्सारण वाहिनी टाकणे या कामाचे अंदाजपत्रक SSR 2021-22 नुसार र.रु.32,01,674/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून या कामाचा खर्च महानगरपालिका अर्थसंकल्प सन 2022-23 च्या मधील लेखाशिर्ष जलनि:स्सारण देखभाल दुरुस्ती करणे मधून प्रस्तावीत करण्यात आला आहे.

करीता सदर कामाचे अंदाजपत्रक र.रु.32,01,674/- मान्यतेबाबतचा मा.स्थायी समिती सभेसमोर ठेवण्याचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 382/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.89 चिकलठाणा भारतनगर ते पुष्पक गार्डन पर्यंत 450 मी.मी.व्यासाची जलनि:स्सारण वाहिनी टाकणे या कामाचे अंदाजपत्रक र.रु.32,01,674/- च्या प्रस्तावात मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 383/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.18.05.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिका शिक्षण विभागामार्फत एकूण 141 बालवाड्या शहरातील विविध भागात चालविल्या जातात. सर्व बालवाडी वर्गाचे एकूण 5070 विद्यार्थी आहेत. हे विद्यार्थी साधारणणे कमी उत्पन्न गटातील पालकांचे असतात. यांचा वयोगट 3 ते 6 वर्षे असतो. ह्या वयोगटातील मुलांच्या शारिरिक व बौध्दीक विकासासाठी सकस आहारांची अत्यंत आवश्यकता असते. तो त्यांना न मिळाल्यास ह्या वयात कुपोषण होऊन त्यांच्या शारिरीक व बौध्दीक विकास खुंटला जातो. त्या नंतरच्या वयात तो भरुन निघणे अवघड असते. या बाबींचा विचार करुन महानगरपालिकेच्या शिक्षण विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या बालवाडीतील मुलांना पोषण आहार सुरु करण्यात आलेला आहे. यापुर्वी मनपा बालवाडी यांना अन्नामृत फाऊंडेशन द्वारे पोषण आहार पुरवठा करण्यात येत असे. परंतु कोव्हिड-19 या रोगाच्या प्रार्दुभावामुळे लहान मुलांच्या आरोग्याच्या दृष्टिने शाळा, बालवाड्या बंद करण्याचे आदेश प्राप्त होते. कोव्हिड-19 रोगाचा प्रार्दुभाव हा कमी झाल्यामुळे माहे मार्च-2022 पासून शाळा, बालवाड्या सुरु करण्यात आलेल्या आहेत.

मनपा बालवाड्यातील विद्यार्थ्यांना पुन:श्च पोषण आहार सुरु करणे बाबत निविदा प्रक्रिया प्रस्तावीत करण्यात आलेली आहे निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत मे.अन्नामृत फाऊंडेशन यांनी पोषण आहार हा गतवर्षी असलेल्या दराने म्हणजे र.रु.6.60/-पैसे (अक्षरी सहा रुपये साठ पैसे फक्त) या दराने देण्यास तयार आहेत.

महानगरपालिकेच्या 1 ली ते 7 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार हा अन्नामृत फाऊंडेशन मुंबई यांच्या मार्फत देण्यात येतो. आहार हा उत्तम दर्जाचा, स्वच्छ व गरम असा असतो. याच धर्तीवर अन्नामृत फाऊंडेशनचा पोषण आहार बालवाड्यांसाठी मागील सात वर्षापासून देण्यात येत आहे. पोषण आहाराचा दर्जा चांगला असल्याकारणाने सन 2022-23 या शैक्षणिक वर्षासाठी पोषण आहाराचा पुरवठा करण्यासाठी ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत अन्नामृत फाऊंडेशन या संस्थेस मुदतवाढ देण्यासंबंधी प्रस्तावीत करण्यात येत आहे.

बालवाडी पोषण आहारास लागणारे साहित्य (तांदुळ, दाळ, भाज्या, तुप, मसाला इ.) उपलब्ध करुन घेणे, तो शिजवणे तसेच बालवाडी पर्यंत पोहचविणे अशी संपुर्ण जबाबदारी ही अन्नामृत फांऊडेशनची असेल ह्या संपुर्ण जबाबदारीसाठी महानगरपालिकेने रु.6.60 पैसे (अक्षरी सहा रुपये साठ पैसे फक्त)/प्रतिदिन/ प्रति लाभार्थी असे दर ठरविले आहेत.

त्याप्रमाणे 5070 विद्यार्थी x रु.6.60=33,462/- (अक्षरी तेहतीस हजार चारशे बासष्ठ रुपये फक्त) प्रतिदिन यानुसार एकूण वर्षभरात अंदाजे कार्य दिवस (सुट्टयांचे दिवस वगळता कार्य दिवस हे कमी जास्त होऊ शकतात) पोषण आहार घ्यावा लागतो. म्हणजेच निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन पुरवठा आदेश निर्गमित होईपर्यंतचे तारखेपर्यंत असेल. त्यानुषंगाने जे कार्यदिवस पुरवठा करण्यात येईल त्या अनुषंगाने देयक अदा करण्यात येईल.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम 66 (1) (3) मध्ये महानगरपालिकेस स्वेच्छा निर्णया नुसार तरतुद करता येईल. अशा बाबींमधील शाळकरी मुलांसाठी दुधाची तरतुद करणे या बाबीचा समावेश आहे.

बालवाड्यातील विद्यार्थ्यांचा वयोगट 3 ते 6 वर्ष असा आहे.त्यांना जरुरी उष्मांक मिळण्यासाठी पुरक आहाराची गरज आहे. त्यामुळे दुधा ऐवजी मनपा बालवाडीच्या विद्यार्थ्यांना पोषण आहार देणे बाबत मा.सर्वसाधारण सभा दि.18.10.2012 ठराव क्रमांक-906 अन्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम संविदा प्रकरण 5 चे 2/(2) नुसार सन 2022-23 या शैक्षणिक वर्षासाठी बालवाडी पोषण आहार योजनेस म्हणजेच निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन पुरवठा आदेश निर्गमित झाल्यापर्यंतचे तारखेपर्यंत च्या खर्चाच्या मान्यतेस्तव सादर. तसेच सदर पोषण आहार हा अन्नामृत फाऊंडेशन या संस्थेमार्फत पुरविण्याच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 383/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका शिक्षण विभागामार्फत एकुण 141 बालवाड्या शहरातील विविध भागात चालविल्या जात असून सर्व बालवाडी वर्गातील एकुण 5070 विद्यार्थी हे कमी उत्पन्न गटातील पालकांचे असून त्यांचा वयोगट 3 ते 6 वर्ष असल्यामुळे महानगरपालिकेतील बालवाडीतील मुलांना पोषण आहार उपलब्ध करुन देण्यास मंजुरी देण्यात येते. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 संविदा प्रकरण 5 चे 2/(2) नुसार सन 2022-23 या शैक्षणिक वर्षासाठी बालवाडी पोषण आहार योजनेस पोषण आहाराचा पुरवठा करण्यासाठी ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत अन्नामृत फाऊंडेशन या संस्थेस मुदतवाढ देण्यासंबंधी प्रस्तावीत करण्यात येत आहे. निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन पुरवठा आदेश निर्गमित होईपर्यंतचे तारेखेपर्यंत अन्नामृत फाऊंडेशन यांच्याकडून पोषण आहार पुरवठा करणेस तसेच त्यासाठी प्रती विद्यार्थी रु.6.60/- (अक्षरी सहा रुपये साठ पैसे फक्त) यानुसार होणाऱ्या खर्चास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 384/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.18.05.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहरातील बुढ्ढीलेन परिसरातील मिळकत न.भु.क्र.3208, नेहरुभवन या इमारतीचा पुनर्विकास करण्यासाठी मा.सर्वसाधारण सभेने विषय क्रमांक-1260 दि.19.12.2019 अन्वये सदर ठिकाणी प्रकल्प विकसित करणे, PMC ची नेमणुक करणे, प्रकल्पाची उपयोगिता तपासणे या बाबीसाठी मंजुरी प्रदान केली असून प्रस्ताव क्रमांक-132/2021 दि.11.05.2021 अन्वये या कामासाठी ई-निविदा मागविणे, ऑनलाईन पध्दतीने या संकुलातील उपांगे 30 वर्षाच्या कालावधीसाठी करारावर देणे यासह अंदाजपत्रकीय र.रु.32,01,93,000/- यास प्रशासकीय मंजुरी प्रदान केली आहे.

या मंजुरीनुसार या प्रकल्पासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (Project Management Consultant) ची नेमणुक करण्यासाठी ई-निविदा विभागामार्फत ई-निविदा क्र.2020_AMCA_604267_1 अन्वये निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. सदर निविदेअंतर्गत पाच निविदा प्राप्त झाल्या होत्या. यामध्ये निविदेतील तरतुदीनुसार या कामासाठी पात्र एजन्सीची निवड करण्यासाठी जे पात्रता निकष निश्चित करण्यात आले होते. (Evaluation Criteria) त्याआधारे एजन्सीची निवड करण्याची तरतुद करण्यात आलेली होती. या निविदेमध्ये निवड झालेल्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना एकूण प्रकल्प किंमतीच्या 2% व कर लागू एवढे सेवामुल्य देण्याचे निश्चित करण्यात आले होते.

त्यास्तव प्राप्त पाच निविदांपैकी पात्र प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची निवड करण्यासाठी निविदेतील तरतुदीनुसार मुल्यांकन समिती निश्चित करण्यात आली होती. त्यामध्ये तत्कालीन विभाग प्रमुख-विद्युत सहाय्यक संचालक-नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद मुख्य लेखाधिकारी, शहर अभियंता व मा.प्रशासक/आयुक्त यांचा समावेश करण्यात आलेला होता. सदर निविदेची छाननी मुल्यांकन समिती समोर झाली असता पात्रता निकषानुसार निश्चित करण्यात आली. यामध्ये गुणांकनापैकी निविदा भरलेल्या प्रत्येक एजन्सीला त्यांचे अभिलेखे तपासल्यानंतर मुद्देनिहाय गुण देण्यात येऊन एकूण गुणांची बेरीज विचारात घेण्यात आली आहे.

यासाठी ज्या निविदा प्राप्त झाल्या आहेत व त्यांना मुद्देनिहाय गुण मुल्यांकन समितीने दिली आहे. त्याचा संक्षिप्त तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | एजन्सीचे नाव | प्राप्त गुण (100) पैकी |
|---|---|---|
| 1. | श्री.पत्की ॲण्ड असोसिएट्स | 77 |
| 2. | डिझाईन ब्रु | 78 |

| | | |
|---|---|---|
| 3. | जियो डिझाईन | 69 |
| 4. | फॅबी कॉरपोरेशन | पात्र नाही |
| 5. | रेनिसन्स आर्क प्रा.लि. | 82 |

सदर कामासाठीची निविदा ही मुल्यांकन समितीने दिलेल्या गुणानुसार करावयाची असल्याने मुल्यांकना आधारे सर्वाधिक गुण M/s Renaissance Arch Pvt.Ltd. यांनी 82 गुण प्राप्त केल्याने त्यांची निवड करण्यात आली आहे.

तरी सर्वाधिक गुण प्राप्त करणारी एजन्सी M/s Renaissance Arch Pvt.Ltd. ठरल्याने त्यांची निविदेत नमुद प्रमाणे एकूण प्रकल्प किंमतीच्या निश्चित असलेले सेवामुल्य 2% व कर लागु दराने निवड करण्यात आली आहे. या बाबीस मान्यता देणे बाबतचा प्रस्ताव कार्योत्तर मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 384/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नेहरु भवन, बुढ्ढीलेन ची जुनी इमारत पाडुन सांस्कृतीक सभागृह, प्रदर्शन हॉल व दुकाने/कार्यालये व इतर उपांगाचे बांधकाम करणे या कामासाठी प्राप्त एकुण पाच निविदांपैकी मुल्यांकन समितीच्या मुल्यांकनानंतर सर्वाधिक गुण हे Renaissance Arch Consultant Pvt.Ltd. यांनी प्राप्त केल्याने त्यांची एकूण प्रकल्प किंमतीच्या व निविदेत नमुद केलेले निश्चित सेवामुल्य 2% + लागू वस्तु व सेवाकर या दराच्या निविदेस कार्योत्तर मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 385/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.20.05.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरासाठी सद्यस्थितीत हर्सुल तलाव पाणी पुरवठा योजना (सन-1954) जायकवाडी जुनी व बुस्टर पाणी पुरवठा योजना (सन-1975-76 व 1984) तसेच जायकवाडी नवीन पाणी पुरवठा योजना (सन-1991) या योजनांद्वारे पाणी पुरवठा करण्यात येतो. सदर योजना जुनी झाल्यामुळे अशुध्द पाण्याची उचल दररोज 270 द.ल.ली. असतांना महत्तम क्षमतेनुसार दररोज फक्त 130 द.ल.ली.उचल होत आहे. जलशुध्दीकरण व्यय, योजना व्यय व मार्गस्थ ग्राहकांना पाणी दिल्यानंतर निव्वळ 120 द.ल.ली.पाणी पुरवठा केला जातो. तसेच शहरांतर्गत वितरण व्यवस्था ही जुनी झालेली असल्यामुळे नागरीकांपर्यंत प्रत्यक्षात 80 ते 85 द.ल.ली.प्रतिदिन पाणी पोहचत आहे. त्यामुळे शहरात 6-7 दिवसाआड पाणीपुरवठा करावा लागत आहे.

औरंगाबाद शहर वाढीव पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून राबविण्यात येत असून योजना पुर्ण होण्यास 2-3 वर्षाचा कालावधी लागू शकतो. सदर योजनेचा आढावा घेणेसाठी तसेच औरंगाबाद शहर पाणी पुरवठा सद्यस्थिती बाबत मा.प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली तसेच मा.सदस्य सचिव (महाराष्ट्र जीवन प्राधिकरण) व मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या उपस्थितीत दि.06.05.2022 रोजी बैठक संपन्न झाली. बैठकीत मा.प्रधान सचिव यांनी शहर पाणी पुरवठा सुरळीत करण्यासाठी Temporary Water Supply Schemes (TPWS) तयार करुन अनुदानासाठी मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे रितसर प्रस्ताव दाखल करण्याच्या सुचना दिल्या आहेत. त्यानुसार हिमायतबाग परिसरातील “शक्करबावडी” या विहिरीपासून रोजाबाग येथील Setting Tank पर्यंत Rising Main टाकणे, अस्तित्वातील टँक व विहिरीचा गाळ काढणे व विहिरीवर पंप बसविण्यासाठी कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी रु.40,39,268/- चे अंदाजपत्रक तयार केले आहे.

करीता, उक्त कामाचे र.रु.40,36,268/- चे अंदाजपत्रक मान्यतेस्तव सादर. मान्यतेअंती रु.40,39,268/- चे अनुदान मिळण्यास्तव मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांच्याकडे प्रस्ताव दाखल करण्यात येईल. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 385/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, हिमायतबाग परिसरातील “शक्करबावडी” या विहिरीपासून रोजाबाग येथील Setting Tank पर्यंत Rising Main टाकणे, अस्तित्वातील टँक व विहिरीचा गाळ काढणे व विहिरीवर पंप बसविण्याच्या कामाचे र.रु.40,39,268/- चे अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येते. तसेच सदर कामासाठी रु.40,39,268/- चे अनुदान मिळणेस्तव मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांच्याकडे प्रस्ताव दाखल करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 386/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.23.05.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सातारा-देवळाई या भागाचा मनपा हद्दीत समावेश झालेला असून या भागात जलनि:स्सारण वाहिन्यांचे जाळे निर्माण करण्यासाठी नियुक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे.यश इनोव्हेटिव्ह सोल्युशन्स LLP यांनी कार्यालयाच्या सुचनेनुसार व शासन नगर विकास विभाग यांनी दिलेल्या

निर्देशानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची चालू वर्ष दरसुची सन 2021-22 नुसार सुधारित प्रकल्प अहवाल (Detail Project Report) रु.254,306 कोटी सादर केला आहे.

या सुधारित प्रकल्प अहवालास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने जा.क्र./मुअ/मजीप्राऔ/तांशा-1/946/ 2022 दि.11 मार्च 2022 अन्वये तांत्रिक मान्यता प्रदान केली आहे. सदर प्रकल्प अहवालाच्या अनुषंगाने यापुर्वी मा.सर्वसाधारण सभेने ठराव क्र.249 दि.09.02.2018 नुसार मा.सर्वसाधारण सभा विषय क्रमांक-204 दि.30.09.2021 व मा.सर्वसाधारण सभा विषय क्रमांक-325/2022 दि.17.03.2022 अन्वये वेळोवेळी आवश्यकतेनुसार व बदलत्या प्रकल्प किंमतीस मंजुरी प्रदान केलेली आहे. याप्रमाणे पारीत करण्यात आलेले ठराव शासन निर्णय संकीर्ण/2012/प्र.क्र.24/नवि-16 दि.17 जुन 2012 नुसार महानगरपालिका/नगरपरिषदा यांची नव्याने हद्दवाढ झालेल्या भागात नागरी सुविधांचा विकास करण्यासाठी विशेष अर्थसहाय्य हे 80:20 या आर्थिक आकृतीबंध अनुदेय करण्यात आलेले आहे. त्यास अनुसरुन होते.

तथापि, आता उक्त परिच्छेदात उल्लेख केल्यानुसार शासन नगर विकास विभाग यांनी सन 2012 च्या शासन निर्णय आता लागू होत नसल्याने औरंगाबाद महानगरपालिकेकडून मनपा हद्दीत समाविष्ट झालेल्या सातारा व देवळाई या खेड्यांच्या विकासासाठीचा प्रस्ताव अमृत 2.0 या नवीन योजनेतून सादर करण्याची सुचना केली आहे. या बाबीस स्थानिक प्राधिकरण या स्वरुपाने मा.सर्वसाधारण सभेची मंजुरी आवश्यक आहे. योजनेचा आर्थिक आकृती हा शासनाकडून निश्चित करण्यात येणार आहे व तो महानगरपालिकेस लागू राहणार आहे. त्यावेळच्या शासन निर्णयानुसार यात औरंगाबाद महानगरपालिकेस स्वत:चा हिस्सा टाकावा लागणार आहे. या साठीची योग्य ती आर्थीक तरतुद चालू वर्षाच्या अर्थसंकल्पात करावी लागणार आहे.

तरी पुर्व पारीत ठराव क्रमांक-249 दि.09.02.2018 व ठराव क्रमांक-325 दि.17.03.2022 मधील पुर्व तरतुदी कायम ठेवण्यात येऊन शासन नगर विकास विभाग यांच्या सुचनेनुसार सातारा-देवळाई जलनि:स्सारण प्रकल्प अमृत-2.0 योजनेतून प्रस्तावित करण्यास या योजनेच्या प्रकल्प अहवाल मंजुर होईल. त्यावेळी असलेला आर्थिक आकृतीबंधानुसार मनपाची संमती देणे व त्यानुसार मनपाचा आर्थीक हिस्सा टाकण्यास अनुमती देणे त्यासाठी लागु आर्थिक वर्षात आवश्यक रक्कमेची तरतुद करण्यास तसेच या अनुषंगाने आवश्यक ते सर्व निर्णय घेण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना प्रदान करणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्रमांक 386/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व शासन नगर विकास विभाग यांनी नव्याने दिलेल्या निर्देशानुसार सातारा-देवळाई जलनि:स्सारण प्रकल्प अमृत मिशन-2.0 मधुन प्रस्तावीत करण्यास योजनेच्या निश्चित होणाऱ्या आर्थीक आकृतीबंधानुसार मनपा हिश्श्याची रक्कम टाकण्यास त्यासाठी मनपा अर्थसंकल्पात योग्य ती आर्थिक तरतुद करणे तसेच या कामाच्या अनुषंगाने परिस्थितीनुसार योग्य ते सर्व निर्णय घेण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना प्रदान करण्यास मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 387/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.24.05.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन 2022-23 या एका आर्थीक वर्षासाठी प्राणी संग्रहालयात असलेल्या हिंस्त्र प्राण्यांना देण्यात येणार खाद्य बीफ खरेदी करण्याससाठी ई-टेन्डरद्वारे निविदा मागविण्यात आल्या होत्या. यासाठी एकूण चार भरलेल्या निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्याचा तपशील खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नाव | दर प्रति किलो |
|---|---|---|
| 1. | सोहेल बफेलो मीट शॉप, औरंगाबाद | रुपये 188.00 |
| 2. | फ्रेश बीफ शॉप, औरंगाबाद | रुपये 231.00 |
| 3. | मोईन्नोद्दिन चिश्ती बीफ, औरंगाबाद | रुपये 234.00 |
| 4. | एस क्यु कलेक्शन, औरंगाबाद | रुपये 235.00 |

तुलनात्मक दृष्टिने सोहेल बफेलो मीट शॉप, औरंगाबाद यांचे बीफ खरेदीचे निविदा दर रु.188.00 प्रति किलो हे सर्वात कमी आहेत. ठेकेदारासोबत दर निश्चित करण्यासाठी वाटाघाटी केल्या असता, रु186.50 या दराने बीफ पुरवठा करण्यास त्यांनी मान्यता दिलेली आहे. प्राणी संग्रहालयात असलेले हिंस्त्र प्राणी वाघ, पांढरे वाघ, बिबट, मगर, उदबिल्ला आणि कोल्हे या प्राण्यांना प्रतिदिनी एकूण 150 किलो बीफ खाद्य घेण्यात येत आहे. यामध्ये प्राण्यांची संख्या कमी जास्त झाल्यास बीफ खरेदीचे प्रमाण कमी जास्त करण्यात येते. रु.186.50 प्रति किलो या दरानुसार वार्षिक एकूण खर्च रु.87,56,175.00 एवढा होणार आहे.

करीता प्रस्ताव मंजुर झाल्यानंतर पुढील एका वर्षाचे कालावधीसाठी प्राणी संग्रहालयातील हिंस्त्र प्राण्यांसाठी बीफ खरेदीचा प्रस्ताव मान्यतेसाठी विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्रमांक 387/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रस्ताव मंजुर झाल्यानंतर पुढील एका वर्षाचे कालावधीसाठी प्राणी संग्रहालयातील हिंस्त्र प्राण्यांसाठी बीफ खरेदीसाठी प्राप्त झालेल्या निविदा पैकी तुलनात्मक दृष्टिने सोहेल बफेलो मीट शॉप, औरंगाबाद यांचे बीफ खरेदीचे निविदा दर रु.186.50 प्रति किलो या दरास व या दरानुसार होणारा वार्षिक खर्च रु.87,56,175.00 यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 388/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.25.05.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेस 75/25 टक्के विकास योजना आरक्षणातून न.भु.क्र.16031/4 व 16031/पी, श्रेयनगर बिल्डींगमधील हॉलसाठी निविदा मागविण्यात आलेली आहे. उक्त निविदामध्ये उच्च दराच्या निविदेचा तपशील खालीलप्रमाणे.

- न.भु.क्र.16031/4 व 16031/पी, श्रेयनगर, आरक्षण 289 शॉपींग सेंटर व वाचनालय आरक्षण, पहिला मजल्यासाठी दर रु.14,388/- प्रती माह निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये श्री.काझी इम्तियाज सोहेल काझी फवाद यांच्या निविदा दर प्रती माह र.रु.14,820/- आहे.

करीता वरील प्रमाणे निविदेमध्ये प्राप्त उच्च दराचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 79 (क) नुसार मा.स्थायी समितीचे अधिकार मा.प्रशासक यांच्याकडे असल्याने मा.प्रशासक यांच्या कडे मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्रमांक 388/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपलिकेस 75/25 टक्के विकास योजना आरक्षणातून न.भु.क्र.16031/4 व 16031/पी, श्रेयनगर बिल्डींगमधील हॉलसाठी निविदा मागविण्यात आलेली असून प्रस्तावात नमूद असलेल्या उच्च दराच्या निविदेच्या तपशिलासह प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 389/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.25.05.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो कि, टि.व्हि.सेंटर दुरदर्शनचे प्रसारण केंद्र, एन-12 हडको या इमारतीच्या लगत औरंगाबाद महानगरपालिकेचे सन 1985 या वर्षात तत्कालीन प्रशासकांनी स्वामी विवेकानंद उद्यानाची निर्मीती केली. या उद्यानात कारंजे, लहान मुलांची खेळणी, पागोडे व इतर शोभिवंत वस्तु, हिरवळ, झाडे, बेंचेस ई.ची उभारणी केली आहे. उद्यानाच्या पुर्वेकडील भागात टि.व्हि.सेंटर प्रक्षेपण केंद्रालगत मिनी ट्रेन उभारणीसाठी जागा उपलब्ध आहे.

आता स्वामी विवेकानंद उद्यानात पर्यावरणपूरक बॅटरी/विद्युत ऊर्जेवर चालणारी, आवाज व धुर विरहीत मिनी ट्रेन सुरु करावी याकरीता मुळ संचिकेतील टिप्पणीनुसार मा.उप आयुक्त महोदयांचे पृष्ठांकन (परिच्छेद-7) व मा.आयुक्त महोदयांचे पृष्ठांकन (परिच्छेद-8) अनुसार मान्यता झाल्याप्रमाणे स्थानिक वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिध्द करुन स्वारस्य अभिव्यक्ती प्रस्ताव (EOI) मागविण्यात आले. दिनांक 18 मे 2022 रोजी तीन एजन्सीधारकांनी या विभागात स्वारस्य अभिव्यक्ती प्रस्ताव (EOI) सादर केले. मा.उप आयुक्त यांच्या मान्यतेने प्राप्त स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) उघडण्यात आल्या असता पात्र तीन एजन्सीनी खालील दर्शविल्याप्रमाणे ऑफर्स दिलेल्या आहे.

| अ.क्र. | एजन्सीधारकाचे नांव | 3 ते 12 वर्ष वयोगटासाठी आकारण्यात येणारी प्रवेश फी | 12 वर्षावरील वयोगटाससाठी आकारण्यात येणारी प्रवेश फी | दैनंदिन प्रवेश फी मधुन मनपास मिळणारी रॉयल्टी |
|---|---|---|---|---|
| 01 | विश्वा मल्टी सर्व्हीसेस, पैठण | रुपये 25/- | रुपये 50/- | २५% |
| 02 | महाराणा एजन्सी औरंगाबाद | रुपये 38/- | रुपये 60/- | १२% |
| 03 | तुळजाई एन्टरप्रायजेस, औरंगाबाद. | रुपये 30/- | रुपये 55/- | १८% |

उक्त नमूद तक्त्यानुसार प्राप्त एजन्सीधारकांपैकी विश्वा मल्टी सर्व्हीसेस, पैठण या एजन्सीने सर्वात कमी प्रवेश फी 3 ते 12 वर्ष वयोगटासाठी रु.25/- प्रति बालक आणि 12 वर्षावरील गटासाठी रु.50/- आकारणी करुन सर्वात जास्त रॉयल्टी म्हणजे दैनंदिन प्रवेश फी रक्कमेच्या 25 टक्के रॉयल्टी मनपास देवू अशी ऑफर दिलेली आहे.

या प्रस्तावानुसार मनपावर कुठलाही आर्थिक भार येणार नसून उलट उत्पन्नात वाढ होणार आहे. करीता खालील अटी शर्तीच्या अधिन राहून संबंधीत एजन्सीधारकांनी स्वखर्चाने प्रकल्प राबविण्याबाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

करिता उक्त नमुद नुसार विश्वा मल्टी सर्व्हीसेस, पैठण यांना स्वामी विवेकानंद उद्यान येथे पर्यावरणपूरक/बॅटरी/विद्युतवर चालणारी मिनी ट्रेन प्रकल्प स्वखर्चाने उभारणी करुन कार्यान्वित झाल्याच्या तारखेपासून पुढील 10 वर्ष कालावधीसाठी प्रकल्प चालविणे व त्यास्तव 12 वर्षावरील वयोगटासाठी रुपये 50/- व 3 ते 12 वयोगटातील बालकांसाठी रुपये 25/- एवढे प्रवेश शुल्क आकारुन महानगरपालिकेस जमा होणा-या दैनंदिन प्रवेश फि मधुन 25 टक्के रॉयल्टी देणे व प्रवेश फि मध्ये प्रतीवर्ष 10 टक्के नैसर्गीक वाढ करणे या बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 389/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विश्वा मल्टी सर्व्हीसेस, पैठण यांना स्वामी विवेकानंद उद्यानात पर्यावरण पूरक/बॅटरी/विद्युतवर चालणारी मिनी ट्रेनची स्वखर्चाने उभारणी करुन कार्यादेश दिनांकापासून पुढील 10 वर्ष कालावधीकरीता प्रकल्प चालविणेसाठी मान्यता देण्यात येते. 12 वर्षावरील वयोगटासाठी रु.50/- प्रती व्यक्ती, 3 ते 12 वर्ष वयोगटासाठी रु.25/- प्रती बालक प्रवेश शुल्क आकारुन दैनंदिन जमा होणा-या प्रवेश शुल्कातून महानगरपालिकेस 25 टक्के रॉयल्टी देणे, प्रवेश फि मध्ये प्रतिवर्ष 10 टक्के नैसर्गीक वाढ या व इतर अटी शर्तीस अधिन राहून हा प्रकल्प चालविणेसाठी मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 390/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.25.05.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो कि, टि.व्हि.सेंटर दुरदर्शनचे प्रसारण केंद्र, एन-12 हडको या इमारतीच्या लगत औरंगाबाद महानगरपालिकेचे सन 1985 या वर्षात तत्कालीन प्रशासकांनी स्वामी विवेकानंद उद्यानाची निर्मीती केली. या उद्यानात कारंजे, लहान मुलांची खेळणी, पागोडे व इतर शोभिवंत वस्तु, हिरवळ, झाडे, बेंचेस ई. ची उभारणी केली आहे. उद्यानाच्या पुर्वेकडील भागात टि.व्हि.सेंटर प्रक्षेपण केंद्रालगत मिनी ट्रेन उभारणीसाठी जागा उपलब्ध आहे.

आता स्वामी विवेकानंद उद्यानात पर्यावरणपूरक बॅटरी/विद्युत ऊर्जेवर चालणारी, आवाज व धुर विरहीत मिनी ट्रेन सुरु करावी याकरीता मुळ संचिकेतील टिप्पणीनुसार मा.उप आयुक्त महोदयांचे पृष्ठांकन (परिच्छेद-7) व मा.आयुक्त महोदयांचे पृष्ठांकन (परिच्छेद-8) अनुसार मान्यता झाल्याप्रमाणे स्थानिक वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिध्द करुन स्वारस्य अभिव्यक्ती प्रस्ताव (EOI) मागविण्यात आले. दिनांक 18 मे 2022 रोजी तीन एजन्सीधारकांनी या विभागात स्वारस्य अभिव्यक्ती प्रस्ताव (EOI) सादर केले. मा.उप आयुक्त यांच्या मान्यतेने प्राप्त स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) उघडण्यात आल्या असता पात्र तीन एजन्सीनी खालील दर्शविल्याप्रमाणे ऑफर्स दिलेल्या आहे.

| अ.क्र. | एजन्सीधारकाचे नांव | 3 ते 12 वर्ष वयोगटासाठी आकारण्यात येणारी प्रवेश फी | 12 वर्षावरील वयोगटाससाठी आकारण्यात येणारी प्रवेश फी | दैनंदिन प्रवेश फी मधुन मनपास मिळणारी रॉयल्टी |
|---|---|---|---|---|
| 01 | विश्वा मल्टी सर्व्हीसेस, पैठण | रुपये 25/- | रुपये 50/- | २५% |
| 02 | महाराणा एजन्सी औरंगाबाद | रुपये 38/- | रुपये 60/- | १२% |
| 03 | तुळजाई एन्टरप्रायजेस, औरंगाबाद. | रुपये 30/- | रुपये 55/- | १८% |

उक्त नमूद तक्त्यानुसार प्राप्त एजन्सीधारकांपैकी विश्वा मल्टी सर्व्हीसेस, पैठण या एजन्सीने सर्वात कमी प्रवेश फी 3 ते 12 वर्ष वयोगटासाठी रु.25/- प्रति बालक आणि 12 वर्षावरील गटासाठी रु.50/- आकारणी करुन सर्वात जास्त रॉयल्टी म्हणजे दैनंदिन प्रवेश फी रक्कमेच्या 25 टक्के रॉयल्टी मनपास देवू अशी ऑफर दिलेली आहे. या प्रस्तावानुसार मनपावर कुठलाही आर्थिक भार येणार नसून उलट उत्पन्नात वाढ होणार आहे. करीता खालील अटी शर्तीच्या अधिन राहून संबंधीत एजन्सीधारकांनी स्वखर्चाने प्रकल्प राबविण्याबाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**अटि व शर्ती:-**

1. सदरील प्रकल्पासाठी रु.1.00 लक्ष सुरक्षा अनामत (Security Deposit) रक्कमेचा भरणा करुन कार्यादेश पुर्वी त्याची पावती सादर करावी लागेल.
2. नागरीक व लहान मुलांच्या मनोरंजना करिता हा प्रकल्प चालविणेसाठी कालावधी प्रकल्प कार्यान्वीत झाल्याच्या तारखेपासून येणा-या दहा वर्षासाठी असेल. निश्चित केलेली प्रवेश फि मध्ये प्रतीवर्षी 10% नैसर्गिक भाववाढ लागु असेल.
3. सदरील प्रकल्प कार्यान्वित झाल्याच्या दिनांकापासुन प्रवेश फि संबंधीचा दैनंदिन लेखाजोखा (हिशोब) ठेवावा लागेल व करारनाम्यानुसार मनपास रॉयल्टी भरावी लागेल.
4. पर्यावरणपूरक बॅटरी/विद्युत ऊर्जेवर चालणारी, आवाज व धुर विरहीत मिनी ट्रेनची उभारणी करणे या प्रकल्पासाठी जागा ही तात्पुरत्या स्वरुपात असुन यावर आपला कोणताही हक्क राहणार नाही किंवा दावा करता येणार नाही.
5. प्रस्तावात मान्यता दिलेल्या पर्यावरणपूरक बॅटरी/विद्युत ऊर्जेवर चालणारी, आवाज व धुर विरहीत मिनी ट्रेन व्यतिरीक्त कोणताही उपक्रम सुरु करता येणार नाही.
6. नियुक्त केलेल्या कर्मचा-याकडुन उद्यानाचे पावित्र्य जपले जाईल तसेच मनपाच्या मालमत्तेचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही याचे हमीपत्र द्यावे लागेल.
7. सदरील जागेत कोणतेही पक्के बांधकाम करता येणार नाही. त्यासाठी महानगरपालिकेची पुर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.
8. या प्रकल्पामधील साहित्याची काही मोड-तोड झाल्यास किंवा चोरी झाल्यास त्यास महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.
9. पर्यावरणपूरक बॅटरी/विद्युत ऊर्जेवर चालणारी, आवाज व धुर विरहीत मिनी ट्रेन उभारणीसाठी लागणारा विद्युत पुरवठ्याचा सेटअप, इलेक्ट्रीक फिटिंग तसेच अंतर्गत रस्ते, लाईटस याची सर्व व्यवस्था संबंधीत एजन्सीला करावी लागेल.
10. सदर प्रकल्प चालविण्यासाठी लागणारा सुरक्षा कर्मचारी वर्ग तसेच इतर कर्मचारी हा संबंधीत एजन्सीला ठेवावा लागेल.
11. सदर प्रकल्प स्वामी विवेकानंद उद्यानाच्या दैनंदिन वेळेप्रमाणे किंवा वेळेनुसार चालविणे बंधनकारक राहिल.
12. या प्रकल्पामध्ये मनोरंजनासाठी आलेल्या लहान मुलांना खेळतांना काही इजा किंवा अपघात झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत एजन्सीची राहिल. त्यास महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.
13. सदरील प्रकल्पात काही देखभाल दुरुस्त्या करणे झाल्यास स्वखर्चाने कराव्या लागतील.
14. शालेय सहली, शालेय विद्यार्थ्यांचा ग्रुप यांना प्रवेश दरात 25% सुट द्यावी लागेल.
15. या प्रकल्पातुन मिळणा-या प्रवेश फि मधुन शासनाच्या नियमानुसार संबंधीत एजन्सीला मनोरंजन कर भरावा लागेल व दरवर्षी मनोरंजन कर भरल्याची पावती सादर करावी लागेल.
16. कोणत्याही कारणाने जसे नैसर्गिक आपत्ती अथवा अन्य आपत्तकालीन परिस्थितीमुळे स्वामी विवेकानंद उद्यान बंद ठेवावे लागले तर अशा कालावधीत सदरील प्रकल्प चालविता येणार नाही.
17. परीसर सुरक्षिततेच्या दृष्टीने महानगरपालिकेचे अधिकारी वेळोवेळी प्रकल्पाची पाहणी करतील. अशा पहाणीच्या वेळी अधिका-यास मज्जाव करता येणार नाही.
18. ठरल्यानुसार प्रवेश फि संबंधी प्रकल्पाच्या प्रवेशव्दारावर दरपत्रकाचा सुस्पष्ट व सर्वांना दिसेल असा फलक स्वखर्चाने लावावा लागेल.
19. प्रकल्प चालविणेसाठी सर्व आवश्यक परवानगी काढण्याची जबाबदारी एजन्सी धारकांची राहिल.
20. कोणत्याही प्रकारे नैसर्गिक आपत्ती अथवा इतर कोणत्याही कारणाने प्रकल्पाचे नुकसान झाल्यास औरंगाबाद महानगरपालिका त्यास जबाबदार राहणार नाही.
21. सदरील प्रकल्प बंद करणे असल्यास एजन्सी धारकाने 30 दिवस अगोदर पुर्व कल्पना देणे आवश्यक राहिल. अन्यथा भरलेली सुरक्षा अनामत रक्कम परत मिळणार नाही.

22. प्रकल्पाचा करारनामा नियमानुसार योग्य त्या मुद्रांकावर स्वखर्चाने एजन्सीधारकाने करुन देवुन नोंदणी प्रमाणपत्र, पॅन, जीएसटी इ. उद्यान विभागाकडे सादर करणे आवश्यक राहील.
23. कामगारांचा विमा, पीएफ/ईएसआयसी हा नियमानुसार भरणा करावा लागेल. या बाबत कुठलीही तक्रार औरंगाबाद मनपा स्विकारणार नाही.

वर नमुद केलेल्या कोणत्याही अटी व शर्तीचा भंग झाला तर करारनामा रद्द करण्याचे व सदर प्रकल्पातील उपकरणे उद्यानातुन काढुन घेण्याचे अधिकार मा.आयुक्त महोदय यांना असतील.

करिता उक्त नमुद नुसार विश्वा मल्टी सर्व्हीसेस, पैठण यांना स्वामी विवेकानंद उद्यान येथे पर्यावरणपूरक/ बॅटरी/विद्युतवर चालणारी मिनी ट्रेन प्रकल्प स्वखर्चाने उभारणी करुन कार्यान्वित झाल्याच्या तारखेपासून पुढील 10 वर्ष कालावधीसाठी प्रकल्प चालविणे व त्यास्तव 12 वर्षावरील वयोगटासाठी रु.50/- व 3 ते 12 वयोगटातील बालकांसाठी रुपये 25/- एवढे प्रवेश शुल्क आकारुन महानगरपालिकेस जमा होणा-या दैनंदिन प्रवेश फि मधुन 25 टक्के रॉयल्टी देणे व प्रवेश फि मध्ये प्रतीवर्ष 10 टक्के नैसर्गीक वाढ करणे या बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 390/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विश्वा मल्टी सर्व्हीसेस, पैठण यांना स्वामी विवेकानंद उद्यानात पर्यावरणपूरक/ बॅटरी/विद्युतवर चालणारी मिनी ट्रेनची स्वखर्चाने उभारणी करुन कार्यादेश दिनांकापासून पुढील 10 वर्ष कालावधीकरीता प्रकल्प चालविणेसाठी मान्यता देण्यात येते. 12 वर्षावरील वयोगटासाठी रु.50/- प्रती व्यक्ती, 3 ते 12 वर्ष वयोगटासाठी रु.25/- प्रती बालक प्रवेश शुल्क आकारुन दैनंदिन जमा होणा-या प्रवेश शुल्कातून महानगरपालिकेस 25 टक्के रॉयल्टी देणे, प्रवेश फि मध्ये प्रतिवर्ष 10 टक्के नैसर्गीक वाढ या तसेच सर्वसाधारण सभेने निश्चित केलेल्या अटी शर्तीच्या अधिन राहून हा प्रकल्प चालविणेसाठी मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 391/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.25.05.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो कि, मराठवाडयाची पर्यटन राजधानी असलेल्या औरंगाबाद शहरात मध्यवर्ती बसस्थानका शेजारी असलेल्या एकूण 35 एकर जागेवर सिध्दार्थ उद्यान व प्राणी संग्रहालयाची सन 1985 साली उभारणी झालेली आहे. वर्षभरात या ठिकाणी अनेक पर्यटक, शालेय सहली मिळून अंदाजे 7 ते 8 लक्ष नागरिक/पर्यटक भेटी देतात. सदरील ठिकाणी आस्थापनेवरील कर्मचारी, देखभाल व दुरुस्ती, विद्युत बिले ई.चा खर्च व या ठिकाणी प्रवेश फि मधुन प्राप्त झालेली रक्कम मिळणा-या प्रवेश फि पेक्षा जास्त होत होती.

आजमितीस सिध्दार्थ उद्यानात लहान मुलांसाठी खेळण्यांशिवाय इतर काही मनोरंजनाची साधने नाहीत तत्कालीन आयुक्तांनी या उद्यानाच्या मध्यवर्ती भागात अंदाजे 300 मिटर गोलाकार पध्दतीची डिझेलवर चालणारी लोखंडी मिनी ट्रेन लहान मुलांसाठी कार्यन्वीत करुन मनपाच्या उद्यान विभागातील कर्मचा-यांकडुन सन 2017 पर्यंत चालविली होती, मात्र सिध्दार्थ उद्याना लगत असलेल्या प्राणी संग्रहालयातील काही प्राण्यांबाबत केंद्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरण (CZA) टिमने आक्षेप घेवुन सदरील लहान मुलांसाठी चालणारी व आवाज येणारी मिनी ट्रेन तात्काळ बंद करण्याचे आदेश दिले जेणेकरुन या आवाजाने प्राण्यांना त्रास होणार नाही. या कारणाने दिनांक 25/05/2018 पासून या ठिकाणची मिनी ट्रेन बंद आहे.

सदरील मिनी ट्रेनसाठी हि 3-12 वर्ष वयोगटातील मुलांना सन 2014-15 या वर्षापर्यंत रु.10/- प्रती बालक अशी प्रवेश फि आकारली जात असे या नूसार या मिनी ट्रेन प्रवेश फि मधून मनपास वार्षिक स्वरुपात.

| अ.क्र. | आर्थिक वर्ष | मिळालेली रक्कम |
|---|---|---|
| 01 | 2011-12 | रु.6,16,520 |
| 02 | 2012-13 | रु.9,15,000 |
| 03 | 2013-14 | रु.7,69,250 |
| 04 | 2014-15 | रु.3,34,900 |
| 05 | 2015-16 | रु.10,47,300 |
| 06 | 2016-17 | रु.12,74,800 |
| 07 | 2017-18 | रु.11,03,600 |

| | | |
|---|---|---|
| 08 | 2018-19 | रु.94,000 |

असे उत्पन्न प्राप्त झाले उक्त नमूद वर्षाचे सरासरी अनुमान पाहता वार्षिक 7.69 लक्ष उत्पन्न मिळाले आहे. सोबत प्रवेश फि वसुली तक्ता आहे.

महानगरपालिकेतर्फे हि रेल्वे चालविण्यासाठी एक रेल्वे चालक, एक तिकिट विक्रेता व एक तिकिट तपासणीस असे तीन कायमस्वरुपी आस्थापनेवरील कर्मचारी कार्यरत होते. जे की तिकिट विक्रीसाठी, तिकिट तपासणी व प्रवेश देणेसाठी, तसेच रेल्वे चालक असे या आस्थापनेवरील कायमस्वरुपी तीन कर्मचा-यांसाठी सरासरी रु.25000/- प्रतिमहा म्हणजे रु.9 लक्ष प्रतिवर्ष व दररोज मिनी ट्रेन चालविणेसाठी 5 लिटर डिझेल रु.60 प्रति लिटर म्हणजे रु.1.08 लक्ष व वार्षीक देखभाल दुरुस्तीसाठी अंदाजे रु.0.50 लक्ष असे एकूण 10.58 लक्ष प्रतिवर्ष सन 2016 पर्यंत खर्च येत असे.

उक्त नमूद नुसार प्रवेश शुल्कातून सरासरी अनुमानानूसार वार्षीक रक्कम रु.7.84 लक्ष प्राप्त झाली होती. म्हणजे सदरील मिनी ट्रेनच्या तिकिट विक्रीपासून मिळणारे उत्पन्न हे आस्थपना खर्च व देखभाल दुरुस्ती खर्च यापेक्षा कमी होता. परंतू औरंगाबाद महानगरपालिकेने शहरातील मुले/शालेय सहली यांना मुलभूत सुविधा देणे हे मनपाचे कर्तव्य असल्याने सदरील मिनी ट्रेन कार्यरत होती. केंद्रीय प्राणी संग्रहालय संचालनालय (CZA) यांच्या आक्षेपामुळे दि.25/05/2018 पासून मिनी ट्रेन हि बंद अवस्थेत पडुन आहे. या मुळे मनपाचे महसुली उत्पन्न बंद झाल्याने आर्थिक नुकसान होत आहे.

सदरील प्रस्तावाबाबत सिध्दार्थ उद्यानातील सन 2011-2018 पर्यंत मिनी ट्रेनच्या तिकिट विक्रीतून होणारा किंवा मिळणा-या उत्पन्नाचा तुलनात्मक दृष्टया खालील तक्त्यात विवरण केले आहे. त्यानूसार उद्यानातील मिनी ट्रेनचे उत्पन्न हे आस्थापनेवरील व इतर खर्चापेक्षा खुपच कमी आहे.

| **अ.क्र.** | **आर्थिक वर्ष** | **मिनी ट्रेन तिकिट विक्री संख्या** | **रक्कम** | **तिकिट दर** |
|---|---|---|---|---|
| 01 | 2011-12 | 61652 | 6,16,520 | रु.10/- प्रति ति.प्र. |
| 02 | 2012-13 | 91500 | 9,15,000 | रु.10/- प्रति ति.प्र. |
| 03 | 2013-14 | 76925 | 7,69,250 | रु.10/- प्रति ति.प्र. |
| 04 | 2014-15 | 33490 | 3,34,900 | रु.10/- प्रति ति.प्र. |
| 05 | 2015-16 | 52365 | 10,47,300 | रु.20/- प्रति ति.प्र. |
| 06 | 2016-17 | 63740 | 12,74,800 | रु.20/- प्रति ति.प्र. |
| 07 | 2017-18 | 55180 | 11,03,600 | रु.20/- प्रति ति.प्र. |
| 08 | 2018-19 | 4700 दि.25/05/2018 पासून मिनी ट्रेन बंद आहे (CZA) आक्षेप | 94,000 | रु.20/- प्रति ति.प्र. |
| **एकूण** | | **4,39,552** | **61,55,370** | |

मागील आर्थिक वर्षाचा तिकिट विक्रिचे सरासरी अनुमान काढल्यास 54944 इतक्या तिकिट विक्रीमधून मनपास सरासरी रु.7.69 लक्ष वार्षीक उत्पन्न मिळत होते.

आता सिध्दार्थ उद्यानात पर्यावरणपूरक बॅटरी/विद्युत ऊर्जेवर चालणारी, आवाज व धुर विरहीत मिनी ट्रेन सुरु करावी याकरीता मुळ संचिकेतील टिप्पणीनुसार मा.उप आयुक्त महोदयांचे पृष्ठांकन (परिच्छेद-7) व मा.आयुक्त महोदयांचे पृष्ठांकन (परिच्छेद-8) अनुसार मान्यता झाल्याप्रमाणे स्थानिक वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिध्द करुन स्वारस्य अभिव्यक्ती प्रस्ताव (EOI) मागविण्यात आले. दिनांक 18 मे 2022 रोजी तीन एजन्सीधारकांनी या विभागात स्वारस्य अभिव्यक्ती प्रस्ताव (EOI) सादर केले. मा.उप आयुक्त यांच्या मान्यतेने प्राप्त स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) उघडण्यात आल्या असता पात्र तीन एजन्सीनी खालील दर्शविल्याप्रमाणे ऑफर्स दिलेल्या आहे.

| अ.क्र. | एजन्सीधारकाचे नांव | 3 ते 12 वर्ष वयोगटासाठी आकारण्यात येणारी प्रवेश फी | 12 वर्षावरील वयोगटाससाठी आकारण्यात येणारी प्रवेश फी | दैनंदिन प्रवेश फी मधुन मनपास मिळणारी रॉयल्टी |
|---|---|---|---|---|
| 01 | गॅलेक्सी मल्टी सर्व्हीसेस | रुपये 40/- | रुपये 58/- | १७% |
| 02 | जय बजरंग फायर सर्व्हीसेस | रुपये 32/- | रुपये 57/- | २०% |
| 03 | व्ही. प्ले. औरंगाबाद | रुपये 25/- | रुपये 50/- | २५% |

उक्त नमूद तक्त्यानुसार प्राप्त एजन्सीधारकांपैकी व्ही प्ले, औरंगाबाद या एजन्सीने सर्वात कमी प्रवेश फी आकारणी करुन सर्वात जास्त रॉयल्टी म्हणजे दैनंदिन प्रवेश फी रक्कमेच्या 25 टक्के रॉयल्टी मनपास देवू अशी ऑफर दिलेली आहे. या प्रस्तावानुसार मनपावर कुठलाही आर्थिक भार येणार नसून उलट उत्पन्नात वाढ होणार आहे. करीता खालील अटी शर्तीच्या अधिन राहून संबंधीत एजन्सीधारकांनी स्वखर्चाने प्रकल्प राबविण्याबाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

करिता उक्त नमुद नुसार व्ही प्ले औरंगाबाद यांना सिध्दार्थ उद्यान येथे पर्यावरणपूरक/बॅटरी/विद्युतवर चालणारी मिनी ट्रेन प्रकल्प कार्यान्वित झाल्याच्या तारखेपासून 10 वर्ष कालावधीसाठी चालविणे त्यास्तव 3 ते 12 वयोगटातील बालकांसाठी रुपये 25/- व 12 वर्षावरील वयोगटासाठी रुपये 50/- एवढे प्रवेश शुल्क आकारुन महानगरपालिकेस जमा होणा-या दैनंदिन प्रवेश फि मधुन 25 टक्के रॉयल्टी देणे व प्रवेश फि मध्ये प्रतीवर्ष 10 टक्के नैसर्गीक वाढ करणे तसेच सर्वसाधारण सभेने निश्चित केलेल्या अटी शर्तीच्या अधिन राहून राबविण्या बाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 391/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व्ही प्ले, औरंगाबाद यांना सिध्दार्थ उद्यानात पर्यावरणपूरक/बॅटरी/विद्युतवर चालणारी मिनी ट्रेनची स्वखर्चाने उभारणी करुन कार्यादेश दिनांकापासून हा प्रकल्प पुढील 10 वर्ष कालावधीकरीता चालविणेसाठी मान्यता देण्यात येते. त्यास्तव 3 ते 12 वयोगटातील बालकांसाठी रुपये 25/- व 12 वर्षावरील वयोगटासाठी रुपये 50/- एवढे प्रवेश शुल्क आकारुन दैनंदिन जमा होणा-या प्रवेश शुल्कातून महानगरपालिकेस 25 टक्के रॉयल्टी देणे, प्रवेश फि मध्ये प्रतिवर्ष 10 टक्के नैसर्गीक वाढ करणे तसेच मा.सर्वसाधारण सभेने निश्चित केलेल्या अटी शर्तीच्या अधिन राहून प्रकल्प राबविण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 392/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.25.05.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो कि, मराठवाडयाची पर्यटन राजधानी असलेल्या औरंगाबाद शहरात मध्यवर्ती बसस्थानका शेजारी असलेल्या एकूण 35 एकर जागेवर सिध्दार्थ उद्यान व प्राणी संग्रहालयाची सन 1985 साली उभारणी झालेली आहे. वर्षभरात या ठिकाणी अनेक पर्यटक, शालेय सहली मिळून अंदाजे 7 ते 8 लक्ष नागरिक/पर्यटक भेटी देतात. सदरील ठिकाणी आस्थापनेवरील कर्मचारी, देखभाल व दुरुस्ती, विद्युत बिले ई. चा खर्च व या ठिकाणी प्रवेश फि मधुन प्राप्त झालेली रक्कम मिळणा-या प्रवेश फि पेक्षा जास्त होत होती.

आजमितीस सिध्दार्थ उद्यानात लहान मुलांसाठी खेळण्यांशिवाय इतर काही मनोरंजनाची साधने नाहीत तत्कालीन आयुक्तांनी या उद्यानाच्या मध्यवर्ती भागात अंदाजे 300 मिटर गोलाकार पध्दतीची डिझेलवर चालणारी लोखंडी मिनी ट्रेन लहान मुलांसाठी कार्यन्वीत करुन मनपाच्या उद्यान विभागातील कर्मचा-यांकडुन सन 2017 पर्यंत चालविली होती, मात्र सिध्दार्थ उद्याना लगत असलेल्या प्राणी संग्रहालयातील काही प्राण्यांबाबत केंद्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरण (CZA) टिमने आक्षेप घेवुन सदरील लहान मुलांसाठी चालणारी व आवाज येणारी मिनी ट्रेन तात्काळ बंद करण्याचे आदेश दिले जेणेकरुन या आवाजाने प्राण्यांना त्रास होणार नाही. या कारणाने दिनांक 25/05/2018 पासून या ठिकाणची मिनी ट्रेन बंद आहे.

सदरील मिनी ट्रेनसाठी हि 3-12 वर्ष वयोगटातील मुलांना सन 2014-15 या वर्षापर्यंत रु.10/- प्रती बालक अशी प्रवेश फि आकारली जात असे या नूसार या मिनी ट्रेन प्रवेश फि मधून मनपास वार्षिक स्वरुपात.

| अ.क्र. | आर्थिक वर्ष | मिळालेली रक्कम |
|---|---|---|
| 01 | 2011-12 | रु.6,16,520 |
| 02 | 2012-13 | रु.9,15,000 |
| 03 | 2013-14 | रु.7,69,250 |
| 04 | 2014-15 | रु.3,34,900 |
| 05 | 2015-16 | रु.10,47,300 |
| 06 | 2016-17 | रु.12,74,800 |
| 07 | 2017-18 | रु.11,03,600 |
| 08 | 2018-19 | रु.94,000 |

असे उत्पन्न प्राप्त झाले उक्त नमूद वर्षाचे सरासरी अनुमान पाहता वार्षिक 7.69 लक्ष उत्पन्न मिळाले आहे. सोबत प्रवेश फि वसुली तक्ता आहे.

महानगरपालिकेतर्फे हि रेल्वे चालविण्यासाठी एक रेल्वे चालक, एक तिकिट विक्रेता व एक तिकिट तपासणीस असे तीन कायमस्वरुपी आस्थापनेवरील कर्मचारी कार्यरत होते. जे की तिकिट विक्रीसाठी, तिकिट तपासणी व प्रवेश देणेसाठी , तसेच रेल्वे चालक असे या आस्थापनेवरील कायमस्वरुपी तीन कर्मचा-यांसाठी सरासरी रु.25000/- प्रतिमहा म्हणजे रु.9 लक्ष प्रतिवर्ष व दररोज मिनी ट्रेन चालविणेसाठी 5 लिटर डिझेल रु.60 प्रति लिटर म्हणजे रु.1.08 लक्ष व वार्षीक देखभाल दुरुस्तीसाठी अंदाजे रु.0.50 लक्ष असे एकूण 10.58 लक्ष प्रतिवर्ष सन 2016 पर्यंत खर्च येत असे.

उक्त नमूद नुसार प्रवेश शुल्कातून सरासरी अनुमानानूसार वार्षीक रक्कम रु.7.84 लक्ष प्राप्त झाली होती. म्हणजे सदरील मिनी ट्रेनच्या तिकिट विक्रीपासून मिळणारे उत्पन्न हे आस्थपना खर्च व देखभाल दुरुस्ती खर्च यापेक्षा कमी होता. परंतू औरंगाबाद महानगरपालिकेने शहरातील मुले/शालेय सहली यांना मुलभूत सुविधा देणे हे मनपाचे कर्तव्य असल्याने सदरील मिनी ट्रेन कार्यरत होती. केंद्रीय प्राणी संग्रहालय संचालनालय (CZA) यांच्या आक्षेपामुळे दि.25/05/2018 पासून मिनी ट्रेन हि बंद अवस्थेत पडुन आहे. या मुळे मनपाचे महसुली उत्पन्न बंद झाल्याने आर्थिक नुकसान होत आहे.

सदरील प्रस्तावाबाबत सिध्दार्थ उद्यानातील सन 2011-2018 पर्यंत मिनी ट्रेनच्या तिकिट विक्रीतून होणारा किंवा मिळणा-या उत्पन्नाचा तुलनात्मक दृष्टया खालील तक्त्यात विवरण केले आहे. त्यानूसार उद्यानातील मिनी ट्रेनचे उत्पन्न हे आस्थापनेवरील व इतर खर्चापेक्षा खुपच कमी आहे.

| **अ.क्र.** | **आर्थिक वर्ष** | **मिनी ट्रेन तिकिट विक्री संख्या** | **रक्कम** | **तिकिट दर** |
|---|---|---|---|---|
| 01 | 2011-12 | 61652 | 6,16,520 | रु.10/- प्रति ति.प्र. |
| 02 | 2012-13 | 91500 | 9,15,000 | रु.10/- प्रति ति.प्र. |
| 03 | 2013-14 | 76925 | 7,69,250 | रु.10/- प्रति ति.प्र. |
| 04 | 2014-15 | 33490 | 3,34,900 | रु.10/- प्रति ति.प्र. |
| 05 | 2015-16 | 52365 | 10,47,300 | रु.20/- प्रति ति.प्र. |
| 06 | 2016-17 | 63740 | 12,74,800 | रु.20/- प्रति ति.प्र. |
| 07 | 2017-18 | 55180 | 11,03,600 | रु.20/- प्रति ति.प्र. |
| 08 | 2018-19 | 4700 दि.25/05/2018 पासून मिनी ट्रेन बंद आहे (CZA) आक्षेप | 94,000 | रु.20/- प्रति ति.प्र. |
| | **एकूण** | **4,39,552** | **61,55,370** | |

मागील आर्थिक वर्षाचा तिकिट विक्रिचे सरासरी अनुमान काढल्यास 54944 इतक्या तिकिट विक्रीमधून मनपास सरासरी रु.7.69 लक्ष वार्षीक उत्पन्न मिळत होते.

आता सिध्दार्थ उद्यानात पर्यावरणपूरक बॅटरी/विद्युत ऊर्जेवर चालणारी, आवाज व धुर विरहीत मिनी ट्रेन सुरु करावी. याकरीता मुळ संचिकेतील टिप्पणीनुसार मा.उप आयुक्त महोदयांचे पृष्ठांकन (परिच्छेद-11) व मा.आयुक्त महोदयांचे पृष्ठांकन (परिच्छेद-12) अनुसार मान्यता झाल्याप्रमाणे स्थानिक वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिध्द करुन स्वारस्य अभिव्यक्ती प्रस्ताव (EOI) मागविण्यात आले. दिनांक 18 मे 2022 रोजी तीन एजन्सीधारकांनी या विभागात स्वारस्य अभिव्यक्ती प्रस्ताव (EOI) सादर केले. मा.उप आयुक्त यांच्या मान्यतेने प्राप्त स्वारस्य अभिव्यक्ती (EOI) उघडण्यात आल्या असता पात्र तीन एजन्सीनी खालील दर्शविल्याप्रमाणे ऑफर्स दिलेल्या आहे.

| अ.क्र. | एजन्सीधारकाचे नांव | **3** ते **12** वर्ष वयोगटासाठी आकारण्यात येणारी प्रवेश फी | **12** वर्षावरील वयोगटाससाठी आकारण्यात येणारी प्रवेश फी | दैनंदिन प्रवेश फी मधुन मनपास मिळणारी रॉयल्टी |
|---|---|---|---|---|
| 01 | गॅलेक्सी मल्टी सर्व्हीसेस | रुपये 40/- | रुपये 58/- | १७% |
| 02 | जय बजरंग फायर सर्व्हीसेस | रुपये 32/- | रुपये 57/- | २०% |
| 03 | व्ही. प्ले. औरंगाबाद | रुपये 25/- | रुपये 50/- | २५% |

उक्त नमूद तक्त्यानुसार प्राप्त एजन्सीधारकांपैकी व्ही प्ले, औरंगाबाद या एजन्सीने सर्वात कमी प्रवेश फी आकारणी करुन सर्वात जास्त रॉयल्टी म्हणजे दैनंदिन प्रवेश फी रक्कमेच्या 25 टक्के रॉयल्टी मनपास देवू अशी ऑफर दिलेली आहे. या प्रस्तावानुसार मनपावर कुठलाही आर्थिक भार येणार नसून उलट उत्पन्नात वाढ

होणार आहे. करीता खालील अटी शर्तीच्या अधिन राहून संबंधीत एजन्सीधारकांनी स्वखर्चाने प्रकल्प राबविण्याबाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**अटि व शर्ती:-**

1. सदरील प्रकल्पासाठी रु.1.00 लक्ष सुरक्षा अनामत (Security Deposit) रक्कमेचा भरणा करुन कार्यादेश पुर्वी त्याची पावती सादर करावी लागेल.
2. नागरीक व लहान मुलांच्या मनोरंजना करिता हा प्रकल्प चालविणेसाठी कालावधी प्रकल्प कार्यान्वीत झाल्याच्या तारखेपासून येणा-या दहा वर्षासाठी असेल. निश्चित केलेली प्रवेश फि मध्ये प्रतीवर्षी 10% नैसर्गिक भाववाढ लागु असेल.
3. सदरील प्रकल्प कार्यान्वित झाल्याच्या दिनांकापासुन प्रवेश फि संबंधीचा दैनंदिन लेखाजोखा (हिशोब) ठेवावा लागेल व करारनाम्यानुसार मनपास रॉयल्टी भरावी लागेल.
4. पर्यावरणपूरक बॅटरी/विद्युत ऊर्जेवर चालणारी, आवाज व धुर विरहीत मिनी ट्रेनची उभारणी करणे या प्रकल्पासाठी जागा ही तात्पुरत्या स्वरुपात असुन यावर आपला कोणताही हक्क राहणार नाही किंवा दावा करता येणार नाही.
5. प्रस्तावात मान्यता दिलेल्या पर्यावरणपूरक बॅटरी/विद्युत ऊर्जेवर चालणारी, आवाज व धुर विरहीत मिनी ट्रेन व्यतिरीक्त कोणताही उपक्रम सुरु करता येणार नाही.
6. नियुक्त केलेल्या कर्मचा-याकडुन उद्यानाचे पावित्र्य जपले जाईल तसेच मनपाच्या मालमत्तेचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही याचे हमीपत्र द्यावे लागेल.
7. सदरील जागेत कोणतेही पक्के बांधकाम करता येणार नाही. त्यासाठी महानगरपालिकेची पुर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.
8. या प्रकल्पामधील साहित्याची काही मोड-तोड झाल्यास किंवा चोरी झाल्यास त्यास महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.
9. पर्यावरणपूरक बॅटरी/विद्युत ऊर्जेवर चालणारी, आवाज व धुर विरहीत मिनी ट्रेन उभारणीसाठी लागणारा विद्युत पुरवठ्याचा सेटअप, इलेक्ट्रीक फिटिंग तसेच अंतर्गत रस्ते, लाईटस याची सर्व व्यवस्था संबंधीत एजन्सीला करावी लागेल.
10. सदर प्रकल्प चालविण्यासाठी लागणारा सुरक्षा कर्मचारी वर्ग तसेच इतर कर्मचारी हा संबंधीत एजन्सीला ठेवावा लागेल.
11. सदर प्रकल्प सिध्दार्थ उद्यानाच्या दैनंदिन वेळेप्रमाणे किंवा वेळेनुसार चालविणे बंधनकारक राहिल.
12. या प्रकल्पामध्ये मनोरंजनासाठी आलेल्या लहान मुलांना खेळतांना काही इजा किंवा अपघात झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत एजन्सीची राहिल. त्यास महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.
13. सदर प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर लगतच्या प्राणी संग्रहालयातील प्राण्यांना आवाजामुळे काही त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी लागेल.
14. सदरील प्रकल्पात काही देखभाल दुरुस्त्या करणे झाल्यास स्वखर्चाने कराव्या लागतील.
15. शालेय सहली, शालेय विद्यार्थ्यांचा ग्रुप यांना प्रवेश दरात 25% सुट द्यावी लागेल.
16. या प्रकल्पातुन मिळणा-या प्रवेश फि मधुन शासनाच्या नियमानुसार संबंधीत एजन्सीला मनोरंजन कर भरावा लागेल व दरवर्षी मनोरंजन कर भरल्याची पावती सादर करावी लागेल.
17. कोणत्याही कारणाने जसे नैसर्गिक आपत्ती अथवा अन्य आपत्तकालीन परिस्थितीमुळे सिध्दार्थ उद्यान बंद ठेवावे लागले तर अशा कालावधीत सदरील प्रकल्प चालविता येणार नाही.
18. सदर जागेवरील खेळाची उपकरणे कोणत्याही त-हेने हस्तांतरण करणे, पोटभाडेकरु ठेवणे, बक्षीस, गहाणखत इत्यादी बाबी करता येणार नाहीत. या प्रकल्पात कुणास भागीदार घेता येणार नाही.
19. परीसर सुरक्षिततेच्या दृष्टीने महानगरपालिकेचे अधिकारी वेळोवेळी प्रकल्पाची पाहणी करतील. अशा पहाणीच्या वेळी अधिका-यास मज्जाव करता येणार नाही.
20. ठरल्यानुसार प्रवेश फि संबंधी प्रकल्पाच्या प्रवेशव्दारावर दरपत्रकाचा सुस्पष्ट व सर्वांना दिसेल असा फलक स्वखर्चाने लावावा लागेल.
21. प्रकल्प चालविणेसाठी सर्व आवश्यक परवानगी काढण्याची जबाबदारी एजन्सी धारकांची राहिल.
22. कोणत्याही प्रकारे नैसर्गिक आपत्ती अथवा इतर कोणत्याही कारणाने प्रकल्पाचे नुकसान झाल्यास औरंगाबाद महानगरपालिका त्यास जबाबदार राहणार नाही.

23. सदरील प्रकल्प बंद करणे असल्यास एजन्सी धारकाने 30 दिवस अगोदर पुर्व कल्पना देणे आवश्यक राहिल. अन्यथा भरलेली सुरक्षा अनामत रक्कम परत मिळणार नाही.
24. प्रकल्पाचा करारनामा नियमानुसार योग्य त्या मुद्रांकावर स्वखर्चाने एजन्सीधारकाने करुन देवुन नोंदणी प्रमाणपत्र, पॅन, जीएसटी इ. उद्यान विभागाकडे सादर करणे आवश्यक राहील.
25. कामगारांचा विमा, पीएफ/ईएसआयसी हा नियमानुसार भरणा करावा लागेल. या बाबत कुठलीही तक्रार औरंगाबाद मनपा स्विकारणार नाही.
26. वर नमुद केलेल्या कोणत्याही अटी व शर्तीचा भंग झाला तर करारनामा रद्द करण्याचे व सदर प्रकल्पातील उपकरणे उद्यानातुन काढुन घेण्याचे अधिकार मा.आयुक्त महोदय यांना असतील.

करिता उक्त नमुद नुसार व्ही प्ले औरंगाबाद यांना सिध्दार्थ उद्यान येथे पर्यावरणपूरक/बॅटरी/विद्युतवर चालणारी मिनी ट्रेन प्रकल्प कार्यान्वित झाल्याच्या तारखेपासून 10 वर्ष कालावधीसाठी चालविणे व त्यास्तव 3 ते 12 वयोगटातील बालकांसाठी रुपये 25/- व 12 वर्षावरील वयोगटासाठी रुपये 50/- एवढे प्रवेश शुल्क आकारुन महानगरपालिकेस जमा होणा-या दैनंदिन प्रवेश फि मधुन 25 टक्के रॉयल्टी देणे व प्रवेश फि मध्ये प्रतीवर्ष 10 टक्के नैसर्गीक वाढ करणेसाठी मंजुरी मिळणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ मा.सर्वसाधारण सभेसमोर तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 392/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व्ही प्ले, औरंगाबाद यांना सिध्दार्थ उद्यानात पर्यावरणपूरक/बॅटरी/विद्युतवर चालणारी मिनी ट्रेनची स्वखर्चाने उभारणी करुन कार्यादेश दिनांका पासून 10 वर्ष चालविणेसाठी मान्यता देण्यात येते. त्यास्तव 3 ते 12 वयोगटातील बालकांसाठी रु.25/- व 12 वर्षावरील वयोगटासाठी रु.50/- एवढे शुल्क आकारुन दैनंदिन जमा होणा-या प्रवेश शुल्कातून महानगरपालिकेस 25 टक्के रॉयल्टी देणे, प्रवेश फि मध्ये प्रतिवर्ष 10 टक्के नैसर्गीक वाढ या व इतर अटी शर्तीस अधिन राहून हा प्रकल्प चालविणेसाठी मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 393/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.25.05.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, 'आरोग्य अधिकारी (रुग्णालये)/प्रतिबंधात्मक उपाय' संवर्गातून 'सहाय्यक आरोग्य अधिकारी' संवर्गातील रिक्त पदे पदोन्नतीने भरणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 54(1) अन्वये गठीत केलेल्या निवड समितीची बैठक दि.10.05.2022 रोजी घेण्यात आली. सद्य:स्थितीत सहाय्यक आरोग्य अधिकारी संवर्गात एकूण (01) पद मंजूर असून सद्यस्थितीत सदर पद रिक्त आहे.

वैद्यकीय अधिकारी या पदावर कार्यरत अधिका-यांच्या वयाच्या 50/55 नंतर सेवेत ठेवण्याबाबतचे पुनर्विलोकनाबाबत कार्यवाही करण्यात आलेली नाही. आरोग्य अधिकारी (रुग्णालये)/प्रतिबंधात्मक उपाय/वैद्यकीय अधिक्षक संवर्गातील कार्यरत अधिका-यांची सेवा ज्येष्ठता, शौक्षणिक अर्हता, गोपनीय अहवाल, विभागीय चौकशी इ. सेवाविषयक बाबीं विचारात घेता, सहाय्यक आरोग्य अधिकारी पदावरील रिक्त पदांची संख्या तसेच कामाची निकड लक्षात घेता खालील अधिका-यांना खुल्या प्रवर्गातून 'सहाय्यक आरोग्य अधिकारी' या पदावर वेतनश्रेणी (एस-23) 67700-208700 (7वा वेतन आयोग) मध्ये मा.उच्च न्यायालय,मुंबई यांनी रिट याचिका क्र.2797/2015 मध्ये दि.4.8.2017 रोजी दिलेल्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका क्र.28306/2017 च्या निर्णयाच्या अधिन राहून तसेच सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र.बीसीसी 2018 /प्र.क्र.366/16-ब. दि.07.05.2021 मधील सुचनांनुसार पदोन्नती देण्याबाबत डॉ.बाबासाहेब गंगाराम उनवणे यांच्या सेवाविषयक अभिलेख्यांची पडताळणी समितीने केलेली आहे.

त्यांचे नियुक्ती आदेशात त्यांची नियुक्ती ही त्यांच्या उच्चत्तम वयोमानास शासनाची मान्यता मिळेल या अटीच्या अधिन राहील,असे नमूद आहे. त्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 51(4) नुसार शासनाकडून मान्यता मिळण्याच्या अटीस अधिन राहून समिती **डॉ.बाबासाहेब गंगाराम उनवणे** यांना **सहाय्यक आरोग्य अधिकारी** पदावर पदोन्नती देण्याबाबत एकमताने निव्वळ तदर्थ (Adhoc) स्वरुपात पदोन्नती शिफारस करीत आहे. औरंगाबाद महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम 2021 मधील नियम 6 नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 45 अंतर्गत येणारी पदे तसेच वर्ग-1 ची इतर सर्व पदे पदोन्नतीने भरतांना, सर्वसाधारण सभेच्या ठरावानंतर त्यास शासनाची पूर्वमंजूरी आवश्यक राहील,अशी तरतूद असून त्यानुसार मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेवून तसा प्रस्ताव मा.राज्य शासनाकडे मान्यतेस्तव

पाठविणेबाबत समिती शिफारस केल्यानुसार, मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेण्यासाठी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 393/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सहाय्यक आरोग्य अधिकारी पदावरील रिक्त पदांची संख्या तसेच कामाची निकड लक्षात घेता डॉ.बाबासाहेब गंगाराम उनवणे,आरोग्य अधिकारी (रुग्णालये/ प्रतिबंधात्मक उपाय यांना खुल्या प्रवर्गातून 'सहाय्यक आरोग्य अधिकारी' या पदावर वेतनश्रेणी (एस-23) 67700-208700 (7वा वेतन आयोग) मध्ये मा.उच्च न्यायालय,मुंबई यांनी रिट याचिका क्र.2797/2015 मध्ये दि.4.8.2017 रोजी दिलेल्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका क्र.28306/2017 च्या निर्णयाच्या अधिन राहून,सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र.बीसीसी 2018/ प्र.क्र.366/16-ब. दि.07.05.2021 मधील सुचनांनुसार निव्वळ तदर्थ (Adhoc) स्वरुपात पदोन्नती देण्याबाबत व त्यांचे नियुक्ती आदेशात त्यांची नियुक्ती ही त्यांच्या उच्चत्तम वयोमानास शासनाची मान्यता मिळेल या अटीच्या अधिन राहील. तसेच औरंगाबाद महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम 2021 मधील नियम 6 नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 45 अंतर्गत येणारी पदे तसेच वर्ग-1 ची इतर सर्व पदे पदोन्नतीने भरतांना, सर्वसाधारण सभेच्या ठरावानंतर त्यास शासनाची पूर्वमंजूरी आवश्यक राहील,अशी तरतूद असून त्यानुसार मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेवून तसा प्रस्ताव मा.राज्य शासनाकडे मान्यतेस्तव पाठविणेबाबत समिती शिफारस केल्यानुसार, मा.सर्वसाधारण सभेची मान्यता देण्यात येते. वौधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 394/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.25.05.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, 'उपअभियंता (स्थापत्य)' संवर्गातून 'कार्यकारी अभियंता (स्थापत्य)' संवर्गातील रिक्त पदे पदोन्नतीने भरणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 54(1) अन्वये गठीत केलेल्या निवड समितीची बैठक दि.10/05/2022 रोजी घेण्यात आली. सद्य:स्थितीत कार्यकारी अभियंता (स्थापत्य) संवर्गात एकूण (06) पदे मंजूर असून (01) पद भरण्यात आले असून (05) पदे रिक्त आहेत.

रिट याचिका क्र.5156/1988 व रिट याचिका क्र.5045/1997 श्री.सखाराम पानझडे विरुध्द मनपा मध्ये मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी या संदर्भात तांत्रिक संवर्गातील अधिकारी व कर्मचा-यांना व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण होण्यासंदर्भातील तपशिल नमूद आहे. तथापि,औरंगाबाद महानगरपालिकेच्या सेवाभरती नियम दि.16.05.1994 मधील तरतूदीनुसार वयाची 45 वर्षे पूर्ण झाल्यानंतर व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्याची तरतूद आहे. त्यानुसार औरंगाबाद महानगरपालिकेने खालील अधिका’-यांना व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट दिलेली आहे. उपअभियंता संवर्गातून कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या संवर्गात पदोन्नती देण्यासाठी संबंधितांच्या सेवाविषयक व व्यावसायिक परीक्षेसंदर्भातील बाबी इ.पडताळणी समितीसमोर करण्यात आलेले आहे. त्यामुळे पदोन्नती व सेवाविषयक तपशीलाच्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 51(4) च्या अधिन राहून समिती एकमताने खालील अधिका-यांच्या तदर्थ (Adhoc) स्वरुपात पदोन्नतीसाठी मान्यता प्रदान करीत आहे. तसेच संबंधित अधिका-यांच्या वयाच्या 50/55 नंतर सेवेत ठेवण्याबाबतचे पुनर्विलोकनाबाबत कार्यवाही करण्यात आलेली नाही.

उपअभियंता (स्थापत्य) संवर्गातील कार्यरत अधिका-यांची सेवा ज्येष्ठता, शौक्षणिक अर्हता, गोपनीय अहवाल, विभागीय चौकशी इ. सेवाविषयक बाबीं विचारात घेता, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) पदावरील रिक्त पदांची संख्या तसेच कामाची निकड लक्षात घेता खालील अधिका-यांना **खुल्या** प्रवर्गातून **'कार्यकारी अभियंता (स्थापत्य)'** या पदावर **वेतनश्रेणी (एस-23) 67700-208700 (7वा वेतन आयोग)** मध्ये मा.उच्च न्यायालय,मुंबई यांनी रिट याचिका क्र.2797/2015 मध्ये दि.4/8/2017 रोजी दिलेल्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका क्र.28306/2017 च्या निर्णयाच्या अधिन राहून तसेच सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र.बीसीसी 2018/ प्र.क्र.366/16-ब. दि.07.05.2021 मधील सुचनांनुसार निव्वळ तदर्थ (Adhoc) स्वरुपात पदोन्नती देणेबाबत तसेच औरंगाबाद महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम 2021 मधील नियम 6 नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 45 अंतर्गत येणारी पदे तसेच वर्ग-1 ची इतर सर्व पदे पदोन्नतीने भरतांना, सर्वसाधारण सभेच्या ठरावानंतर त्यास शासनाची पूर्वमंजूरी आवश्यक राहील,अशी तरतूद असून त्यानुसार मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेवून तसा प्रस्ताव मा.राज्य शासनाकडे मान्यतेस्तव पाठविणेबाबत समिती शिफारस केल्यानुसार,मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेण्यासाठी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

| अ.क्र. | सेवा ज्येष्ठता क्रमांक | अधिका-यांचे नांव (सर्वश्री) | मुळ जात प्रवर्ग | पदोन्नतीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|
| 1 | 1 | अविनाश भास्कर देशमुख | खुला | खुला |
| 2 | 2 | भागवत दिनकर फड | भटक्या जमाती(ड) | खुला |
| 3 | 3 | राजू नरसूजी संधा | अनूसूचित जमाती | खुला |

**ठराव क्रमांक 394/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,कार्यकारी अभियंता (स्थापत्य) पदावरील रिक्त पदांची संख्या तसेच कामाची निकड लक्षात घेता खालील अधिका-यांना **खुल्या** प्रवर्गातून **'कार्यकारी अभियंता (स्थापत्य)'** या पदावर **वेतनश्रेणी (एस-23) 67700-208700 (7वा वेतन आयोग)** मध्ये मा.उच्च न्यायालय,मुंबई यांनी रिट याचिका क्र.2797/2015 मध्ये दि.4/8/2017 रोजी दिलेल्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका क्र.28306/2017 च्या निर्णयाच्या अधिन राहून तसेच सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र.बीसीसी 2018/प्र.क्र.366/16-ब. दि.07.05.2021 मधील सुचनांनुसार निव्वळ तर्दथ (Adhoc) स्वरुपात पदोन्नती देणेबाबत तसेच औरंगाबाद महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम 2021 मधील नियम 6 नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 45 अंतर्गत येणारी पदे तसेच वर्ग-1 ची इतर सर्व पदे पदोन्नतीने भरतांना, सर्वसाधारण सभेच्या ठरावानंतर त्यास शासनाची पूर्वमंजूरी आवश्यक राहील,अशी तरतूद असून त्यानुसार मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेवून तसा प्रस्ताव मा.राज्य शासनाकडे मान्यतेस्तव पाठविणेबाबत समिती शिफारस केल्यानुसार मा.सर्वसाधारण सभेची मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

| अ.क्र. | सेवा ज्येष्ठता क्रमांक | अधिका-यांचे नांव (सर्वश्री) | मुळ जात प्रवर्ग | पदोन्नतीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|
| 1 | 1 | अविनाश भास्कर देशमुख | खुला | खुला |
| 2 | 2 | भागवत दिनकर फड | भटक्या जमाती(ड) | खुला |
| 3 | 3 | राजू नरसूजी संधा | अनूसूचित जमाती | खुला |

**प्रस्ताव क्रमांक 395/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.25.05.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहराची दिवसेंदिवस वाढत जाणारी लोकसंख्या नागरी वसाहती, शैक्षणिक वातावरण ई-कारणामुळे औरंगाबाद महानगरपालिकेने नागारिकाच्या सोईसाठी शहरात नवीन रस्ते तयार करुन या रस्त्यावर पर्यावरण संतुलन राखणेसाठी वृक्ष लागवडीचे काम हाती घेतले आहे. महानुभव आश्रम चौक ते बीड बायपास रस्त्याच्या डी पी प्लॅन नूसार महानगरपालिकेच्या हद्दी पर्यत 60 मी.रुंद व अंदाजे 14 कि.मी रस्त्याच्या दुतर्फा भारतीय वंशावळीची 2 मी.उंचीची झाडे लावण्याचा महानगरपालिकेचा मानस आहे. या नुसार प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन पुणे विभागाच्या उद्यान विषयक प्रचलीत दरसूची सन 2017-18 नुसार प्रस्तावाचे अंदाजपत्रकीय र.रु.39,99,492/- चे तयार केले आहे. सदर कामाचा खर्च केंद्र शासन पुरस्कृत अमृत योजना हरीत क्षेत्र विकास या शासनाने दिलेल्या Insentive प्रोत्साहनपर निधीतून खर्च करण्यात येणार आहे. जेणे करून भविष्यात या रस्त्यावर सावली येईल व शहर सौंदर्यीकरणास हातभार लागेल व पर्यावरण संतुलन राखता येईल.

करीता, उक्त नमुद नुसार प्रस्तावाचे अं.प.र.रु.39,99,492/- विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 395/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे महानुभाव आश्रम चौक ते महानगरपालिकेची हद्दीपर्यंत या सुमारे 14 कि.मी.लांबीच्या रस्त्याच्या दुतर्फा भारतीय वंशावळीची 2 मी उंचीची झाडे लावणेसाठी पुणे विभागाच्या उद्यान विषयक प्रचलीत दरीसुची सन 2017-18 नुसार प्रस्तावाचे अंदाजपत्रकीय र.रु.39,99,492/- च्या अंदाजपत्रकाच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 396/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.25.05.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, **श्रीमती क्रांती आनंद देशमुख, सहशिक्षिका, केंद्रिय प्राथमिक शाळा इंदिरानगर बायजीपुरा** यांनी स्वत:च्या पतीच्या (हृदयाच्या व्हॉल्व्ह बदलणे) आजारपणावर, युनायटेड सिग्मा हॉस्पिटल येथे उपचार केला असून सदर उपचारासाठी रु. 5,48,810/- (अक्षरी- रुपये पाच लक्ष अठ्ठेचाळीस हजार आठशे दहा मात्र) इतका खर्च केला आहे.

त्यापैकी प्रत्यक्ष अनुज्ञेय शिल्लक रक्क़म रु. 4,73,060/- असून सदर रक्क़मेच्या 90 % र.रु.4,25,754/- आहे. त्यापैकी 5 % रक्क़म रु. 27,440/- (एकुण दाखल केलेले देयके रुपये रु. 5,48,810/- च्या 5% प्रमाणे) महानगरपालिका फंडात जमा करुन उर्वरित निव्वळ देय रक्क़म रु.3,98,314 /- (रुपये-तीन लक्ष अठ्यान्नव हजार तीनशे चौदा मात्र) देय आहे.

संबंधितांनी सदरील गंभीर आजारावर उपचार करण्यासाठी कार्यालयाकडून रक्क़म रुपये 1,50,000/- अग्रिम घेतलेले आहे.

सदरील युनायटेड सिग्मा हॉस्पिटल हे उपचार केलेले (हृदयाच्या व्हॉल्व्ह बदलणे) रुग्णालय शासकीय रुग्णालयाप्रमाणे प्रतिपूर्ती अनुज्ञेयतेसाठी शासन मान्यता दिलेल्या खाजगी रुग्णालयांची अद्ययावत दि. 16/11/2011 पर्यंत प्रसिध्द रुग्णालय यादीत सदरील रुग्णालयाचे नाव समाविष्ठ आहे.

शासन निर्णयामधील प्रतिपूर्तीच्या अनुज्ञेयतेची कमाल मर्यादा व मंजुरीचे अधिकाराबाबत महाराष्ट्र राज्य़ सेवा (वैद्यकिय देखभाल) नियम, 1961 व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील तरतुदींच्या अधिन राहून तसेच दि. 14.05.2013 च्या परिपत्रकानुसार रु.1,00,000/- पर्यंतच्या वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपुर्तीस मंजुरीचे अधिकार संबंधित विभागाच्या विभाग प्रमुखांना प्रदान करण्यात आले आहे. तसेच रु. 1,00,000/- पेक्षा जास्त़ वैद्यकीय देयक रकमेस मंजुरीचे अधिकार आयुक्त़ यांना असुन रु. 2,00,000/- पेक्षा जास्त़ वैद्यकीय देयक रक्क़मेस मा. स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्य़क आहे.

करिता, श्रीमती क्रांती आनंद देशमुख, सहशिक्षिका, केंद्रिय प्राथमिक शाळा इंदिरानगर बायजीपुरा यांना शासन निर्णयामधील तरतुदीच्या अधिन राहून निव्वळ देय रक्क़म रु.3,98,314/- मधुन अग्रिम रक्क़म रु. 1,50,000/- वजा जाता रक्क़म रु.2,48,314/- (अक्षरी रुपये-दोन लक्ष अठ्ठेचाळीस हजार तीनशे चौदा मात्र) वैद्यकिय खर्चास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्त़व सादर.

**<u>ठराव क्रमांक 396/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्यानूसार श्रीमती क्रांती आनंद देशमुख, सहशिक्षिका, केंद्रिय प्राथमिक शाळा इंदिरानगर बायजीपुरा यांनी स्वत:च्या पतीच्या (हृदयाच्या व्हॉल्व्ह बदलणे) आजारपणावर, युनायटेड सिग्मा हॉस्पिटल येथे उपचार केला असुन संबंधितास शासन निर्णयामधील तरतूदीच्या अधिन राहून निव्वळ देय रक्क़म रु.3,98,314/- मधुन अग्रिम रक्क़म रु. 1,50,000/- वजा जाता रक्क़म रु. 2,48,314/- (अक्षरी रुपये- दोन लक्ष अठ्ठेचाळीस हजार तीनशे चौदा मात्र) वैद्यकिय खर्च अदा करण्यास मान्य़ता देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 397/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.25.05.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2021/704. दि.07.05.2021 अन्वये "महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेसाठी पाणी पुरवठा प्रकल्पासाठी रु.1680.50 कोटीच्या योजनेस मंजूर केलेल्या योजनेची प्रभावी अंमलबजावणीसाठी स्थापन केलेल्या 'प्रकल्प व्यवस्थापन युनिट' (PMU) मध्ये कार्यकारी अभियंता म्हणून काम करण्यासाठी" या विवक्षित कामाकरीता श्री.हेमंत आनंदा कोल्हे,कार्यकारी अभियंता (सेवानिवृत्त) यांची सेवा विहित अटी व शर्तीच्या अधीन राहून प्रथमत: 06 महिन्यांच्या कालावधीकरीता करार पध्दतीने,सेवानिवृत्त अधिका-यांना दरमहा सेवानिवृत्तीपूर्वी मिळत असलेल्या एकूण वेतनातून (मूळ वेतन व महागाई भत्ता धरुन) त्यांना आता मिळत असलेले एकूण निवृत्तीवेतन (महागाई भत्ता आणि अंशराशीकृत निवृत्तीवेतनासह) वजा केल्यानंतर होणारी रक्कम त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल. परंतु या पारिश्रमिक रकमेची कमाल मासिक मर्यादा रु.40,000/- (रुपये चाळीस हजार) इतक्या मर्यादेत राहील,या अटीवर घेण्यात आलेली आहे.

तथापि, उक्त आदेशानुसार सदरची मुदत ही दि.02/11/2021 रोजी संपल्याने तसेच उक्त काम प्रगतीपथावर असल्याने श्री.हेमंत आनंदा कोल्हे,कार्यकारी अभियंता (सेवानिवृत्त) यांच्या सेवेची कार्यालयास आवश्यकता असल्याने कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/ 2021/ 1590. दि.13/12/2021 अन्वये दि.06/11/2021 पासून 06 महिन्यांच्या कालावधीसाठी दि.07/05/2021 रोजीच्या आदेशात नमूद अटी व शर्तीच्या अधिन राहून मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

तथापि, उक्त आदेशानुसार सदरची मुदत ही दि.05/05/2022 रोजी संपल्याने तसेच उक्त काम प्रगतीपथावर असल्याने व कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2022/522. दि.13/05/2022 अन्वये त्यांच्याकडे कार्यकारी अभियंता,पाणी पुरवठा (वितरण) विभागाचा कार्यभार सोपविण्यात आलेला आहे. त्यामुळे

सदर कामांसाठी श्री.हेमंत आनंदा कोल्हे,कार्यकारी अभियंता (सेवानिवृत्त) यांच्या सेवेची कार्यालयास आवश्यकता आहे.

करिता श्री.हेमंत आनंदा कोल्हे,कार्यकारी अभियंता (सेवानिवृत्त) यांना ''महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेसाठी पाणी पुरवठा प्रकल्पासाठी रु.1680.50 कोटीच्या योजनेस मंजूर केलेल्या योजनेची प्रभावी अंमलबजावणीसाठी स्थापन केलेल्या 'प्रकल्प व्यवस्थापन युनिट' (PMU) मध्ये कार्यकारी अभियंता म्हणून काम करण्यासाठी'' व ''पाणी पुरवठा (वितरण) कामासाठी कार्यकारी अभियंता म्हणून काम करण्यासाठी'' या कामांसाठी दि.07/05/2022 पासून सहा महिन्यांच्या कालावधीसाठी दि.07.05.2021 च्या आदेशात नमूद अटी व शर्तीच्या (अट क्र.6 वगळून) अधिन राहून तसेच त्यांना त्यांच्या नियुक्तीच्यावेळी महागाई भत्त्यासह मिळत असलेल्या निवृत्तीवेतनाएवढी रक्कम (अंशराशीकृत निवृत्तीवेतन वगळून) त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल,या अटीच्या अधिन राहून नेमणूक देण्याबाबत प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 397/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2021/704. दि.07/05/2021 अन्वये ''महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेसाठी पाणी पुरवठा प्रकल्पासाठी रु.1680.50 कोटीच्या योजनेस मंजूर केलेल्या योजनेची प्रभावी अंमलबजावणीसाठी स्थापन केलेल्या 'प्रकल्प व्यवस्थापन युनिट' (PMU) मध्ये कार्यकारी अभियंता म्हणून काम करण्यासाठी'' या विवक्षित कामाकरीता श्री.हेमंत आनंदा कोल्हे,कार्यकारी अभियंता (सेवानिवृत्त) यांची सेवा विहित अटी व शर्तीच्या अधीन राहून प्रथमत: 06 महिन्यांच्या कालावधीकरीता करार पध्दतीने,सेवानिवृत्त अधिका-यांना दरमहा सेवानिवृत्तीपूर्वी मिळत असलेल्या एकूण वेतनातून (मूळ वेतन व महागाई भत्ता धरुन) त्यांना आता मिळत असलेले एकूण निवृत्तीवेतन (महागाई भत्ता आणि अंशराशीकृत निवृत्तीवेतनासह) वजा केल्यानंतर होणारी रक्कम त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल. परंतु या पारिश्रमिक रकमेची कमाल मासिक मर्यादा रु.40,000/- (रुपये चाळीस हजार) इतक्या मर्यादेत राहील,या अटीवर घेण्यात आलेली आहे.

तथापि, उक्त आदेशानुसार सदरची मुदत ही दि.02.11.2021 रोजी संपल्याने तसेच उक्त काम प्रगतीपथावर असल्याने श्री.हेमंत आनंदा कोल्हे,कार्यकारी अभियंता (सेवानिवृत्त) यांच्या सेवेची कार्यालयास आवश्यकता असल्याने कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2021/1590. दि.13.12.2021 अन्वये दि.06.11.2021 पासून 06 महिन्यांच्या कालावधीसाठी दि.07.05.2021 रोजीच्या आदेशात नमूद अटी व शर्तीच्या अधिन राहून मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

तथापि, उक्त आदेशानुसार सदरची मुदत ही दि.05.05.2022 रोजी संपल्याने तसेच उक्त काम प्रगतीपथावर असल्याने व कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2022/522. दि.13.05.2022 अन्वये त्यांच्याकडे कार्यकारी अभियंता,पाणी पुरवठा (वितरण) विभागाचा कार्यभार सोपविण्यात आलेला आहे. त्यामुळे सदर कामांसाठी श्री.हेमंत आनंदा कोल्हे,कार्यकारी अभियंता (सेवानिवृत्त) यांच्या सेवेची कार्यालयास आवश्यकता आहे.

करिता श्री.हेमंत आनंदा कोल्हे,कार्यकारी अभियंता (सेवानिवृत्त) यांना ''महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेसाठी पाणी पुरवठा प्रकल्पासाठी रु.1680.50 कोटीच्या योजनेस मंजूर केलेल्या योजनेची प्रभावी अंमलबजावणीसाठी स्थापन केलेल्या 'प्रकल्प व्यवस्थापन युनिट' (PMU) मध्ये कार्यकारी अभियंता म्हणून काम करण्यासाठी'' व ''पाणी पुरवठा (वितरण) कामासाठी कार्यकारी अभियंता म्हणून काम करण्यासाठी'' या कामांसाठी दि.07.05.2022 पासून सहा महिन्यांच्या कालावधीसाठी दि.07.05.2021 च्या आदेशात नमूद अटी व शर्तीच्या (अट क्र.6 वगळून) अधिन राहून तसेच त्यांना त्यांच्या नियुक्तीच्यावेळी महागाई भत्त्यासह मिळत असलेल्या निवृत्तीवेतनाएवढी रक्कम (अंशराशीकृत निवृत्तीवेतन वगळून) त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल,या अटीच्या अधिन राहून नेमणूक देण्याबाबत प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 398/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.26.05.2022)**

मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेसाठी प्रस्ताव ठेवण्यात येतो की, महानगरपालिका औरंगाबाद कार्यक्षेत्रातील रमाई आवास योजना अंमलबजावणी होत आहे. सदर योजनेसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा पुरवठा कामी मे.सिमा कन्सलटंट यांचा 0.99% दराने नेमणुक झाली आहे. सदर प्रकल्प व्यवस्थापन

सल्लागार यांचे सेवा पुरवठा कामासाठी यापुर्वी 49.99 लक्ष रक्कमेपर्यंत मान्यता प्राप्त आहे. सदर योजना कामाचे उर्वरित आर्थीक उद्दीष्टपुर्तीसाठी सेवा पुरवठा धारक यांचे नेमणुकीसाठी (49.99+63.87) लक्ष या प्रमाणे एकत्रित र.रु.113.86 लक्ष याप्रमाणे सुधारीत मान्यतेसाठी प्रस्तावित आहे. सुधारीत मान्यतेसाठी सेवा पुरवठाचे दर मुळ मंजुर दराप्रमाणे 0.99%+जी.एस.टी. याप्रमाणे निर्णयाचे मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 398/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद कार्यक्षेत्रात रमाई आवास योजना कामासाठी अंमलबजावणी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांचे सेवा पुरवठा यांच्या सेवा पुरवठा कामासाठी सुधारीत अंदाजपत्रकीय र.रु.113.86 लक्ष कामासाठी मे.सिमा कन्सलटंट यांच्या सेवा पुरवठ्याचे 0.99%+जी.एस.टी.दराने सुधारीत कामासाठी मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 399/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.26.05.2022)**

**प्रस्ताव सादर करण्यात येतो की,** विषय :- पडेगांव घनकचरा प्रक्रिया केंद्र येथे लिचेट ट्रीटमेंट प्लांट उभारणे बाबत.

संदर्भ :- टेंडर आय.डी. क्र.२०२१-AMCA-७४३३८४_3

| क्र. | खात्याचे नांव | घनकचरा व्यवस्थापन विभाग |
|---|---|---|
| १ | कामाचे स्वरुप | पडेगांव घनकचरा प्रक्रिया केंद्र येथे लिचेट ट्रीटमेंट प्लांट उभारणे बाबत. |
| २ | पुर्वगणनपत्र मान्य झाले आहे काय?, असल्यास किती रकमेच्या मान्यतेचा ठराव? | होय, एकत्रित रक्कम रुपये ६५.९० कोटी मान्यता दिनांक १३.१०.२०२१ |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रु.१,२०,००,०००/- |
| ३ | ज्या वृत्तपत्रात टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | राष्ट्रस्तरीय वर्तमानपत्र इंग्रजी-०१, राज्यस्तरीय वर्तमानपत्र मराठी-०१ तसेच ई-निविदा विभाग |
| ४ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | दि.०२.१२.२०२१ ते २९.१२.२०२१<br>दि.०३.०१.२०२२ ते १७.०१.२०२२<br>दि.२४.०१.२०२२ ते ०१.०२.२०२२ |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | दि.१२.०४.२०२२ (तिसरी वेळ) |
| ५ | एकूण किती टेंडर्स आली ? | ०१ (एक) |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ. क्र. | ठेकेदाराचे नांव व पत्ता | प्राप्त टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| १ | सिद्दीकी जलीसुद्दीन मोईजुद्दीन | रु.१,१४,२५,०००/- | First Lowest |
| ६ | सर्वात कमी रकमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत | | लागु नाही |
| ७ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षावर पडणार आहे ? ते शिर्षक नमुद करावे. | | शासकीय अनुदान १५ वा वित्त आयोग |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय ? | | होय |
| ८ | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय ? | | नाही |

| | | |
|---|---|---|
| | अ) असल्यास डिपॉझीट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय ? (डिपॉझीट रजिस्टर पान क्रमांक द्यावा) | लागु नाही |
| ९ | सोबत मान्य पुर्वगणनपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे काय ? | --- |

विषयांकित कामासाठी सिद्दीकी जलीसुद्दीन मोईजुद्दीन यांनी बी-२ स्वरुपातील रक्कम रुपये १,१४,२५,०००/- रकमेची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.८० टक्के कमी दराने दाखल केलेली आहे.

तरी सदरील काम सिद्दीकी जलीसुद्दीन मोईजुद्दीन, कंत्राटदार यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.८० टक्के कमी दराने म्हणजेच रु.१,१४,२५,०००/- एवढ्या रकमेचे काम करुन घेणेस व करार करणेस मा. स्थायी समितीची मान्यता घेणेसाठी सादर.

**ठराव क्रमांक 399/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पडेगांव घनकचरा प्रक्रिया केंद्र येथे लिचेट ट्रीटमेंट प्लांट उभारणे या कामासाठी सिद्दीकी जलीसुद्दीन मोईजुद्दीन, कंत्राटदार यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.८० टक्के कमी दराने म्हणजेच रुपये १,१४,२५,०००/- एवढ्या रकमेचे काम करुन घेणेस व करार करणेस मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 400/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.26.05.2022)**

**प्रस्ताव सादर करण्यात येतो की,** विषय :- घनकचरा संकलन व वाहतुक या करिता ट्रान्सफर स्टेशन उभारणे बाबत.

संदर्भ :- टेंडर आय.डी. क्र.२०२१-AMCA-७४३३६६_2

| क्र. | खात्याचे नांव | घनकचरा व्यवस्थापन विभाग |
|---|---|---|
| १ | कामाचे स्वरुप | घनकचरा संकलन व वाहतुक या करिता ट्रान्सफर स्टेशन उभारणे बाबत. |
| २ | पुर्वगणनपत्र मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेच्या मान्यतेचा ठराव? | होय, एकत्रित रक्कम रुपये ६५.९० कोटी मान्यता दि.१३.१०.२०२१ |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले ? | रक्कम रुपये ९,२४,२०,३८८/- |
| ३ | ज्या वृत्तपत्रात टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | राष्ट्रस्तरीय वर्तमानपत्र इंग्रजी-०१, राज्यस्तरीय वर्तमानपत्र मराठी-०२ व हिंदी-०१ तसेच ई-निविदा विभाग |
| ४ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | दि.०२.१२.२०२१ ते २९.१२.२०२१ |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | दि.३१.१२.२०२१ |
| ५ | एकूण किती टेंडर्स आली ? | ०१ (एक) |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ. क्र. | ठेकेदाराचे नांव व पत्ता | प्राप्त टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| १ | बाबुराव केरबा अदमाने सेवानिवृत्त अभियंता | रुपये ८,८७,५८,६८१/- | First Lowest |

| | | |
|---|---|---|
| ६ | सर्वात कमी रकमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |

| | | |
|---|---|---|
| | असल्यास कारणे नमुद करावीत | लागु नाही |
| ७ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षावर पडणार आहे ? ते शिर्षक नमुद करावे. | शासकीय अनुदान १५ वा वित्त आयोग |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ८ | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझीट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझीट रजिस्टर पान क्रमांक द्यावा) | लागु नाही |
| ९ | सोबत मान्य पुर्वगणनपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे काय? | --- |

विषयांकित कामासाठी बाबुराव केरबा अदमाने यांनी बी-१ स्वरुपातील र.रु.८,८७,५८,६८१/- रकमेची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.८८ टक्के कमी दराने दाखल केलेली आहे.

तरी सदरील काम बाबुराव केरबा अदमाने, सेवानिवृत्त अभियंता कंत्राटदार यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.८८ टक्के कमी दराने म्हणजेच रु.८,८७,५८,६८१/- एवढ्या रकमेचे काम करुन घेणेस व करार करणेस मा. स्थायी समितीची मान्यता घेणेसाठी सादर.

**ठराव क्रमांक 400/२०२२:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, घनकचरा संकलन व वाहतुक या करिता ट्रान्सफर स्टेशन उभारणे या कामासाठी बाबुराव केरबा अदमाने, सेवानिवृत्त अभियंता कंत्राटदार यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.८८ टक्के कमी दराने म्हणजेच रु.८,८७,५८,६८१/- एवढ्या रकमेचे काम करुन घेणेस व करार करणेस मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 401/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.26.05.2022)**

प्रशासकीय मान्यतेनुसार प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.दशरथ गंगाराम कुलकर्णी, सफाई मजुर, झोन क्र.5, महानगरपालिका औरंगाबाद यांनी स्वतःच्या Coronary Angiography (हृदयाच्या आजार) आजारपणावर उपचारासाठी खाजगी रुग्णालय सेठ नंदलाल धुत हॉस्पीटल, जालनारोड औरंगाबाद येथे र.रु.2,38,424/- इतका खर्च केला आहे.

अर्जदाराने आवश्यक विहित नमुन्यात माहितीसह सर्व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली असून Coronary Angiography या आजारावर उपचारार्थ एकुण केलेला खर्च र.रु.2,38,424/- इतका झाला असून त्यापैकी अनुज्ञेय नसलेली र.रु.9,277/- वजा जाता रु.2,29,147/- शिल्लक राहते. शिल्लक रक्कमेच्या 90% रु.2,06,232/- इतकी होते. एकुण खर्चाचा 5% र.रु.11,921/- ही मनपा फंडात जमा करुन तसेच एकुण निव्वळ देय र.रु.1,94,311/- मधुन अग्रीम र.रु.1,50,000/- वजा जाता र.रु.44,311/- संबंधीतास अदा करावयाची आहे.

संबंधीताने सेठ नंदलाल धुत हॉस्पीटल, जालनारोड, औरंगाबाद येथे उपचार घेतलेले आहे. महाराष्ट्र शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र.वैखप-2011/प्र.क्र.33/11/राकावि-2, मंत्रालय मुंबई -32 दि.16.11.2011 नुसार परिशिष्ठ-अ शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटूंबीयांनी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या Coronary Angiography या आजारावर केलेल्या विशिष्ट खर्चावरील शासकीय रुग्णालया प्रमाणे प्रतिपुर्ती अनुज्ञेयतेसाठी शासन मान्यता दिलेली आहे. खाजगी रुग्णालयाची अद्यावत यादी दि.16.11.2011 पर्यंत मधील प्रसिध्द यादीमध्ये सदर रुग्णालयाचे नाव नमुद आहे. सदरच्या प्रस्तावास पडताळणी करुन वैद्यकीय प्रतिपुर्तीसाठी मा.वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्यांनी शिफारस केलेली आहे.

करीता, श्री.दशरथ गंगाराम कुलकर्णी, सफाई मजुर, झोन क्र.5, महानगरपालिका औरंगाबाद यांना प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली रु.44,311/- संबंधीताच्या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सविनय सादर.

**ठराव क्रमांक 401/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.दशरथ गंगाराम कुलकर्णी, सफाई मजुर, झोन क्र.5, महानगरपालिका औरंगाबाद यांनी स्वतःच्या Coronary Angiography (हृदयाच्या आजार) या आजारपणावर खाजगी रुग्णालय सेठ नंदलाल धुत हॉस्पीटल, जालना रोड, औरंगाबाद येथे उपचार घेतलेले आहे. नियमाप्रमाणे एकुण

रु.44,311/- खर्च अनुज्ञेय करण्यात आलेला आहे. सदर रक्कम संबंधीतास अदा करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 402/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.26.05.2022)**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद मा.स्थायी समितीसमोर प्रस्ताव सादर करीत आहेत की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 243 (अ) मधील तरतुदीनुसार वाहने उभे करून ठेवण्याच्या किंवा थांबविण्याच्या जागा किंवा ठिकाणे व त्या संबंधातील फी किंवा शुल्क आकारणी करणे बाबत तरतुद आहे. त्यानुषंगाने मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.13/2020 अन्वये रस्त्यांवर पार्किंगचे क्षेत्र निश्चित करणे, दुचाकी, तीन चाकी, चार चाकी, खाजगी व व्यावसायीक वाहनांकरीता जागेच्या किंवा ठिकाणाच्या केलेल्या वापराकरीता आणि वापरण्यात येणाऱ्या कालावधीकरीता शुल्क आकारणी करण्याचे धोरण निश्चित करण्यात आले असून मान्यता प्राप्त आहे. तसेच महानगरपालिकेकडे पुरेसे मनुष्यबळ नसल्यामुळे सदर कामाकरीता खाजगी एजन्सीची नियुक्ती करण्याच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्यास देखील मान्यता प्राप्त आहे.

शहरातील नागरीकांना रस्त्यावरील पार्किंग करीता योग्य पध्दतीने आखणी करणे, फलक लावून नागरीकांची वाहने शिस्तीत उभी करणे (पार्क) आणि या करीता पार्किंग शुल्क आकारणी करणे आवश्यक आहे. या सर्व कामासाठी कर्बलेट पार्किंग सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमीटेड (Kerblet Parking Services Pvt.Ltd.) एजन्सीसोबत 24 महिन्यांकरीता द्विपक्षीय सामंजस्य करार (MOU) करण्याचे प्रस्तावीत करण्यात येत आहे.

सदरील प्रकल्प प्रायोगीक तत्वावर विविध ठिकाणी करण्यात येत असून नागरीकांना याचा आर्थिक बोजा पडू नये आणि चांगली सोय निर्माण व्हावी या दृष्टिने मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.13/2020 मध्ये नमुद केलेल्या दरांपेक्षा किमान दर आकारणी करण्याचे प्रस्तावीत करण्यात येत आहे.

संबंधीत एजन्सी Information and Communications Technology (ICT) आधारित पार्किंग सोल्युशन्स प्रदान करत आहेत. एजन्सी महानगरपालिकेस Web Application व Mobile Application देणार आहे व हे Applicatio औरंगाबाद महानगरपलिकेच्या E Governance च्या स्मार्ट नागरीक ॲपला लिंक करुन देणार आहे. तसेच पार्किंगच्या ठिकाणी संबंधीत एजन्सीने पार्किंग झोन, फ्री पार्किंग झोन, नो पार्किंग झोन, इ.चे फलके (Sign Board) तयार करणे, देखभाल दुरुस्ती करणे, आवश्यक मनुष्यबळ लावून पार्किंगचे व्यवस्थापन करणे करीता होणारा भांडवली खर्च आणि तंत्रज्ञानाच्या खर्चाकरीता निर्धारित होणाऱ्या पार्किंगच्या ठिकाणांकरीता किमान तासांचे शुल्क विचारात घेऊन प्राप्त होणाऱ्या महसुल मधून महानगरपालिकेस 70 टक्के हिस्सा देणे आणि उर्वरित 30 टक्के हिस्सा एजन्सीकडे राहील या अटीवर आणि द्विपक्षीय सामंजस्य करार (MOU) मध्ये नमुद अटी/शर्तीच्या अधिन राहून कर्बलेट पार्किंग सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमीटेड (Kerblet Parking Services Pvt.Ltd.) सोबत द्विपक्षीय सामंजस्य करार (MOU) करणेच्या प्रस्ताव मान्यतेस्तव सविनय सादर.

**<u>ठराव क्रमांक 402/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पार्किंगच्या ठिकाणी संबंधीत एजन्सीने पार्किंग झोन, फ्री पार्किंग झोन, नो पार्किंग झोन, इ.चे फलक (Sign Board) तयार करणे, देखभाल दुरुस्ती करणे, आवश्यक मनुष्यबळ लावून पार्किंगचे व्यस्थापन करणे या करीता होणारा भांडवली खर्च आणि तंत्रज्ञानाच्या खर्चाकरीता निर्धारित होणाऱ्या पार्किंगच्या ठिकाणांकरीता किमान तासाचे शुल्क विचारात घेऊन प्राप्त होणाऱ्या महसुल मधून महानगरपालिकेस 70 टक्के हिस्सा देणे आणि उर्वरित 30 टक्के हिस्सा एजन्सीकडे राहील या अटीवर आणि द्विपक्षीय सामंजस्य करार (MOU) मध्ये नमुद अटी/शर्तीच्या अधिन राहून कर्बलेट पार्किंग सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमीटेड (Kerblet Parking Services Pvt.Ltd.) सोबत द्विपक्षीय सामंजस्य करार (MOU) करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 403/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.27.05.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, टि.व्ही.सेंटर एन-१० सिडको येथील खेळाचे मैदानासाठी राखीव भुखंड (P.G.-३) खेळाच्या मैदानासाठी आरक्षित असून, औरंगाबाद महानगरपालिकेच्या विनंतीनुसार या भुखंडावर महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ अन्वये विकास कामे करण्यासाठी सिडको कार्यालयाने त्यांचे कार्यालयीन पत्र No./CIDCO/SP(NT)/AUR/२४ Date:१२.०१.२०२२ ना-हरकत कळविली आहे. सदरचा भुखंड हा उत्तर दक्षिण रस्त्यावर २४ मि. रूंद विकास योजना रस्त्यालगत स्थित असून त्याचे क्षेत्रफळ २२५४५ चौ.मी.एवढे आहे. या भुखंडावर प्रस्तावित कामाचे नियोजन पुर्वी खेळाचे मैदान (P.G.-४) साठी राखीव असलेल्या भुखंडावर उत्तर व पुर्व बाजुने ५० दुकाने बांधुन औरंगाबाद महानगरपालिकेने स्टेडियमचा विकास केला आहे. याच धर्तीवर (P.G.-३) खेळाच्या मैदानासाठी राखीव असलेल्या भुखंडावर ३० मोठ्या

आकारमानाची व उंचीची व २८ लहान आकाराची दुकाने बांधण्याचे नियोजन केले आहे. यासाठी नियुक्त वास्तुविशारद श्री.महेश कुलकर्णी यांनी विस्तृत नकाशे व बाब निहाय अंदाजपत्रके सा.बां.दरसुची सन २०२१-२२ नुसार सादर केली आहेत.

आत्ता नव्याने जो विकास (P.G.-३) या भुखंडाचा करावयाचा आहे. त्यास फेज-३ असे संबोधन करण्यात आले असून, यापुर्वी (P.G.-४) या भुखंडावर करण्यात आलेला विकास फेज-२ या नावाने संबोधन करण्यात आलेले आहे. सद्यस्थितीत (P.G.-४) या भुखंडाच्या उत्तर व पुर्व बाजुचा विकास करण्यात आलेला असून, आता नव्याने याच भुखंडाच्या दक्षिण व पश्चिम बाजुला करावयाची शिल्लक असलेली कामे करण्याचे प्रस्तावित आहे. संबंधीत नियुक्त वास्तुविशारद यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकापैकी प्रथम प्राधान्य खालील नमुद कामे भुखंड आरक्षणनिहाय हाती घेण्याचे नियोजन आहे.

| भुखंडाचे नाव : पी.जी.-४<br>भुखंड क्षेत्र : १६२४० चौ.मी.<br>बांधकाम क्षेत्र : १६३२.३७ चौ.मी. | | | भुखंडाचे नाव : पी.जी.-३<br>भुखंड क्षेत्र : २२५४५ चौ.मी.<br>बांधकाम क्षेत्र : १५१५.०० चौ.मी. | | |
|---|---|---|---|---|---|
| **अ. क्र.** | **संक्षिप्त तपशिल** | **अं.प. रक्कम रू.** | **अ. क्र.** | **संक्षिप्त तपशिल** | **अं.प. रक्कम रू.** |
| १. | कुंपन भिंत बांधणे | २५,७१,१३६ | १. | कुंपन भिंत बांधणे | ४२,०४,१३६ |
| २. | फुड प्लाझा बांधणे | १९,९८,९७५ | २. | दुकाने बांधणे | ८,१८,००,९०३ |
| ३. | जलनि:स्सारण वाहीनी टाकणे | ५,४२,०९२ | ३. | स्ट्रॉर्म वॉटर ड्रेन बांधणे | २६,५०,३३३ |
| ४. | स्टॉर्म वॉटर ड्रेन बांधणे | २६,५०,४०९ | ४. | समोरी सामासिक अंतरात पेव्हर ब्लॉक बसविणे | ५२,०७,२५१ |
| ५. | टेनिस कोर्ट तयार करणे | ३७,४२,०८५ | ५. | चेनलिंक फेन्सिग करणे | ३,४२,९७२ |
| ६. | बास्केट बॉल मैदान विकसित करणे | २६,६४,१११ | | | |
| ७. | समोरील सामासिक अंतरात पेव्हर ब्लॉक बसविणे | ४३,४३,३४६ | | | |
| ८. | बहुमजली वाहनतळ बांधणे | ३,१५,९०,३४३ | | | |
| एकुण रक्कम | | ४,९९,०२,४९२/- | एकुण रू. | | ९,४२,०५,५९४/- |

अशा प्रकारे एकत्रित अंदाजपत्रकीय रक्कम रू.१४,४१,०८,०८७/- इतकी होत आहे.

याशिवाय पुर्वी बांधण्यात आलेले फेज-१ अंतर्गत ५० दुकानांच्या खाली जोत्या मधील (Plinth Level Difference) फरकाचा लाभ मिळुन आल्याने उत्तर बाजूने या ठिकाणी तळघर स्वरूपात दोन मोठ्या क्षेत्रफळाचे हॉल अटॅच स्वच्छतागृहासह, तसेच एक स्टोअर रूम, एक कार्यालयासाठीची खोली, जिमसाठी उपयोगात येऊ शकणारा हॉल, पंप रूम व पाण्याचा हौद ईत्यादी आदी बांधकाम शक्य झाले आहे. या हॉल व खोल्यांचा उपयोग भविष्यात क्रिडा स्पर्धाच्यावेळी खेळाडूंना थांबण्यासाठी, इतर संलग्न कामांसाठी व इतर वेळी कार्यालयाच्या उपयोगासाठी करता येऊ शकेल.

सदर संकुलात फेज-३ अंतर्गत जे ५८ गाळे तयार होणार आहेत. त्याचे वितरण हे, पुर्वीच्या फेज-१ अंतर्गत बांधण्यात आलेल्या व जाहीर लिलावा आधारे ३० वर्षाच्या दिर्घ मुदतीच्या कालावधीसाठी १२० दिवसांमध्ये यशस्वी उच्चतम बोली रक्कमेचा भरणा करून केवळ भाडेतत्वावर कराराआधारे करण्यात आले आहे./येत आहे. याच आधारावर आत्ताची ५८ गाळयांचे वितरण करण्याचे नियोजन योजिले असून, यामध्ये जाहीर लिलावा ऐवजी महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत निविदा संकेतस्थळावर ई-निविदा काढून करण्यात येणार आहे. जे स्वारस्यधारक यामध्ये यशस्वी ठरतील त्यांना उक्त रक्कमे व्यतिरिक्त कार्यालय ठरवील त्या दराने चौ.मी.प्रति माह स्वरूपाने भाड्याची रक्कम अदा करणे, सदरचा परिसरात स्वच्छता राखणेसाठी साफसफाई कर म्हणून रू.५/- प्रति माह प्रति चौ.मी. कर भरणा करणे, दुकाने/गाळयाच्या आतील भागात गाळेधारकाने स्व-खर्चाने महावितरण कार्यालयाकडून औरंगाबाद महानगरपालिकेने दिलेल्या ना-हरकत प्रमाणपत्राच्या आधारे विज पुरवठा घेणे व अंतर्गत भागात विद्युत फिटिंग करून घेणे, गाळयाची बोली रक्कमेचा संपुर्ण भरणा केल्यानंतर गाळेधारकाने स्वखर्चाने आवश्यक मुद्रांक शुल्क अदा करून नोंदणीकृत दस्तऐवज करून घेणे बंधनकारक राहणार आहे.

या संकुलातील दुकाने/गाळे ३० वर्षाच्या दिर्घ मुदतीवर भाडेतत्वावर देणेसाठी ई-निविदा माहिती पुस्तिका तयार करणे, त्यासाठी रू.६००/- चे शुल्क ऑनलाईन ई-पेमेंट गेटवे व्दारे व सदर ई-लिलावामध्ये भाग घ्यावयाचा झाल्यास त्यासाठी रू.५०००/- ई-पेमेंट गेटवे व्दारे अदा करून आवश्यक असलेला फॉर्मचा नमुना प्राप्त/डाऊनलोड करून घ्यावयाचा आहे. या व्यतिरिक्त ज्यांना या स्पर्धेत/ई-निविदेत भाग घेण्यास स्वारस्य आहे. त्यांना खुल्या वर्गासाठी रू.१,००,०००/- व राखीव/मागावर्गीय संवर्गासाठी रू.५०,०००/- अनामत रक्कम स्वरूपाने स्वत:च्या बँक खात्यातून ऑनलाईन पध्दतीने भरणा करावयाचा आहे. जे स्पर्धक सर्वोच्च बोलीच्या आधारे तथापी कार्यालयाने ठरवून दिलेल्या आधारभूत किंमतीपेक्षा अधिकची बोली नमूद करतील

त्यांची निवड केली जाणार आहे. या ई-निविदासाठीच्या अटी व शर्तीचा समावेश तयार करण्यात येत असलेल्या माहिती पुस्तिकेत केला जाणार आहे.

उक्त परिच्छेदात नमुद नुसार या ठिकाणी दोन्ही आरक्षित भुखंडाच्या मध्यभागी जी टेकडी वजा खोदकाम करावयाचे आहे व त्यातील निघणारा मलबा याची योग्य विल्हेवाट लावणे आवश्यक आहे. यासाठी जाहीर ई-लिलाव पध्दतीने व गौण खनिज विभागाची परवानगी घेऊन लिलाव करणे योग्य होईल, या कामासाठीचे अंदाजपत्रक रू.२,७१,८६,०८९/- चा होत आहे.

उक्त नमुद प्रमाणे या संकुलात आता नव्याने निर्माण होणार असलेल्या ५८ दुकानांची बोली रक्कम यशस्वी गाळेधारकाकडून ४ हप्त्यात व १२० दिवसांमध्ये भरणा करून घ्यावयाचे आहे. ती रक्कम यापुर्वी फेज-१ साठी जे खाते HDFC Bank निराला बाजार औरंगाबाद येथे उघडण्यात आले आहे, त्याच बँक खात्यात जमा करणे व या रकमेतून संकुलाच्या/प्रस्तावित कामाच्या बांधकामाचा खर्च भागविण्यात येणार असल्याने, एका अर्थाने सदर प्रकल्प स्वअर्जीत धर्तीवर करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

या संकुलात ५८ गाळे तयार झाल्यानंतर व यशस्वी गाळेधारकांनी संपुर्ण रक्कमेचा भरणा केल्यानंतर गाळयाचा प्रत्यक्षात ताबा देऊन ताबा पावती तयार करणे, आगामी एक वर्षाचे भाड्याची रक्कम भरणा करून घेणे, नोंदणीकृत दस्ताऐवज करून ३० वर्षाचा दिर्घ मुदतीचा भाडेत्त्वावर करार करणे मल्टी लेव्हल पार्किग बाबत शहर अभियंता यांच्या सल्ल्याने आवश्यक कार्यवाही करणे व ई-निविदेची कार्यवाही करणे या बाबीसाठी मालमत्ता अधिकारी औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद यांनी कार्यवाही करावी असे प्रस्तावित करण्यात येते. तथापी यासाठी त्यांनी शासन नियमानुसार आरक्षणाची तरतुद करणे आवश्यक राहील.

करिता या फेज-२ आणि फेज-३ च्या अनुषंगाने दुकाने/गाळे/कार्यालये, बहुमजली वाहनतळ, फेज-१ च्या दुकानाखाली असलेले हॉल व खोल्या संबंधाने शहर अभियंता विभागाचा अभिप्राय घेऊन कार्यवाही करणे चे प्रस्तावित करण्यात येत आहे. या संकुलाच्या अनुषंगाने संबंधीत विभागाने कार्यवाही करावयाची असून त्याचा संक्षिप्त तपशिल खालील नमुद प्रमाणे कार्यवाही करावी.

**(अ) कार्यकारी अभियंता (इमारत व उद्यान) :**

१. फेज-२ अंतर्गत कुंपन भिंत बांधणे, फुड प्लाझा उभारणे, जलनि:स्सारण वाहिनी टाकणे, स्टॉर्म वॉटर ड्रेन तयार करणे, टेनिस कोर्ट उभारणे, बास्केट बॉल मैदान विकसित करणे व समोरील सामासिक अंतरात पेव्हर ब्लॉक बसविणे, व मल्टी लेव्हल पार्किग चे आर.सी. मध्ये बांधकाम करणे.
२. फेज-३ अंतर्गत ५८ दुकाने बांधणे, स्टॉर्म वॉटर ड्रेन तयार करणे, समोरील सामासिक अंतरात पेव्हर ब्लॉक बसविणे, चेनलिंक फेन्सिंग उभारणे.
३. पी.जी.-३ आणि पी.जी.-४ या आरक्षित भुखंडाच्या मधील टेकडीचे खोदकाम करणे, खोदकामातून निघालेल्या साहित्याची वाहतूक करणे व विल्हेवाट लावणे यासाठी स्वारस्य प्रस्ताव (Expression of Interest) मागविणे व काम पुर्ण करून घेणे, ही कामे सोपविण्याचे प्रस्तावित करण्यात येते.
४. या ठिकाणी करावयाच्या कामांसाठी ई-निविदा प्रसिध्द करणे, शासन निर्णयानुसार योग्य कंत्राटदाराची निवड करणे व कंत्राटदाराची निवड झाल्यानंतर त्यांचे समवेत करारनामा करून कार्यादेश जारी करणे.
५. कामाची अंदाजपत्रकीय रक्कम ही रू.१ कोटी पेक्षा अधिकची असल्याने, या कामासाठी शासकिय अभियांत्रिकी महाविद्यालय औरंगाबाद यांची थर्ड पार्टी टेक्निकल इन्सपेक्शन व ऑडीटसाठी शासन निर्णयात नमुद प्रमाणे योग्य टक्केवारीवर नियुक्ती करणे.

**(ब) मालमत्ता विभाग :**

१. कार्यकारी अभियंता (इमारत व उद्यान) विभागाशी समन्वय ठेवून या संकुलात नव्याने तयार होत असलेल्या ५८ गाळयांचा ई-लिलाव (e-auction) करणे, यासाठीची माहिती पुस्तिका तयार करून घेणे, व ती प्रसिध्द करणे, यासाठी ची छोटी जाहिरात स्थानिक सर्वाधिक खपाच्या मराठी, हिंदी व इंग्रजी दैनिक वर्तमानपत्रात देणे.
२. यशस्वी गाळेधारकांना संपुर्ण रक्कमेचा भरणा केल्यानंतर प्रत्यक्ष भौतिक ताबा देणे, तत्पुर्वी आगामी एक वर्षाचे ठरविण्यात आलेल्या भाड्याची रक्कम भरणा करून घेणे, तसेच नोंदणीकृत दस्ताऐवजाआधारे संबंधीत गाळेधारकासमवेत नोंदणीकृत भाडेपट्टा करणे.
३. या संकुलातील गाळे व्यतिरिक्त बांधण्यात येत असलेली उपांगे ज्यामध्ये फुड प्लाझा, मल्टि लेवल पार्किग, हॉल व इतर उपांगे यासाठी ई-लिलावाची पध्दत अवलंबून तथापी. मा.शहर अभियंता यांची अनुमती घेऊन कार्यवाही करणे.
४. आर.सी.सी.मध्ये बांधण्यात येणार असलेल्या मल्टी लेव्हल पार्किगचे संचलन व व्यवस्थापन करणेच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही शहर अभियंता यांच्या सल्ल्याने करणे.
५. या संपुर्ण संकुलाच्या देखभाली साठी आवश्यक संख्येमध्ये सुरक्षारक्षकाची तीन पाळीमध्ये (२४x७) नेमणुक करणे.

**(क) लेखा विभाग :**

१. लेखा विभागाने या संकुलातील गाळे व दुकाने ई-लिलावाव्दारे भाडे तत्त्वावर देणेसाठी व स्वारस्य कर्त्यांना या लिलावात भाग घेणेसाठी ई-निविदा विभागामार्फत Enrollment करून योग्य शुल्काचा भरणा करून घेऊन निविदा भरणे कामी ई-टोकन उपलब्ध करून देणे.

२. फेज-३ मधील ५८ गाळयांची रक्कम कार्यालयाने निश्चित केलेल्या १२० दिवसाच्या कालावधीमध्ये HDFC Bank निराला बाजार, औरंगाबाद येथील पुर्वीच्या फेज-१ च्या वेळी जे बँक खाते उघडण्यात आले आहे त्या खात्यात रक्कम जमा करून घेण्यासाठी योग्य ती कार्यवाही करणे.
या बँक खात्याची दैनिक स्वरूपात ई-स्टेटमेंट प्राप्त करणेसाठी कार्यालयाचा व या विभागाचा ई-मेल आयडी uidssmt.amc@gmail.com संबंधीत बँक खात्याला संलग्न करणे, जेणेकरून या खात्यात होत असलेल्या दैनंदिन नोंदीची विभागास माहिती होऊ शकेल.

३. संबंधीत बँक खात्यातून फेज-२ व फेज-३ अंतर्गत करण्यात येणार असलेल्या कामाच्या खर्चाची देयक स्वरूपात अदायगी रितसर निवड झालेल्या कंत्राटदारास कार्यकारी अभियंता, (इमारत व उद्यान) व शहर अभियंता यांच्या समन्वयाने, अभिप्रायाने मा.प्रशासक यांच्या मंजुरीने करणे.

करिता वर नमुद प्रमाणे सादर प्रस्तावास आणि अंदाजपत्रकीय रक्कम रू.१४,४१,०८,०८७/- यास मंजुरी देणेबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्रमांक 403/2022:-**

प्रस्तावात नमुद केल्यानुसार फेज-२ व फेज-३ अंतर्गत नमुद केलेली कामे स्वअर्जीत निधीतून करणेस, मल्टि लेवल पार्किगसाठी स्वतंत्र ई-निविदा कार्यवाही करणे, तयार होणारे दुकाने/गाळे ३० वर्षाच्या कालावधीसाठी एक रकमी बोली रक्कम (ना-परतावा स्वरूपाची) स्विकारून उच्चतम बोली आधारे भाडे तत्त्वार देणे ईत्यादी कार्यवाही कार्यकारी अभियंता (इमारत व उद्यान), लेखा विभाग व मालमत्ता विभागाने समन्वयाने करणे, वेळोवेळी प्रकल्पात गरज भासल्यास आवश्यक ते बदल करण्याचे अधिकार आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांना प्रदान करणे सह एकुण अं.प.रक्कम रू.१४,४१,०८,०८७/- यास मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 404/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.31.05.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरातील विविध मुख्य रस्त्यांवर आणि मुख्य चौकात ओव्हरहेड कॅन्टीलिव्हर गॅन्ट्री साइनबोर्ड उभारण्याचे कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाचे राज्य दरसुची सन २०२१-२२ नुसार र.रु.७२,७१,२९५/- चे तयार करण्यात आले आहे. यास तांत्रिक मान्यता प्राप्त आहे. औरंगाबाद शहर हे पर्यटन, औद्योगिक, शैक्षणिक दृष्टया महत्वाचे शहर असून सदर ओव्हरहेड कॅन्टीलिव्हर गॅन्ट्री साइनबोर्ड उभारणीचे काम झाल्यानंतर शहरात येणाऱ्या पर्यटकांना, अभ्यागतांना आणि स्थानिक नागरिकांना याचा लाभ होणार असून शहराच्या सौंदर्यीकरणात भर पडणार आहे.

सदर कामाकरीता महानगरपालिकेच्या सन २०२२-२०२३ च्या वित्तीय वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये स्ट्रीट फर्निचर या लेखाशिर्ष अंतर्गत र.रु.७५.०० लक्षची तरतूद उपलब्ध आहे.

करीता, उक्तनमूद प्रमाणे औरंगाबाद शहरातील विविध मुख्य रस्त्यांवर आणि मुख्य चौकात ओव्हरहेड कॅन्टीलिव्हर गॅन्ट्री साइनबोर्ड उभारणेच्या कामाचे अंदाजपत्रक र.रु.७२,७१,२९५/- यास मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर करण्यात आला आहे.

**ठराव क्रमांक 404/2022:-**

प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरातील विविध मुख्य रस्त्यांवर आणि मुख्य चौकात ओव्हरहेड कॅन्टीलिव्हर गॅन्ट्री साइनबोर्ड उभारण्याचे कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु.७२,७१,२९५/- चे सार्वजनिक बांधकाम विभागाचे राज्य दरसुची सन २०२१-२२ नुसार तयार करण्यात आले असून यास तांत्रिक मान्यता प्राप्त आहे. सदर ओव्हरहेड कॅन्टीलिव्हर गॅन्ट्री साइनबोर्ड उभारणीच्या कामामुळे शहरात येणा-या पर्यटकांना, अभ्यागतांना आणि स्थानिक नागरिकांना याचा लाभ होणार असून शहराच्या सौंदर्यीकरणात भर पडणार आहे.

करीता, उक्त नमूद प्रमाणे औरंगाबाद शहरातील विविध मुख्य रस्त्यांवर आणि मुख्य चौकात ओव्हरहेड कॅन्टीलिव्हर गॅन्ट्री साइनबोर्ड उभारण्याचे कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु.७२,७१,२९५/- यास प्रशासकीय मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 405/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि. 31.05.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की औरंगाबाद शहरातील मुख्य रस्ते अंतर्गत तसेच शहरातील इतर रस्ते अंतर्गत सतत पडणारे खड्डे Ready Mix Material चा वापर करून बुजविणे करीता रक्कम रु.२६,५८,२१०/- चे अंदाजपत्रकास मंजूर ठराव क्र.५२/२०२० दि.०३.११.२०२० नुसार मा.स्थायी समिती सभेची मान्यता प्राप्त आहे.

यानुसार SSR २०१९-२०२० च्या दरसुचीनुसार भाग-अ-Supply of Ready Mix Material बाबतचे अंदाजपत्रक रक्कम रु.२४,९९,०००/- व भाग-ब नुसार जास्त खोलीचे खड्डे भरणे करीता ४० मी.मी. जाडीची खडी Providing, Supplying & Spreading या बाबीचे अंदाजपत्रक रक्कम रु.१,५९,२१०/- असे एकूण रक्कम रु.२६,५८,२१०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. या अनुषंगाने या कामाची बी-१ स्वरुपाची निविदा दुस-या वेळेस मागविली असता मे.ब्लॅकगोल्ड ट्रेडर्स ॲण्ड डिस्ट्रीब्युटर्स प्रा.लि., पुणे व मे.क्वालिटी बिटुमन प्रा.लि., औरंगाबाद यांचे निविदा प्राप्त होते. यानुसार प्राप्त निविदास्पर्धकांनी सादर केलेल्या तांत्रिक कागदपत्रांची तपासणी केली असता निविदेतील अटी व शर्तीनुसार मे.ब्लॅकगोल्ड ट्रेडर्स ॲण्ड डिस्ट्रीब्युटर्स प्रा.लि., पुणे यांची निविदा, तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरली आहे. तद्नंतर या पात्र एकमेव निविदास्पर्धकाची वाणिज्यीक निविदा (Financial Bid) उघडली असता त्यांनी भरणा केलेल्या दराची तुलना केली असता हे दर, मंजूर निविदा रक्कमेच्या समतुल्य म्हणजेच रक्कम रु.२३,७३,४०१.७६ चे प्राप्त आहे.

यानुसार मे.ब्लॅकगोल्ड ट्रेडर्स ॲण्ड डिस्ट्रीब्युटर्स प्रा.लि., पुणे यांचेकडून निविदा दराने म्हणजेच रक्कम रु.२३,७३,४०१.७६ पर्यंत मंजूर शेडयुल-बी नुसार कामे करणे करीता करार करणेस मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

संदर्भ : Tender ID 2021_AMCA_692972_2 सन २०२१-२०२२

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | शासन अनुदान प्रकल्प विभाग (रस्ते) |
| २ | कामाचे स्वरुप | Ready Mix Material (Polymer Based Compound) व्दारे रस्त्यांचे पॅचवर्क/दुरुस्ती करणे बाबत. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय?<br>असल्यास किती रकमेचे?<br>मान्यतेचा ठराव? | होय, अंदाजपत्रक रक्कम रु.२६,५८,२१०/- यास ठराव क्र.५२/२०२० दि.०३/११/२०२० अन्वये मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेण्यात आली आहे. |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | रक्कम रु.२३,७३,४०१.७६ |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | • जिल्हास्तरावरील वर्तमानपत्रे मराठी-०१<br>• राज्यस्तरावरील वर्तमानपत्रे मराठी-०१, इंग्रजी-०१<br>• संकेतस्थळ - महा ई-टेंडर<br>• प्रसिध्दी दि.०४/०६/२०२१ |
**<u>प्रस्ताव क्रमांक 413/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.08.06.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, टि.व्ही.सेंटर रस्ता मंजनू हिल येथे श्री स्वामी विवेकानंद उद्यान येथे जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांचा पुर्णाकृती अश्वारूढ पुतळा बसविण्यात येणार असून या कामातंर्गत आर.सी.सी.मध्ये चबुतरा बांधणे, पुतळयाच्या विविक्षित परिसराचा विकास करणे अंतर्गत कुंपन भिंत बांधणे, पेव्हर ब्लॉक बसविणे, रंगकाम करणे, विश्रांतीसाठी बेचेंस बसविणे, सुरक्षा रक्षकासाठी खोलीची दुरूस्ती करणे, स्वच्छता गृहाची दुरूस्ती करणे व विधंन विहीर घेणे इत्यादी कामांसाठी सा.बां./परिसर अभियांत्रिकी दरसुची सन २०२१-२०२२ नुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, कामातंर्गत विद्युतीकरणासाठी, ५% किरकोळ

खर्चासाठी, १% मटेरियल चाचणी साठी, कामगार विमासाठी ०.५% व वस्तू व सेवा करासाठी १८% या तरतुदीसह एकुण अंदाजपत्रक रक्कम रू.१,४९,७४,३५०/- तयार करण्यात आले असून या कामासाठी मनपा अर्थसंकल्प २०२२-२३ अंतर्गत पुतळे खरेदी व संगोपन या लेखाशिर्षकाखाली या कामासाठी रक्कम रू.१.५० कोटी रक्कमेची आर्थिक तरतुद करण्यात आलेली आहे.

सदर कामासाठी महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाचा निर्णय दिनांक ०२ फेब्रुवारी २००५ नुसार पुतळा उभारण्याच्या कामासाठी परवानगीसाठी शासनाकडे परस्पर अर्ज सादर न करता सदरचा अर्ज मा.जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करून व समितीने सदर शासन निर्णयातील पुतळे उभारण्या संबंधीची सर्व मार्गदर्शक तत्वे तपासुन संपुर्ण कागदपत्रांसह परिपुर्ण प्रस्ताव शासनाकडे सादर करावा असे नमुद करण्यात आलेले आहे. तसेच शासन निर्णय दिनांक ०२ मे २०१७ नुसार पुतळा धोरण निश्चित करण्यात आले असून त्यामध्ये राष्ट्रपुरूष/थोर व्यक्ती यांचा पुतळा उभारण्यास परवानगी देण्यासाठीची मार्गदर्शक तत्त्वे विहित करण्यात आली आहेत. यातील अट क्र.२० नुसार पुतळा उभारण्यासाठी पारीत केलेले ठराव, ना-हरकत प्रमाणत्रे, एक वर्षापेक्षा अधिक जुनी असू नये अशी स्पष्टपणे तरतुद करण्यात आलेली आहे.

त्यामुळे यापुर्वी पारित करण्यात आलेला मा.सर्वसाधारण सभेचा ठराव विषय क्र. विषय क्र.३४८ दिनांक १८/०५/२०११ निरस्त ठरतो. त्यास्तव सदर ठिकाणी पुतळा उभारणेसाठी उक्त शासन निर्णयातील विहित मार्गदर्शक तत्त्वांचा अवलंब करून पुतळा उभारण्याच्या मंजुरीसाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करणे योग्य वाटते.

त्यास्तव या कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून यामध्ये जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांचा पुर्णाकृती अश्वारूढ पुतळा उभारणे, चबुतरा बांधणे व पुतळयाचा विविक्षित परिसर विकसित करणे इत्यादी बाबींची तरतुद करण्यात आलेली आहे.

तरी उक्त नमुद ठिकाणी पुतळा उभारणीच्या कामास व यासाठी तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक एकुण रक्कम रू. १,४९,७४,३५०/- यास मंजुरी देणे व या अनुषंगाने आवश्क ती सर्व कार्यवाही करणेसाठी आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांना प्राधिकृत करणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीसतव सादर.

**ठराव क्रमांक 413/2022:-**

प्रस्तावात नमुद केल्यानुसार, श्री स्वामी विवेकानंद उद्यान टि.व्ही.सेंटर मजनू हिल येथील उद्यानात जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांचा पुर्णाकृती अश्वारूढ पुतळा उभारण्यास, त्यासाठी चबुतरा बांधणे व इतर अनुषंगीक कामे करणे ईत्यादी कामाचा समावेश असलेले अंदाजपत्रकास व या कामाच्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व कार्यवाही करणेस मा.आयुक्त यांना प्राधिकृत करणेबाबतच्या प्रस्तावास मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 414/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.08.06.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सुखना नदी, खाम नदी व शहरात वाहणारे मुख्य नालामार्गे नादुरूस्त मुख्य जलनि:स्सारण वाहिनी काही ठिकाणी उघड्यावर वाहत आहे. याशिवाय शहरात विविध विकास कामे करीत असतांना अंतर्गत जलनि:स्सारण वाहिन्या या नाल्याच्या दिशेने टाकल्या जातात. त्यांची जोडणी मुख्य जलनि:स्सारण वाहिनीला करणे आवश्यक आहे. जेणेकरून नाला/नदी मार्गे उघड्यावर वाहणार नाही व नागरिकांचे आरोग्यास सुयोग्य वातावरण निर्माण होऊन नदी/नाला पात्रातील वाहणाऱ्या पाण्याचेप्रदुषण कमी होण्यास मदत होणार आहे.

या कारणास्तव १५ व्या वित्त आयोगाच्या प्राप्त निधीतून निविदा काढण्यात आली असून ई-निविदा अंतर्गत दोन निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्याची संक्षिप्त माहिती खालील नमुद प्रमाणे आहे.

१. Nasit Infrastructure - अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८.८६% अधिक दराने
२. Cube Infra Projects - अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०.१०% अधिक दराने

तुलनात्मक दृष्ट्या सर्वाधिक कमी दराची निविदा Nasit Infrastructure यांची असून ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा 8.86% अधिक दराची आहे. या अनुषंगाने त्यांना दर कमी करणे बाबत विचारणा केली असता त्यांनी निविदा भरलेल्या दरानेच काम देणे बाबत विनंती केलेली आहे.

करिता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची Nasit Infrastructure यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 8.86% अधिक या सर्वाधिक कमी दराची निविदा विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 414/2022:-</u>**

प्रस्तावात नमुद केल्यानुसार, सुखना नदी, खामनदी व शहरात वाहणारे मुख्य नाला मार्गे वाहत असलेल्या ड्रेनेजच्या क्रॉस कनेक्शन करणे या कामाच्या प्राप्त निविदेपैकी सर्वाधिक कमी दराची Nasit Infrastsructure यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 8.86% अधिक दराची निविदेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 415/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.08.06.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, देशामध्ये व राज्यामध्ये कोव्हिड-19 या विषाणुचा प्रादुर्भाव झाल्यामुळे Pandemic ची साथ संपुर्ण जग, देश व राज्यामध्ये पसरली असून कोव्हिड-19 हा साथरोग नियंत्रित करण्याची आवश्यकता आहे. औरंगाबाद शहरामधील कोव्हिड-19 विषाणु बाधित रुग्णांची सद्यस्थिती व त्या वरील उपाय योजना करण्यात येत आहे.

सन 2020-21 या आर्थिक वर्षात कोव्हिड-19 प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्याकरीता जिल्हा नियोजन समिती मधुन जा.क्र./जिनिस/जिवायो निवि/कोव्हिड-19/2020-21/450 दि.18.02.2021 या निधी वितरण आदेशामधील अखर्चित र.रु.322.50 लक्ष यामधून अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद यांना 07 नग, जिल्हा आरोग्य वैद्यकीय अधिकारी, जिल्हा परिषद औरंगाबाद यांना 40 नग तसेच जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय व ग्रामिण रुग्णालय यांना 15 नग व महानगरपालिका औरंगाबाद यांना 08 नग असे एकूण 70 नग Solar D.C.Chest Refrigerator 240 Liter खरेदी करण्याकरीता जिल्हाधिकारी, अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन औरंगाबाद यांनी जा.क्र.जिनिस/प्रमा-निवि/जिवायो/2021-22/922 दि.31.03.2022 प्रमाणे सुधारीत प्रशासकीय मान्यता दिलेली असून सदरील निधी लवकरात लवकर खर्च करून त्याचे उपयोगीता प्रमाणपत्र सादर करावयाचे आहे.

Solar D.C.Chest Refrigerator 240 Liter-70 नग खरेदी करण्याकरीता अंदाजीत र.रु.2,42,41,000/- (अक्षरी दोन कोटी बेचाळीस लक्ष एक्केचाळीस हजार फक्त) खर्च अपेक्षित असुन यासाठी GeM Portal वर निविदेद्वारे खरेदी प्रक्रिया राबविण्यास मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**<u>ठराव क्रमांक 415/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कोव्हिड-19 प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्याकरीता जा.क्र./जिनिस/ जिवायो-निवि/कोव्हिड-19/2020-21/450 दि.18.02.2021 या निधी वितरण आदेशामधील अखर्चित र.रु.322.50 लक्ष यामधून जिल्हाधिकारी अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन औरंगाबाद यांनी जा.क्र.जिनिस/ प्रमा-निवि/जिवायो/2021-22/922 दि.31.03.2022 प्रमाणे व प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे GeM Portal वर निविदेद्वारे खरेदी प्रक्रिया राबविण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 416/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.09.06.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिका मुख्यालयात विविध विकास कामांच्या अनुषंगाने आयुक्त वेळोवेळी बैठका घेत असतात. तथापी अशा स्वरूपाच्या बैठका घेणेसाठी स्वतंत्र सभागृह नसल्यानेसदर बैठकात सद्यस्थितीत आयुक्त यांच्या दालनात घेतल्या जातात. तथापी आयुक्त यांचे दालन अशा बैठकांच्या उपस्थितीसाठीकमी पडते.

त्यास्तव आयुक्त यांच्या कक्षालगत मोठ्या आकारमानाचा हॉल अधिकारी/कर्मचारी यांची बैठक घेण्यासाठी नसल्याने दुर अंतरावरील मनपाच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र याठिकाणी किंवा डॉ.अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र, मजनु हिल या ठिकाणी बैठका घ्याव्या लागतात. तथापी सदर ठिकाणी बैठकी साठी जाणे-येणे सर्व अधिकारी/कर्मचारी यांना गैरसोयीचे पडते शिवाय यामध्ये कार्यालयाचा अधिकचा वेळ खर्ची पडतो.

त्यास्तव या अनुषंगाने प्रशासकीय बैठका घेण्यासाठी इमारतीची पाहणीकेली असता असे आढळून आलेकी, आयुक्त यांच्या दालनालगत असलेल्या जागेत उपआयुक्त यांची दोन दालने व कर निर्धारक तथा

संकलक यांचे एक दालन यांची जागा एकत्रित केल्यास त्याठिकाणी प्रशासकीय बैठकीसाठी अद्यावत हॉल तयार होऊ शकतो.

त्यानुषंगाने उपलब्ध जागेचे मोजमाप घेऊन याठिकाणी प्रशासकीय बैठका घेण्यासाठी हॉलचे नियोजन करण्यात आले असून, याच जागेत अतिरिक्त आयुक्त यांचे करीताही दालनाचे नियोजन शक्य झाले आहे. या व्यतिरिक्त प्रशासकीय बैठकीच्या हॉल लगत आयुक्त/अधिकारी यांचे करीता प्रतिक्षाकक्ष, आयुक्त यांचे स्विय सहाय्यक विभागाकरीता स्वतंत्र नियोजन यात स्वच्छता गृहाच्या सुविधेसह करण्यात आले आहे.

या प्रस्तावित बैठक हॉलसाठीच्या कामातील स्थापत्य विषयक कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.३५,३५,०००/- तयार करण्यात येवून त्याची निविदा काढून सदरचे काम कंत्राटदार एस.एम.कंन्सट्रक्शन यांना वाटाघाटी अंती व मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेनुसार (प्रस्ताव क्र.२४५ दि.२३.१२.२०२१ अन्वये) सदरचे काम अं.प.दरापेक्षा १०% जास्त या दराने करण्यात मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

याच बैठक हॉलच्या अनुषंगाने उर्वरीत कामेकरणे बाबत मा.सर्वसाधारण सभागृहाचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन वास्तुविशारद श्री.मुकेश शर्मा ॲण्ड असोसिएट्स यांची नेमणूक करण्यात आलेली असल्याने व त्यांना या कामाच्या अनुषंगीक माहिती असल्याने त्यांचेकडून या बैठक हॉलसाठीचे इलेक्ट्रिकल, फर्निचर, अग्निशमन व्यवस्था, ॲकोस्टीक पॅनलिंग, एलईडी स्क्रिन व सि.सि.टि.व्ही. कॅमेरा या बाबींचे स्वतंत्र अंदाजपत्रक सा.बां.दरसुची सन २०२१-२२ नुसार व बाजार भावानुसार दरपत्रके मागवून तयारकरण्यात आले आहे. या शिल्लक कामाचे एकत्रित अंदाजपत्रक रू.१,०६,६४,८०३/- एवढे झाले असून त्यास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदर कामासाठीचा खर्च महानगरपालिका अर्थसंकल्प २०२२-२३ अंतर्गत भांडवली खर्च-अ-प्रशासकीय इमारत या लेखाशिर्षकातून उपलब्ध तरतुदी मधून करण्यात येणार आहे.

तरी प्रशासकीय बैठक हॉलच्या उर्वरीत कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.१,०६,६४,८०३/- यास मंजुरी प्रदानकरणे, या कामासाठी ई-निविदा प्रकाशित करणे व या कामासाठी काम करीत असलेले वास्तुविशारद श्री.मुकेश शर्मा ॲण्ड असोसिएट्स यांचेकडून सदरचे काम त्यांनी यापुर्वी मा.सर्वसाधारण सभागृहाच्या कामासाठी निविदा भरलेले व मान्य केलेल्या दराने म्हणेजेच एकुण अंदाजपत्रकीय रक्कमेच्या १.७६% या दराने त्यांच्या कामाचे सेवामुल्य कार्योत्तर स्वरूपाने अदा करणेच्या मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 416/2022:-</u>**

प्रस्तावात नमुद केल्यानुसार, प्रशासकीय बैठकीच्या हॉलचे उर्वरीत कामा मधील इलेक्ट्रिकल, फर्निचर, अग्निशमन व्यवस्था, ॲकोस्टीक पॅनलिंग, एल.ई.डी.स्क्रिन व सि.सि.टि.व्ही.कॅमेरा या बाबींचे एकुण अंदाजपत्रक र.रू.१,०६,६४,८०३/- यास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात येते, तसेच या कामासाठी काम करीत असलेले पुर्व नियुक्त वास्तुविशारद श्री.मुकेश शर्मा ॲण्ड असोसिएट्स हे मा.सर्वसाधारण सभेच्या सभागृहाचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार या भुमिकेतून काम करीत असल्याने व त्याच दराने म्हणजेच एकुण अंदाजपत्रकीय खर्चाच्या १.७६% अधिक लागु कर या दराने सेवामुल्य अदा करणे, या साठीचा त्यांचे समवेत करारनामा करणे या बाबीस कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 417/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.09.06.2022)**

आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 79 (क) नुसार महानगरपालिकेच्या मालमत्तेचा विनियोग करण्या संबंधी तरतुदी आहे. त्यानुसार सादर करण्यात येतो की, सन-1994 साली श्री.शेख खमर हे उपअभियंता (इमारती) या पदावर कार्यरत असतांना मोहल्ला ज्युब्ली पार्क येथील पाण्याची टाकी व महिला महाविद्यालय नवखंडा मधील महानगरपालिकेच्या जागेवर निवासस्थान बांधून त्यांना उपलब्ध करुन देणेसाठी तत्कालीन प्रशासकांनी परवानगी दिल्यानुसार 33x13.50 मी.उपलब्ध जागेवर कार्यालयीन कृतीचा नियमानुसार अवलंब करुन सदर निवासस्थान बांधण्यात आलेले आहे. कार्यालयीन आदेश दि.15.07.1994 अन्वये मालमत्ता विभागाने त्यांना रितसर ताबा दिलेला आहे. श्री.शेख खमर अब्दुल शकुर हे मागील 28 वर्षापासुन त्यांचे कुटूंबीयांसह सदर निवासस्थानात राहत आहेत. संबंधीतांच्या विनंतीनुसार तत्कालीन प्रशासकांच्या कार्यकाळात सदर मालमत्तेचा दिर्घकालीन भाडेपट्टा करार करण्याच्या निर्णय झालेला होता. त्यानुसार कार्यालयाच्या ना-हरकती प्रमाणे वीज पुरवठा व विद्युतीकरण, पाणी पुरवठा व ड्रेनेज व्यवस्था, फर्निचर व सुशोभिकरण तसेच इमारतीची व आवारातील शिल्लक व अतिरिक्त बांधकामासह सिलींग व कायम फर्निचर इ. कामे टप्प्याटप्प्याने त्यांनी

स्वखर्चाने पुर्ण केली आहेत. यासाठी त्यांना सुमारे 30 लक्ष खर्च लागला आहे. तसेच या खर्चा व्यतिरिक्त बांधकामावर रु.2,98,215/- महानगरपालिकेचा खर्च झालेला आहे. मा.तत्कालीन प्रशासकांच्या बैठकीत ठरल्यानुसार सन-1996 व त्यानंतर संबंधीतांनी वेळोवेळी विनंती अर्ज सादर केलेले आहे. परंतु भाडेपट्टा करारनामा झालेला नाही. या ठिकाणच्या 445 चौमी जागेपैकी 8.65 x 19.10 = 165 चौमी क्षेत्रावर दुमजली बांधकाम आहे. सदरील मालमत्तेचा दिर्घकालीन भाडेपट्टा करारनामा करण्यासाठी मनपाने केलेला खर्च रु.2,98,215/- अदा करण्यास संबधीत जरी तयार असले तरी आज रोजी अंमलात असलेले शासन निर्णय, मार्गदर्शक तत्व व प्रचलित धोरण विचारात घेता पुर्वीच्या प्रशासकांच्या कार्यकाळात झालेल्या निर्णयानुसार आता एकाच वेळी 99 वर्षाचा भाडेपट्टा करार करणे शक्य नाही.

सबब, संबंधीतानी वेळोवेळी सादर केलेल्या विनंती अर्जांचा सहानुभूतीपुर्वक विचार करता, महानगरपालिकेचा झालेला खर्च थकबाकी र.रु.2,98,215/- तसेच शीर्घगणक प्रमाणे नियमानुसार आकरण्यात आलेले वार्षिक भाडे र.रु.1,48,500/- या प्रमाणे तीन वर्षांचे आगाऊ भाडे रु.4,45,500/- अशी एकूण रु.7,43,715/- संबंधीताकडून प्रथम भरणा करुन घेण्यास तसेच आकारणी करण्यात आलेले वार्षिक भाडे र.रु.1,48,500/- यावर दर पाच वर्षांनी 10% वाढ करुन प्रत्येक आर्थिक वर्षाच्या सुरुवातीस संबंधीताकडून भाडे वसुली करण्याच्या अटीवर उपरोक्त नमुद मालमत्तेचा तीस वर्ष कालावधीचा भाडेपट्टा करारनामा करणेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 417/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेचा खर्च र.रु.2,98,215/- आणि तीन वर्षाचे आगाऊ भाडे र.रु.4,45,500/- अशी एकूण र.रु.7,43,715/- संबंधीताकडून प्रथम भरणा करुन घेतल्यानंतर तसेच दर पाच वर्षांनी 10% भाडेवाढीसह प्रस्तावातील नमुद मालमत्तेचा तीस वर्षे कालावधीचा भाडेपट्टा करारनामा करण्याच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 418/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.09.06.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, IIT, IIM, AIIMS सारख्या सर्वोच्च संस्थेमध्ये प्रवेशित किंवा प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना विशेष बाब म्हणुन मदत करण्यासाठी खालीलप्रमाणे धारेण ठरवून पुढील शिक्षणासाठी आर्थिक मदत करता येईल.

**<u>धोरण :-</u>**

1. अर्जदार दिव्यांग विद्यार्थी औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील रहिवासी असावा.
2. सदर विद्यार्थ्याचा प्रवेश संबंधीत IIT, IIM, AIIMS सारख्या संस्थांनी निश्चित केलेला असावा. अर्जदाराने राष्ट्रीय स्तरावरील भारत सरकार द्वारा, केंद्रीय एजन्सी द्वारा पात्रता परिक्षा देऊन संबंधीत संस्थेत प्रवेश घेतलेला असावा. NEET, JEE, AIIMS इ. Seat Allotment Letter मिळालेले असावे.
3. ज्या संस्थेत प्रवेश घेणार आहे त्या संस्थेच्या प्रमुखाने वर्षभरातील विविध खर्चाची माहिती Fees Structure प्रमाणित करुन दिलेले असावे. त्यानुसार संस्थेस देय असलेले Fees चा धनादेश संस्थेच्या नावे अदा करण्यात येईल.
4. अर्जदाराने संपुर्ण माहितीसह कागदपत्रासह अर्ज शिक्षण विभाग महानगरपालिका यांना सादर केलेला असावा.
5. अर्जदाराचे अर्ज व सर्व माहितीसह उत्पन्न रु.8 लाखापेक्षा कमी असावे.
6. अर्जदाराचे अर्ज व सर्व माहितीसह मदतीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभा किंवा मा.स्थायी समिति सभेसमोर ठेऊन संमत झाल्यानंतर कार्यवाही करण्यात येईल.
7. महाविद्यालयीन फीस/शैक्षणिक खर्चाचा धनादेश संस्थेच्या नावे देण्यात यावा. तथापि, अर्जदाराने भरलेल्या फीसच्या पावत्या/देयक मुळ प्रतीत सादर केल्यास संबंधीतांना अदा करण्यासत येतील.
8. वैयक्तिक खर्चासाठी जसे प्रवास खर्च, मासिक खर्च, जेवण, हॉटेल खर्च, स्टेशनरी साहित्य, पुस्तके यासाठी मा.सर्वसाधारण सभा/स्थायी समिती यांच्या निर्णयानुसार मासिक ठरावीक रक्कम संबंधीताच्या नावे देण्यात यावी.
9. संपुर्ण कोर्ससाठी लागणारे एकदाच आवश्यक असलेले साहित्य उदा.:लॅपटॉप, संगणक व इतर साहित्य आवश्यकता व दरपत्रके मागवून महानगरपालिकेने खरेदी करावीत.
10. अर्जदाराने अभ्यासक्रम अपुर्ण ठेवल्यास किंवा मध्येच सोडून दिल्यास मदत बंद करण्यात येईल. प्रत्येक शैक्षणिक वर्षाच्या निकाल व पुढील वर्षाचे Bonafide Certificate पाहून योजनेचा लाभ सुरु ठेवण्यात

येईल. तथापि, अभ्यासक्रमाच्या ठरविण्यात आलेला कालावधी इतर कोणत्याही परिस्थितीत योनजेची मुदत वाढविली जाणार नाही.

सदर योजनेचा वरील धारेणानुसार लाभ देण्याचे किंवा योजनेने बदल करण्याचे सर्व अधिकार मा.आयुक्त यांना राहतील.

वरील प्रमाणे IIT, IIM, AIIMS सारख्या सर्वोच्च संस्थेमध्ये प्रवेशित किंवा प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना विशेष बाब म्हणुन मदत करण्यासाठी धोरण मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेसाठी सादर.

**ठराव क्रमांक 418/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, भारतातील सर्वोच्च शैक्षणिक संस्था IIT, IIM, AIIMS सारख्या संस्थेमध्ये प्रवेशित किंवा प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना उपरोक्त अटी नुसार विशेष बाब म्हणुन मदत करण्यासाठी ठरावास मान्यता देण्यात येत आहे. सद्या प्रस्तावीत आकाश वसंत बोरकर IIT Madras येथे संगणक संगणक अभियांत्रिकी पदवीसाठी प्रवेशीत विद्यार्थ्यास त्याने सादर केल्याप्रमाणे र.रु.48,042/- अदा करणे व संबंधीताचा अभ्यासक्रम पुर्ण होईपर्यंत लागणाऱ्या शैक्षणिक खर्चाची देयके सादर केल्याप्रमाणे अदा करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 419/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.09.06.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे 53(1) अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करुन झोन क्र.7 अंतर्गतशासन अनुदानातील प्रकल्पाचे तांत्रिक कामे करणे या विवक्षित कामासाठी श्री.सय्यद मुर्तुझा कादरी, कनिष्ठ अभियंता (सेवानिवृत्त) यांना कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2021/820 दि.03.06.2021 च्या आदेशामध्ये नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहून 06 महिन्याच्या कालावधीकरीता करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आलेली होती.

तथापि, दि.03.06.2021 च्या आदेशाची मुदत दि.29.11.2021 रोजी संपल्याने तसेच उपअभियंता, झोन क्र.07 यांनी सद्यस्थितीत झोन क्र.07 विभागातील कामाचा व्याप बघता संबंधीतास पुढील 06 महिन्यां करीता मुदतवाढ देण्याबाबत कळविले आहे. त्यानुषंगाने ठराव क्र.242 दि.22.12.2021 नुसार त्यांना कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2021/1630 दि.22.12.2021 अन्वये दि.01.12.2021 पासून पुढील 06 महिन्यांच्या कालावधीसाठी करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आली होती.

तथापि, दि.22.12.2021 रोजीच्या आदेशाची मुदत दि.31.05.2022 रोजी संपत असल्याने तसेच उपअभियंता, झोन क्र.07 यांनी सद्यस्थितीत झोन क्र.07 विभागातील कामाचा व्याप बघता संबंधीतास पुढील 06 महिन्यांकरीता मुदतवाढ देण्याबाबत कळविले आहे.

करीता, श्री.सय्यद मुर्तूझा कादरी, कनिष्ठ अभियंता (सेवानिवृत्त) यांना झोन क्र.07 अंतर्गत शासन अनुदानातील प्रकल्पाचे तांत्रिक कामे कराणे या विवक्षित कामासाठी दि.03.06.2021 च्या आदेशातील अटी व शर्तीनुसार व 02 दिवसांचा तांत्रिक खंड देऊन दि.03.06.2022 पासून पुढील 06 महिन्यांच्या कालावधीसाठी करार पध्दतीने नियुक्ती देण्याबाबत प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 419/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे 53(1) अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करुन झोन क्र.7 अंतर्गतशासन अनुदानातील प्रकल्पाचे तांत्रिक कामे करणे या विवक्षित कामासाठी श्री.सय्यद मुर्तुझा कादरी, कनिष्ठ अभियंता (सेवानिवृत्त) यांना कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2021/820 दि.03.06.2021 च्या आदेशामध्ये नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहून 06 महिन्याच्या कालावधीकरीता करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आलेली होती.

तथापि, दि.03.06.2021 च्या आदेशाची मुदत दि.29.11.2021 रोजी संपल्याने तसेच उपअभियंता, झोन क्र.07 यांनी सद्यस्थितीत झोन क्र.07 विभागातील कामाचा व्याप बघता संबंधीतास पुढील 06 महिन्यां करीता मुदतवाढ देण्याबाबत कळविले आहे. त्यानुषंगाने ठराव क्र.242 दि.22.12.2021 नुसार त्यांना कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2021/1630 दि.22.12.2021 अन्वये दि.01.12.2021 पासून पुढील 06 महिन्यांच्या कालावधीसाठी करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आली होती.

तथापि, दि.22.12.2021 रोजीच्या आदेशाची मुदत दि.31.05.2022 रोजी संपत असल्याने तसेच उपअभियंता, झोन क्र.07 यांनी सद्यस्थितीत झोन क्र.07 विभागातील कामाचा व्याप बघता संबंधीतास पुढील 06 महिन्यांकरीता मुदतवाढ देण्याबाबत कळविले आहे.

करीता, श्री.सय्यद मुर्तूझा कादरी, कनिष्ठ अभियंता (सेवानिवृत्त) यांना झोन क्र.07 अंतर्गत शासन अनुदानातील प्रकल्पाचे तांत्रिक कामे कराणे या विवक्षित कामासाठी दि.03.06.2021 च्या आदेशातील अटी व

शर्तीनुसार व 02 दिवसांचा तांत्रिक खंड देऊन दि.03.06.2022 पासून पुढील 06 महिन्यांच्या कालावधीसाठी करार पध्दतीने नियुक्ती देण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 420/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.09.06.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहराच्या विकासासाठी औरंगाबाद महानगरपालिकेच्या झोन कार्यालयात नवीन प्रकल्प/कामे सुरु आहेत. सध्या कार्यरत तांत्रिक कर्मचाऱ्यांची संख्या अत्यंत कमी असून सदरील कामे पार पाडण्यासाठी उपलब्ध तांत्रिक कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त ताण निर्माण होत आहे.

सद्यस्थितीत झोन क्र.9 कार्यालय, कार्यक्षेत्रातील ड्रेनेज, रस्ते इ.काम सुरु असून सदर विभागात तांत्रिक कर्मचाऱ्यांची अत्यंत कमतरता आहे. तसेच सदर विभागात कार्यरत असलेले श्री.नाना झिपरु पाटील, शाखा अभियंता हे दि.31.04.2022 रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यांचा सदर विभागातील प्रत्यक्ष कामांचा अनुभव असल्याने त्यांच्या सेवेचा लाभ होऊ शकतो.

करीता झोन क्र.9 कार्यालय कार्यक्षेत्रातीलन ड्रेनेज, रस्ते इ.कामे करणे या विवक्षित कामाकरीता श्री.नाना झिपरु पाटील, शाखा अभियंता (सेवानिवृत्त) यांची नियुक्ती विहित अटी व शर्तीच्या अधीन राहून प्रथमत: 06 महिन्यांच्या कालावधी करीता करार पध्दतीने सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना दरमहा सेवानिवृत्तीपुर्वी मिळत असलेल्या एकूणा वेतनातून (मुळ वेतन व महागाई भत्ता धरुन) त्यांना आता मिळत असलेले एकूण निवृत्तीवेतन (महागाई भत्ता आणि अंशराशीकृत निवृत्तीवेतनासह) वजा केल्यानंतर होणारी रक्कम त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणुन निश्चित करण्यात येईल. परंतु या पारिश्रमिक रक्कमेची कमाल मासिक मर्यादा र.रु.40,000/- (रुपये चाळीस हजार फक्त) इतक्या मर्यादित राहील या अटीवर घेण्याबाबत प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 420/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन क्र.9 कार्यालय कार्यक्षेत्रातीलन ड्रेनेज, रस्ते इ.कामे करणे या विवक्षित कामाकरीता श्री.नाना झिपरु पाटील, शाखा अभियंता (सेवानिवृत्त) यांची नियुक्ती विहित अटी व शर्तीच्या अधीन राहून प्रथमत: 06 महिन्यांच्या कालावधी करीता करार पध्दतीने सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना दरमहा सेवानिवृत्तीपुर्वी मिळत असलेल्या एकूण वेतनातून (मुळ वेतन व महागाई भत्ता धरुन) त्यांना आता मिळत असलेले एकूण निवृत्तीवेतन (महागाई भत्ता आणि अंशराशीकृत निवृत्तीवेतनासह) वजा केल्यानंतर होणारी रक्कम त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणुन निश्चित करण्यात येईल. परंतु या पारिश्रमिक रक्कमेची कमाल मासिक मर्यादा र.रु.40,000/- (रुपये चाळीस हजार फक्त) इतक्या मर्यादित राहील या अटीवर घेण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 421/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.16.06.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, नाविन्यपुर्ण योजनेतुन शासकीय कला महाविद्यालय गेट (मीर आदिल दरवाजा) व त्यालगत किलेअर्क तटबंदीची दुरूस्ती व संवर्धन व एका बाजुला खुले व्यासपीठ (Open Stage) करणे बाबत प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव (जिल्हा नियोजन समिती), जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद यांच्याकडे पाठविण्यात आला होता. तथापी यापुर्वी महानगरपालिकेस शहरातील ऐतिहासिक दरवाजांची, तटबंदीची दुरूस्ती व संवर्धन केल्याचा अनुभव असल्याने सदर काम सार्वजनिक बांधकाम विभागाऐवजी महानगरपालिका यंत्रणेमार्फत प्रस्ताव सादर करणे बाबत निर्देश होते.

त्यानुषंगाने विषयांकीत कामाचा प्रस्ताव तयार करून मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव (जिल्हा नियोजन समिती), यांच्याकडे निधी प्राप्त होणेसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाची तांत्रिक मान्यता प्राप्त असलेले अंदाजपत्रक जिल्हा नियोजन समितीकडे पाठविण्यात आले असता त्यास मान्यता होवून रक्कम रू. २,२५,६९,७३१/- इतका निधी महानगरपालिकेस वितरीत करण्यात आलेला आहे.

त्यानुसार सदरील कामाचे अंदाजपत्रक र.रू.२,२५,६९,७३१/- चा प्रस्ताव व वास्तुविशारद/प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना एकुण प्रकल्प किमतीच्या २% व GST सह दराने शुल्क देणेबाबतच्या सुधारीत प्रस्तावास मा.सर्वसाधारण सभेने ठराव क्र.१७२/२०२१ दिनांक २६.०७.२०२१ अन्वये मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार स्थापत्य कामासाठी र.रु.१,५१,९८,४२८/- इतक्या रक्कमेची ई-निविदा विभागामार्फत निविदा मागविण्यात येवून मे. साईप्रेम कन्स्ट्रक्शन, लातुर यांना अंदाजपत्रकीय दराने करण्यास मा. स्थायी समितीचा ठराव क्र. ३०८/२०२२ दि. ०४.०३.२०२२ नुसार मंजुरी प्राप्त होवून संबंधीतास कार्यादेश देण्यात आलेला आहे. त्यानुसार स्थापत्य विषयक कामे प्रगतीपथावर आहे.

सदर तटबंदीची ब-याच वर्षापासून दुरुस्ती झालेली नसल्याने विविध ठिकाणी भिंत मोडकळीस आलेली असून त्याचे संपूर्ण प्लास्टर निघालेले होते. तसेच तटबंदीची दगडी कामामधील Mortar जवळपास ५० मीमी ते ६० मीमी आतपर्यंत निघालेले असल्याने त्याची दुरुस्ती करतांना तसेच भिंतीचा पृष्टभाग एक समान करण्यासाठी जास्त जाडीचे प्लास्टर करावे लागत आहे. अंदाजपत्रकामध्ये २ लेअर मध्ये 15mm thick Internal Plaster च्या बाबीचा समावेश असल्याने सदर बाबीसाठी अतिरिक्त बाब प्रस्तावित करणेबाबत संबंधीत कंत्राटदाराने पत्र देवून विनंती केली आहे.

त्यानुसार संबंधीत वास्तुविशारद मे. डी.पी. डिझाईन यांचे मार्फत अतिरिक्त बाबीचे अंदाजपत्रक मागविले असता त्याबाबींचा खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १. स्थापत्य कामासाठी अतिरिक्त बाबीसाठी खर्च | र.रु. | ६७,५४,६६३/- |
| २. विद्युतीकरणासाठी अतिरिक्त बाबीचा खर्च | र.रु. | १५,८६,२४५/- |
| | एकूण र.रु. | ८३,४०,९०८/- |

सदर अतिरिक्त बाबीची रक्कम ही मुळ निविदा रक्कमेच्या १०% पेक्षा जरी जास्त असली तरी मूळ निविदेतील काही बाबींच्या परिमाणामध्ये बचत होणार असल्याने होणारा खर्च हा मूळ मंजुर रक्कमेच्या आतच होणार आहे. तसेच सदर स्थापत्यविषयक अतिरिक्त बाबी या मूळ कामातील बाबीशी संलग्नीत असल्याने कामाचे मुळ कंत्राटदार मे. साईप्रेम कन्स्ट्रक्शन, लातुर यांचे मार्फत मूळ मंजुर निविदा दराने म्हणजेच अंदाजपत्रकीय दराने करुन घेणेबाबतचा अतिरिक्त बाबींचा प्रस्ताव तसेच विद्युत विषयक अतिरिक्त बाबीचे र.रु.१५,८६,२४५/- च्या कामाची स्वतंत्र निविदा कार्यवाही होवून काम करणेचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक 421/2022:-**

प्रस्तावात नमुद प्रमाणे नाविन्यपूर्ण योजने अंतर्गत किलेअर्क येथील मीर आदील दरवाजा व तटबंदीची दुरुस्ती व संवर्धन करणे या कामासाठीचे वास्तु विशारद मे.डी.पी.डिझाईन असो.औरंगाबाद यांचे मार्फत तयार करण्यात आलेल्या स्थापत्य कामासाठी अतिरिक्त बाबीच्या र.रु.६७,५४,६६३/- च्या अतिरिक्त बाबी मूळ निविदेच्या काही बाबीच्या होणाऱ्या बचतीमधून तसेच मूळ मंजूर रक्कमेच्या आतच होणार असल्याने प्रस्तावीत अतिरिक्त बाबीस मान्यता देण्यात येते तसेच सदर बाबी मूळ कामाची संलग्नीत असल्याने कामाचे मुळ कंत्राटदार मे. साईप्रेम कन्स्ट्रक्शन, लातुर यांचे मार्फत मूळ मंजुर निविदा दराने म्हणजेच अंदाजपत्रकीय दराने करुन घेणेबाबत अतिरिक्त बाबींच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. तसेच विद्युत विषयक अतिरिक्त बाबीचे र.रु.१५,८६,२४५/- च्या कामाची स्वतंत्र निविदा कार्यवाही होवून काम करणेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 421-1/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.16.06.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, नाविण्यपूर्ण योजनेतून किलेअर्क येथील मीर आदील दरवाजा व तटबंबदीची दुरुस्ती व संवर्धन करणे. (सिटी सेंटरची स्थापना) या कामासाठी मा. जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा नियोजन समिती यांचेकडून रक्कम रु. २,२५,६९,७३१/- इतका निधी प्राप्त असून निविदा कार्यवाही होवून सदर काम प्रगतीपथावर आहे.

सदर कामाची मा. जिल्हाधिकारी महोदय यांनी प्रत्यक्ष पाहणी केली असता सदर पाहणीमध्ये काम सुरु असलेल्या परिसरात असलेल्या अस्तित्वातील योगारूम साठी दगडी पायऱ्या, नव्याने स्थापन करत असलेल्या सिटी सेंटरमध्ये आसन व्यवस्थेसाठी दगडी पायऱ्या तसेच ध्वजारोहणासाठी दगडी चुबतरा व ध्वजस्तंभ उभारणेबाबत आदेशित केले आहे. त्यानुसार यापूर्वीच्या कामाचे वास्तुविशारद मे. डी.पी. डिझाईन यांचे मार्फत सदर कामासाठी लागणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०२०-२०२१ च्या एस.एस.आर.नुसार तसेच Non SSR दरानुसार तयार करण्यात आले असून त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

<u>प्रस्तावित कामाचा तपशिल</u>

१. पूर्वेकडील बाजुने व आत मध्ये अस्तित्वातील
   योगारुम साठी दगडी पाय-या बनविणे. र.रु.४०,२९,३८०/-

२. खुल्या जागेत ध्वज स्तंभासाठी

८.०० मी. X ८.०० मी.
आकाराचा दगडी चबुतरा तयार करणे. र.रु.३०,२९,९२५/-

**एकूण - ७०,५९,३०५/-**

सदर कामाच्या र.रु.७०,५९,३०५/- इतकेच्या अंदाजपत्रकास तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्राप्त असुन अंदाजपत्रक र.रु.७०,५९,३०५/- इतकेचा प्रस्ताव व वास्तुविशारद मे. डी.पी. डिझाईन, असो. औरंगाबाद यांना एकूण प्रकल्प किंमतीच्या २% + जीएसटीसह शुल्क अदा करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. त्यानुसार सदरील कामाचे अंदाजपत्रक र.रु.७०,५९,३०५/- चा प्रस्ताव व वास्तु विशारद/प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना एकूण प्रकल्प किंमतीच्या २% + जीएसटीसह शुल्क देणेबाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक 421-1/2022:-**

प्रस्तावात नमुद प्रमाणे नाविण्यपूर्ण योजने अंतर्गत किलेअर्क येथील मीर आदील दरवाजा व तटबंदीची दुरुस्ती व संवर्धन करणे या कामा अंतर्गत पूर्वेकडील बाजुने व आत मध्ये अस्तित्वातील योगारुम साठी दगडी पाय-या बनविणे. यासाठी र.रु.४०,२९,३८०/- व खुल्या जागेत ध्वज स्तंभासाठी ८.००मी. X ८.०० मी.आकाराचा दगडी चबुतरा तयार करणे. यासाठी र.रु.३०,२९,९२५/- असे एकूण र.रु.७०,५९,३०५/- च्या प्रस्तावास व वास्तुविशारद/प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना एकूण प्रकल्प किंमतीच्या २%+ जीएसटीसह शुल्क देणेबाबतच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 422/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.20.06.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.15, मिटमिटा मेन रोड ते बशीरजंग कॉलनी ते अप्पावाडी पर्यंत खडी रस्ता तयार करुन मजबुतीकरण करणे या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन 2021-22 च्या दरसुचीनुसार र.रु.49,47,826/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे.

सदरील कामाचा खर्च सन 2022-23 मधील मंजुर रेखांकनात मुलभूत सुविधा पुरविणे रस्ते या लेखाशिर्ष अंतर्गत उपलब्ध असलेल्या तरतुदीमधून करण्यात येईल. त्यानुसार सदरील कामाचे अंदाजपत्रक र.रु.49,47,826/- चे अंदाजपत्रक मान्यतेचा प्रशासकीय प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक 422/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.15, मिटमिटा मेन रोड ते बशीरजंग कॉलनी ते अप्पावाडी पर्यंत खडी रस्ता तयार करुन मजबुतीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक र.रु.49,47,826/- च्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 423/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.21.06.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहराला ऐतिहासिक अशी पार्शवभुमी लाभलेली असुन शहरात विविध ऐतिहासिक व पर्यटन स्थळे स्थित आहेत. या शिवाय शहरांचे औद्योगिक क्षेत्रातही अग्रेसर आहे. या कारणाने शहरात वास्तव्यास असणाऱ्या व येणाऱ्या नागरीकांची संख्या मोठी असून ऐतिहासिक अशा पर्यटन स्थळाला भेट देणाऱ्या देशी-विदेशी पर्यटकांची संख्याही लक्षणीय राहते. तसेच शहरात रोजगारासाठी व शिक्षणासाठी येणाऱ्या नागरीकांची, विद्यार्थी यांचीही संख्या मोठी असून शहर कालओघात शैक्षणिक दृष्ट्या प्रगत व अग्रेसर राहिलेले आहे.

औद्योगिकीकरण, वाढती लोकसंख्या या व इतर कारणाने शहराचा अमर्याद विकास झालेला आहे व होत आहे. मात्र यामुळे व मानवी हस्तक्षेप वाढल्याने प्रदुषणाचे प्रमाण वाढलेले असून त्यास पाबंद घालणे व सुधारण करणे यासाठी प्रामुख्याने शहरातून वाहणारी ऐतिहासिक अशा खाम नदीतील प्रदुषण कमी करणे, नागरीकांसाठी आल्हाददायक वातावणाची निर्मीती करणे, नदीकाठी पाणी धारण क्षमता वाढविणारे झाडे लावणे इ. उपाय योजना करणे आवश्यक वाटते.

याच उद्येशातहत औरंगाबाद महानगरपालिकेने खामनदी पुर्न:जीवन व सौंदर्यीकरण प्रकल्प हाती घेतला असून या उपक्रमांतर्गत आतापर्यंत सामाजिक जाणीवेतून व शहरातील काही उद्योन समुहाची मदत घेऊन दृष्य स्वरुपाचे काम, कार्यालयाची मशिनरी व मनुष्यबळ वापरून काम केले आहे. तथापि, नदीचे विस्तीर्ण स्वरुप, लांबी, प्रदुषणांची पातळी या बाबी विचारात घेता, मोठ्या स्वरुपाचे काम हाती घेणे आवश्यक असल्याचे आढळून आले आहे.

त्यास्तव विस्तृत प्रकल्प अहवाल (Deatailed Project Report) तयार करणेसाठी ई-निविदा काढून पात्र प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (Project Management Counsultant) Ecosattva Environmental Solutions Pvt.Ltd. Aurangabad यांची 2.0% दराने नियुक्ती करण्यात आली असून त्यांनी सर्वेक्षण आधारे विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) या कार्यालयात सादर केला आहे. या सादर विस्तृत प्रकल्प अहवालामध्ये (DPR) मध्ये प्रामुख्याने खालील बाबींचा समावेश करण्यात आला आहे.
त्यामध्ये –

- विस्तृत प्रकल्प अहवालात विचारात घेतलेली नदीची लांबी - 14.73 कि.मी.
- जोडण्यात येणारे पाणी प्रवाह - मुख्य – 7
  - अंतर्गत पाणी प्रवाह - 27
- विचारात घेतल्या बाबी संक्षिप्त स्वरुपाने - नदीला येऊन मिळणारे सिवेज
  - नदीपात्रा/नदीपात्रालगत साचविला जाणारा कचरा उचलणे
  - पाणी प्रवाहाचे कमतरता दुर करणे
  - वनराईची कमतरता व जैवविविधता

या विस्तृत प्रकल्प अहवालात (DPR) मध्ये ज्या भागातील कामाचा समावेश करण्यात आला त्यामध्ये खालील भागाचा समावेश आहे.

d) फेज – 1 अंतर्गत :
लोखंडी पुल ते स्मशान भुमी रस्ता (बीबी का मकबरा जवळील)
e) फेज – 2 अंतर्गत :
स्मशान भुमी रस्ता (बीबी का मकबरा) ते हिमायतबाग
f) फेज – 3 अंतर्गत :
हिमायत बाग ते खाम नदी उगमस्थानापर्यंत

या शिवाय या कामाअंतर्गत खाम नदी /नालामार्गे-उघड्यावर वाहणारे मल-जलाची जोडणी उक्त कामाच्या हद्दी पावेतो मुख्य जलनि:स्सारण वाहिनीला करण्याची यात तरतुद करण्यात आलेली आहे. सदरील अंदाजपत्रक परिसर (महाराष्ट्र जीवन प्राधिकरण) दरसुची सन 2021-22 नुसार तयार करण्यात आलेले आहे. सदर काम 15 व्या वित्त आयोगाच्या निधीमधून प्रस्तावित करण्यात येत आहे.

तरी या कामाचे अंदाजपत्रक/प्रकल्प अहवाल एकुण रु.56,02,46,222/- प्रशासकीय मंजुरीस्तव शासनाकडे अनुदान मागणीसाठी सादर करण्याच्या अनुमतीस्तव व या कामाच्या अनुषंगाने आवश्यक ते निर्णय घेणे, बदल करणे या बाबतचे अधिकार मा.आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांना प्रदान करणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 423/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, या कामासाठी तयार करण्यात आलेला विस्तृत प्रकल्प अहवाल रु.56,02,46,222/- यास मंजुरी प्रदान करणेचा तसेच सदर कामासाठी 15 व्या वित्त आयोगाअंतर्गत निधी मागणी साठीचा प्रस्ताव प्रशासनास सादर करणे, निविदा काढणेसह या कामाच्या अनुषंगाने आवश्यक ते निर्णय घेणे, बदल करणे या बाबतचे अधिकार मा.आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांना प्रदान करणे बाबतचा प्रस्तावास मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी

**<u>प्रस्ताव क्रमांक 424/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.27.06.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहराची आजची लोकसंख्या साधारणत/ 18 लक्ष असून शहरासाठी असलेल्या जायकवाडी धरणावरील 156 दलली क्षमतेच्या दोन्ही योजना जुन्या झाल्यामुळे पाणी पुरवठा योजनेचे अपुरे इन्फ्रास्ट्रक्चर, शहराची दिवसेंदिवस होणारी वाढ इ.बाबींमुळे उपलब्ध पाणी परिमाण अत्यंत तोकडे पडत असून सद्यस्थितीत शहरास 6 दिवसाआड पाणी पुरवठा करावा लागत आहे. शहरासाठी असलेल्या दोन पाणी पुरवठा योजनांपैकी 56 दलली क्षमतेची योजना सन 1972 साली कार्यान्वीत झाली असून 100 दललीची सन 1991-92 मध्ये कार्यान्वीत झाली आहे. शहराच्या पाणी पुरवठा विषयक अडचणी लक्षात घेता, महानगरपालिकेने सन 2003-04 मध्ये बांधा-वापरा-हस्तांतरीत करा तत्वावर योजना आखली होती. योजनेची निविदा कार्यवाही झाली होती. परंतु त्यावेळच्या परिस्थितीत निविदा उघडण्यात आल्या नाहीत. त्यानंतर महानगरपालिकेने समांतर पाणी पुरवठा योजना प्रकल्प तयार केला. सदर प्रकल्प पीपीपी तत्वावर होता. किंतु तत्कालीन मा.सर्वसाधारण सभेने संबंधीतांचा करारनामा रद्द केला. त्यानंतर औरंगाबाद

महानगरपलिकेच्या क्षेत्रामध्ये सातारा-देवळाईचा समावेश करण्यात आला. सन-2018 मध्ये सातारा-देवळाई करीता रु.415.50 कोटी किंमतीची योजना तयार केली होती. त्यानंतर नगर विकास विभागाकडून प्राप्त निर्देशानुसार सातारा-देवळाईसह संपुर्ण शहरासाठी जायकवाडी धरणावरून उद्भव ते वितरण व्यवस्था अंतर्भुत असलेला रु.1680.50 किंमतीचा प्रकल्प तयार केला. सदर प्रकल्पास सन-2019 मध्ये प्रशासकीय मान्यता मिळाल्यावर प्रशासकीय मान्यतेच्या अटी व शर्तीनुसार या प्रकल्पाची कार्यान्वयीन यंत्रणा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत योजनेचे काम प्रगतीपथावर आहेत. काम पुर्ण करण्याचा कालावधी 3 वर्षे असून दि.04.02.2021 रोजी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने कार्यादेश दिल्यापासून आतापर्यंत योजनेची गती व प्रगती भौतिक दृष्ट्या आपेक्षानूरुप नसल्यामुळे वेळेमध्ये कामे पुर्ण होण्यास विलंब लागणार आहे.

औरंगाबाद शहराची सध्याची पाण्याची दैनंदिन 220 दलली आहे. तथापि, अस्तित्वातील योजनेद्वारे शहरास दररोज 120 ते 130 दलली पाणी उपलब्ध होत आहे. अपुरी साठवण क्षमता व वितरण वाहिन्या यामुळे शहरास 6 दिवस आड पाणी पुरवठा होत आहे व ह्याची तीव्रता उन्हाळ्यात जास्त जाणवते. त्यामुळे लोकप्रतिनिधी व नागरीकांच्या सतत तक्रारी प्राप्त होत असतात. अस्तित्वातील व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा मार्फत प्रगतीपथावरील योजनेच्या कामाचा आढावा वरिष्ठ स्तरावर सातत्याने घेण्यात घेत आहे.

मा.मुख्यमंत्री महोदयांनी दि.02.06.2022 रोजी आढावा बैठक घेतली असता, प्रगतीपथावरील योजनेचे काम पुर्ण होण्यास कालावधी लागणार असल्याने 1971 साली टाकण्यात आलेली जलवाहिनी बदलल्यास पाणी पुरवठ्यात वाढ होऊ शकेल व हे काम एक वर्ष एवढ्या कमी कालावधीत पुर्ण होऊ शकते व असे केल्यास शहराची पाणी पुरवठ्यात लक्षणीय सुधारण होऊ शकते. तसेच शहराच्या सभोवताली पुर्ण सिडको मार्फत होत असलेल्या विकास कामांसाठी भविष्यात या योजनेचे पाणी वापरता येईल. असा प्रस्ताव प्रशासनाने मांडला. त्यावर मा.मुख्यमंत्री महोदयांनी असा प्रस्ताव त्वरित सादर करण्याचे आदेशित केले.

प्राप्त ओदशानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मार्फत रु.193-72 कोटी किंमतीच्या प्रकल्पाचा डी.पी.आर. तयार करण्यात आला आहे. मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या दि.08.06.2022 रोजीच्या औरंगाबाद दौऱ्यात सदर योजनपेचा आढावा घेतला त्यावेळी योजना त्वरित करण्याचे आदेश दिले
योजनेची माहिती थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 8. | अस्तित्वातील 700 मीमी व्यासाची पाईप लाईन बदलून तो 900 मीमी व्यासाची डी.आय.टाकणे लांबी 40.25 किमी | 117.96 कोटी |
| 9. | 24 दलली क्षमतेचे जलशुध्दीकरण केंद्र | 7.93 कोटी |
| 10. | अस्तित्वातील 56 दलली क्षमतेचे जलशुध्दीकरण केंद्र दुरुस्ती | 1.42 कोटी |
| 11. | उच्च पातळीवरील संतुलन जलकुंभ क्षमता 34 दलली अस्तित्वातील संप व पंपाची दुरुस्ती | 2.29 कोटी |
| 12. | अस्तित्वातील संप व पंपाची दुरुस्ती | 1.55 कोटी |
| 13. | सर्व ठिकाणाची पंपींग मशिनी व स्वयंचलन यंत्रणा | 31.77 कोटी |
| 14. | राष्ट्रीय महामार्ग परवानगी शुल्क | 1.27 कोटी |
| | **एकुण** | **164.17 कोटी** |
| | **जी.एस.टी.** | **29.55 कोटी** |
| | **एकुण ढोबळ किंमत** | **193.72 कोटी** |

**ठराव क्रमांक 424/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहराच्या 56 दलली क्षमतेच्या जुन्या योजनेचे पुनरुज्जीवन करणे करीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने रु.193.72 कोटी किंमतीचा एकत्रित सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केला आहे. सद्यस्थितीत महानगरपालिकेची आर्थिक स्थिती पाहता, मा.मुख्यमंत्री महोदय यांनी योजनेसाठी संपुर्ण अनुदान राज्य शासनामार्फत देण्याचे बैठकीमध्ये निर्देश दिले आहेत. त्यानुसार संपुर्ण योजनेचा खर्च राज्य शासनामार्फत होणे तसेच प्रशासकीय मान्यता आणि राज्य शासनाकडे निधी उपलब्धतेसाठी सादर करण्यास आणि प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 425/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.29.06.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रशासकीय ठराव क्र.232 दि.07.12.2021 नुसार महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील दैनिक वेतनावर कार्यरत असलेल्या वर्ग-3 संवर्गातील खालील

कर्मचाऱ्यांना कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2021/1579 दि.08.02.2021 अन्वये दि.01.12.2021 ते दि.29.05.2022 या कालावधीसाठी तात्पुरत्या नियुक्ती देण्यात आली होती.

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांना नाव | पदनाम | कार्यरत विभाग |
|---|---|---|---|
| 1. | श्रीमती जयश्री जयवंतराव झाल्टे | संगणक ऑपरेटर | घरकूल कक्ष |
| 2. | श्री.अरुण रावजी बोडखे | वाहन चालक | यांत्रिकी विभाग |
| 3. | श्री.सय्यद फरीदोद्यीन सय्यद गौस | वाहन चालक | यांत्रिकी विभाग |
| 4. | श्री.सतिश राम जाधव | वाहन चालक | यांत्रिकी विभाग |
| 5. | श्री.रविंद्र कौतिकराव पाटील | वाहन चालक | यांत्रिकी विभाग |

तथापि, उक्त कर्मचाऱ्यांपैकी अ.क्र.3 व 5 वरील श्री.सय्यद फरीदोद्दीन सय्यद गौस व श्री.रविंद्र कौतिकराव पाटील यांना अनुक्रमे कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2022/243 व 244 दि.07.03.2022 अन्वये महानगरपालिकेच्या आस्थापनेवर वाहन चालक या पदावर समावेशन करण्यात आलेले आहे. सद्यस्थितीत खालील कर्मचारी दैनिक वेतनावर कार्यरत असून दि.08.12.2021 रोजीच्या आदेशानुसार त्यांची नियुक्तीची मुदत ही दि.29.05.2022 रोजी संपणार आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव | पदनाम | कार्यरत विभाग |
|---|---|---|---|
| 1. | श्रीमती जयश्री जयवंतराव झाल्टे | संगणक ऑपरेटर | घरकूल कक्ष |
| 2. | श्री.अरुण रावजी बोडखे | वाहन चालक | यांत्रिकी विभाग |
| 3. | श्री.सतिश राम जाधव | वाहन चालक | यांत्रिकी विभाग |

त्यानुषंगाने सदर कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 53(3) च्या परंतुकान्वये 02 दिवसांचा (सार्वजनिक सट्टीचे दिवस वगळून) तांत्रिक खंड देऊन 06 महिन्यांसाठी दि.01.06.2022 ते दि.30.11.2022 पर्यंत तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 425/2022:-</u>**

प्रशासकीय ठराव क्र.232 दि.07.12.2021 नुसार महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील दैनिक वेतनावर कार्यरत असलेल्या वर्ग-3 संवर्गातील खालील कर्मचाऱ्यांना कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2021/1579 दि.08.12.2021 अन्वये दि.01.12.2021 ते दि.29.05.2022 या कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात आली होती.

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव | पदनाम | कार्यरत विभाग |
|---|---|---|---|
| 1. | श्रीमती जयश्री जयवंतराव झाल्टे | संगणक ऑपरेटर | घरकूल कक्ष |
| 2. | श्री.अरुण रावजी बोडखे | वाहन चालक | यांत्रिकी विभाग |
| 3. | श्री.सय्यद फरीदोद्यीन सय्यद गौस | वाहन चालक | यांत्रिकी विभाग |
| 4. | श्री.सतिश राम जाधव | वाहन चालक | यांत्रिकी विभाग |
| 5. | श्री.रविंद्र कौतिकराव पाटील | वाहन चालक | यांत्रिकी विभाग |

तथापि, उक्त कर्मचाऱ्यांपैकी अ.क्र.3 व 5 वरील श्री.सय्यद फरीदोद्दीन सय्यद गौस व श्री.रविंद्र कौतिकराव पाटील यांना अनुक्रमे कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2022/243 व 244 दि.07.03.2022 अन्वये महानगरपालिकेच्या आस्थापनेवर वाहन चालक या पदावर समावेशन करण्यात आलेले आहे. सद्यस्थितीत खालील कर्मचारी दैनिक वेतनावर कार्यरत असून दि.08.12.2021 रोजीच्या आदेशानुसार त्यांची नियुक्तीची मुदत ही दि.29.05.2022 रोजी संपणार आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव | पदनाम | कार्यरत विभाग |
|---|---|---|---|
| 1. | श्रीमती जयश्री जयवंतराव झाल्टे | संगणक ऑपरेटर | घरकूल कक्ष |
| 2. | श्री.अरुण रावजी बोडखे | वाहन चालक | यांत्रिकी विभाग |
| 3. | श्री.सतिश राम जाधव | वाहन चालक | यांत्रिकी विभाग |

त्यानुषंगाने सदर कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 53(3) च्या परंतुकान्वये 02 दिवसांचा (सार्वजनिक सट्टीचे दिवस वगळून) तांत्रिक खंड देऊन 06 महिन्यांसाठी दि.01.06.2022 ते दि.30.11.2022 पर्यंत तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्याबाबतच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 426/2022:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.29.06.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कोव्हिड-19 च्या विलगीकरण कक्षाकरीता दि.29.1.2021 ते दि.29.1.2021 या कालावधी करीता अधिग्रहित करण्यात आलेले आहे. सदरील अधिग्रहित इमारतीचे भाडे, पाणी देयक व विद्‌युत देयक अदा करण्यासाठी संचालिका, मराठवाडा महसुल प्रशिक्षण प्रबोधिनी, औरंगाबाद मागणी करण्यात आलेली आहे. सदरील कक्षाचे भाडे रु.44,16,000/- पाणी देयक रु.5,43,565/- व विद्‌युत देयक रु.2,30,000/- असे एकुण रु.51,89,565/- (रुपये एकावन्न लाख एकोणनव्वद हजार पाचशे पासष्ट) अदा करावयाचे आहे. याबाबत मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या मार्फत रु.51,89,565/- अनुदान उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. रु.51,89,565/- संचालक, मराठवाडा महसुल प्रबोधिनी औरंगाबाद यांना अदा करण्यात आलेले आहे. प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या कार्योत्तर मान्यतेस्तव व मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 426/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कोव्हिड-19 च्या विलगीकरण कक्षाकरीता दि.29.1.2021 ते दि.29.1.2021 या कालावधी करीता अधिग्रहित करण्यात आलेले आहे. सदरील अधिग्रहित इमारतीचे भाडे, पाणी देयक व विद्‌युत देयक अदा करण्यासाठी संचालिका, मराठवाडा महसुल प्रशिक्षण प्रबोधिनी, औरंगाबाद मागणी करण्यात आलेली आहे. सदरील कक्षाचे भाडे रु.44,16,000/- पाणी देयक रु.5,43,565/- व विद्‌युत देयक रु.2,30,000/- असे एकुण रु.51,89,565/- (रुपये एकावन्न लाख एकोणनव्वद हजार पाचशे पासष्ट) एसडीआरएफ मार्फत मंजुर करण्यात आलेल्या अनुदान अदा करण्यासाठी कार्योत्तर सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 427/2022:-</u>** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.29.06.2022)**

प्रशासकीय मान्यतेनुसार प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.अशोक रंगनाथ हिवराळे स्वच्छता जवान झोन क्र.4, महानगरपालिका औरंगाबाद यांनी त्यांच्या स्वतःच्या CAD With Coronary Artery Disease With AWMI (हृदय उक्त वाहिन्यांचे आजार) हा गंभीर आजारावर शासन मान्य खाजगी एम.जी.एम.हॉस्पीटल, औरंगाबाद येथे उपचार केलेला असून एकुण र.रु.2,00,339/- इतका खर्च केलेला आहे.

अर्जदाराने आवश्यक विहित नमुन्यात माहितीसह सर्व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली असून त्यांना CAD With Coronary Artery Disease With AWMI (हृदय उक्त वाहिन्यांचे आजार) या आजारावर उपचारार्थ खालीलप्रमाणे खर्च केलेला आहे. त्यानुसार देय नसलेली व शिल्लक रक्कमेचा तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | रक्कम रुपये |
|---|---|---|
| 1. | एकुण खर्च | रु.2,00,339/- |
| 2. | (-) अनुज्ञेय नसलेली रक्कम | रु.2,223/- |
| 3. | शिल्लक रक्कम (अ.क्र.1-2) | रु.1,98,116/- |
| 4. | 90 टक्के देयक रक्कम (अ.क्र.3 वर) | रु.1,78,304/- |
| 5. | मनपा फंडात 5 टक्के रक्कम (अ.क्र.1 च्या रक्कमेवर) | रु.10,016/- |
| 6. | संबंधीतास निव्वळ देय रक्कम (अ.क्र.4-5) | रु.1,68,288/- |
| 7. | (-) अग्रिम रक्कम | रु.1,50,000/- |
| एकुण देय रक्कम (अ.क्र.6 मधून अ.क्र.7 अग्रिम रक्कम वजा जाता निव्वळ अनुज्ञेय रक्कम) | | रु.18,288/- |

वरील तक्त्याप्रमाणे संबंधीतास निव्वळ देय र.रु.18,288/- अदा करावयाची आहे.

संबंधीताने उपचार एम.जी.एम.हॉस्पीटल, औरंगाबाद हे महाराष्ट्र शासन निर्णय क्र.सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.2011/प्र.क्र.33/11/राकावि-2/मंत्रालय, मुंबई-32 दि.16.11.2011 अन्वये जारी केलेल्या परिशिष्ट-अ शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटूंबीयांनी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या गंभीर व विशिष्ट खर्चावरील शासकीय रुग्णालयाच्या अद्यावत यादीत सदरच्या रुग्णालयाचे नाव समाविष्ट आहे. सदरच्या प्रस्तावास पडताळणी करुन वैद्यकीय प्रतिपुर्तीसाठी आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी शिफारस केलेली आहे.

**<u>ठराव क्रमांक 427/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.अशोक रंगनाथ हिवराळे, स्वच्छता जवान झोन क्र.4, महानगरपालिका औरंगाबाद यांना अनुज्ञेय र.रु.1,68,288/- मधुन अग्रिम र.रु.1,50,000/- वजा जाता प्रत्यक्ष अनुज्ञेय

र.रु.18,288/- (अक्षरी र.रु. अठरा हजार दोनशे अठ्ठयाऐंशी फक्त) संबंधीताच्या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्याबाबतच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 428/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.29.06.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, घनकचरा प्रक्रिया केंद्र येथील लिचेट वाहतूक करण्यासाठी तसेच एसटीपी प्लॅन्टचे पाणी वाहतूक करण्यासाठी एक 20 हजार ली.क्षमतेचे टँकर खरेदी करावयाचे आहे. 20 हजार ली.क्षमतेचे टँकर उभारणी करण्यासाठी 28 जीव्हीडब्ल्यु चेसीसची आवश्यकता लागणार आहे. सदरील चेसीस खरेदी करण्यासाठी जीईएम पोर्टलवरून मे.अशोक लिलॅण्ड लि.टाटा मोटर्स लि.व मे.भारतबेन्झ या तीन नामांकीत कंपन्यांचे दर तपासणी केली असता, मे.अशोक लिलॅण्ड लि.यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या किफायतशीर असल्याचे आढळून आले असून ते रु.28,65,000/- खर्चाचे आहे. 28 जीव्हीडब्ल्यु चेसीसवर 20 हजार ली. क्षमतेचे टँकर तसेच 5 एच.पी.क्षमतेचा पंप (30 मी.पाईपसह) उभारणी करण्यासाठी टँकर उत्पादक एजन्सीकडून दरपत्रके घेण्यात आली असता, सर्वात कमी दराचे दरपत्रक रु.14,35,000/- खर्चाचे आहे.

उपरोक्त प्रमाणे 28 जीव्हीडब्ल्यु चेसीस खरेदी करुन त्यावर 20 हजार ली.क्षमतेचे टँकर उभारणी करण्यासाठी एकूण रु.43.00 लक्ष खर्च अपेक्षीत आहे. अंदाजपत्रकीय खर्चास मान्यता मिळाली तर 28 जीव्हीडब्ल्यु चेसीस खरेदीसाठी मे.अशोक लिलॅण्ड ली.यांना जीईएम पोर्टलद्वारे कार्यादेश देण्यात येईल व खरेदी करण्यात आलेल्या चेसीसवर टँकरची उभारणी करुन घेणेसाठी जाहीर निविदा मागविण्यात येतील. सदरील खर्च खाजगी तत्वावर कचरा उचलणे साफसफाई खर्च या लेखाशिर्षातून करण्यात येणार आहे.

करीता, 20 हजार ली.क्षमेतेच टँकर खरेदी करण्यासाठी एकूण अपेक्षीत खर्च रु.43.00 लक्षचे अंदाजपत्रक मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 428/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, 28 जीव्हीडब्ल्यु चेसीस मे.अशोक लिलॅण्ड यांच्याकडून जीईएम पोर्टलद्वारे खरेदी करण्यास व सदरील चेसीसवर 20 हजार ली.क्षमतेचे टँकर उभारणी करण्यासाठी जाहिर निविदा मागविण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच या कामासाठी अपेक्षीत खर्च एकूण र.रु.43.00 लक्षच्या अंदाजत्रकास देखील मान्यता प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 429/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.29.06.2022)**

आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद हे मा.सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव सादर करीत आहेत की, मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.४२१ दिनांक ७-९-२०११ नुसार दि.१४-३-२०१४ रोजी "औरंगाबाद महानगरपालिका पाणी पूरवठा आणि उपविधी-२०११", महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम-४६२ अन्वये शासन राजपत्रात प्रसिध्द झालेले आहेत. सदरील उपविधीमध्ये बदल करावयाचे असल्यास या अधिनियमाच्या कलम ४६५ मधील तरतुदीनुसार शासनास फेर बदल करता येतील किंवा पूर्णतः किंवा अशंतः निरसीत करता येतील. करिता, सदरील उपविधीमध्ये अशतः बदल करण्याकरीता प्रस्ताव सादर करण्यात येतो.

औरंगाबाद महानगरपालिकेने दि.७-९-२०११ रोजी मा.सर्वसाधारण सभेच्या ठराव क्र.४२१ अन्वये पाणीपुरवठा उपविधी मध्ये पाणीपट्टीचे दर आणि प्रस्तावित पध्दती नमूद केली होती. सदरील प्रस्तावानुसार पब्लीक प्रायव्हेट पार्टनरशिप तत्वावर औरंगाबाद वॉटर युटीलिटी कंपनीसोबत पाणीपुरवठा देखभाल दुरूस्ती व संचलनाकरीता करारनामा केला होता. ज्याद्वारे शहरामध्ये पाण्याच्या पुरवठ्या होणाऱ्या परिमाणामध्ये वाढ होणे अपेक्षित होते. औरंगाबाद महानगरपालिकेने उपविधी-२०११ नुसार वार्षीक पाणीपट्टीचे दर निश्चित केले होते. यामध्ये पाणीपट्टीचे दर हे नळ जोडण्याच्या व्यासाशी निगडीत न ठेवता व्हॉलीमेट्रीक पध्दतीने निश्चित करणे, व्यावसायीक व औद्योगीक ग्राहकांसाठी स्वतंत्र दर आकारणे, जलमापक यंत्र बसविणे, याशिवाय पाण्याच्या उत्पादन खर्चानुसार शहरवासीयांना आकारावयाचे पाण्याचे दर काढण्यासाठी देण्यात आलेली नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन मार्फत शासन निर्णय क्र.संकीर्ण-२००९/प्र.क्र.२०७/०९/नवि-२०, दि.२-८-२०१० नुसार नमूद करण्यात आलेल्या पध्दतीनुसार करण्यात आले होते. सदर औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे राबविण्यात येणा-या समांतर पाणीपुरवठा योजनेच्या अटी व शर्तीनुसार कन्सेशन कालावधी करीता

निर्धारीत करण्यात आले होते. या कालावधीमध्ये महापालिकेच्यावतीने विकासक पाणीपट्टीची वसूली करणार होते. सदरील निविदा प्रक्रिया राबविताना योजना कार्यान्वीत झाल्यानंतर हे दर अमंलात येतील असे गृहीत धरून निविदा कार्यवाही करण्यात आलेली आहे. सदर दर हे पहिल्या तीन वर्षाकरीता नळ जोडणीच्या व्यासावर व पुढे सतरा वर्षाकरीता व्हॉल्यूमेट्रीक पध्दतीने आकारण्याबाबत परिशिष्ट-क मध्ये नमूद करण्यात आले आहे. सदरील दर वाढ केल्यास पाणीपट्टीपोटी मिळणारी अपेक्षित रक्कम महापालिकेस मिळणार आहे,या आधारे करण्यात आली होती. उपविधीमध्ये परिशिष्ट-ड भाग-१ मध्ये पहिल्या तीन वर्षाकरीता नळ जोडणीच्या व्यासावर व उर्वरीत सतरा वर्षाकरीत व्हॉल्यूमेट्रीक पध्दतीने काढण्यात आलेले दर असून काही अपरिहार्य कारणामुळे जर महापालिका व्हॉल्यूमेट्रीक पध्दतीने पाणीपट्टी वसूल करू शकली नाही तर त्याबाबतीत फ्लॅट दराने वाढीव पाणीपट्टीचे दर परिशिष्ट-ड भाग-२ नुसार आकारण्यात येतील असे नमूद केले होते. या ठरावानुसार औरंगाबाद महानगरपालिका पाणीपुरवठा व पाणीपट्टी उपविधी-२०११ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ४६२ नुसार प्रसिध्द करण्यात आले आहेत. तथापि, या प्रयोजनानुसार समांतर पाणीपुरवठा योजना कार्यान्वीत करण्यात औरंगाबाद वॉटर युटीलिटी कंपनी प्रा.लि. यांना यश आले नाही. त्याआधारे कंपनीसोबत करण्यात आलेला करारनामा ऑक्टोबर-२००१६ मध्ये रद्द करण्यात आला. तद्नंतर पाणीपुरवठा देखभाल दुरूस्ती, वितरण व वसूलीचे काम महानगरपालिका मार्फत करण्यात येत आहे. औरंगाबाद महानगरपालिकेच्या पाणीपुरवठ्याची समांतर जलवाहिनी योजना सन २०१६ मध्ये संपुष्टात आणली गेली. त्यानंतर रू.१६८० कोटीची नवीन योजना शासन निर्णय क्र.नगरो-२०१९/प्र.क्र.२५८/नवि-३३ अन्वये प्रशासकीय मान्यता दि.१३-०९-२०१९ रोजी मंजुर केली. त्यानंतर सदर योजना निविदा कार्यवाही नंतर कार्यादेश देवुन तीन वर्षात पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले होते. म्हणजेच ही योजना सन २०२२ पर्यत पूर्ण होणे अपेक्षित होते. परंतु या योजनेचे कार्यादेश दि.४-२-२०२१ रोजी देण्यात आला असून अद्याप या योजनेचे तीन ते पाच टक्के काम झालेले आहे. पुढील काम होण्यासाठी कामाची प्रगती वाढवुन काम येत्या दोन वर्षात पूर्ण करण्यासाठी सर्वातोपरी प्रयत्न करण्यात येत आहे. तथापि, ही योजना सन २०२४ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. या पार्श्वभुमीवर सन २०१७-१८ पासून पाणीपट्टीच्या दरात वाढ करण्यात आलेली नाही. शासनाने मंजुर केलेल्या नमूद उपविधीमध्ये सुधारित परिशिष्ट-अ भाग-१ मध्ये वीस वर्षाच्या कालावधीकरीता संपूर्ण फ्लॅट दराने सुधारीत पाणीपट्टीचे दर नमूद करण्यात आले आहे. तथापि, औरंगाबाद वॉटर युटीलिटी कंपनी प्रा.लि.सोबतचा करारनामा रद्द झाल्यामुळे सद्यस्थितीत पुढील योजनेची अमंलबजावणी होऊन पाणीपुरवठ्याच्या परिमाणामध्ये वाढ होणे, मीटर बसविणे इत्यादी कार्यवाही झाली नसल्यामुळे उपविधी मध्ये नमूद करण्यात आलेली फ्लॅट दराने पाणीपट्टीची दरवाढ सुधारीत करणे आवश्यक असल्याने पुढील प्रमाणे पाणीपट्टीचे दर आणि वार्षीक वाढ प्रस्तावित करण्यात येते.

पाणीपट्टी दरात ५० टक्के सूटसह लागू होणारा दराचा तक्ता.

| नळ जोडणीचा आकार (इंचामध्ये) | निवासी पाणीपट्टीचा प्रचलीत दर | निवासी पाणीपट्टी ५० टक्केचा दर |
|---|---|---|
| १/२ इंच | ४०५० | २,०२५ |
| ३/४ इंच | ६४०० | ३,२०० |
| १ इंच | १४,९०० | ७,४५० |
| १.५ इंच | ६५,२५० | ३२,६२५ |
| २ इंच | १,०८,७०० | ५४,३५० |
| ३ इंच | १,७३,९५० | ८६,९७५ |
| ४ इंच | २,६०,९०० | १,३०,४५० |
| ६ इंच | ४,३४,८५० | २,१७,४२५ |

| | | |
|---|---|---|
| ८ इंच | ६,५२,३०० | ३,२६,१५० |

उपरोक्त नमूद केलेली रू.१६८० कोटीची नवीन योजना कार्यान्वीत होईपर्यंत वरील प्रमाणे असलेल्या दरामध्ये नैसर्गिक वाढ करण्याचे अधिकार सर्वसाधारण सभा ठरवील त्यादराने आकारणी करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. तो पर्यंत सुधारीत परिशिष्ट-अ भाग-१ निरसीत करण्यासाठी शासनास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ४६४ अन्वये उपविधी-२०११ अशंतः निरसीत करण्याची कार्यवाही करण्यासाठी प्रस्ताव सादर कण्यात येत आहे.

उपविधी मधील १२.४ अंतर्गत नियमितीकरणाची पध्दत नमूद केले आहे. तसेच १२.५ अंतर्गत पूर्नस्थापना/पूर्नजोडणी बाबत नमूद आहे. याच्याशी संलग्नीत परिशिष्ट-क मध्ये

१. पाणी पूरवठा खंडीत करण्याचे शुल्क, जोडणीचा व्यास आणि वापर यानुसार आकारण्यात येतो.
२. अवैध पाणी वापर शुल्क रू.५०००/- प्रती जोडणी
३. अवैध जोडणी नियमितीकरण शुल्क, जोडणीचा व्यास आणि वापर नुसार आकारण्यात येतो.
४. पूर्नजोडणी शुल्क, पाणी वापराचा प्रकार आणि कलम १२.५ नुसार आकारणी करण्यात येते.

उपरोक्त नमूद १२.५ मधील परिशिष्ट-क मध्ये नमूद क्र.२ अवैध पाणी वापर शुल्क रू.५०००/- जोडणी निरसीत करण्याकरीता कार्यवाही करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

करीता उपरोक्त प्रमाणे “औरंगाबाद महानगरपालिका पाणीपुरवठा व पाणीपट्टी उपविधी-२०११” मधील सुधारीत परिशिष्ट-अ भाग-१ निरसीत करण्याचे तसेच उपविधीच्या कलम १२.५ मधील परिशिष्ट-क मधील क्र.२ अवैध नळ जोडणी शुल्क रू.५०००/- प्रती जोडणी हे निरसीत करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात येतो. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ४६४ अनुसार उपविधी तील या तरतुदी अशंतः निरसीत करण्याचा प्रस्ताव अवलोकनास्तव तथा विचारार्थ सादर.

**<u>ठराव क्रमांक 429/2022:-</u>**

उपरोक्त नमूद केलेली रू.१६८० कोटीची नवीन पाणीपुरवठा योजना कार्यान्वीत होईपर्यंत वरील प्रमाणे असलेल्या दरामध्ये नैसर्गिक वाढ करण्याचे अधिकार सर्वसाधारण सभा ठरवील त्यादराने आकारणी करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. तो पर्यंत सुधारीत परिशिष्ट-अ भाग-१ निरसीत करण्यासाठी शासनास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ४६४ अन्वये उपविधी-२०११ अशंतः निरसीत करण्याची कार्यवाही करण्यासाठी प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते.

पाणीपट्टी दरात ५० टक्के सूटसह लागू होणारा दराचा तक्ता.

| नळ जोडणीचा आकार (इंचामध्ये) | निवासी पाणीपट्टीचा प्रचलीत दर | निवासी पाणीपट्टी ५० टक्केचा दर |
|---|---|---|
| १/२ इंच | ४०५० | २,०२५ |
| ३/४ इंच | ६४०० | ३,२०० |
| १ इंच | १४,९०० | ७,४५० |
| १.५ इंच | ६५,२५० | ३२,६२५ |
| २ इंच | १,०८,७०० | ५४,३५० |
| ३ इंच | १,७३,९५० | ८६,९७५ |
| ४ इंच | २,६०,९०० | १,३०,४५० |
| ६ इंच | ४,३४,८५० | २,१७,४२५ |
| ८ इंच | ६,५२,३०० | ३,२६,१५० |

तसेच “औरंगाबाद महानगरपालिका पाणीपुरवठा व पाणीपट्टी उपविधी-२०११” मधील सुधारीत परिशिष्ट-अ भाग-१ निरसीत करण्याचे तसेच उपविधीच्या कलम १२.५ मधील परिशिष्ट-क मधील क्र.२ अवैध नळ जोडणी शुल्क रू.५०००/- प्रती जोडणी हे निरसीत करण्याचा प्रस्ताव सादर

करण्यात येतो. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ४६४ अनुसार उपविधीतील या तरतुदी अशंतः निरसीत करण्याचा प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 430/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.29.06.2022)**

आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 53(1) मधील उपलब्ध तरतुदीनुसार प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) च्या कामकाजासाठी श्री.शेख खमर यांना नियुक्ती देण्यासाठी मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.1254 दि.19.12.2019 अन्वये ठराव मंजुर झालेला आहे. सदर ठरावानूसार कार्यालयीन आदेश जा.क्र./मनपा/आस्था-1/2020/384 दि.20.03.2020 अन्वये संबंधीतास नियुक्ती देण्यात आलेली आहे.

घटक क्र.4:आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील लाभार्थ्यांद्वारे वैयक्तिक स्वरुपातील घरकुल बांधण्यास अनुदान (BLC) अंतर्गत 5 डी.पी.आर.एकूण लाभार्थी संख्या 1259 ला राज्य व केंद्र शासनाची मंजुरी प्राप्त असून त्या संबंधीत कामे प्रगती पथावर आहे.तसेच घटक क्र.3 खाजगी भागीदारीद्वारे परवडण्याऱ्या घरांची निर्मिती करणे (AHP) ची अंमलबजावणी करण्यासाठी मा.जिल्हाधिकारी यांनी महानगरपालिकेस प्रदान केलेल्या विविध शासकीय जमीनीवर प्रस्तावीत करण्यात आलेल्या 39260 घरकुलांच्या एकूण सहा डीपीआरला राज्य शासनाची राज्य स्तरीय मंजुरी व सनियंत्रण समिती (SLAC) व केंद्र शासनाची केंद्रीय मंजुरी व सनियंत्रण समिती (CSMC) यांची अनुक्रमे दि.21.03.2022 व दि.30.03.2022 रोजी मंजुरी झालेली आहे.

घटक क्र.3: (AHP) खाजगी भागीदारीद्वारे परवडणाऱ्या घरांची निर्मिती करण्याच्या कामासाठी मागविलेल्या ई-निविदा (RFP) नुसार मंजुर डीपीआर मधील गृहप्रकल्पाची कामे प्रत्यक्षात सुरु करण्यासाठी 6 महिने व कामे सुरु झाल्यानंतर ती पुर्ण करण्यासाठी 30 महिने असे एकूण 36 महिने मुदत देण्यात आलेली आहे. प्रधानमंत्री आवास योजने संबधीत सर्व कामे तसेच शासकीय अनुदानातील अनुषंगीक कामे पार पाडण्यासाठी श्री.शेख खमर यांच्या सेवेची आवश्यकता आहे. गृहप्रकल्पाच्या कामासाठी देण्यात आलेल्या मुदतीच्या प्रमाणात त्यांना प्रथम 36 महिन्यांची मुदतवाढ देणे संयुक्तिक राहील. नैसर्गिक आपत्ती किंवा इतर काही अपरिहार्य व तांत्रिक कारणास्तव गृहप्रकल्पाची कामेजर 36 महिन्याच्या मुदतीत पुर्ण झाली नाहीत आणि अशा परिस्थितीत सक्षम प्राधिकारी शासन अथवा महानगरपालिकेकडून कामे पुर्ण करण्यासाठी ज्या कालावधी पर्यंत मुदतवाढ देण्यात येईल त्या कालावधी पर्यंत संबंधीतास देखील मुदतवाढ देय राहील. संबंधीताचा विविध विभागातील कामकाजाचा पुर्व अनुभव विचारात घेता, तसेच सक्षम व अनुभवी अभियंत्यांची सध्या कमतरता विचारात घेता, भविष्यात आवश्यकता भासल्यास त्यांना देण्यात आलेल्या या कामाच्या जबाबदारी सोबत इतर कामकाज देखील त्यांच्या संमतीने सोपविता येईल.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 53(1) नुसार महानगरपालिका आस्थापनेवर स्थायी किंवा अस्थायी नेमणुकीचे अधिकार मा.महासभा/मा.सवर्साधारण सभेस आहेत. अशा प्रकारच्या नियुक्त्या देणेसाठी महानगरपालिका सक्षम प्राधिकारी असल्यामुळे मा.सर्वसाधारण सभेने विषय क्र.1254 दि.19.12.2019 अन्वये त्यांना नियुक्ती देणेचा ठराव मंजुर केला आहे. याच प्रमाणे पुढील मुदतवाढी करीता, मा.सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव सादर करुन मंजुरीचा ठराव पारीत होणे आवश्यक वाटते. करीता, मा.सर्वसाधारण सभा मंजुर ठराव क्र.1254 दि.19.12.2019 मधील तरतुदी व कार्यालयीन आदेशातील नमुद अटी व शर्तीनुसार श्री.शेख खमर यांचे नियुक्तीस दि.20.07.2022 पासून प्रथम 36 महिन्याच्या कालावधीसाठी व त्यानंतर आवश्यकता भासल्यास प्रधानमंत्री आवास योजना गृहप्रकल्पांची सर्व कामे पुर्ण होईपर्यंत विशेष बाब म्हणुन मुदतवाढ देण्याचा तसेच दर अकरा महिन्यांनी विभाग प्रमुख्य यांच्या स्तरावरून मुदतवाढीचे नवीन आदेश निर्गमित करण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 430/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दि.20.07.2022 पासून 36 महिन्याच्या कालावधीसाठी व त्यानंतर आवश्यकता भासल्यास गृहप्रकल्पाची कामे पुर्ण होईपर्यंत संबधीतास मुदतवाढ देणेचा आणि दर अकरा महिन्यांनी विभाग प्रमुख यांच्या स्तरावरुन मुदतवाढीचे आदेश निर्गमित करण्याच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 431/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.29.06.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे 53 (1) अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करुन औरंगाबाद महानगरपालिकेकडे तांत्रिक संवर्गातील अधिकाऱ्यांची पदे रिक्त असून शहर अभियंता या पदावर पदोन्नतीने नेमणूक करण्यासाठी महानगरपालिकेत कार्यकारी अभियंता या संवर्गात

एकही अधिकारी उपलब्ध नाही. तसेच औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील विविध विकास कामे/महत्वाकांशी प्रकल्प पुर्ण करण्यासाठी अनुभवी अधिकाऱ्यांची उणीव भासू नये,यासाठी प्रशासकीय ठराव क्र.166. दि.30.6.2021 नुसार श्री.एस.डी.पानझडे,शहर अभियंता (सेवानिवृत्त) यांना दि.01.07.2021 ते दि.31.12.2021 या सहा महिन्याच्या कालावधीसाठी शहर अभियंता या पदावर नेमणूक देण्यासाठी शासन मान्यतेच्या अधिन राहून कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2021/946. दि.30.06.2021 अन्वये नेमणूक देण्यात आलेली होती.

त्यानुसार जा.क्र.मनपा/आस्था-1/2021/947. दि.30/6/2021 च्या पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला असता,नगर विकास विभागाचे शासन निर्णय क्र.औमपा-2021/प्र.क्र.219/नवि-24, दि.2/9/2021 नुसार श्री.एस.डी.पानझडे यांना महानगरपालिकेतील कामासाठी सेवानिवृत्तीनंतर सहा महिन्यांच्या कालावधीसाठी शहर अभियंता या पदावर नेमणूक देण्याबाबत जा.क्र. मनपा/आस्था-1/2021/947. दि.30.06.2021 अन्वये शासनास सादर केलेला प्रस्तावास मान्यता दिलेली आहे. तथापि,दि.30.06.2021 च्या आदेशाची मुदत दि.31/12/2021 रोजी संपलेली होती.

श्री.एस.डी.पानझडे,शहर अभियंता यांच्या सेवेची कार्यालयास आवश्यकता असल्याने तसेच शहर अभियंता या रिक्त पदावर प्रतिनियुक्तीने अधिकारी पाठविणेबाबत शासनास दि.22.01.2021 व दि.06.05.2021 रोजीच्या पत्रान्वये विनंती करण्यात आलेली होती.

श्री.एस.डी.पानझडे,शहर अभियंता (सेवानिवृत्त) यांना कोव्हीड संबंधी करावयाच्या उपाययोजना/ सोयीसुविधा इ.साठी नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली असून कोव्हिड-19 ची संबंधी करावयाच्या उपाय योजना/सोयीसुविधा इ.साठी करणे तसेच महानगरपालिका क्षेत्रातील विविध विकास कामे/ महत्वाकांक्षी प्रकल्प पूर्ण करणेसाठी सद्यस्थितीत शहर अभियंता या पदावर पदोन्नती देण्यासाठी कार्यकारी अभियंता संवर्गात अधिकारी उपलब्ध नसल्याने श्री.एस.डी.पानझडे,शहर अभियंता (सेवानिवृत्त) यांना प्रशासकीय ठराव क्र.238/2021 दि.13.12.2021 नुसार दि.01.01.2022 ते दि.30.06.2022 या 06 महिन्यांच्या कालावधीसाठी शहर अभियंता या पदावर विशेष बाब म्हणून नेमणूक देण्याबाबत शासन मान्यतेच्या अधिन राहून मान्यता देऊन कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/ आस्था-1/2021/1589. दि.13.12.2021 अन्वये नेमणूक देण्यात आली होती. त्यानुषंगाने जा.क्र.मनपा/ आस्था-1/2021/1607. दि.17.12.2021 रोजीच्या पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला असता,शासनाने शासन निर्णय दि.18.01.2022 अन्वये श्री.एस.डी.पानझडे यांना सदर कालावधीसाठी मुदतवाढ देण्याबाबत मान्यता दिलेली आहे. तथापि सदर मुदत दि.30.06.2022 रोजी संपणार आहे.

शासन निर्णय दि.26.08.2022 अन्वये औरंगाबाद महानगरपालिकेसाठी नविन सेवाप्रवेश नियम मंजूर करण्यात आले असून त्यानुसार शहर अभियंता हे पद अतिरिक्त शहर अभियंता या संवर्गातून पदोन्नतीने भरण्याची तरतूद आहे. तथापि पदोन्नतीने अधिकारी उपलब्ध होत नसल्यास सदर अधिकारी उपलब्ध होईपर्यंत, राज्य शासनाच्या अधिक्षक अभियंता या पदावर किमान 3 वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या अधिकाऱ्यांमधून प्रतिनियुक्तीच्या धोरणानुसार शासनामार्फत प्रतिनियुक्तीने नियुक्ती करता येईल.

सद्यस्थितीत शहर अभियंता या पदावर पदोन्नतीने नेमणूक करण्यासाठी महानगरपालिकेत अतिरिक्त शहर अभियंता या संवर्गात एकही अधिकारी उपलब्ध नाही. त्यामुळे शहर अभियंता या रिक्त पदावर प्रतिनियुक्तीने अधिकारी पाठविणेबाबत शासनास दि.22.01.2021, दि.06.05.2021 व दि.26.04.2022 रोजीच्या पत्रान्वये विनंती करण्यात आलेली आहे. तथापि, अद्याप शासनाकडुन प्रतिनियुक्तीवर अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली नाही.

औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे महत्वपुर्ण आणि महत्वाकांक्षी प्रकल्प पुर्ण करण्यासाठी सक्षम तांत्रिक अधिकारी असणे गरजेचे आहे. सद्यस्थितीत कामे पार पाडण्याची जबाबदारी उपलब्ध तांत्रिक कर्मचा-यांवर अतिरिक्त स्वरुपात पदभार सोपवून काम करुन घेण्यात येत आहे. पर्यायाने या अतिरिक्त पदभाराचा ताण संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर निर्माण होत आहे. तांत्रिक बाबीच्या अनुषंगाने औरंगाबाद महानगरपालिका अंतर्गत असलेल्या कामाचे स्वरुप पाहता उदा.भविष्यात औरंगाबाद शहरासाठी रु.1680 कोटीची वाढीव पाणी पुरवठा योजना यशस्वीपणे राबविण्यासाठी महापालिकेच्या आस्थापनेवरील जाणकार आणि अनुभवी तांत्रिक अधिका-यांची फळी अत्यंत आवश्यक आहे. त्याकरिता श्री.एस.डी.पानझडे यांच्या सेवेची आवश्यकता आहे.

शहर अभियंता या पदाची नेमणूक महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम (45) नुसार केल्या जाते. कलम 45(5) नुसार या कलमात विर्निदिष्ट केलेल्या शहर अभियंता पदाची जागा रिकामी झाल्यास ज्या

तारखेस ती रिकामी झाली आहे त्या तारखेपासून चार महिन्याच्या आत महानगरपालिकेने अथवा शासनाचे आदेश मिळाल्यापासून 30 दिवसाच्या आत महानगरपालिकेने त्या जागी दुस-या व्यक्तीची नेमणूक केली पाहिजे अशी तरतुद आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण चार मधील पोट-कलम 45(7) मध्ये पुढीलप्रमाणे तरतुद आहे. "पोट-कलम (1) किंवा पोट-कलम (5) अन्वये नेमणुकीची व्यवस्था होईपर्यंत,महानगरपालिकेस एखाद्या व्यक्तिची नेमणूक करुन ती जागा तात्पुरती भरता येईल आणि अशा रीतीने नेमणूक केलेल्या व्यक्तिला पोट-कलम (3) अन्वये त्या वेळी निश्चित केलेल्या कमाल मर्यादेहून अधिक नसेल इतके महानगरपालिकेस योग्य वाटेल असे मासिक वेतन व भत्ते मिळतील असा निर्देश देता येईल:

परंतु,अशी कोणतीही नेमणुक,ज्या तारखेस ती जागा रिकामी झाली असेल त्या तारखेपासुन सहा महिन्यांहून अधिक मुदतीसाठी करता येणार नाही किंवा ती अशा तारखेपासून सहा महिने झाल्यानंतर करता येणार नाही. अशी तरतुद आहे".

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 54(2) मध्ये पुढील प्रमाणे तरतुद करण्यात आलेली आहे. "आधीच नगरपालिका सेवेत असलेल्या व्यक्तींमधून नेमणूक करण्याचे योजले असेल त्याव्यतिरिक्त किंवा नेमणूक तात्पुरत्या स्वरुपाची असून सहा महिन्यांपेक्षा अधिक काळासाठी नसेल तर,कर्मचारी निवड समितीने नियमांद्वारे विहित केलेल्या रीतीने कलम 53,पोट-कलम (1) मध्ये निर्दिष्ट केलेल्या नेमणुकांव्यतिरिक्त व महानगरपालिका (राज्य) शासनाच्या पूर्वमंजुरीने आदेशाद्वारे याबाबत विनिर्दिष्ट करील अशा नेमणुकांव्यतिरिक्त नगरपालिका सेवेतील अन्य सर्व नेमणुकांसाठी उमेदवारांची निवड केली पाहिजे."

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 53(1) मध्ये पुढीलप्रमाणे तरतुद करण्यात आलेली आहे. "महानगरपालिकेचा जो अधिकारी सहायक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे. - मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत- त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकेमध्ये निहित असेल:

परंतु,आयुक्ताला (महानगरपालिकेचा सहायक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर असलेल्या) कर्जविषयक कामांसाठी करावयाच्या कोणत्याही अस्थायी नेमणुका सहा महिन्यांहून अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समितीच्या पूर्वमंजुरीने या अटीवर करता येतील की,आयुक्ताने अशी प्रत्येक नेमणूक करताना त्याविषयी महानगरपालिकेस ताबडतोब कळवले पाहिजे आणि उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर महानगरपालिकेच्या पूर्वमंजुरीवाचून अशा कोणत्याही नेमणुकीचे नवीकरण करता येणार नाही."

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 45(5),45(7),53(1) व 54(2) मध्ये उपरोक्त प्रमाणे तरतूद उपलब्ध आहे.

संबंधितांना दरमहा सेवानिवृत्तीपूर्वी मिळत असलेल्या एकूण वेतनातून (मूळ वेतन व महागाई भत्ता धरुन) त्यांना आता मिळत असलेले एकूण निवृत्तीवेतन (महागाई भत्ता आणि अंशराशीकृत निवृत्तीवेतनासह) वजा केल्यानंतर होणारी रक्कम त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल.

करिता श्री.एस.डी.पानझडे,शहर अभियंता (सेवानिवृत्त) यांना महानगरपालिका क्षेत्रातील विविध विकास कामे/महत्वाकांक्षी प्रकल्प पूर्ण करणेसाठी श्री.एस.डी.पानझडे,शहर अभियंता (सेवानिवृत्त) यांना दि.01.07.2022 ते दि.31.12.2022 या 06 महिन्यांच्या कालावधीसाठी दि.30.06.2021 च्या आदेशात नमूद अटी व शर्तीच्या अधिन राहून शहर अभियंता या पदावर नेमणूक देण्याबाबत प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 431/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहर अभियंता या रिक्त पदावर प्रतिनियुक्तीने अधिकारी पाठविणेबाबत शासनास दि.22.01.2021, दि.06.05.2021 व दि.26.04.2022 रोजीच्या पत्रान्वये विनंती करण्यात आलेली आहे.

महानगरपालिका अंतर्गत तांत्रिक विभाग हा कार्यान्वय व अंमलबजावणी करणार विभाग असून, शहरातील विविध महत्वाच्या योजना, प्रकल्प राबविणे, विकासाची कामे करणे, नागरिकांच्या तक्रारींचे निरसण करणे इ.ची जबाबदारी तांत्रिक संवर्गावर येऊन पडते. भारतीय राज्य घटनेतील अनुसुची 12 मध्ये नमूद स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कर्तव्यांपौकी बहुतांश कर्तव्यांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ही तांत्रिक विभागाची आहे.

सद्यस्थितीत शहर अभियंता या पदावर पदोन्नती देण्यासाठी कार्यकारी अभियंता संवर्गात अधिकारी उपलब्ध नसल्याने श्री.एस.डी.पानझडे,शहर अभियंता (सेवानिवृत्त) यांना प्रशासकीय ठराव क्र.238/2021 दि.13.12.2021 नुसार दि.01.01.2022 ते दि.30.06.2022 या 06 महिन्यांच्या कालावधीसाठी शहर अभियंता या पदावर विशेष बाब म्हणून नेमणूक देण्याबाबत शासन मान्यतेच्या अधिन राहून मान्यता देऊन कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2021/1589. दि.13.12.2021 अन्वये नेमणूक देण्यात आली होती. त्यानुषंगाने जा.क्र.मनपा/आस्था-1/2021/1607. दि.17.12.2021 रोजीच्या पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला असता,शासनाने शासन निर्णय दि.18.01.2022 अन्वये श्री.एस.डी.पानझडे यांना सदर कालावधीसाठी मुदतवाढ देण्याबाबत मान्यता दिलेली आहे. तथापि सदर मुदत दि.30.06.2022 रोजी संपणार असून श्री.एस.डी.पानझडे, शहर अभियंता यांच्या सेवेची कार्यालयास आवश्यकता होती.

करिता श्री.एस.डी.पानझडे,शहर अभियंता (सेवानिवृत्त) यांना महानगरपालिका क्षेत्रातील विविध विकास कामे/महत्वाकांक्षी प्रकल्प पूर्ण करणेसाठी श्री.एस.डी.पानझडे,शहर अभियंता (सेवानिवृत्त) यांना दि.01.07.2022 ते दि.31.12.2022 या 06 महिन्यांच्या कालावधीसाठी दि.30.06.2021 च्या आदेशात नमूद अटी व शर्तीच्या अधिन राहून शहर अभियंता या पदावर नेमणूक देण्यासाठी शासन मान्यतेच्या अधिन राहून मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 432/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.29.06.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहराच्या विकासासाठी औरंगाबाद महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात नवीन प्रकल्प/कामे सुरु आहेत. सध्या कार्यरत तांत्रिक अधिकाऱ्यांची संख्या अत्यंत कमी असून सदरील कामे पार पाडण्यासाठी उपलब्ध तांत्रिक अधिकाऱ्यांवर अतिरीक्त ताण निर्माण होत आहे.

सद्यस्थितीत औरंगाबाद महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात ड्रेनेज व रस्ते इ.कामे सुरु असून सदर विभागात तांत्रिक अधिकाऱ्यांची अत्यंत कमतरता असून सदर विभागात कार्यरत असलेले श्री.भागवत दिनकर फड, कार्यकारी अभियंता हे दि.30.06.2022 रोजी सेवानिवृत्त होत असून त्यांचा सदर विभागातील प्रत्यक्ष कामांचा अनुभव असल्याने त्यांच्या सेवेचा लाभ होऊ शकतो.

करीता, "महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील ड्रेनेज व रस्ते इ.कामे करणे" या विवक्षित कामाकरीता श्री.भागवत दिनकर फड, कार्यकारी अभियंता (सेवानिवृत्त) यांची नियुक्ती विहित अटी व शर्तीच्या अधीन राहून प्रथमत:6 महिन्याच्या कालावधी करीता करार पध्दतीने नियुक्ती सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना अशा नियुक्तीच्या वेळी महागाई भत्त्यासह मिळत असलेल्या निवृत्तीवेतना एवढी रक्कम (अंशराशीकृत निवृत्तीवेतन वगळून (त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणुन निश्चित करण्यात येईल या अटीवर घेण्याबाबत प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 432/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, "महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील ड्रेनेज व रस्ते इ.कामे करणे" या विवक्षित कामाकरीता श्री.भागवत दिनकर फड, कार्यकारी अभियंता (सेवानिवृत्त) यांची नियुक्ती विहित अटी व शर्तीच्या अधीन राहून प्रथमत:6 महिन्याच्या कालावधीकरीता "महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील ड्रेनेज व रस्ते इ.कामे करणे" या विवक्षित कामाकरीता श्री.भागवत दिनकर फड, कार्यकारी अभियंता (सेवानिवृत्त) यांची नियुक्ती विहित अटी व शर्तीच्या अधीन राहून प्रथमत:6 महिन्याच्या कालावधीकरीता करार पध्दतीने नियुक्ती सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना अशा नियुक्तीच्या वेळी महागाई भत्त्यासह मिळत असलेल्या निवृत्तीवेतना एवढी रक्कम (अंशराशीकृत निवृत्तीवेतन वगळून) त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणुन निश्चित करण्यात येईल. या अटीवर घेण्याबाबतच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी

**<u>प्रस्ताव क्रमांक 433/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.29.06.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान अंतर्गत औरंगाबाद शहर पाणी पुरवठा प्रकल्पाच्या रु.1680.50 कोटी किंमतीच्या पाणी पुरवठा योजनेला नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.नगरो-2019/प्र.क्र.258/नवि-33 दि.13.09.2019 अन्वये प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. प्रशासकीय मान्यतेच्या अटीनुसार सदर प्रकल्पाची कार्यान्वयीन यंत्रणा (Implementing Agency) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण असून उक्त काम पुर्ण ठेव तत्वावर करण्यात येत आहे. या प्रकल्पाअंतर्गत 49 उंचावरील व 4 जमिनीवरील जलकुंभ बांधण्यात येत आहे.

मंजुर योजनेतील स्थापत्य कामांची निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत नियुक्त कंत्राटदाराकडून वितरण व्यवस्थेतील जलकुंभांची कामे प्रगतीपथावर आहेत. प्रस्तावीत प्रकल्पाअंतर्गत खालील ठिकाणी नवीन जलकुंभ बांधण्यात येणार आहेत.

1. हर्सुल गाव येथे अस्तित्वातील दोन जलकुंभ परिसरात.
2. सिल्कमिल कॉलनी येथे अस्तित्वातील जलकुंभ परिसरात.

सदर ठिकाणी जलकुंभ बांधण्याकरीता जागा उपलब्ध नसल्याने या ठिकाणी वापरात नसलेले जलकुंभ बांधकामे निष्काशीत करुन प्रस्तावीत जलकुंभांकरीता जागा उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. अस्तित्वातील बांधकामाची माहिती खालील प्रमाणे.

3. हर्सुल गाव येथे अस्तित्वातील जुने उंचावरील दोन जलकुंभ:-
   या ठिकाणी 2.50 व 3.00 लक्ष लि.क्षमतेचे दोन उंचावरील जलकुंभ अस्तित्वात आहेत. सदर दोन्ही जलकुंभ सन-1993 मध्ये बांधलेले आहेत. सदर दोन्ही जलकुंभ मागच्या सात वर्षापासून वापरात नाहीत. हर्सुल गाव परिसररासाठी वाढीव पाणी पुरवठा योजनेमध्ये 18.20 लक्ष लि.क्षमतेचा जलकुंभ बांधणे प्रस्तावित असून या जलकुंभाकरीता नवीन जागा उपलब्ध नसल्याने हे जुने बांधकाम निष्काशीत केल्यास प्रस्तावीत जलकुंभाकरीता जागा उपलब्ध होऊ शकते. या संदर्भाने काय्रकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी सदर जलकुंभ निष्काशीत करण्याची परवानगी मिळणे बाबत पत्र क्र.1654 दि.01.09.2021 व पत्र क्र.164 दि.18.01.2022 अन्वये पत्र दिलेले आहे.
4. सिल्कमिल कॉलनी येथील अस्तित्वातील उंचावरील जलकुंभ:-
   या ठिकाणी 1.50 लक्ष लि.क्षमतेचा उंचावरील जलकुंभ अस्तित्वात असून सन-1987 मध्ये बांधलेला आहे. सदर जलकुंभ नादुरुस्त असल्याने मागच्या 15 वर्षापासून वापरात नाहीत. सिल्कमिल कॉलनी परिसरात वाढीव पाणीपुरवठा योजनेमध्ये 12.90 लक्ष लि.क्षमेतेचा जलकुंभ प्रस्तावीत असून या जलकुंभाकरीता नवीन जागा उपलब्ध नसल्याने हे जुने बांधकाम निष्काशीत केल्यास प्रस्तावीत जलकुंभाकरीता नवीन जागा उपलब्ध होऊ शकते. या संदर्भाने कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी सदर जलकुंभ निष्काशीत करण्याची परवानगी मिळणे बाबत पत्र क्र.1654 दि.01.09.2021 व पत्र क्र.164 दि.18.01.2022 अन्वये पत्र दिलेले आहे.

औरंगाबाद शहराकरीता वाढीव पाणी पुरवठा योजना हा महत्वाकांक्षी प्रकल्प असल्याने प्रकल्प विहित कालावधीत पुर्ण होण्याकरीता वरील नमुद बांधकामे निष्काशीत करुन प्रस्तावीत जलकुंभांकरीता जागा उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 433/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहर पाणी पुरवठा योजनेअंतर्गत प्रस्तावीत जलकुंभांच्या कामासाठी हर्सुल गाव येथे वापरात नसलेले दोन जलकुंभ व सिल्कमिल कॉलनी येथील वापरात नसलेला जलकुंभ बांधकामे निष्काशीत करुन जागा उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 434/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.29.06.2022)**

संदर्भ:- 1. केंद्र शासनाची अधिसुचना क्र.एस.ओ.1357 (इ) दि.07.04.2016.
2. इकोसत्तव इव्हायमेंटल सोल्युशन प्रा.लि.औरंगाबाद महानगरपालिका यांच्यासोबत सामंजस्य करार (MOU) दि.26.03.2021.
3. दि.28.06.2022 रोजी मा.प्रशासन महोदय यांच्या दालनात झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

केंद्र शासनाची अधिसुचना क्र.एस.ओ.1357 (इ) दि.07.04.2016 अन्वये घनकचरा व्यवस्थापन नियम लागू केले आहेत. या नियमांची अंमलबजावणी शहरामध्ये प्रभावीपणे सुरु असून स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत सुरु असलेल्या स्वच्छ सर्वेक्षण 2021 मध्ये औरंगाबाद महानगरपालिकेचा क्रमांक देशामध्ये 22 वा आहे.

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत चिकलठाणा, पडेगाव, हर्सुल व कांचनवाडी या ठिकाणी घनकचरा प्रक्रिया केंद्र प्रस्तावीत असुन त्यापैकी पडेगाव व चिकलठाणा येथे प्रत्येकी 150 मे.टन प्रतिदिन क्षमतेने कार्यान्वित आहे. हर्सुल येथील 150 मे.टन.क्षमतेचे प्रक्रिया केंद्र उभारणीचे स्थापत्य काम प्रगतीपथरवर आहे व कांचनवाडी येथील 30 मे.टन क्षमतेचे बायोमेथेनेशन प्रकल्प कार्यान्वीत आहे.या व्यतिरिक्त शहरात रामनगर-विठ्ठलनगर, कांचनवाडी, हर्सुल व सेंट्रलनाका येथे प्रत्येकी 5 मे.टन क्षमतेने सुका कचरा प्रक्रिया केंद्र (Material Recovery Facility) उभारण्यात आले आहे. औरंगाबाद शहराची आजची लोकसंख्या पाहता शहरामधुन प्रतिदिन 480 ते 500 मे.टन कचरा निर्माण होत असून 330 ते 350 मे.टन घनकचऱ्यावर पडेगाव, चिकलठाणा व कांचनवाडी या ठिकाणी प्रक्रिया करण्यात येत आहे. रामनगर-विठ्ठलनगर, कांचनवाडी, हर्सुल व सेंट्रलनाका या MRF Center वर 20 मे.टन सुका कचऱ्यावर प्रक्रिया केरण्यासाठी इकोसत्तव इन्व्हायमेंटल सोल्युशन प्रा.लि.औरंगाबाद यांना

दि.26 मार्च 2021 च्या सामंजस्य करारानुसार चालविण्यास देण्यात आले आहे. परंतु हर्सुल MRF Center हे आग लागून नष्ट झाले आहे. त्यामुळे सदरील केंद्र सद्यस्थितीत बंद आहे.

हर्सुल, चिलकठाणा व पडेगाव येथे प्रत्येकी 10 मे.टन क्षमतेचे Material Recovery Facility नव्याने उभारावे लागणार आहे. त्या कामी येणारा खर्च घनकचरा व्यवस्थापन स्वच्छ भारत अभियान 1.0 (SBM 1.0) अंतर्गत मंजुर असलेला सविस्तर प्रकल्प अहवाल (रु.148.79 कोटी) अंतर्गत करण्यात यावा. त्यास शासनाची कार्योत्तर मान्यता घ्यावी लागणार आहे. तसेच इकोसत्तव इन्व्हायमेंटल सोल्युशन प्रा.लि. औरंगाबाद या संस्थेबरोबर औरंगाबाद महानगरपालिकेने यापुर्वी सामंजस्य करार झालेला असून त्यानुसार कांचनवाडी, हर्सुल, रामनगर व सेंट्रलनाका या ठिकाणावरील MRF Center इकोसत्तव इन्व्हायमेंटल सोल्युशन प्रा.लि.औरंगाबाद ही संस्था उपरोक्त नमुद सेंटरच्या माध्यमातून चालवत आहे.

तसेच सामंजस्य करारानुसार चिकलठाणा येथील 16 मे.टन क्षमतेचे 2 युनिटच्या सुरु करुन त्या माध्यमातून चिकलठाणा येथील पडून असलेला जुना कचऱ्यावर (Legacy Waste) वर प्रक्रिया करण्याचे काम हे इकोसत्तव इन्व्हायमेंटल सोल्युशन प्रा.लि.औरंगाबाद यांच्या मार्फत करण्यात येणार आहे.

सदरील MRF Center च्या माध्यमातून शहरातील सुका कचरा प्रक्रिया करणे, MRF Center ची देखभाल व दुरुस्ती करणे (O & M Cost), विद्युत देयके अदा करणे, MRF Center च्या शेड व स्थापत्य कामे तसेच यंत्रसामुग्रीचा विमा उतरविणे, सुरक्षा व्यवस्था करणे व इतर आवश्यक मनुष्यबळ लावणे ई.कामे करण्यासाठी इकोसत्तव इन्व्हायमेंटल सोल्युशन प्रा.लि.औरंगाबाद यांना र.रु.02.00 लक्ष प्रतिमाह MRF Center प्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे अदा करण्यात यावे. तसेच चिकलठाणा येथील 16 मे.टन क्षमतेचे 2 युनिट सुरु करुन Legacy Waste वर प्रक्रिया करणे बाबत र.रु.01.50 लक्ष प्रति महा देयक इकोसत्तव इन्व्हायमेंटल सोल्युशन प्रा.लि.औरंगाबाद यांना अदा करण्यात यावेत.

सदरील खर्च हा मुळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक सन 2022-23 मधील महसुली खर्चाअंतर्गत "क सार्वजनिक आरोग्य व इतर सुखसोई, क-1 घनकचरा व्यवस्थापन विभाग अ.क्र.04 वरील लेखाशिर्ष हर्सुल, पडेगाव, चिकलठाणा, नक्षत्रवाडी, कचरा प्रक्रिया केंद्र देखभाल दुरुस्ती, ई." या लेखाशिर्षांतर्गत करण्यात येणार असून चालू वर्षी वाढीव तरतुद करण्यास मान्यता प्रदान करणे आवश्यक आहे. उरोपक्त प्रमाणे MRF Center चालविण्यासाठी इकोसत्तव इन्व्हायमेंटल सोल्युशन प्रा.लि.औरंगाबाद या संस्थेसोबत करारनामा करणे आवश्यक आहे.

यानंतर उपरोक्त कामांसाठी उपलब्ध होणारा Corporater Social Responsibility (CSR) अनुदानाबाबत इकोसत्तव इन्व्हायमेंटल सोल्युशन प्रा.लि.औरंगाबाद व औरंगाबाद मनपासह CSR अनुदान देणारी कंपनीबरोबर त्रिसदस्यीय करारनामा करण्यास मंजुरी प्रदान करावी लागणार आहे. त्याबाबत चा करारनामा करण्यात यावा.

करीता, उपरोक्त प्रमाणे प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 434/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वरील सर्व बाबींना मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 435/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.29.06.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, क्रांती चौक येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याच्या चौथाऱ्याची उंची वाढविण्याच्या कामाचे र.रु.1,84,53,572/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. मान्यतेअंती सदरील कामाचा कार्यादेश मे.गायत्री आर्किटेक्टस यांन अंदाजपत्रकीय दराने पारीत करण्यात आला आहे.

क्रांतीचौक येथे छत्रपती शिवाजी महाराज यांना पुतळा बसविण्यासाठी सुमारे 31 फुट उंचीच्या सुशोभित चौथाऱ्याचे काम पुर्ण झाले असून या चौथाऱ्यावर सुमारे 21 फुट उंचीचा छत्रपती शिवाजी महाराज यांचा नवीन अश्वारुढ पुतळा बसविण्यात आला आहे.

पुतळ्याच्या प्रमाणानुसार चौथाऱ्याचे बांधकामाच्या आकारात RCC Design मध्ये चौथाऱ्या भोवती लावावयाच्या क्लॅडिंगमध्ये, चौथाऱ्यास अनुरुप लावावयाच्या विविध प्रकारच्या म्युरल्समध्ये, विद्युत व्यवस्था इ.मध्ये पुतळा समिती, वास्तुविशारद, शिवप्रेमी नागरीक व मान्यवरांनी प्रत्यक्ष पाहणी करुन या प्रकरणी संपन्न झालेल्या बैठकीत सुचना केलेल्या आहेत.

त्यानुषंगाने उपरोक्त बाबींचा मुळ अंदाजपत्रकात समाविष्ट नसल्याने महानगरपालिका अर्थसंकल्प सन 2021-22 मधील उपलब्ध तरतुदीच्या मर्यादेत सदरील कामाचे सुधारीत अंदाजपत्रक र.रु.2,54,98,503/- चे तयार करण्यात आले होते. त्यास तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

सदर काम नागरीकांच्या व शिवप्रेमींच्या मागणीमुळे दि.18 फेब्रुवारी 2022 रोजी शिवजयंतीपुर्वी पुर्ण करणे आवश्यक असल्याने तातडीने पुर्ण करण्यात आले आहे. सदरील कामासाठी प्रथम सुधारीत मंजुर अंदाजपत्रकापेक्षा र.रु.39,23,893/- इतकी वाढ झाली आहे. यानुसार सदरील कामाचे सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून या कामाची एकुण सुधारीत अं.प.र.रु.2,94,22,396/- इतकी आहे. सदरील काम शिवजयंतीपुर्वी पुर्ण करणे आवश्यक असल्याने या कामाचे मुळ कंत्राटदार मे.गायत्री आर्किटेक्ट्स् यांच्या मार्फत निविदा मंजुर दर अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यात आलेले आहे. सदरील कामासाठी मनपा अर्थसंकल्प सन 2022-23 अंतर्गत रु.150.00 लक्ष इतकी तरतुद उपलब्ध असून या शिवाय या कामासाठी र.रु.22.30 लक्ष इतकी अतिरीक्त तरतुद उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

करीता, उक्त प्रमाणे र.रु.22.30 लक्ष इतकी अतिरीक्त तरतुद उपलब्ध करुन देणेसह या कामाचे एकूण सुधारीत अं.प.र.रु.2,94,22,396/- कार्योत्तर मान्यतेस्तव तथा मान्यतेअंती सदरील काम या कामाचे मुळ कंत्राटदार मे.गायत्री आर्किटेक्ट्स् यांच्या कडून निविदा मंजुर दर अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**<u>ठराव क्रमांक 435/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, र.रु.22.30 लक्ष इतकी अतिरीक्त तरतुद उपलब्ध करुन देण्यासह या कामाचे एकुण सुधारीत अं.प.र.रु.2,94,22,396/- कार्योत्तर मान्यतेसह सदरील काम या कामाचे मुळ कंत्राटदार मे.गायत्री आर्किटेक्ट्स् यांच्या कडून निविदा मंजुर दर अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्याच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 436/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि. 29.06.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, 15 व्या वित्त आयोगातून हवेची गुणवत्ता (Air Quality) सुधारण्यासाठी बंधनकारक अनुदानातील पहिला व दुसरा हफ्ता तसेच पाणी पुरवठा व व्यवस्थापन सुधारणा व प्रभावी घनकचरा व्यवस्थापन (For Improving Conservation, Supply and Managaement of Water and Efficient Solid Waste Management) साठी बंधनकारक अनुदानातील पहिला व दुसरा हफ्त्याद्वारे प्राप्त एकत्रित निधी रु.63,51,58,834/- अंतर्गत प्रस्तावीत रु.65,90,87,957/- च्या कामांना मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.207/2021 दि.13.10.2021 नुसार एकत्रित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. या एकत्रित कामांपैकी मंजुर ठरावातील (इ) सभोवतालच्या हवेची गुणवत्ता या कामांतर्गत अ.क्र.04 'औरंगाबाद शहरातील विविध मुख्य रस्त्यावर दुभाजक, फुटपाथ बांधणे व दुभाजकात झाडे लावणे' च्या कामाकरीता र.रु.19,99,96,019/- निधी मंजुर आहे.

या अनुषंगाने औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत् यापुर्वी नियुक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यश इन्नोव्हेटिव्ह सोल्युशन्स एल.एल.पी.औरंगाबाद यांच्या मार्फत सदर कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2020-2021 च्या दरसुचीनुसार तयार करुन घेण्यात आले आहे. यानुसार या कामाची बी-1 स्वरुपात दुसऱ्या वेळेस निविदा प्रसिध्द करण्यात आली असता एकूण तीन निविदा प्राप्त होत्या.यामधील तांत्रिक निविदेमध्ये पात्र दोन निविदा स्पर्धक के.एच. कन्स्ट्रक्शन औरंगाबाद व मे. अमन कन्स्टक्शन औरंगाबाद यांची वाणिज्यीक निविदा(financial Bid)उघडली असता के.एच.कन्स्टक्शन औरंगाबाद हे L1 निविदास्पर्धक असून त्यांनी भरणा केलेल्या दराची तुलना केली असता हे दर मंजूर निविदा रक्कमेपेक्षा 12.55% कमी दराची म्हणजेच रक्कम रु.14,54,59,101.36 चे प्राप्त आहे.

या नुसार के.एच. कन्स्ट्रक्शन औरंगाबाद यांचेकडून निविदा रक्कमेपेक्षा 12.55% कमी दराची म्हणजेच रक्कम रु.14,54,59,101.36 पर्यत मंजूर शेडयूल बी नुसार कामे करणे करीता करार करणेस मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : Tender id 2021 AMCA 750002 2 ,सन 2021-2022

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | शासन अनुदान प्रकल्प विभाग (रस्ते) |
| 2. | कामाचे स्वरुप | 15 व्या वित्त आयोग निधी अंतर्गत औरंगबाबाद शहरातील विविध मुख्य रस्त्यावर आर.सी.सी.मध्ये दुभाजक व फुट पाथ बांधणे बाबत. |
| 3. | पुर्व गणनपत्रक मान्य झाले आहे काय असल्यास किती रक्कमेचे मान्यतेचा ठराव. | होय.<br>अंदाजपत्रक र.रु.19,99,96,019/- यास ठराव क्र.207/ 2021 ते दि.13.10.2021 अन्वये मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेण्यात आलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | अ) त्यापैकी किती रक्कमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रु.16,83,14,340/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | • जिल्हा स्तरावरील मराठी-01<br>• राज्यस्तरावरील वर्तमानपत्रे मराठी-01, हिंदी-01<br>• राष्ट्रीयस्तर इंग्रजी-02, हिंदी-01<br>• संकेतस्थळ-महा-ई-टेंडर<br>• प्रसिध्दी दि.23.12.2021 |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याच मुदत | दि.23.12.2021 ते दि.04.02.2022 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | दि.25.04.2022 |
| | क) निविदेची कितवी वेळ होती? | दुसरी |
| 6. | एकूण किती टेंडर्स आली | 03 (तीन) |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी).

| **अ.क्र.** | **ठेकेदाराचे नाव व पत्ता** | **टेंडर रक्कम रुपये** | **पुर्वगणनपत्राकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त** | |
|---|---|---|---|---|
| 1. | के.एच.कन्स्ट्रक्शन | 16,83,14,340/- | 14,54,59,101.36 | 12.55% कमी दराने |
| 2. | मे.अमन कन्स्ट्रक्शन | 16,83,14,340/- | 16,38,39,010.39 | 1.50% कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत | -- |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे | 15 वा वित्त आयोग |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदर काम डिपॉझिटमधून करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणतया कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर पान क्रमांक द्यावा). | -- |
| 10. | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | होय |

मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.207/2021 दि.13.10.2021 अन्वये 15 व्या वित्त आयोग निधी अंतर्गत एकत्रित कामांना मंजुरी प्राप्त असून यापैकी उक्त नमुद प्रमाणे औरंगाबाद शहरातील विविध मुख्य रस्त्यावर आर.सी.सी. मध्ये दुभाजक व फुटपाथ बांधणेच्या कामाचे अंदाजपत्रक र.रु.19,99,96,019/- यास मान्यता प्राप्त आहे. उक्त नमुद कामाची निविदा ई-टेंडरिंग माध्यमातून मागविण्यात आली आहे.

तरी उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे L1 निविदाधारक के.एच.कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांची निविदा मंजुर निविदा रक्कमेपेक्षा 12.55% कमी दराची म्हणजेच र.रु.14,54,59,101.36 ची प्राप्त असून निविदा स्विकृतीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 436/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.207/2021 दि.13.10.2021 अन्वये 15 व्या वित्त आयोग निधी अंतर्गत एकत्रित कामांना मंजुरी प्राप्त असून यापैकी प्रस्तावात नमुद प्रमाणे औरंगाबाद शहरातील विविध मुख्य रस्त्यावर आर.सी.सी. मध्ये दुभाजक व फुटपाथ बांधणेच्या कामाचे अंदाजपत्रक र.रु.19,99,96,019/- चे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2020-2021 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून या अनुषंगाने र.रु.16,83,14,340/- च्या मर्यादेत निविदा प्रक्रिया करण्यात आली आहे.

करीता, सदरील कामाचे L1 निविदाधारक के.एच.कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांची निविदा मंजुर निविदा रक्कमेपेक्षा 12.55% कमी दराची म्हणजेच र.रु.14,54,59,101.36 ची प्राप्त असून निविदा स्विकृतीचा प्रस्तावास मान्यता व तद्नुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 437/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.29.06.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो कि,१५ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार औरंगाबाद महानगरपालिकेचा समावेश Milion Plus Cities मध्ये झाला असल्याने सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षासाठी शासनाने एकूण र.रु.११७.२० कोटी रक्कम मंजूर केली आहे. दि.०६.०९.२०२१ रोजी तत्कालीन पर्यावरण मंत्री यांनी व्हि.सी.द्वारे आयोजित बैठकीत महाराष्ट्र राज्यातील सर्व स्थानिक संस्थांना या एकूण प्राप्त निधीतून ८० टक्के खर्च म्हणजे जवळपास र.रु.९३.३ कोटी हा EV Convergence वर करावा असे निर्देश दिले आहेत.

या अनूदानातील पहिला हप्ता व दुसरा हप्ता अनूक्रमे महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्रं.एफ.एफ.सी.-२०२०/प्र.क्र.८६/नवि-४ मंत्रालय, मुंबई-३२ दि.०९.११.२०२० अन्वये रु.१६.०० कोटी व महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाचा शासन निर्णय क्र.एफ.एफ.सी-२०२०/ प्र.क्र.३४/नवि-४ व एफ.एफ.सी.२०२०/प्र.क्र.८६/नवि-०४ मंत्रालय, मूंबई-३२ दि.१२.०४.२१ अन्वये रु.१६ कोटी असे एकूण रक्कम रु रु.३२.०० कोटी इतका निधी व महानगरपालिकेस प्राप्त झालेला आहे. या निधीपैकी छावणी परिषद कटक मंडळ यांना रु.४८,४१,१६६/- यांना वर्ग करण्यात आला आहे. सदरील प्राप्त रक्कमेतून कटक मंडळाची रक्कम वजा जाता रक्कम रु.३१,५१,५८,८३४/- एवढी रक्कम या योजनेच्या स्वतंत्र खात्यात जमा आहे.

यानुसार औरंगाबाद महानगरपालिकेने दि.१३.१०.२०२१ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभा विषय क्रं.२०७/२०२१ रोजी ठराव घेऊन १५ व्या वित्त आयोगातून या योजनेतील कामे करण्यास मान्यता प्राप्त आहे. वातावरणातील हवेची गुणवत्ता सुधारण्याकरिता बंधनकारक अनूदानातून खालील प्रस्तावित कामास मान्यता मिळाली व त्यानूसार संबंधित विभागाने 'ई' निविदा प्रक्रियेद्वारे खालील नमूद सर्व कामे प्रगतीपथावर आहेत.

| सभोवतालच्या हवेची गुणवत्ता | रक्कम रुपये |
|---|---|
| शहरातील उड्डाणपुलाखाली व प्रमुख पुलांवर व्हर्टीकल गार्डनची उभारणी करणे | ९९,९५,८१६.०० |
| मनपाच्या प्रमुख उद्यानातील कारंजाचे नुतनीकरण करुन तीन वर्ष देखभाल दुरुस्ती करणे | १,९९,६५,६२५.०० |
| शहरातील मुख्य चौकामध्ये नविन कारंजाची उभारणी करुन तीन वर्ष देखभाल दुरुस्ती करणे | २,९९,९९,०००.०० |
| औरंगाबाद शहरातील विविध मुख्य रस्त्यावर रस्ता दुभाजक, फुटपाथ बांधणे व दुभाजकात झाडे लावणे. (३१.६० कि.मी.) | १९,९९,९६,०१९.०० |
| एकूण रुपये | २५,९९,५६,४६०.०० |

दि.१४.१०.२०२१ रोजी श्री.अशोक शिनगारे, मा.सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, यांच्या प्राप्त पत्रानूसार इलेक्ट्रीक वाहन धोरण-२०२१ व राष्ट्रीय शुध्द हवा कार्यक्रम यांच्या एककेंद्रभिमूखक्ता धोरणानूसार सुधारित शहर कृती आराखडा सादर करणे बाबत सूचना प्राप्त झाल्या त्या नूसार औरंगाबाद महानगरपालिकेने शहराचा EV Convergence संदर्भात शहर कृती आराखडा दिनांक ३ फेब्रुवारी २०२२ रोजी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास सादर केला. १५ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनूसार औरंगाबाद महानगरपालिकेस वित्तीय वर्ष सन २०२०-२१ ते २०२५-२६ पर्यंत एकूण निधी रु.११९.०० कोटी प्रस्तावित आहे. त्या नूसार औरंगाबाद महानगरपालिकेने ८० टक्के EV Convergence plan चे जवळपास ९३.३ कोटी रुपयांची कामे प्रस्तावित केली आहे. त्याचे कार्यनिहाय विवरण खालील प्रमाणे आहे.

Under EV Convergence AMC To allocate Rs 93.3 Cr to EV Convergence (in 3 years )

| Sr.No. | Proposed Works | Estimate Cost |
|---|---|---|
| 01 | E-Cycle and Track Sharad Mobility | 8 Cr. |
| 02 | Public charging stations come up in city at identified locations for the public | 9.3 Cr. |
| 03 | Swapping/Transfer stations | 11 Cr. |
| 04 | Retrofitiment of 6000 petrol Auto rickshaws at subsidy | 15 Cr. |
| 05 | E-swm vehicles | 20 Cr. |
| 06 | 60 E Buses | 30 Cr. |
| | Total Rs. | 93.3 Cr. |

उक्त नमूद नुसार प्रथम टप्यांमधील प्राप्त निधी पैकी छावणी कटक मंडळास वर्ग केलेली रक्कम वजा जाता रु.३१,५१,५८,८३४ एवढी रक्कम या योजनेच्या स्वतंत्र खात्यात जमा आहे. या योजनेतून शहरातील हवेची गुणवत्ता सुधारणेसाठी वर नमूद केल्यानूसार र.रु.२५,९९,५६,४६०.०० येवढा खर्च अपेक्षित आहे. म्हणजे रु.(३१,५१,५८,८३४ - २५,९९,५६,४६०) म्हणजे रु.५,५२,०२,३७४.०० येवढी रक्कम शिल्लक रहाते.

सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात सदरील योजनेसाठी रु.१५.६९ कोटी (Tied Grant) व प्रोत्साहनपर रक्कम रु.७.२ कोटी (Incentive Grant) अशी खालील तक्त्यानुसार रक्कम एकत्रित रक्कम म्हणजे

| अ.क्र. | रक्कमे बाबत | एकूण रक्कम |
|---|---|---|
| ०१ | प्राप्त निधीतील ऊर्वरीत रक्कम | रु.५.५२ कोटी |
| ०२ | सन २०२१-२२ या आर्थिक वर्षातील प्राप्त रक्कम | रु.१५.६९ कोटी |
| ०३ | सन २०२१-२२ या आर्थिक वर्षातील प्राप्त रक्कम प्रोत्साहनपर रक्कम | रु.७.२ कोटी |
| | **एकूण रक्कम** | रु.२८.४१ कोटी |

एकूण र.रु.२८.४१ कोटी हि शहराच्या EV Convergence Plan अंतर्गत **माझी स्मार्ट बससाठी** वापरणे बाबत मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिली आहे. करिता उक्त नमूद नूसार या योजनेतील एकत्रित र.रु.२८.४१ कोटी हि शहरातील EV Convergence Plan साठी खर्च करण्याच्या व प्रकल्प कार्यान्वीत होण्याच्या दृष्टीने मा.सर्वसाधारण सभेसमोर द्यावयाचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्रमांक 437/2022:-**

प्रस्तावात नमूद केल्यानूसार १५ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनूसार ऊर्वरीत रक्कम, सन २०२१-२२ या आर्थिक वर्षातील प्राप्त निधी, प्रोत्याहनपर निधी अशी एकूण **रु.२८.४१ कोटी** रक्कम शहराच्या EV Convergence Plan अंतर्गत **माझी स्मार्ट बस** प्रकल्प कार्यान्वीत होण्याच्या **दृष्टीने नियमानुसार** खर्च भागविण्यात यावा. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 438/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.29.06.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या विविध प्रकरणात विधीज्ञ यांची नेमणुक करण्यात येते. पॅनल वरील विधीज्ञ यांना देण्यात येणारी फीस विविध प्रकरणात महानगरपालिकेची बाजु मांडणेसाठी प्रति दावा/याचिका प्रमाणे दर खालील प्रमाण निश्चित केले आहे. खालील प्रमाणे निश्चित केले आहे.

| Sr. No. | Types of Cases | Aurangabad AMC Fee Structure | Aurangabad Proposed Fee |
|---|---|---|---|
| **I** | **Cases Filed in District Court** | | |
| 1<br>2<br>3<br>4<br>5 | Regular Civil Suit<br>Municipal Appeal<br>Election<br>Petition/Application<br>Motor Accident Cases | Rs. 5000/-<br>For all cases filed in District Court | Rs. 8000/-<br>For all cases filed in District Court |

| | | | |
|---|---|---|---|
| 6 | Cases Pertaining to enforcement of Court Orders<br>MCA | | 5000/- |
| **II**<br>1<br>2<br>3 | **Caveats**<br>Court Labour & Industrial Court<br>Bombay High Court<br>Session & District Court | Rs. 2000/-<br>Rs. 2000/-<br>Rs. 2000/- | Rs. 2000/-<br>Rs. 2000/-<br>Rs. 2000/- |
| **III**<br>1.<br><br>2.<br><br><br>3.<br>4.<br><br>5. | **Criminal Cases**<br>Cases Pertaining to Illegal Slaughter & Sell of Meat.<br>All other Cases (Cheque Bounce.<br><br><br>PCPNDT, Illegal Tree Cutting ETC.<br>Criminal Appeals, Revision & Review Application.<br>Criminal M.A. | -<br><br>-<br><br><br>Rs. 5000/-<br>Rs. 5000/-<br><br>- | Rs. 6000/-<br>As per previos order of Commissioner 2021.<br>Rs. 6000/-<br>Rs. 6000/-<br><br>Rs. 6000/- |
| **IV** | **Labour/Industrial Court SPL.CS** | Rs. 5000/- | Rs. 10000/- |
| **V** | **Misc Application RCA** | Rs. 5000/- | Rs. 8000/- |
| **VI** | Title Clearance Certificate in respect of T.D.R. proposals (Including Opinion in Respect of Objections/queries asked by the concerned Dep) | Rs. 10000/-<br>+<br>Including Expenditure All | Rs. 10000/-<br>+<br>Advertisement Expenditure |
| **VII**<br>1.<br>2. | **Agreements**<br>Drafting of Agreement<br>Vetting of Agreement | Rs. 5000/-<br>- | Rs. 5000/-<br>- |
| **VIII** | **Opinion** | - | As per demand and proposed by Law Officer. |
| **IX** | Cases Pertaining to Courts Beyond Jurisdiction | - | Power to Commissioner |
| X | Cases Pertaining to Slum Tribunal, Competent Authority Consumer State Commission, National Human Right Commission, MACT (Mumbai) | - | Power to Commissioner |
| XI<br>1.<br><br>2.<br><br>3. | Bombay High Court Cases<br>Where Corporation is Respondent<br><br>Where Corporation is Petitioner/ Applicant / Appellant etc.<br><br>Public Interest Litigation | Rs. 10000/-<br><br>Rs. 10000/-<br><br>--- | Rs. 15000/-<br>Rs. 15000/-<br>(Connecting Matters 10,000/- Fees)<br>Per Matter 25000/-<br>Per Affidavit 2000/- |
| XII | Supreme Court | Power to Commissioner | Power to Commissioner |
| XIII<br>XIV<br>XV | Consumer Court<br>Wakf Tribunal<br>SLR, DLR, City Survey | Rs. 8000/-<br>Rs. 5000/-<br>Rs. 7000/- | Rs. 8000/-<br>Rs. 8000/-<br>Rs. 8000/- |
| XVI | Special Case | Power to Commissioner | Power to Commissioner |
| XVII | National Green Tribunal | Power to Commissioner | Power to Commissioner |
| XVIII | Mantralaya Cases | Power to Commissioner | Power to Commissioner |

वरील दरास मान्यता देणेसाठीचा प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक 438/2022:-**

प्रस्तावीत केल्याप्रमाणे विधीज्ञ यांना देण्यात येणारी फी विविध प्रकरणात महानगरपालिकेची बाजु मांडणेसाठी प्रति दावा/याचिका प्रमाणे दरास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 439/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.29.06.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 313,376,377,378 व 386 अन्वये व्यवसाय करण्यासाठी महानगरपालिकेचे व्यवसाय परवाना असणे आवश्यक असल्याने उक्त कलमा आधारे महानगरपालिका मा.सर्वसाधारण ठराव क्र.743 दि.11.11.2017 अन्वये ठराव पारीत करण्यात आला होता. त्यानुसार महापालिका क्षेत्रातील विविध व्यवसायांकरीता परवाना शुल्क आणि नुतणीकरण शुल्क निश्चिती करण्यात आली असून यास शासनाने दि.26.11.2020 रोजी जा.क्र./प्र.क्र.94/नवि-24 अन्वये मान्यता दिलेली आहे.

महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणावर व्यावसायीक आस्थापना आहेत. व्यावसायीका कडून आवश्यक ती कागदपत्रे प्राप्त करुन याची नोंदणी करणे, प्रमाणपत्र वितरीत करणे आणि नुतनीकरण करणे आणि शुल्क वसुल करणे इ.कामे करण्यासाठी महानगरपालिकेकडे पुरशी यंत्रणा व मनुष्यबळ नसल्याने सदरील कामे खाजगी एजन्सी मार्फत करण्यासाठी प्रशासकीय मान्यता झालेली आहे. त्यानुसार परवाना शुल्क वसुल करण्यासाठी निविदा मागविण्यात आली होती. यामध्ये एकूण 04 निविदा धारकांनी सहभाग नोंदविला होता. खालील प्रमाणे सर्व चारही निविदाधारक तांत्रिकदृष्ट्या पात्र ठरले.

1. मे.कोअर प्रोजेक्ट इंजिनिअर्स ॲण्ड कन्सलटंट प्रा.लि.
2. मे.सार आय.टी. टेक्नॉलॉजी रिसोर्सेस प्रा.लि.
3. मे.ओर्नेट टेक्नॉलॉजी
4. मे.स्थापत्य कन्सलटंट इंडिया प्रा.लि.

वरील चारही निविदाधारकांना सादरीकरणासाठी बोलाविण्यात आले होते. त्यापैकी 1.मे.सार आय.टी. रिसोर्सेस प्रा.लि. 2. मे.ओर्नेट टेक्नॉलॉजी यांनी सादरीकरण केले. सर्वांचे Qualithy Cum Cost Best Selection &(QCBS) आधारे तांत्रिक, सादरीकरण आणि आर्थिक दरांचे गुणांकन करण्यात आले. त्यानुसार नवीन उद्योगधंदा सर्वेक्षण आणि व्यवसाय उद्योगधंदा परवाना वाटप व नुतनीकरण या दोन्ही करीता दर निश्चिती करण्यात आली.

उपरोक्त प्रमाणे कार्यवाही अंती मे.ओर्नेट टेक्नॉलॉजी यांचे खालील दरास निविदा अंतिम करुन मान्यता देण्यात आलेली आहे.

1. नवीन उद्योगधंदा सर्वेक्षण रु.395/- प्रति सर्वेक्षण
2. व्यवसाय उद्यागधंदा परवाना वाटप व नुतनीकरण रु.245/- प्रति व्यावसायीक

वरील प्रमाणे मे.ओर्नेट टेक्नॉलॉजी यांचे उपरोक्त प्रमाणे निविदा व दर मान्यतेस्तव तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्रमांक 439/2022:-**

प्रसतावात नमुद केल्याप्रमाणे मे.ओर्नेट टेक्नॉलॉजी यांचे प्राप्त दरास निविदा अंतिम करुन मान्यता देण्यात येते आहे.

1. नवीन उद्योगधंदा सर्वेक्षण रु.395/- प्रति सर्वेक्षण
2. व्यवसाय उद्यागधंदा परवाना वाटप व नुतनीकरण रु.245/- प्रति व्यावसायीक

वरील प्रमाणे मे.ओर्नेट टेक्नॉलॉजी यांचे उपरोक्त प्रमाणे निविदा व दरास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी

**प्रस्ताव क्रमांक 440/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.29.06.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहराला ऐतिहासिक अशी पार्शवभुमी लाभलेली असून शहरात विविध ऐतिहासिक व पर्यटन स्थळे स्थित आहेत. या शिवाय शहरांचे औद्योगिक क्षेत्रातही अग्रेसर आहे. या कारणाने शहरात वास्तव्यास असणाऱ्या व येणाऱ्या नागरीकांच्या संख्या मोठी असून ऐतिहासिक अशा पर्यटन स्थळाला भेट देणाऱ्या देशी-विदेशी पर्यटकांची संख्याही लक्षणीय राहते. तसेच शहरात रोजगारासाठी व शिक्षणासाठी येणाऱ्या नागरिकांची, विद्यार्थी यांचीही संख्या मोठी असून शहर कालाओघात शैक्षणिक दृष्ट्या प्रगत व अग्रेसर राहिलेले आहे.

औद्योगिकरण वाढती लोकसंख्या या व इतर कारणाने शहरचा अमर्याद विकास झालेला आहे व होत आहे. मात्र यामुळे व मानवी हस्तक्षेप वाढल्याने प्रदुषणाचे प्रमाण वाढलेले असून त्यास पाबंद घालणे व सुधारणा करणे यासाठी प्रामुख्याने शहरातून वाहणारी ऐतिहासिक अशा खाम नदीतील प्रदुषण कमी करणे, नागरीकांसाठी आल्हाददायक वातावरणाची निर्मिती करणे, नदीकाठी पाणी धारण क्षमता वाढविणारे झाडे लावणे इ.उपाय योजना करणे आवश्यक वाटते.

याच अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने माझी वसुंधरा प्रकल्प हाती घेतला आहे. या अभियानाचा उद्येश हा प्रामुख्याने नदी/नाला यांचे प्रदुषण कमी करणे, वातावरणातील हवेची शुध्दता वाढविणे, नागरीकांसाठी सुयोग्य वातावरण निर्मिती करणे, नागरीकांमध्ये जागृती निर्माण करणे हा आहे.

याच उद्येशातहत औरंगाबाद महानगरपालिकेने खाम नदी पुर्नःजीवन व सौंदर्यीकरण प्रकल्प हाती घेतला असून या उपक्रमांअंतर्गत आतापर्यंत सामाजीक जाणीवेतून व शहरातील काही उद्योग समुहाची मदत घेऊन दृष्य स्वरुपाचे काम, कार्यालयाची मशिनरी व मनुष्यबळ वापरून काम केले आहे. तथापि, नदीचे विस्तीर्ण स्वरुप, लांबी प्रदुषणाची पातळी या बाबी विचारात घेता, मोठ्या स्वरुपाचे काम हाती घेणे आवश्यक असल्याचे आढळून आले.

त्यास्तव प्रकल्प अहवाल (Detailed Project Report) तयार करण्यासाठी ई-निविदा काढून पात्र प्रकल्प व्यवस्थापन सल्लागर (Project Management Consultant) Ecosttava Environmental Solutionas Pvt.Ltd. Aurangabad यांची 2.0% दराने नियुक्ती करण्यात आली असून त्यांनी सर्वेक्षणा आधारे विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) या कार्यालयात सादर केला आहे. त्यात प्रामुख्याने पुढील बाबींचा समावेश आहे.

(1) Repairing existing Compound Wall (2) Drip irrigation of trees and plantation along riverf and public spaces created along the bank (3) Retaining wall and filling from Lokhandi Pool to Panchakki (4) Dust Bin-60 nos (5) Seating Benches-60 nos (6) Porta Cabin for security person, ticket counter and toilet black (7) Lighting arrangement with soloar poles.

या कामाद्वारे शहरातील नागरीकांना खामनदी पात्रात वावरणेसाठी चांगला पॅसेज/पाथ-वे तयार होणार असून शहरातील नागरीक याचा लाभ घेऊ शकतील. तसेच सदरच्या कामाद्वारे खामनदी पात्रातील प्रदुषण कमी करण्याच्या प्रयत्नाला नागरीकांच्या सहकार्याची जोड मिळून नागरीकांमध्ये पर्यावरणाबाबत व शहरातील प्रदुषण कमी करण्याच्या अनुषंगाने जागृती निर्माण होऊ शकेल.

त्यास्तव या कामाचे सा.बां.दरसुची सन 2021-2022 नुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर कामासाठी लागणारी आर्थीक तरतुदीसाठी 15 व्या वित्त आयोगातून निधीतून प्रस्तावीत करण्यात येत असून मंजुरीनंतर निधी उपलब्ध होणेसाठी प्रस्ताव शासनाच्या पर्यावरण मंत्रालयास सादर केला जाणार आहे. तरी या कामाचे अंदाजपत्रक एकूण र.रु.3,96,00,259/- यास मंजुरी देणे, निविदा काढणे व इतर अनुषंगीक कार्यवाही करणेस तसेच या कामाच्या अनुषंगाने आवश्यक ते सर्व निर्णय घेण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना प्रदान करणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्रमांक 440/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, खामनदीचे पुनःर्जीवन व सौंदर्यीकरण अंतर्गत खामनदी पात्रात पाथ-वे तयार करणे व इतर अनुषंगीक कामे करणे या बाबतच्या अंदाजपत्रक र.रु.3,96,00,259/- यास व या अनुषंगाने ई-निविदा काढणे शासनास निधी मागणीसाठी प्रस्ताव सादर करणे व या कामाच्या अनुषंगाने मा.आयुक्त यांना मंजुरी प्रदान करणेच्या सादर प्रस्तावास मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 441/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.29.06.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती शिल्पा तोताराम बहुरे, शिक्षणसेवक, वीर हुतात्मा भाई कोतवाल प्राथमिक विद्यामंदिर नगर परिषद, माथेरान, तालुका कर्जत, जिल्हा रायगड या शाळेवर शिक्षणसेविका म्हणून सद्यस्थितीमध्ये कार्यरत असून औरंगाबाद महानगरपालिका येथे आस्थापनेवर वर्ग करून घेण्याची विनंती केली आहे.

संबंधीत शिक्षणसेविका यांचे सासरे श्री.केसरसिंग चंपालाल सुलाने यांचे शासकीय कर्करोग रुग्णालय औरंगाबाद येथे (Stage IV Prostate Cancer) कॅन्सरचा उपचार चालूआहे. त्यांची सेवा व देखभाल करण्यासाठी कोणीही नाही.

मुख्याधिकारी माथेरान गिरीस्थान नगरपरिषद तालुका कर्जत जिल्हा रायगड यांनी श्रीमती शिल्पा तोताराम बहुरे यांना औरंगाबाद महानगपालिकेस सेवा वर्ग करण्याबाबत ना-हरकत प्रमाणपत्र दिले आहे.

करीता, श्रीमती शिल्पा तोताराम बहुरे, शिक्षणसेविका, वीर हुतात्मा भाई कोतवाल प्राथमिक विद्यामंदिर नगर परिषद, माथेरान, तालुका कर्जत, जिल्हा रायगड यांना औरंगाबाद महानगरपालिकेत शिक्षण विभागाच्या आस्थापनेवर विशेष बाब म्हणुन सेवा वर्ग करण्यासाठी मा.सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 441/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमती शिल्पा तोताराम बहुरे, शिक्षणसेवक, वीर हुतात्मा भाई कोतवाल प्राथमिक विद्यामंदिर नगर परिषद, माथेरान, तालुका कर्जत, जिल्हा रायगड यांना एकतर्फी आंतरजिल्हा बदलीने विशेष बाब म्हणुन औरंगाबाद महानगरपालिका शिक्षण विभागाच्या आस्थापनेवर सेवा वर्ग करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 442/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.29.06.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.सुभाष रामा निरपगारे, मजुर,पशुसंवर्धन विभाग, महानगरपालिका औरंगाबाद यांनी स्वतःच्या आईच्या नामे श्रीमती कचराबाई निरपगारे (मयत) यांच्या DM with Ht with accute IWMI with Cardiagenic shock with AKI (हृदयाचे आजार) या आजारावर खाजगी रुग्णालय सिटी केअर सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल औरंगाबाद येथे उपचार घेतलेला आहे. या आजारावर र.रु.1,82,773/- इतका खर्च केला आहे.

त्यापैकी अनुज्ञेय नसलेली र.रु.13,328/- वजा जाता रु.1,69,445/- शिल्लक राहते. शिल्लक रक्कमेच्या 90% रु.1,52,500/- इतके होते. एकुण खर्च 5 टक्के र.रु.9,138/- ही मनपा फंडात जाम करुन मंजुर देय र.रु.1,43,362/- संबंधीतास अदा करावयाची आहे.

सदरील रुग्णालय शासकीय रुग्णालयाप्रमाणे प्रतिपुर्ती अनुज्ञेयसाठी शासन मान्यता दिलेल्या खाजगी रुग्णालयाची अद्यावत दि.16.11.2011 पर्यंत प्रसिध्द करण्यात आलेल्या रुग्णालयाच्या यादीत सदरील रुग्णायाचे नाव समाविष्ट नाही.

वरील शासन निर्णयामधील प्रतिपुर्तीच्या अनुज्ञेयतेची कमाल मर्यादा व मंजुरीचे अधिकाराबाबत महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम 1961 व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील तरतुदींच्या अधिन राहून रु.1,00,000/- (रुपये एक लाख फक्त) पर्यंतच्या वैद्यकीय खर्चाच्या मंजुरीचे अधिकार संबंधीत विभागाच्या विभाग प्रमुखांना देण्यात आलेले आहे. तसेच रु.1,00,000/- (रुपये एक लाख फक्त) पेक्षा जास्त वैद्यकीय देयक रक्कमेस मंजुरीचे अधिकार मा.आयुक्त यांना असून रु.2,00,000/- पेक्षा जास्त वैद्यकीय देयक रक्कमेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. सदरच्या प्रस्तावास पडताळणी करुन वैद्यकीय प्रतिपुर्तीसाठी आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी शिफारस केलेली आहे.

करीता श्री.सुभाष रामा निरपगारे, मजुर, पशुसंवर्धन विभाग, महानगरपालिका औरंगाबाद यांना शासन निर्णयामधील तरतुदीच्या अधिन राहून रु.1,00,000/- (रुपये एक लाख फक्त) च्या 5 टक्के रक्कम मनपा फंडात जमा करण्यात येऊन उर्वरित र.रु.95,000/- (रुपये पंच्च्यान्नव हजार) वैद्यकीय खर्चास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 442/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.सुभाष रामा निरपगारे, मजुर,पशुसंवर्धन विभाग, महानगरपालिका औरंगाबाद यांनी स्वतःच्या आईच्या नामे श्रीमती कचराबाई निरपगारे (मयत) यांच्या DM with Ht with accute IWMI with Cardiagenic shock with AKI (हृदयाचे आजार) या आजारावर खाजगी रुग्णालय सिटी केअर सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल औरंगाबाद येथे उपचार घेतलेला आहे. नियमाप्रमाणे एकूण र.रु.95,000/- (रुपये पंच्च्यान्नव हजार) खर्च अनुज्ञेय करण्यात आलेला आहे. सदर रक्कम संबंधीतास अदा करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 443/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.29.06.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, एन-10, टि.व्ही. सेंटर हडको येथे PG-4 या आरक्षीत जागेवर औरंगाबाद महानगरपालिकेने 50 दुकाने बांधून येथे छत्रपती श्री संभाजी राजे वाणिज्य तथा क्रिडा संकुलाचे बांधकाम केले आहे. या संकुलातील बहुतांश गाळे धारकांनी त्यांना प्रदान करण्यात आलेल्या गाळ्यामध्ये अनुज्ञेय व्यवसाय सुरु केला आहे. सदर भाग हा सिडको-हडको भागातील मुख्य बाजारपेठ असल्याने येथे

येणाऱ्या नागरीकांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. याठिकाणी मनपाचे सार्वजनिक वापरा करीताचे शौचालय नसल्याने नागरीकांची ग्राहक वर्गाची व विशेषत: महिलाची गैरसोय होते.

त्यास्तव या संकुलाच्या उत्तर पुर्व कोपऱ्यामध्ये PG-4 या आरक्षित जागेतील टि.व्ही.रिले सेंटर लगतच्या शिल्लक जागेत BOT तत्वावर पे ॲण्ड युज पध्दतीवर चालविले जाणारे शौचालय नागरीकांच्या सार्वजनिक वापराकरीता मे.सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हिस ऑर्गनायझेशन मुंबई यांनी बांधण्याची तयारी दर्शविली होती. सदर बाबीस औरंगाबाद शहर विकास योजनेनुसार स्टेडियम साठी चा संलग्न वापर म्हणुन शौचालय बांधणे अनुदेय असल्याने प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

तरी सदर ठिकाणी मे.सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हिस ऑर्गनाझेशन मुंबई यांन त्यांचे संस्थेच्या CSR यांना फंडातून BOT तत्वावर बांधून पे ॲण्ड युज पध्दतीवर चालविणे तसेच या शौचालयाचे पुढील 30 वर्षे संपुर्ण स्वखर्चाने (संस्थेच्या) शौचालयाचे संचलन व व्यवस्थापन करणे यास अनुमती देणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 443/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एन-10, टि.व्ही. सेंटर हडको येथे PG-4 या आरक्षीत जागेवर औरंगाबाद महानगरपालिकेने 50 दुकाने बांधून येथे छत्रपती श्री संभाजी राजे वाणिज्य तथा क्रिडा संकुलाचे बांधकाम केले आहे. या संकुलाच्या उत्तर पुर्व कोपऱ्यामध्ये PG-4 या आरक्षीत जागेतील टि.व्ही.रिले सेंटर लगतच्या शिल्लक जागेत BOT तत्वावर पे ॲण्ड युज पध्दतीवर चालविले जाणारे शौचालय नागरीकांच्या सार्वजनिक वापराकरीता मे.सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हिस ऑर्गनायझेशन मुंबई यांना त्यांच्या CSR फंडातून बांधण्याची व पुढील 30 वर्षे संस्थेच्या खर्चाने संचलन व व्यवस्थापन करण्यास मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानिक काग्रवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 444/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.29.06.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सेव्हन हिल जालना रस्ता येथे औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या व ताब्यातील अग्निशमन दल कार्यालयाच्या जागेवर शहरातीलअग्रगण्य सामाजिक संस्था मे.माहेश्वरी मंडळ औरंगाबाद यांनी सामाजिक जाणीवेतून व त्यांच्या या संस्थेच्या माध्यमातून CSR फंडातून पे ॲण्ड युज पध्दतीचे शौचालय इमारतीचे बांधकाम पुर्व मंजुरीनुसार पुर्ण केले आहे.

तथापि, कोरोना या साथ रोगाच्या संसर्ग काळात त्यांच्या संस्थेकडील निधीत कमतरता झाल्याने या शौचालयाची अंतर्गत व बाहेरील शिल्लक कामे करणे या शौचालय प्री-कास्ट कुंपण भींत बांधणे, शौचालयाची जोडणी मनपाच्या जलनि:स्सारण वाहिनीला करणे, पिण्याचे पाणी उपलब्ध होणेसाठी नळ कनेक्शन घेणे या बाबी त्यांना शक्य नसल्याचे त्यांनी कळविले असून ही शिल्लक कामे महानगरपालिकेच्या माध्यमातून पुर्ण करणे बाबत विनंती केली होती.

पुर्वी शहरात मे.आधार फाऊंडेशन, मुंबई यांनी BOT तत्वावर सहा ठिकाणी पे ॲण्ड युज पध्दतीवर चालविली जाणारी शौचालये बांधली असून ती नागरीकांच्या सार्वजनिक वापराकरीता खुली करण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर संस्थेस विचारणा केली असता, त्यांनी सदर शौचालयाचे पुढील 30 वर्ष कालावधीकरीता संचलन व व्यवस्थापन करण्याची अनुमती दिल्यास या शौचालयाची शिल्लक कामे त्यांच्या संस्थेच्या फंडातून CSR च्या माध्यमातून करण्याची तयारी दर्शविली होती. त्यानुसार त्यांना सदर ठिकाणी शिल्लक कामे पुर्ण करण्यास व या शौचालयाची कामे पुर्ण झाल्यानंतर करारनामातील अटी व शर्तीनुसार पुढील 30 वर्षे स्वखर्चाने संचलन व व्यवस्थापन करण्यास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे व या अनुषंगाने त्रिपक्षीय करार मे.आधार फाऊंडेशन, मुंबई व माहेश्वरी मंडळ, औरंगाबाद तसेच महानगरपालिका औरंगाबाद असा करण्यास तसेच सदर शौचालयाची शिल्लक कामे त्यांच्या संस्थेच्या CSR फंडातून करण्यास शौचालयाचे संपुर्ण संचलन व व्यवस्थापन पुढील 30 वर्षाकरीता करण्यास अनुमती प्रदान करणे सदरचे शौचालय पे ॲण्ड युज तत्वावर चालविणे तसेच या शौचालयाचे संचलन व व्यवस्थापन करणे बाबत प्रस्ताव विचारार्थ तथ मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 444/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सेव्हन हिल, जालना रस्ता येथील औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या व ताब्यातील जागेवर व मनपा अग्निशमन दल कार्यालयाच्या परिक्षेत्रात मे.माहेश्वरी मंडळ औरंगाबाद यांनी त्यांच्या संस्थेचा CSR फंडातून बांधलेल्या शौचालय बांधून पुर्ण केले आहे. तथापि त्यांनी या शौचालयाची शिल्लक काम पुर्ण करण्यास संस्थेकडे पुरेसा निधी नसल्याने सदरील कामे मनपाच्या माध्यमातुन करणे बाबत विनंती केली होती. या अनुषंगाने मे.आधार फाऊंडेशन मुंबई यांनी संमती दर्शविल्यानुसार या शौचालयाची शिल्लक कामे त्यांच्या संस्थेच्या CSR फंडातून पुर्ण करणे व सदर शौचालय पे ॲण्ड युज तत्वावर

चालविणे तसेच पुढील 30 वर्षाकरीता मे.आधार फाऊंडेशन, मुंबई स्वखर्चाने संचलन व व्यस्थापन करणे तसेच यासाठीचा त्रिपक्षीय करार मे.आधार फाऊंडेशन, मुंबई-माहेश्वरी मंडळ औरंगाबाद तसेच महानगरपालिका औरंगाबाद असा करणे या बाबीस मान्यता प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 445/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.29.06.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.94 अंतर्गत जालाननगर व राजनगर भागात पुर्नःडांबरीकरण करण्याच्या कामाचे अं.प.र.रु.39,78,756/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. मान्यतेअंती सदरील कामाचा कार्यादेश मे.अरोरा कन्स्ट्रक्शन यांना अंदाजपत्रकीय दरापेक्षा 3.12% कमी दराने पारीत करण्यात आला आहे. सदरील कामाचे अंदाजपत्रक माहे डिसेंबर-2013 मध्ये करण्यात आले होते. प्रत्यक्ष काम माहे मार्च-2016 मध्ये करण्यात आले. दरम्यानच्या कालावधीमध्ये रेल्वेस्टेशन उड्डाणपुल व सेवा रस्त्यावर मोठ मोठे खड्डे पडलेले असल्यामुळे सदर रस्त्याची दुरुस्ती करण्यासाठी नागरीकांची मागणी होत असल्याने तत्कालीन मा.आयुक्त यांनी प्रत्यक्ष स्थळावर पाहणीकरुन उड्डाणपुलावरील रस्त्याचे व सेवा रस्त्याचे पॅचवर्क त्वरीत पुर्ण करण्यासाठी आदेशीत केले. त्यानुषंगाने मुळ कामाचे कंत्राटदार मे.अरोरा कन्स्ट्रक्शन यांच्या मार्फत सदरील रस्त्याचे पॅचवर्कचे काम करुन घेण्यात आलेले आहे. सदर पॅचवर्कच्या वाढीव कामामुळे अंदाजपत्रकीय खर्चात र.रु.32,35,351/- एवढी वाढ होत आहे.

सदरील कामाचे दुसरे व दरम्यानचे देयकापर्यंतची रक्कम आणि वाढीव कामाचे अंदाजपत्रकीय रक्कम अशी एकुण रु.76,13,000/- इतकी सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम असून त्यास सदरील कामाच्या संचिकेतील परि.क्र.81 ते 91 नुसार प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. वाढीव कामासह सदरील कामाचे तिसरे व अंतिम देयक तत्कालीन शाखा अभियंता व उपअभियंता, वॉर्ड कार्यालय-ड यांनी मोजमाप पुस्तिका क्र.5042 मध्ये नोंदवून सादर केले आहे.

करीता, उक्त कामाचे सुधारित अं.प.र.रु.76,13,000/- मान्यतेस्तव तथा मान्यतेअंती सदरील काम या कामाचे मुळ कंत्राटदार मे.अरोरा कन्स्ट्रक्शन यांच्या कडून मुळ मंजुर निविदा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा 3.12% कमी दराने करुन घेणेचा कार्योत्तर प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक 445/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सदर कामाचे सुधारीत अं.प.र.रु.76,13,000/- चे सदरील काम या कामाचे कंत्राटदार मे.अरोरा कन्स्ट्रक्शन यांच्या कडून मुळ मंजुर निविदा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा 3.12% कमी दराने करुन घेणेचा प्रस्तावास कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 446/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.29.06.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, देशामध्ये व राज्यामध्ये कोव्हिड-19 या विषाणुचा प्रार्दुभाव झाल्यामुळे Pandemic ची साथ संपुर्ण जग, देश व राज्यामध्ये पसरली असून कोव्हिड-19 हा साथरोग नियंत्रित करण्याची आवश्यकता आहे. औरंगाबाद शहरामधील कोव्हिड-19 विषाणु बाधित रुग्णांची सद्यस्थिती व त्यावरील उपाय योजना करण्यात येत आहे.

सन 2020-21 या आर्थिक वर्षात कोव्हिड-19 प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्याकरीता जा.क्र./ जिनिस/जिवायो निवि/ कोव्हिड-19/2020-21/450 दि.18.02.2021 या निधी वितरण आदेशामधील अ.क्रमांक सेंट्रल ऑक्सिजन लाईनसाठी लागणारा खर्च यासाठी रु.42 लक्ष व अ.क्र.3 जम्बो सिलेंडरसाठी लागणारा खर्च रु.99 लक्ष निधी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन 2020-21 अंतर्गत जिल्हा नियोजन समितीकडून प्राप्त झालेला आहे.

यामधून जम्बो ऑक्सिजन सिलेंडरची खरेदी व सेंर्टल ऑक्सिजन पाईपलाईन उभारणीसाठी अंदाजीत र.रु.1,60,00,000/- (अक्षरी एक कोटी साठ लक्ष फक्त) करीता दुसऱ्या वेळेस Tender ID No.2021_ AMCA_678249_2 Date 22.04.2021 अन्वये निविदा मागविण्यात आलेली आहे.

उपरोक्त प्रमाणे मागविण्यात आलेल्या निविदेस मा.सर्वसाधारण सभेच्या कार्योत्तर मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव क्रमांक 446/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे सन २०२०-२१ या आर्थिक वर्षासाठी कोविड-१९ प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी आरोग्य विभागाअंतर्गत जम्बो ऑक्सिजन सिलेंडरची खरेदी व सेंट्रल ऑक्सिजन पाईपलाईन उभारणीसाठी अंदाजित रक्कम रूपये १,६०,००,०००/- (अक्षरी एक कोटी साठ लक्ष फक्त) करीता दुसऱ्या

वेळेस Tender ID No.2021_AMCA_678249_2 Date:-22.04.2021 प्रमाणे मागविण्यात आलेल्या निविदेस कार्योत्तर मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 447/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि. 29.06.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, देशामध्ये व राज्यामध्ये कोविड-१९ या विषाणुचा प्रार्दुभाव झाल्यामुळे Pandemic ची साथ संपुर्ण जग, देश व राज्यामध्ये पसरली असुन कोविड-१९ हा साथरोग नियंत्रित करण्याची आवश्यकता आहे. औरंगाबाद शहरामधील कोविड १९ विषाणु बाधित रूग्णांची सद्यस्थिती व त्यावरील उपाययोजना करण्यात येत आहे.

सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात कोविड-१९ प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याकरीता जा.क्र./जिनिस/जिवायो-निवि/कोव्हिड-१९/२०२०-२१/४५० दि.१८.०२.२०२१ या निधी वितरण आदेशामधील अ.क्रमांक २ सेंट्रल ऑक्सिजन लाईनसाठी लागणारा खर्च यासाठी रूपये ४२ लक्ष व अ. क्र. ३ जम्बो सिलेंडरसाठी लागणारा खर्च यासाठी रूपये ९९ लक्ष निधी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२०-२१ अंतर्गत जिल्हा नियोजन समितीकडून प्राप्त झालेला आहे.

यामधून जम्बो ऑक्सिजन सिलेंडरची खरेदी व सेंट्रल ऑक्सिजन पाईपलाईन उभारणीसाठी अंदाजित र.रू.1,60,00,000/- (अक्षरी एक कोटी साठ लक्ष फक्त) करीता दुसऱ्या वेळेस Tender ID No.2021_AMCA_678249_2 Date:- 22.04.2021 अन्वये निविदा मागविण्यात आली असता Global Energy Management Services, C/o Balaji Civil Industries, Pt No.52 MIDC, Chikalthana, Aurangabad यांचे निविदेतील प्राप्त दराबाबत वाटाघाटी पश्चात खालील प्रमाणे दर आहेत.

| Sr No. | Description Of Item | निविदा दर | वाटाघाटी पश्चातचे दर |
|---|---|---|---|
| 1 | Jumbo Oxygen Cylender Type D without Trolly jumidifier | 32000 per Nos. | 23000 per Nos. |
| 2 | laying fitting & Testing, Painting of Medical Copper Pipeline 28 mm OD | 780/ Feet | 650 / Feet |
| 3 | laying fitting & Testing, Painting of Medical Copper Pipeline 22 mm OD | 720/ Feet | 575 / Feet |
| 4 | laying fitting & Testing, Painting of Medical Copper Pipeline 15 mm OD | 320/ Feet | 310 / Feet |
| 5 | laying fitting & Testing, Painting of Medical Copper Pipeline 12 mm OD | 310/ Feet | 280 / Feet |
| 6 | BS/DIN/SSV Type patient End Outlets | 2700/ Unit | 2100 / Unit |
| 7 | B.P.C. Flow meter Metal body, Humidifier with Nasal Canula | 2000/ Unit | 1900 / Unit |
| 8 | Oxygen Semi Automatic Control Panel with Pressure reduction in 3 stages, with indication | 95000/ Unit | 75000 / Unit |
| 9 | Oxygen Manifold System 10+10 | 39000/ Unit | 35000 / Unit |
| 10 | Non return Valve (20) | 650/ Unit | 600 / Unit |
| 11 | Pig Tail Pipe Copper (20) | 3200/ Unit | 2900 / Unit |
| 12 | M.S."C" Channel (2) | 1000/ Unit | 1000 / Unit |
| 13 | Oxygen Manual Manifold System 4+4 Comprising of | 16000/ Unit | 16000 / Unit |
| 14 | Non return Valve (8) | 650/ Unit | 600 / Unit |
| 15 | Pig Tail Pipe Copper (8) | 3200/ Unit | 2900 / Unit |
| 16 | M.S."C" Channel (1) | 1000/ Unit | 1000 / Unit |
| 17 | Emergency Point with Isolation Valve (1) | 5000/ Unit | 4700 / Unit |
| 18 | Area Alarm -2 Gas | 21000/ Unit | 15000 / Unit |
| 19 | Isolation Valve 28 mm | 3800/ Unit | 3300 / Unit |
| 20 | Isolation Valve 22 mm | 3100/ Unit | 2400 / Unit |
| 21 | Isolation Valve 15 mm | 2250/ Unit | 1800 / Unit |
| 22 | Templates, Spanner Set. | 8000/set | Free |

शासनाकडून औरंगाबाद महानगरपालिकेस जम्बो ऑक्सिजन सिलेंडरचा पुरवठा झाल्यामूळे सदरील बाब वगळून सेंट्रल ऑक्सिजन पाईपलाईनकरीता आवश्यक असणाऱ्या बाबींच्या उपरोक्त प्रमाणे मागविण्यात आलेल्या निविदेस, Global Energy Management Services, C/o Balaji Civil Industries, Pt No.52 MIDC, Chikalthana, Aurangabad. यांच्या वाटाघाटी अंती निश्चित केलेल्या दरास मा. स्थायी समितीच्या कार्योत्तर मान्यतेस्तव प्रस्ताव सादर

**ठराव क्रमांक 447/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे सन २०२०-२१ या आर्थिक वर्षासाठी कोविड-१९ प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी आरोग्य विभागाअंतर्गत जम्बो ऑक्सिजन सिलेंडरची खरेदी व सेंट्रल ऑक्सिजन पाईपलाईन उभारणीसाठी अंदाजित र.रू.१,६०,००,०००/- (अक्षरी एक कोटी साठ लक्ष फक्त) करीता दुसऱ्या वेळेस Tender ID No.2021_AMCA_678249_2 Date:-22.04.2021 प्रमाणे मागविण्यात आलेल्या निविदेस व प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे Global Energy Management Services, C/o Balaji Civil Industries,Pt.No.52 MIDC,Chikalthana,Aurangabad यांच्या वाटाघाटी अंती निश्चित केलेल्या दरास कार्योत्तर मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 448/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.01.07.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वर्ग-४ संवर्गातील स्त्री व पुरुष कर्मचा-यांना गणवेश खरेदीची निविदा क्र.2021_AMCA_716919_5 नुसार निविदा मागविण्यात आली. पाचव्या वेळेस फक्त दोन निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्यापैकी मे.अंकित कॉटेज इंडस्ट्रीज यांनी निविदेतील अटी व शर्तीची पुर्तता केलेली असल्याने संबंधितास पात्र ठरविण्यात आलेले आहे. मे.अंकित कॉटेज इंडस्ट्रीज यांचे प्राप्त निविदेतील दर खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | साहित्याचे नांव | प्रमाण | निविदेतील प्राप्त दर सर्व करांसाहित |
|---|---|---|---|
| 1. | SKY BLUE COLOUR SAARI WITH BLACK BORDER 5.5 METER 118 CM,67% POLYESTER,33% COTTON | नग | 349 |
| 2. | SKY BLUE COLOUR SAARI WITH BLACK BORDER 8.5 METER 118 CM,67% POLYESTER,33% COTTON | नग | 553.40 |
| 3. | SKY BLUE BLOUSE PIECE 1 METER 48% POLYESTE, 52% COTTON | मिटर | 75.00 |
| 4. | WHITE COLOUR SAARI WITH BLUE BORDER 5.5 METER 118 CM, 67% POLYESTER, 33% COTTON | नग | 334.70 |
| 5. | WHITE COLOUR SAARI 5.5 METER 118 CM,67% POLYESTER,33% COTTON | नग | 324.00 |
| 6. | WHIT BLOUSE PIECE 1 METER 48% POLYESTE,52% COTTON | मिटर | 81.99 |
| 7. | SKY BLUE COLOUR SALWAR SUIT CLOTH 67%POLYESTER,53% COTTON | मिटर | 243.99 |
| 8. | ODHANEE CLOTH 2.5 METER | नग | 263.70 |
| 9. | KHAKI COLOUR SUITING CLOTH 67% POLYESTER,33% COTTON,138 CM WIDTH | मिटर | 243.99 |
| 10. | WHITE COLOUR SUITING CLOTH 67% POLYESTER,33% COTTON,138 CM WIDTH | मिटर | 243.99 |
| 11. | WHITE COLOUR SHIRTING 48% POLYESTER,52% COTTON,89 CM WIDTH | मिटर | 239.40 |

| | | | |
|---|---|---|---|
| 12. | NIVE BLUE COLOUR SUITING CLOTH<br>67% POLYESTER,33% COTTON,138 CM WIDTH | मिटर | 243.99 |
| 13. | SKY BLUE COLOUR SHIRTING<br>48% POLYESTER,52% COTTON,89 CM WIDTH | मिटर | 239.40 |

प्राप्त निविदेतील दर जास्ती असल्यामुळे केंद्रीय खरेदी समक्ष दि.१५.०६.२०२२ रोजी दर वाटाघाटी करण्यात आली. दर वाटाघाटी समिती समोर पुरवठादार यांनी लेखी संमतीपत्र देवून खालील दरानुसार साहित्याचा पुरवठा करण्यासाठी सहमती दिली. त्यानुसार केंद्रीय खरेदी समितीने खालीलप्रमाणे दर निश्चित करुन दिले आहेत.

| अ. क्र. | साहित्याचा तपशील | प्रमाण | अंदाजपत्रकीय दर सर्व करांसहित (बाजार भावानुसार) | अंकित कॉटेज इंडस्ट्रीज यांचे निविदेतील दर सर्व करांसाहित | वाटाघाटी अंती अंतिम झालेले दर सर्व करासांहित |
|---|---|---|---|---|---|
| **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** |
| 1. | SKY BLUE COLOUR SAARI WITH BLACK BORDER 5.5 METER 118 CM,67% POLYESTER,33% COTTON | नग | 352.28 | 349 | 349.00 |
| 2. | SKY BLUE COLOUR SAARI WITH BLACK BORDER 8.5 METER 118 CM,67% POLYESTER,33% COTTON | नग | 544.42 | 553.40 | 553.40 |
| 3. | SKY BLUE BLOUSE PIECE 1 METER 48% POLYESTE, 52% COTTON | मिटर | 71.40 | 75.00 | 75.00 |
| 4. | WHITE COLOUR SAARI WITH BLUE BORDER 5.5 METER 118 CM, 67% POLYESTER, 33% COTTON | नग | 352.28 | 334.70 | 334.70 |
| 5. | WHITE COLOUR SAARI 5.5 METER 118 CM,67% POLYESTER,33% COTTON | नग | 544.42 | 324.00 | 324.00 |
| 6. | WHIT BLOUSE PIECE 1 METER 48% POLYESTE,52% COTTON | मिटर | 71.40 | 81.99 | 81.99 |
| 7. | SKY BLUE COLOUR SALWAR SUIT CLOTH 67%POLYESTER,53% COTTON | मिटर | 243 | 243.99 | 243.99 |
| 8. | ODHANEE CLOTH 2.5 METER | नग | 87 | 263.70 | 110.00 |
| 9. | KHAKI COLOUR SUITING CLOTH 67% POLYESTER,33% COTTON,138 CM WIDTH | मिटर | 243 | 243.99 | 243.99 |
| 10. | WHITE COLOUR SUITING CLOTH 67% POLYESTER,33% COTTON,138 CM WIDTH | मिटर | 243 | 243.99 | 243.99 |
| 11. | WHITE COLOUR SHIRTING 48% POLYESTER,52% COTTON,89 CM WIDTH | मिटर | 243 | 239.40 | 239.40 |
| 12. | NIVE BLUE COLOUR SUITING CLOTH 67% POLYESTER,33% COTTON,138 CM WIDTH | मिटर | 243 | 243.99 | 243.99 |
| 13. | SKY BLUE COLOUR SHIRTING 48% POLYESTER,52% COTTON,89 CM WIDTH | मिटर | 243 | 239.40 | 239.40 |

केंद्रीय खरेदी समितीने वरील नमुद तक्त्यातील स्तंभ क्र. ६ मधील दरास मंजूरी प्रदान केली असून या दरानुसार अंदाजपत्रकीय तरतुद रु.३५,३८,७९१/- च्या मर्यादेत साहित्य खरेदी करण्याचा व पुरवठादार मे.अंकित कॉटेज इंडस्ट्रीज यांची वाटाघाटी अंती मंजूर केलेल्या दरानुसार निविदा स्विकृतीचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 448/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वर्ग-४ संवर्गातील स्त्री व पुरुष कर्मचाऱ्यांना गणवेश खरेदीची निविदा क्र.2021_AMCA_716919_5 नुसार निविदा मागविण्यात आली. पाचव्या वेळेस फक्त दोन निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्यापैकी मे.अंकित कॉटेज इंडस्ट्रीज यांनी निविदेतील अटी व शर्तींची पुर्तता केलेली असल्याने फक्त एकच निविदा पात्र ठरविण्यात आली होती. केंद्रीय खरेदी समितीने वाटाघाटी अंती मंजूर केलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | साहित्याचा तपशील | प्रमाण | वाटाघाटी अंती अंतिम झालेले दर सर्व करासांहित |
|---|---|---|---|
| 1 | SKY BLUE COLOUR SAARI WITH BLACK BORDER 5.5 METER 118 CM,67% POLYESTER,33% COTTON | नग | 349.00 |
| 2 | SKY BLUE COLOUR SAARI WITH BLACK BORDER 8.5 METER 118 CM,67% POLYESTER,33% COTTON | नग | 553.40 |
| 3 | SKY BLUE BLOUSE PIECE 1 METER 48% POLYESTE, 52% COTTON | मिटर | 75.00 |
| 4 | WHITE COLOUR SAARI WITH BLUE BORDER 5.5 METER 118 CM, 67% POLYESTER, 33% COTTON | नग | 334.70 |
| 5 | WHITE COLOUR SAARI 5.5 METER 118 CM,67% POLYESTER,33% COTTON | नग | 324.00 |
| 6 | WHIT BLOUSE PIECE 1 METER 48% POLYESTE,52% COTTON | मिटर | 81.99 |
| 7 | SKY BLUE COLOUR SALWAR SUIT CLOTH 67%POLYESTER,53% COTTON | मिटर | 243.99 |
| 8 | ODHANEE CLOTH 2.5 METER | नग | 110.00 |
| 9 | KHAKI COLOUR SUITING CLOTH 67% POLYESTER,33% COTTON,138 CM WIDTH | मिटर | 243.99 |
| 10 | WHITE COLOUR SUITING CLOTH 67% POLYESTER,33% COTTON,138 CM WIDTH | मिटर | 243.99 |
| 11 | WHITE COLOUR SHIRTING 48% POLYESTER,52% COTTON,89 CM WIDTH | मिटर | 239.40 |
| 12 | NIVE BLUE COLOUR SUITING CLOTH 67% POLYESTER,33% COTTON,138 CM WIDTH | मिटर | 243.99 |
| 13 | SKY BLUE COLOUR SHIRTING 48% POLYESTER,52% COTTON,89 CM WIDTH | मिटर | 239.40 |

वरील दरानुसार व अंदाजपत्रकातील नमूद संख्येनुसार/प्रत्यक्ष उपलब्ध कर्मचारी संख्येनुसार चतुर्थ श्रेणी स्त्री व पुरुष कर्मचा-यांना गणवेश खरेदीस अंदाजपत्रकीय र.रु.३५,३८,७९१/- च्या मर्यादेत खरेदी करण्यासाठी व पुरवठादार मे. अंकित कॉटेज इंडस्ट्रीज यांची निविदा स्विकृतीस मंजूरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 449/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.06.07.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील टप्पा क्र.1 दुसऱ्या प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह असून या सभागृहाची दुरुस्ती करणे व श्रेणीवाढ करणे या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2021-2022 च्या दरसुची नुसार र.रु.6,32,46,812/- चे अंदाजपत्रक नियुक्त PMC द्वारे तयार करण्यात आले आहे. या रक्कमेपैकी किरकोळ खर्चासाठीची, कामगार विम्याची रक्कम थर्ड पार्टी इन्सपेक्शन साठी त्यांना अदा करावयाच्या सेवामुल्याची रक्कम, रॉयल्टी चार्जेस व PMC च्या सेवा शुल्काची रक्कम G.S.T. ची रक्कम वगळता येणारी निविदा र.रु.4,99,02,517/- ई-निविदा काढण्यात आली आहे. त्यास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली असून या अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभेने विषय क्र.339 दि.11.04.2022 अन्वये मान्यता प्रदान केली आहे.

या मंजुरीनुसार सदर कामासाठी र.रु.4,99,02,517/- इतक्या रक्कमेची ई-निविदा मागविली असता, एकूण दोन पात्र निविदा प्राप्त झाल्या त्याची संक्षिप्त माहिती खालील प्रमाणे आहे.

1. New Era Electrical अंदाजपत्रकीय दरापेक्षा 13% ने कमी दराने
2. Sai Krishna Construction अंदाजपत्रकीय दरापेक्षा 11.11% ने कमी दराने

प्राप्त निविदा पैकी सर्वात कमी दराची निविदा न्यु ईरा इलेक्ट्रिकल यांची असुन ती अं.प.दरापेक्षा13% कमी दराची असल्याने त्यास मंजुरी देणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्रमांक 449/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मा.सर्वसाधारण सभागृहाची आवश्यक दुरुस्ती करणे व श्रेणीवाढ करणे या कामासाठी प्राप्त निविदांपैकी सर्वात कमी दरची म्हणजेच New Era Electrical यांची अं.प.दरापेक्षा 13% ने कमी दराच्या निविदेस मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 450/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.06.07.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मा.सर्वसाधारण सभा दि.20.02.2016 विषय क्रमांक-303 नुसार वॉर्ड क्र.25 गणेश कॉलनी येथे महानगरपालिकेच्या शाळा परिसरातील उपलब्ध जागेवर नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र नवीन बिल्डींग बांधण्यासाठी मान्यता प्राप्त झाली आहे. सदर कामासाठी निविदा बोलाविण्यात आल्या असता, कंत्राटदार मे.शहा कन्स्ट्रक्शन यांची निविदा सर्वात कमी दर म्हणजेच 16.01% कमी दराची असल्याने ती मा.स्थायी समिती ठराव क्रमांक-177 दि.07.04.2017 च्या मंजुरीनुसार जा.क्र./मनपा/ स्लम/ 2017/180 दि.21.08.2017 रोजी संबंधीत कंत्राटदारास रितसर कार्यादेश देऊन कामास सुरुवात करण्यात आलेली असून हे काम पुर्णत्वाकडे आहे. कामाचे अंदाजपत्रकीय र.रु.70.00 लक्ष असल्यामुळे या कामावर थर्ड पार्टी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

सदर कामाच्या ठिकाणीस्थळाची प्रत्यक्ष पाहणी स्थिती व तांत्रिक बाबींनुसार पाया खोदकाम व बांधकाम मध्ये वाढ झालेली आहे. तसेच सदर ठिकाणी उपलब्ध भुखंडाचे क्षेत्रफळ जास्त असल्यामुळे कुंपणभिंत पेव्हर ब्लॉक तसेच इतर सर्व संबंधीत कामाच्या बाबी यामध्ये देखील वाढ झालेली आहे. करीता, हे काम पुर्ण करुन अंतिम देयक अदा करण्यासाठी प्रत्यक्ष परिस्थितीनुरुप सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून ते र.रु.75,51,608/- चे होत आहे. प्रस्तावित वाढीव कामातील अतिरिक्त बाबी या अंदाजपत्रकीय दराने आणि परिशिष्ट-ब मधील बाबींची कामे ही मंजुर निविदा दर 16.01% कमी दराने अशी एकत्रित प्रत्यक्ष र.रु.64,36,030/ खर्च या कामावर अपेक्षित आहे.

| अ.क्र. | बाब | रक्कम रुपये |
|---|---|---|
| 1. | मुळ मंजुर अंदाजपत्रक | 70,00,000/- |
| 2. | निविदा रक्कम | 57,95,560/- |
| 3. | प्रत्यक्ष परिस्थितीनुरुप सुधारीत अंदाजपत्रक (4+7) | 75,51,608/- |
| 4. | परिशिष्ट-ब मधील बाबींची सुधारीत रक्कम | 69,68,007/- |
| 5. | अ.क्र.4 च्यासुधारीत रक्कमेवर 16.001% कमी निविदा दरानुसार होणारी बचत रक्कम | 11,15,578/- |
| 6. | परिशिष्ट-ब मधील बाबींच्या कामासाठी प्रत्यक्षात लागणारी रक्कम (4-5) | 58,52,429/- |
| 7. | अतिरिक्त बाबींची रक्कम | 5,83,601/- |
| 8. | प्रत्यक्ष कामावर होणारा अपेक्षित खर्च (6+7) | 64,36,030/- |

करीता, सुधारीत अंदाजपत्रक र.रु.75,51,608/- व प्रत्यक्षात खर्च र.रु.64,36,030/- यास मान्यतेस्तव वाढीव कामे मुळ परिशिष्ट-ब मधील बाबी 16.01% कमी दराने अतिरिक्त बाबी अंदाजपत्रक दराने मे.शहा कन्स्ट्रक्शन यांच्या कडून करुन घेणेस्तव प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्त्व सादर.

**ठराव क्रमांक 450/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, या कामाचे सुधारीत अंदाजपत्रक र.रु.64,36,030/- यास व अतिरिक्त बाबींवर झालेल्या खर्चासह या कामावर झालेल्या खर्चानुसार संबंधीत कंत्राटदार यांना मुळ मंजुर निविदा दरानुसार म्हणजेच अं.प.दरापेक्षा 16.01% कमी दराने अदा करणे बाबतचा प्रस्तावास कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 451/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.07.07.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, देशामध्ये व राज्यामध्ये कोव्हिड-19 या विषाणुचा प्रार्दुभाव झाल्यामुळे Pandemic ची साथ संपुर्ण जग, देश व राज्यामध्ये पसरली असून कोव्हिड-19 हा साथरोग नियंत्रित करण्यासाठी सीएसआर फंडामधून कमल नयन बजाज हॉस्पीटल यांच्याकडून औरंगाबाद महानगरपालिका डीसीएचसी मेल्ट्रॉन रुग्णालय, चिकलठाणा येथे Philips Access CT PRO 32 Slice CT With Vertical Table Movement सिटीस्कॅन मशीन ऑक्टोंबर-2020 मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदरील सिटी स्कॅन मशीनचा वॉरंटी कालावधी माहे ऑक्टोंबर-2021 रोजी संपुष्टात आलेला असून त्या पुढील कालावधी करीता ए.एम.सी.सी.एम.सी.करणे आवश्यक आहे.

या करीता, Philips Access CT PRO 32 Slice CT With Vertical Table Movement ची मुळ उत्पादक कंपनीकडून दरपत्रक (कोटेशन) मागविण्यात आले असून कंपनीने सादर केलेल्या दराबाबत अतिरिक्त आयुक्त-1, मुख्यलेखा व वित्त अधिकारी व वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी कंपनीच्या प्रतिनिधीसोबत वाटाघाटी करुन खालीलप्रमाणे दराची शिफारस केलेली आहे.

| अ.क्र. | कराराचा कालावधी | तपशिल | एकुण र.रु. |
|---|---|---|---|
| 1. | दि.1 नोव्हें-2021 ते दि.31 ऑक्टो-2022 | रु.15,50,000+जी.एस.टी.18% रु.2,79,000/- असे एकूण र.रु.18,29,000/- | 18,29,000/- |
| 2. | दि.1 नोव्हें-2022 ते दि.31 ऑक्टो-2023 | रु.16,27,500+जी.एस.टी.18% रु.2,92,950/- असे एकूण र.रु.19,20,450/- | 19,20,450/- |
| 3. | दि.1 नोव्हें-2023 ते दि.31 ऑक्टो-2024 | रु.17,08,875+जी.एस.टी.18% रु.3,07,598/- असे एकूण र.रु.20,16,473/- | 20,16,473/- |
| 4. | दि.1 नोव्हें-2024 ते दि.31 ऑक्टो-2025 | रु.17,94,319+जी.एस.टी.18% रु.3,22,977/- असे एकूण र.रु.21,17,296/- | 21,17,296/- |
| 5. | दि.1 नोव्हें-2025 ते दि.31 ऑक्टो-2026 | रु.18,84,035+जी.एस.टी.18% रु.3,39,126/- असे एकूण र.रु.22,23,161/- | 22,23,161/- |
| | | **एकुण रक्कम रुपये** | **1,01,06,380/-** |

सदरील ए.एम.सी./सी.एम.सी. (सर्व समावेशक देखभाल दुरुस्ती सर्व सुटे भाग यासह यामध्ये Consumables, Peripherals, Accessories, Printers, Physical Damage Third Party Items यांचा समावेश नाही) एकूण 05 वर्षासाठी असून दि.01 नोव्हेंबर 2021 रोजी पासून लागू करण्यास प्रस्तावीत आहे.

कोव्हिड Pandemic परिस्थिती लक्षात घेता, रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणुन यांनी Philips India Limited (Company) यांनी वॉरंटी कालावधी संपुष्टात आल्यानंतर सुध्दा आवश्यकतेप्रमाणे देखभाल दुरुस्तीसाठी सेवा दिलेली आहे. सदर Warranty ही Comprehensive असूनयामध्ये एक्स-रे ट्युब कितीही वेळा बदलून देण्याचे प्रयोजन आहे.

करीता, औरंगाबाद महानगरपालिका डी.सी.एच.सी.मेल्ट्रॉन रुग्णालय, चिकलठाणा येथे दुरुस्तीसाठी Philips India Access CT PRO 32 Slice CT With Vertical Table Movement च्या देखभाल दुरुस्तीसाठी Philips India Limited (Company) यांच्या सोबत प्रस्तावीत प्रमाणे करारनामा करणे व प्रतीवर्षी पाच टक्के नैसर्गिक वाढ विचारात घेता यासाठी येणारा एकूण खर्च रु.1,01,06,380/- (अक्षरी एक कोटी एक लक्ष सहा हजार तिनशे ऐंशी रुपये फक्त) या खर्चास मा.स्थायी समिती सभेच्या (कार्योत्तर) मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव क्रमांक 451/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कोव्हिड-19 हा साथरोग नियंत्रित करण्यासाठी सी.एस.आर.फंडामधून कमल नयन बजाज हॉस्पिटल यांच्याकडून औरंगाबाद महानगरपालिका डी.सी.एच.सी.मेल्ट्रॉन रुग्णालय चिकलठाणा येथे प्राप्त झालेल्या Philips Access CT PRO 32 Slice CT With Vertical Table Movement सिटी स्कॅन मशीनसाठी ए.एम.सी./सी.एम.सी. (सर्व समोवशक देखभाल दुरुस्ती सर्व सुटेभाग यासह (यामध्ये Consumables, Peripherals, Accessories, Printers, Physical Damage Third Party Items यांचा समावेश नाही) करण्यास व येणारा खर्च रु. 1,01,06,380/- (अक्षरी एक कोटी एक लक्ष सहा हजार तिनशे ऐंशी रुपये फक्त) यास कार्योत्तर मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 452/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.07.07.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरात भुमिगत गटार योजना राबविण्यात आलेली असुन, याच योजने अंतर्गत कांचनवाडी येथील औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या व ताब्यातील जागेवर 161 MLD क्षमतेचा S.B.R. Technology वर आधारित सिवेज ट्रिटमेंट प्लांन्ट बांधुन कार्यान्वित करण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत या STP ला प्राप्त होत असलेल्या सरासरी 60 MLD पाणी परिणामावर प्रक्रिया केली जाते व प्रक्रिया झालेले पाणी खाम नदी पात्रात सोडले जात आहे.

ज्ञात असल्यानुसार मराठवाडा भागात, पर्जन्यमान कमी राहिल्याने, बहुतांश वेळा या भागात पाण्याची कमतरता राहते. याचे परिणाम स्वरूप, शहरात नव-नवीन उद्योग येण्यावर होतो. सन 2011 च्या जनगणने नुसार शहराची लोकसंख्या 11,65,146 असुन, व सद्याची लोकसंख्या सुमारे 16,50,000एवढी असल्याचे अनुमान आहे.

शहरात जी-1680 कोटीची नविन पाणी पुरवठा योजना राबविण्यास येत असुन, त्यांचे संकल्पमान सन 2022 मध्ये, सन 2037 मध्ये व सन 2052 मधील पाण्याची गरज शहराची अनुमानीत लोकसंख्येचा विचार करण्यात येऊन नियोजन करण्यात आले आहे. तथापी सदरची पाणी पुरवठा योजना पुर्ण होऊन, कार्यान्वित होणेसाठी तीन वर्ष किंवा त्यापेक्षा अधिकचा कालावधी लागणे अपेक्षित आहे.

औरंगाबाद शहराला ऐतिहासिक पार्श्र्वभुमी लाभलेली असुन शहराला जायकवाडी जलाशयातुन पाणी पुरवठा केला जातो. परंतु गत काही वर्षातील अनुभव पाहता, या औरंगाबाद परिक्षेत्रात पावसाचे प्रमाण अत्यल्प राहिलेले आहे. याचे परिणाम स्वरूप, पिण्याचे पाण्याची गरज वगळता, उद्योग-व्यवसाय यांना, त्यांचे वाढीस लागणारा म्हणुन महत्वाचा घटक म्हणुन पाण्याची कमतरता पडते. ज्यामुळे या भागात उद्योग येण्यास अथवा त्यांचे उद्योगाची वाढ करण्यास उद्योजक उत्सुक राहत नाहीत. त्याचा परिणाम रोजगार उपलब्ध न होण्यात होतो.

अशा परिस्थितीत नियमित पाण्याचा वापर पिण्याचे पाण्यासाठीच / मानवी वापराकरीता करणे, व इतर अनुषंगीक/अत्यावश्यक बाबींसाठी करणे, यासाठी व ज्या उद्योगांना, बागायती/कोरडवाहू शेतीकरीता,घरांची बांधकामेसाठी या प्रक्रियायुक्त पाण्याचा वापर वाढविण्याची बाब प्रशासनाच्या विचाराधीन होती. शिवाय सद्यस्थितीत प्रगतीपथावर असलेल्या पाणी पुरवठा योजनेतील उपांगाचे बांधकामा करण्यासाठीहीपाण्याची दैनिक स्वरूपात मोठी गरज आहे. या स्वरूपाने नियोजन केल्यास, नैसर्गिक पाण्याचा सुयोग्य पध्दतीने, जास्तीत जास्त पिण्याचे पाणी दुष्काळसदृश्य परिस्थिती जरी उद्‌भवली तरी जास्तीत जास्त कालावधीसाठी करता येईल.

त्यास्तव या सर्व बाबींची पुर्तता होणस्तव जे नियोजन प्रस्तावित करण्यात येत आहे, त्यामध्ये (1) प्रगतीपथावर असलेल्या पाणी पुरवठा योजनेचा बांधकामासाठी प्रक्रियायुक्त मल-जल, फारोळा जलशुद्धीकरण केंद्रापर्यत पोहचविणे, त्यासाठी तेथे साठवण करण्यासाठी हौदाचे बांधकाम करणे. (2) शेती, शेजीजन्य, मनपाची उद्याने, हरितपट्टे, दुभाजकातील झाडांना पाणी देणे यासाठी, (3) ज्या उद्योग व्यवसायांना प्रक्रियायुक्त पाणी अनुदेय होऊ शकेल त्यांना प्रकियायुक्त पाण्याचा पुरवठा करणे, (4) व पिण्याचे पाण्याचे दुर्भिय जाणवल्यास, या पाण्यातून शुद्ध पाणी उपलब्ध करून देणे ईत्यादी बाबींचा समावेश करण्यात येत आहे.

यासाठी (1) कांचनवाडी STP ते फारोळा जलशुद्धीकरण केंद्र पर्यंत जल-वहनासाठी पाईप लाईन टाकणे, व याच STP च्या ठिकाणी टँकर फिलिंग स्टेशनव्दारे नागरिकांना/व्यावसायिक यांना बांधकामासाठी प्रक्रियायुक्तपाणी उपलब्ध करून दणे, (2) शेती, शेतीजन्य, उद्यानांसाठी व हरित पट्टयांसाठी टँकरव्दारे प्रकियायुक्त पाण्याचा पुरवठा करणे, (3) उद्योग/व्यवसायांच्या पाण्याची गरज भागविणेसाठी शुद्ध पाणी प्रकल्पाची उभारणी, कांचनवाडी STP येथील मनपाच्या जागेत करणे व त्यासाठी तेथे Tertiary Treatment साठी RO सिस्टिम बसविणे ईत्यादी कामे करण्याचे नियोजन आहे.

सद्यस्थितीत कांचनवाडी STP ला येऊन मिळणारे सुमारे 60 MLD मल-जल व सातारा-देवळाई भागातुन येऊन मिळणारे 23.12 MLD असे सुमारे सुमारे 80 MLD मल-जलावर, उक्त स्वरूपाने प्रक्रिया करून शुद्ध पाण्याची निर्मिती करणे यासाठी, या क्षेत्रातील तज्ञ प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) यांच्या माध्यमातुन, या बाबींसाठी (त्यांचे स्तरावरून) कोटेशन मागवुन, अंदाज व्यक्त केला आहे. या संक्षिप्त प्रकल्प अहवालात त्यांनी खालील नमुद बाबींचा समावेश केला आहे.

1) 80 MLD पैकी, सुमारे 50 MLD पाण्यावर Tertiary Treatment System बसुवन, निर्मित होणारे प्रक्रिया युक्त शुद्ध पाण्याचा उद्योगांनी, शेतीसाठी/उद्यानासाठी, बांधकामासाठी पुरवठा करणे.
2) सुमारे 30 MLD पाण्यावर Tertiary Treatment Systemü सह (RO System) व्दारे प्रक्रिया करून, ते पाणी फारोळा येथील पाणी पुरवठा विभागाच्या शुद्ध पाणी प्रक्रिया केंद्रापर्यत (WTP) पोहचविणे.

जे प्राथमिक प्रकल्प संकल्पन मे.यश इनोव्हेटिव्ह सोल्युशन्स LLP यांनी सादर केले आहे., त्यामध्ये पुढील बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | मायक्रो स्क्रीन डिस्क फिल्टर | **3 Units** | रू.41,68,62,240/- |
| 2 | Disinfection HOD TM System | - | रू.26,49,00,000/- |
| 3 | STAC-2 compact alert station | **2 Units** | रू.4,90,00,000/- |
| 4 | RO mechanism for 27 MLD | - | रू.55,00,00,000/- |
| 5 | Civil work- includes ESR/GSR, internal piping arrangements, Chlorine contact system, sludge management mechanisam | - | रू.30,00,00,000/- |
| 6 | कांचनवाडी STP ते फारोळा WTP पर्यंत जलवाहिनी टाकणे | - | रू.1,05,00,000/- |
| 7 | Operation & maintenance at Rate Rs.3.00 Cr. For 5 year | - | रू.15,00,00,000/- |
| | | **एकुण** | रू.**174,12,62,240/-** |

या प्रकल्पाच्या अनुषंगाने भारत सरकारच्या गृहनिर्माण व शहरी विकास मंत्रालय यांचे दिनांक 15.06.2022 रोजीच्या Zoom मिटिंगमध्ये दिलेल्या सुचनांनुसार, अशा स्वरूपाचा प्रकल्प हा PPP या तत्वावर राबविण्याच्या सुचना आहेत. औरंगाबाद शहराचा शासनाने मिलीयन प्लस सिटी या संवर्गत समावेश केला असुन, अमृत मिशन 2.0 च्या जारी मार्गदर्शक तत्त्वानुसार, खालील स्वराज्य संस्थेला शासनाकडुन मिळणाऱ्या अनुदानाच्या रक्कमेपैकी किमान 10% एवढ्या किंमतीचा प्रकल्प PPP तत्त्वावर राबविणे बंधनकारक आहे. तसेच अशा स्वरूपाच्या प्रकल्पासाठी केंद्रिय अर्थसहाय्यासाठीची मर्यादा किमान 30% कमाल 60% एवढी राहणार आहे.

त्यास्तव अमृत मिशन 2.0 मधील मार्गदर्शक तत्वे व त्यातील सुचना विचारात घेता, प्रकल्प अहवाल शासनास केल्यानंतर, मिळणाऱ्या केंद्र व राज्य शासन अर्थसहाय्याची रक्कम वगळता, शिल्लक फरकाची रक्कम लोकसहभागातुन (PPP तत्त्वावर) उभारणे आवश्यक आहे. शिवाय निविदा जर अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराची प्राप्त झाल्यास फरकाची रक्कम (Viability Gap Funding) साठीची तरतुद मनपा अर्थसंकल्पात करावी लागणार आहे.

प्रकल्पाचे प्राथमिक संकल्पन जे PMC यांनी सादर केले आहे. त्यानुसार कांचनवाडी येथील मनपाच्या जागेत शुद्धपाणी प्रकल्प (Tertiary Preatment Plant) 80 MLD Capacity साठी एकुण अंदाजित खर्च हा सुमारे र174,12,62,000/- एवढा अपेक्षित आहे.

करिता उक्त सादरीकरणाचे विचारात घेऊन, सदर प्रकल्पासाठी (अ) प्रत्यक्ष सर्व्हेक्षणानुसार विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) चालु वर्ष सां.बा./परिअभि दरसुची नुसार तयार करणेसाठी, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची (PMC) ची नेमणुकीसाठी 7 दिवसांच्या मुदतीची निविदा काढुन PMC नेमणुकी करणे (ब) Tertiary Plant उभारणे कामाची निविदा अं.प.दरापेक्षा

अधिक दराची प्राप्त झाल्यास, लागणाऱ्या फरकाची रक्कमेची गरज भागविणे करीता मनपा अर्थसंकल्पात किमान 10% निधीसाठी मनपा अर्थसंकल्प 2022-2023 मध्ये आर्थिक तरतुद करणे, (क) जास्तीत जास्त आर्थिक सहाय्य प्राप्त करणेसाठी प्रस्ताव दाखल करणे त्यासाठी पाठपुरावा करणे मान्यतेनंतर रितसर निविदा कार्यवाही करणे ची कार्यवाही हाती घेणे आवश्यक आहे. त्यास तसेच प्रकल्पाच्या अनुषंगाने आवश्यक ते निर्णय घेण्याचे, प्रकल्पात वेळोवेळी आवश्यक बदल करण्याचे सर्व अधिकार आयुक्त यांना प्रदान करणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 452/2022:-</u>**

प्रस्तावात नमुद केल्यानुसार, कांचनवाडी STP प्रकल्पाच्या ठिकाणी, मनपा ड्रेनेज स्कीमसाठी राखीव जागेवर, 80 MLD क्षमतेचा शुद्ध पाणी प्रकल्प (Tertiary Treatment Plant) उभारणे, यासाठी विस्तृत सर्व्हेक्षणा आधारे, प्रकल्प अहवाल (Detail Project Report) तयार करणेसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) चे नेमणुक करणेस्तव निविदा काढणे, प्राप्त निविदेसाठी लागणाऱ्या फरकाची रक्कम (for PPP model) टाकणेसाठी मनपा अर्थसंकल्प 2022-2023 मध्ये आर्थिक तरतुद करणे, प्रकल्प PPP तत्त्वावर राबविणेसाठी मंजुरी प्रदान करणे, व मंजुरीनंतर ई-निविदा काढणे या बाबीस, तसेच या प्रकल्पाच्या अनुषंगाने आवश्यक ते निर्णय घेणे, प्रकल्पात आवश्यकतेनुसार फेरबदल करणेचे अधिकार आयुक्त यांना प्रदान करणेसह मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 453/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.11.07.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मा.वसंतराव नाईक, माजी मुख्यमंत्री (महाराष्ट्र राज्य) तसेच हरीतक्रांतीचे प्रणेते यांचा पुर्णाकृती पुतळा सिडको बसस्टँड जवळील वीर सावरकर उड्डाणपुलाच्या स्लीप रोडवर स्थित असून तो स्लिप रोडच्या मधोमध येत असल्याने सदर ठिकाणची वाहतूक सुरळीतपणे सुरु राहणेस व्यत्यय निर्माण होत आहे. या अनुषंगाने सदर पुतळा स्थलांतरीत करण्यासाठी औरंगाबाद शहर वाहतूक शाखेने देखील महानगरपालिकेस नाहरकत प्रमाणपत्र दिले आहे. त्याच बरोबर मा.उच्च न्यायालयाने देखील हा पुतळा स्थलांतरीत करणे बाबत बैठक घेतली होती. या सर्वकश बाबींचा विचार करुन मा.वसंतराव नाईक, माजी मुख्यमंत्री (महाराष्ट्र राज्य) यांचा पुर्णाकृती पुतळा सिडको बसस्टँड ते वीर सावरकर उड्डाणपुल रस्त्यावर अजयदिप प्लाझा इमारती समोरील जागेत स्थलांतरीत करणे आयलँडचे सुशोभिकरण करणे इ.व अनुषंगीक कामांसाठी र.रु.1,23,48,764/- चे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याची सन 2021-2022 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रक या कामासाठी नियुक्त वास्तुविशारद श्री.धीरज देशमुख यांनी तयार केले असून अंदाजपत्रकात श्री.धीरज देशमुख यांचे मानधन र.रु.2,42,132/- चा समावेश आहे. सदर कामाचा खर्च महानगरपालिका अर्थसंकल्प सन 2022-23 मधील पुतळे खरेदी व संगोपन या लेखाशिर्षातून भागविण्यात येईल.

करीता, मा.वसंतराव नाईक, माजी मुख्यमंत्री (महाराष्ट्र राज्य) यांचा वीर सावरकर उड्डाणपुलाच्या स्लीप रोडवर स्थित पुर्णाकृती पुतळा सिडको बसस्टँड ते वीर सावरकर उड्डाणपुल रस्त्यावर अजयदिप प्लाझा इमारती समोरील जागेत स्थलांतरीत करणे या कामाचे अंदाजपत्रक र.रु.1,21,06,632/- व तसेच कामासाठी नियुक्त वास्तुविशारद श्री.धीरज देशमुख यांचे मानधन र.रु.2,42,132/- असे एकत्रित अंदाजपत्रक र.रु.1,23,48,764/- चा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 453/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मा.वसंतराव नाईक, माजी मुख्यमंत्री (महाराष्ट्र राज्य) यांचा वीर सावरकर उड्डाणपुलाच्या स्लीप रोडवर स्थित पुर्णाकृती पुतळा सिडको बसस्टँड ते वीर सावरकर उड्डाणपुल रस्त्यावर अजयदिप प्लाझा इमारती समोरील जागेत स्थलांतरीत करणे या कामाचे अंदाजपत्रक र.रु.1,21,06,632/- व तसेच कामासाठी नियुक्त वास्तुविशारद श्री.धीरज देशमुख यांचे मानधन र.रु.2,42,132/- असे एकत्रित अंदाजपत्रक र.रु.1,23,48,764/- च्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 454/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.11.07.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.धनंजय सुरेश फडके, जलनिर्देशक, सिध्दार्थ जलतरण तलाव यांनी स्वत:च्या आजारपणावर (Covid-19 Positive) एशियन सिटीकेअर हॉस्पिटल, औरंगाबाद येथे

उपचारासाठी र.रु.2,47,628/- (अक्षरी रुपये दोन लाख सत्तेचाळीस हजार सहाशे अठ्ठावीस फक्त) इतका खर्च झाला आहे.

महाराष्ट्र शासनाचे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या शासन निर्णय दि.16.11.2011 मध्ये 'परिशिष्ट-अ' शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटूंबीयांनी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या गंभीर व विशिष्ट खर्चावरील शासकीय रुगणालयाप्रमाणे प्रतीपुर्ती अनुज्ञेयतेसाठी शासन मान्यता दिलेल्या खाजगी रुग्णालयांची यादीमध्ये उक्त रुग्णालयाचे नाव समाविष्ट नाही. परंतु Covid-19 Mild To Moderate illnes या शासनमान्य आजारांमध्ये येतो. औरंगाबाद महानगरपालिकेच्या मा.सर्वसाधारण सभेच्या विषय क्रमांक-65/2020 दि.10.12.2020 च्या अनुषंगाने झालेल्या ठरावानुसार सदर आजारास वैद्यकीय परतावा देता येतो. तसेच उक्त रुग्णालय DCH या प्रकारच्या Facility मध्ये मान्यता प्राप्त यादीत नमुद आहे.

श्री.धनंजय सुरेश फडके, जलनिर्देशक यांना स्वतःच्या आजारपणावर र.रु.2,47,628/- एवढा वैद्यकीय खर्च झालेला आहे. त्यापैकी प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली र.रु.2,21,009/- एवढी असून सदर रक्कमेच्या 90% र.रु.1,98,908/- (अक्षरी रुपये एक लाख अठ्ठयाण्णव हजार आठ फक्त) पैकी 5% र.रु.12,381/- (अक्षरी रुपये बारा हजार तीनशे एक्याऐंशी फक्त) (एकूण सादर केलेले देयक र.रु.2,47,628/- च्या 5% प्रमाणे) मनपा फंडात जमा करुन उर्वरित र.रु.1,86,527/- (अक्षरी रुपये एक लाख शहाऐंशी हजार पाचशे सत्तावीस फक्त) रक्कम देय आहे.

करीता, श्री.धनंजय सुरेश फडके, जलनिर्देशक यांनी स्वतःच्या आजारपणावर खर्च केलेल्या वैद्यकीय देयकांपैकी प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली र.रु.2,21,009/- च्या 90% र.रु.1,98,908/-/- (अक्षरी रुपये एक लाख अठ्ठयाण्णव हजार नऊशे आठ फक्त) या वैद्यकीय खर्चास मान्यता देऊन सदर रक्कमेपैकी 5% र.रु.12,381/- (अक्षरी रुपये बारा हजार तीनशे एक्याऐंशी फक्त) (एकूण सादर केलेले देयक र.रु.2,47,628/- च्या 5% प्रमाणे) मनपा फंडात जमा करुन उर्वरित र.रु.1,86,527/- (अक्षरी रुपये एक लाख शहाऐंशी हजार पाचशे सत्तावीस फक्त) रक्कम संबंधीतास अदा करण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 454/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.धनंजय सुरेश फडके, जलनिर्देशक यांनी स्वतःच्या आजारपणावर खर्च केलेल्या वैद्यकीय देयकांपैकी प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेली र.रु.2,21,009/- च्या 90% र.रु.1,98,908/- (अक्षरी रुपये एक लाख अठ्ठयाण्णव हजार नऊशे आठ फक्त) या वैद्यकीय खर्चास मान्यता देऊन सदर रक्कमेपैकी 5% र.रु.12,381/- (अक्षरी रुपये बारा हजार तीनशे एक्याऐंशी फक्त) (एकूण सादर केलेले देयक र.रु.2,47,628/- च्या 5% प्रमाणे) मनपा फंडात जमा करुन उर्वरित र.रु.1,86,527/- (अक्षरी रुपये एक लाख शहाऐंशी हजार पाचशे सत्तावीस फक्त) रक्कम संबंधीतास अदा करण्याबाबत प्रस्तावास मान्यता देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 455/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.11.07.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दिनांक 25.06.2022 रोजी स्मार्ट सिटी कार्यालय येथे सहा वर्ष व त्यापेक्षा अधिक काळ एकाच शाळेत कार्यरत मुख्याध्यापक व सहशिक्षक यांची समुपदेशाने बदल्याकरीता बैठक आयोजित करण्यात आली होती. यामध्ये बदली पात्र एकूण 03 मुख्याध्यापक व 96 मराठी माध्यमाचे सहशिक्षक आणि 33 उर्दु माध्यमाचे सहशिक्षक यांच्या बदल्यांचा विचार करण्यात आला.

तत्पुर्वी शिक्षण विभागात मिटमिटा येथील शालेय समितीने अर्ज केला की, सदर शाळेतील शिक्षकांचे काम चांगले असून शाळेचे अध्यापन कार्य अत्यंत परिणामकारक व आधुनिक पध्दतीने होत आहे. शाळा शहरापासून दुर असून शिक्षक तेथे वास्तव्यास राहिल्यामुळे मुलांच्या अडचणी सोडविणे व पुढील शिक्षण घेण्यासाठी चांगली प्रेरणा मिळेल. तसेच प्रा.शा.नारेगाव येथील मुख्याध्यापक यांनी ही शाळा आदर्श आहे. कार्यरत शिक्षकांनी आदर्श शाळेकरीता आवश्यक ते प्रशिक्षण पुर्ण केलेले आहे. त्यामुळे तेथील शाळेतील शिक्षकांच्या बदल्या करण्यात येऊ नये. असा विनंती अर्ज केला आहे. यापुर्वी 2016 मध्ये बदल्यांची प्रक्रिया राबविली होती. 6 वर्षानंतर ही प्रक्रिया राबविण्यात येत आहे. विनंती अर्ज व शाळेची गुणवत्ता वाढीमध्ये या शिक्षकांचा सहभाग असेल तर त्यांच्या बदल्या केल्यामुळे गुणवत्ता वाढीमध्ये खिळ पडू नये म्हणुन शिक्षक व शाळा यांचे मुल्यमापन करुन या मुल्यमापनाच्या आधारे ज्या शिक्षकांचे काम समाधानकारक आढळून आले आहे. त्यांना बदली प्रक्रियेतून सुट देण्यात येईल. शाळा व शिक्षकांचे मुल्यमापन करण्याकरीता उपआयुक्त तथा शिक्षण विभाग प्रमुख यांच्या अध्यक्षतेखाली मुख्याध्यापकांची समिती स्थापन करण्यात येईल. मुल्यमापनाकरीता.

1) मागील पाच वर्षात पटसंख्या वृध्दी (20%)

2) मागील पाच वर्षाची सरासरी उपस्थिती (20%)
3) मागील पाच वर्षाचा निकाल (20%)
4) मागील पाच वर्षामधील इयत्ता 5 वी व 8 वी स्कॉलरशिप परीक्षेतील यश तसेच स्पोर्ट ॲवॉर्डस् व इतर क्षेत्रामध्ये शाळेचा नोंदविलेला सहभाग व प्राप्त यश (20%)
5) चालू शैक्षणिक वर्ष 2022-23 ची पटसंख्या वृध्दी (20%) हे निकष ठेवण्यात येत आहेत.

सदरच्या धोरणात्मक निर्णयास मान्यता देण्यात यावी.

करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 455/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बदली पात्र 03 मुख्याध्यापक, 96 मराठी माध्यमाचे सहशिक्षक आणि 33 उर्दु माध्यमाचे सहशिक्षक यांच्या समुपदेशन पध्दतीने बदली करण्यासाठी निकष व मुल्यांकन समितीच्या अहवालानुसार जे सहशिक्षक वरील निकष पुर्ण करीत असतील अशा सहशिक्षकाची बदली प्रक्रियेतून वगळण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 456/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.11.07.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरातील मुख्य बाजारपेठ असलेल्या पैठणगेट येथील न.भु.क्र.13917 मधील 1351.60 चौ.मी.या क्षेत्रावर सद्यस्थितीत महानगरपालिकेतर्फे पार्किंग व्यवस्था करण्यात आलेली असून या भागात मुख्य बाजारपेठ असल्याने मोठ्या प्रमाणात चारचाकी व दुचाकी वाहने उभी करण्यास अडचण निर्माण होत असल्याने नागरीकांच्या सोईसाठी वाहनतळ (Parking) व्यवस्था करणे आवश्यक असल्याने या भागात प्रस्तावीत जागेवर बहुमजली (Mechanical Multilevel Car Parking) वाहनतळ करण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आलेला असून या कामासाठी नियुक्त प्रकल्प सल्लागार (PMC) मे.आरंभ असोसिएट्स यांनी दि.25.05.2022 रोजी मा.आयुक्त तथा प्रशासक महोदय यांचे दालनात बीओटी कमिटी समोर प्रकल्पाचे सादरीकरण (Presentation) केले आहे.

सदरील प्रकरणी प्रस्तावीत प्रकल्प हा स्मार्टसिटी किंवा महानगरपालिकेकडे फंड उपलब्ध नसल्याने बीओटी तत्वावर विकसीत करण्यासाठी समिती सदस्य यांच्यामध्ये चर्चा झालेली असून सर्वानुमते सदरील प्रकल्प हा बीओटी तत्वावर करणे बाबत निर्णय झालेला आहे.

तरी सदरील प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्रमांक 456/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पैठणगेट येथील बहुमजली (Mechanical Multilevel Car Parking) वाहनतळ बीओटी तत्वावर करण्याच्या कामासाठी मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 457/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.11.07.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरातील ज्या भागात जलनि:स्सारण वाहिन्यांची सुविधा नाही, अशा भागासाठी विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करणे या कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) ची नेमणुक करणे बाबत ई-निविदा मागविण्यात आली असून त्यामध्ये दोन निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्याची संक्षिप्त माहिती नमुद प्रमाणे आहे.

3. Yash Innovative Solutions LLP - एकुण प्रकल्प किंमतीच्या 2% दराने
4. Fortress Infracon Ltd. - एकुण प्रकल्प किंमतीच्या 3.51% दराने

तुलनात्मक दृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा Yash Innovative Solutions LLP यांची असून ती एकुण प्रकल्प किंमतीच्या 2% या दराची आहे. या अनुषंगाने त्यांना दर कमी करणे बाबत दर निश्चिती समितीने विचारणा केली असता, त्यांनी एकुण प्रकल्प किंमतीच्या 2% (+GST Extra) ऐवजी एकुण प्रकल्प किंमतीच्या 1.98% (+GST Extra) या दराने काम करण्याचे मान्य केले आहे.

करीता, तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची Yash Innovative Solutions LLP यांची एकुण प्रकल्प किंमतीच्या 1.98% (+GST Extra) दराची निविदा विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्रमांक 457/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरातील ज्या भागात जलनि:स्सारण वाहिन्यांची सुविधा नाही, अशा भागासाठी विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करणे या कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) ची नेमणुक करणे या कामाच्या प्राप्त निविदांपैकी एकुण प्रकल्प किंमतीच्या 2% (+GST Extra) ऐवजी समक्ष 1.98% (+GST Extra) दराची निविदा दर निश्चिती समिती समक्ष वर मान्य केल्यानुसार Yash Innovative

Solutions LLP यांची 1.98% (+GST Extra) दराच्या निविदेस मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 458/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.11.07.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सार्वजनिक आरोग्य, महाराष्ट्र शासन निर्णय क्र.मवैअ/2011/ प्र.क्र.626 /11/सेवा-3, दि.7 ऑगस्ट 2012 नुसार महानगरपालिका आरोग्य विभागांअतर्गत आस्थापने वरील सर्व कार्यरत वैद्यकीय अधिकारी यांना 6 व्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीनुसार मुळ वेतनाच्या 35 टक्के व्यवसायरोध भत्ता (एनपीए) लागु करण्याची मागणी आहे. आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी शिफारस केल्यानुसार व संदर्भीय शासन निर्णयानुसार व महानगरपालिका अधिनियमाचे कलम 454, 455 व 456 नुसार 6 व्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीनुसार मुळ वेतनाच्या 35 टक्के व्यवसायरोध भत्ता (एनपीए) प्रस्तावाच्या तारखे पासून लागू करण्याच्या मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक 458/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सार्वजनिक आरोग्य, महाराष्ट्र शासन निर्णय क्र.मवैअ/2011/ प्र.क्र.626 /11/सेवा-3, दि.7 ऑगस्ट 2012 नुसार महानगरपालिका आरोग्य विभागांअतर्गत आस्थापने वरील सर्व कार्यरत वैद्यकीय अधिकारी यांना 6 व्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीनुसार मुळ वेतनाच्या 35 टक्के व्यवसायरोध भत्ता (एनपीए) प्रस्तावाच्या तारखे पासून लागू करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 459/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.11.07.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, 15 वा वित्त आयोग निधी मधून 3000 ली.क्षमतेचे 03 व्हॅक्युम मशिन्स खरेदी करावयाचे आहेत. त्यासाठी जीईएम पोर्टलद्वारे 03 नामांकित कंपन्यांचे दर तपासणी केली असता, खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| अ.क्र. | एजन्सीचे नाव | प्रतिनग दर |
|---|---|---|
| 1. | मे.कॅम-ॲव्हिदा एन्व्हायरो इंजि.प्रा.लि. | र.रु.35,28,000/- |
| 2. | मे.इन्सॉल मल्टिक्लिन इक्वीपमेंट प्रा.लि. | र.रु.36,78,000/- |
| 3. | मे.क्लिन ॲण्ड ग्रीन इक्विपमेंट प्रा.लि. | र.रु.36,00,000/- |

उपरोक्त प्रमाणे 3000 लि.क्षमेतेचे 03 व्हॅक्युम मशिन खरेदी करण्यासाठी मे.कॅम-ॲव्हिदा एन्व्हायरो इंजि.प्रा.लि. यांचे दर किफायतशीर असल्याने अंदाजपत्रक बनविण्यासाठी ग्राह्य धरण्यात आले आहेत. मे.कॅम-ॲव्हिदा एन्व्हायरो इंजि.प्रा.लि.यांचे दरानुसार 3000 लि.क्षमेतेचे 03 व्हॅक्युम मशिन्स खरेदी करण्यासाठी र.रु.1,05,84,000/- खर्च अपेक्षीत आहे. अंदाजपत्रकीय खर्चास मान्यता मिळाली तर जीईएम पोर्टलद्वारे जाहीर निविदा मागवुन व्हॅक्युम मशिन्स खरेदी करण्यात येईल.

करीता, 3000 लि.क्षमेतेचे 03 व्हॅक्युम मशिन खरेदी करण्यासाठी अपेक्षीत र.रु.1,05,84,000/- खर्चाचे अंदाजपत्रक मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 459/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, 15 वा वित्त आयोग निधी मधून 3000 ली.क्षमतेचे 03 व्हॅक्युम मशिन्स खरेदी र.रु.1,05,84,000/- च्या अंदाजपत्रकास मान्यता प्रदान करण्यात येते. तसेच जीईएम पोर्टलद्वारे जाहीर निविदा मागवून व्हॅक्युम मशिन्स खरेदी करण्यास देखील मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 460/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.12.07.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहराचा पाणी पुरवठा सुरळीत व्हावा या करीता मा.प्रधान सचिव तसेच मा.विभागीय आयुक्त यांनी बैठका घेऊन विविध सुचना केलेल्या आहेत. शहर पाणी पुरवठा सुरळीत व्हावा या करीता प्राधान्याने करावयाच्या बाबींकरीता कार्यवाही करणे बाबत आदेशीत करण्यात आलेले होते. त्याचप्रमाणे शहरातील उन्हाळी परिस्थिती पाण्याची वाढीव मागणी लक्षात घेता, तात्काळ उपाय योजना करण्यासाठी महानगरपालिका स्तरावर दि.09.05.2022, दि.10.05.2022 व दि.12.05.2022 बैठका घेण्यात आलेल्या आहेत.

मजीप्रा मार्फत प्रगतीपथावर असलेल्या नवीन पाणी पुरवठा योजना प्रकल्प पुर्ण होण्यास कालावधी लागणार असल्याने अस्तित्वातील जलस्त्रोतांचा वापर करुन शहराच्या पाणी पुरवठ्यात वाढ करण्यासाठी उपाय योजना अंतर्गत नहर-ए-अंबारी द्वारे होणाऱ्या पाणी पुरवठ्यात वाढ करण्याचा समावेश आहे. नहर-ए-अंबारी द्वारे प्राप्त होणारे पाणी रोजाबाग साठवण टाकीत आणले जाते. रोजाबाग साठवण टाकी येथे या पाण्यावर प्राथमिक प्रक्रिया केली जाते. या पाण्यावर पुर्णपणे शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया केली जावी या करीता रोजाबाग येथे 3 दलली क्षमतेचे प्रेशर फिल्टर प्लँन्ट उभारणे गरजेचे आहे.

मजीप्राच्या दरसुचीमध्ये उपरोक्त बाबींचा समावेश नसल्याने खुल्या बाजारातून दरपत्रके घेऊन अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. अं.प.र.रु.84,37,000/- इतकी आहे. सदरील कामाचा खर्च जायकवाडी जलवाहीनी देखभाल दुरुस्ती या लेखाशिर्षकातून प्रस्तावीत करण्यात आलेला आहे.

महानगरपालिका अर्थसंकल्प 2022-23 मध्ये जायकवाडी जलवाहीनी देखभाल दुरुस्ती या लेखाशिर्षका अंतर्गत एकत्रित तरतुद जलवाहीनी देखभाल दुरुस्ती करीता उपलब्ध आहे. तथापि, या आकस्मिक तातडीच्या उद्भवलेल्या कामामुळे या लेखाशिर्षका अंतर्गत उपलब्ध असलेली तरतुद कमी होउन देखभाल दुरुस्तीच्या कामाकरीता निधी शिल्लक राहणार नसल्याने जायकवाडी जलवाहीनी देखभाल दुरुस्ती या लेखाशिर्षकाअंतर्गत वाढीव र.रु.3 कोटीची तरतुद उपवलब्ध् होणे गरजेचे आहे. रोजाबाग सेटलींग टॅंक येथे 3 दलली क्षमतेच्या प्रेशर फिल्टर प्लान्टची उभारणी करणे या कामाचे अं.प.र.रु.84,37,000/-चे मा.सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 460/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहराच्या पाणी पुरवठ्यात वाढ व्हावी तसेच रोजाबाग सेटलींग टॅंक येथे येणाऱ्या पाण्यावर शास्त्रोक्त पदध्तीने पाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी 3 दलली प्रतिदिन क्षमतेचे प्रेशर फिल्टर प्लॅन्टची उभारणी करणे या कामाचे अंदाजपत्रक र.रु.84,37,000/- चे अर्थसंकल्पात जायकवाडी जलवाहिनी देखभाल दुरुस्ती या लेखाशिर्षकाअंतर्गत वाढीव र.रु.3 कोटीची तरतुद करुन देण्याच्या मान्यतेसह मंजुर करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 461/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.12.07.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहराचा पाणी पुरवठा सुरळीत व्हावा या करीता मा.प्रधान सचिव तसेच मा.विभागीय आयुक्त यांनी बैठका घेऊन विविध सुचना केलेल्या आहेत. शहर पाणी पुरवठा सुरळीत व्हावा या करीता प्राधान्याने करावयाच्या बाबींकरीता कार्यवाही करणे बाबत आदेशीत करण्यात आलेले होते. त्याचप्रमाणे शहरातील उन्हाळी परिस्थिती पाण्याची वाढीव मागणी लक्षात घेता, तात्काळ उपाय योजना करण्यासाठी महानगरपालिका स्तरावर दि.09.05.2022, दि.10.05.2022 व दि.12.05.2022 बैठका घेण्यात आलेल्या आहेत.

मजीप्रा मार्फत प्रगतीपथावर असलेल्या नवीन पाणी पुरवठा योजन प्रकल्प पुर्ण होण्यास कालावधी लागणार असल्याने अस्तित्वातील जलस्तोत्रांचा वापर करुन शहराच्या पाणी पुरवठ्यात वाढ करण्यासाठी उपाय योजना अंतर्गत हर्सुल जलशुध्दीकरण केंद्र येथील पाणी परिमाणात वाढ होण्याकरीता अशुध्द गुरुत्व वाहीनीवर आवश्यकतेप्रमाणे एअर व्हॉल्व्ह बसविणे, गाळणी हौदाचे नुतनीकरण करणे, अस्तित्वातील साठवण टाक्यांची स्वच्छता करणे तसेच साठवण टाकी भरण्यासाठी जलवाहिनी टाकणे इ.कामांचा समोवश आहे. तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत प्रगतीपथावर असलेल्या नवीन पाणी पुरवठा योजनेतून हर्सुल तलाव ते हर्सुल जलशुध्दीकरण केंद्रा दरम्यान नवीन अशुध्द गुरुत्व वाहीनी टाकाणे, हर्सुल जेल व हरसिध्दी जलकुंभांना हर्सुल जलशुदीकरण केंद्र येथून पाणी पुरवठा करणे या बाबींचा देखील समावेश आहे. महानगरपालिका व मजीप्राने कामे पुर्ण केली असून हर्सुल जलशुध्दीकरण केंद्र येथे 15 ते 17 दलली इतके पाणी परिमाण दोन्ही जलवाहिन्याद्वारे उपलब्ध होणे अपेक्षित आहे.

हर्सुल जलशुध्दीकरण केंद्राची स्थापीत क्षमता ही 10 दलली प्रतिदिन इतकी असून 20% जास्तीचा भार लक्षात घेता, अस्तित्वातील जलशुध्दीकरण केंद्रात 12 दलली पाण्यावर प्रक्रिया केली जावू शकते. तथापि 15 ते 17 दलली इतके पाणी परिमाण उपलब्ध होणार असल्याने उर्वरीत पाण्याच्या प्रक्रियेकरीता 3 दलली क्षमतेचे 2 (6दलली प्रतिदिन) प्रेशन फिल्टर प्लॅन्ट उभारणे गरजेचे आहे. मजीप्राच्या दरसुचीमध्ये उपरोक्त बाबींचा समावेश नसल्याने खुल्या बाजारातून दरपत्रके घेऊन अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. अं.प.र.रु.1,68,74,000/- इतकी आहे. सदरील कामाचा खर्च जायकवाडी जलवाहीनी देखभाल दुरुस्ती या लेखाशिर्षकातून प्रस्तावीत करण्यात आलेला आहे.

महानगरपालिका अर्थसंकल्प 2022-23 मध्ये जायकवाडी जलवाहीनी देखभाल दुरुस्ती या लेखाशिर्षका अंतर्गत एकत्रित तरतुद जलवाहीनी देखभाल दुरुस्ती करीता उपलब्ध आहे. तथापि, या आकस्मिक तातडीच्या उद्भवलेल्या कामामुळे या लेखाशिर्षका अंतर्गत उपलब्ध असलेली तरतुद कमी होऊन देखभाल दुरुस्तीच्या कामाकरीता निधी शिल्लक राहणार नसल्याने जायकवाडी जलवाहीनी देखभाल दुरुस्ती या लेखाशिर्षकाअंतर्गत वाढीव र.रु.3 कोटीची तरतुद उपलब्ध होणे गरजेचे आहे. हर्सुल जलशुदीकरण केंद्र येथे 6 दलली क्षमतेच्या प्रेशर फिल्टर प्लान्टची उभारणी करणे या कामाचे अं.प.र.रु.1,68,74,000/- चे मा.सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 461/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहराच्या पाणी पुरवठ्यात वाढ व्हावी या करीता हर्सुल जलशुध्दीकरण केंद्र येथे उपलब्ध होणाऱ्या अतिरीक्त पाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी 6 दलली प्रतिदिन क्षमतेचे प्रेशर फिल्टर प्लॅन्टची उभारणी करणे या कामाचे अं.प.र.रु.1,68,74,000/- चे अर्थसंकल्पात जायकवाडी जलवाहिनी देखभाल दुरुस्ती या लेखाशिर्षकाअंतर्गत वाढीव र.रु.3 कोटीची तरतुद करुन देण्याच्या मान्यतेसह मंजुर करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 462/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.12.07.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.नरेश अनुपसिंग रिडलॉन (स्विपर), वॉर्ड कार्यालय 2 (जी) महानगरपालिका औरंगाबाद यांनी त्यांच्या स्वत:च्या Perinal Abcess आजारावर शासन मान्य खाजगी रुग्णालय एम.आय.टी.हॉस्पीटल, औरंगाबाद येथे उपचार केलेला असून र.रु.1,59,467/- (अक्षरी रुपये एक लाख एकोणसाठ हजार चारशे सदुसष्ट) इतका खर्च केला आहे.

अर्जदाराने आवश्यक विहित नमुन्यात माहितीसह सर्व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली असून त्यांचा Perinal Abcess उपचारार्थ एकूण केलेला खर्च र.रु.1,59,467/- इतका झाला असून त्यापैकी अनुज्ञेय नसलेली र.रु.43,271/- वजा जाता र.रु.1,16,196/- शिल्लक राहते. शिल्लक रक्कमेच्या 90 टक्के र.रु.1,40,576/- इतकी होते. एकूण खर्चाचा 5 टक्के र.रु.7,973/- ही मनपा फंडात जमा करुन मंजुर देय र.रु.96,603/- संबंधीतास अदा करावयाची आहे.

संबंधीताने उपचार एम.आय.टी.हॉस्पीटल, औरंगाबाद येथे केला असून महाराष्ट्र शासन निर्णय क्र.सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.वेखप्र-2011/प्र.क्र./333/11/राकावि-2/मंत्रालय मुंबइ-32 दि.16.11.2011अन्वये जारी केलेल्या परिशिष्ट-अ शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटूंबीयांनी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या गंभीर व विशिष्ट खर्चा वरील शासकीय रुग्णालयप्रमाणे प्रतिपुर्ती अनुज्ञेयतेसाठी खाजगी रुग्णालयाच्या अद्यावत यादी दि.16.11.2001 पर्यंत मधील प्रसिध्द रुग्णालयाचे नाव समाविष्ट नाही. सदरचा प्रस्तावास पडताळणी करुन वैद्यकीय प्रतिपुर्तीसाठी आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी शिफारस केलेली आहे.

करीता, श्री.नरेश अनुपसिंग रिडलॉन (स्विपर), वॉर्ड कार्यालय 2 (जी) यांना प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेल्या र.रु.96,603/- ही रक्कम संबंधीतांना अदा करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर विचारार्थ व मान्यतेस्तव सविनय सादर.

**<u>ठराव क्रमांक 462/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.नरेश अनुपसिंग रिडलॉन (स्विपर), वॉर्ड कार्यालय 2 (जी) महानगरपालिका औरंगाबाद यांनी त्यांच्या स्वत:च्या Perinal Abcess आजारावर शासन मान्य खाजगी रुग्णालय एम.आय.टी.हॉस्पीटल, औरंगाबाद येथे उपचार झालेला आहे. नियमाप्रमाणे एकूण र.रु.96,603/- खर्च अनुज्ञेय करण्यात आलेला आहे. सदर रक्कम अदा करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 463/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.12.07.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तू संग्रहालयातील इतर दुरुस्ती करण्याचा प्रस्ताव आहे. या कामामध्ये पार्ट-ए (वाळवी आणि गळती दुरुस्ती) साठी र.रु.7,00,900/- इतकेचे तसेच पार्ट-बी इतर दुरुस्तीसाठीची कामे करण्यासाठी र.रु.42,97,700/- असे एकूण र.रु.49,98,600/- चे अंदाजपत्रकास तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. सदर प्रस्तावास मा.स्थायी समितीने विषय क्रमांक-221/2021 दि.18.11.2021 अन्वये मान्यता दिलेली आहे.

श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तू संग्रहालयातील इतर दुरुस्ती करण्याच्या कामासाठी र.रु.36,86,481/- इतकेची निविदा ई-निविदा विभागामार्फत मागविण्यात आली असता,निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत दर भरुन प्राप्त झालेल्यानिविदेचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | निविदा धारकाचे नाव | निविदेतील दाखल केलेले दर |
|---|---|---|
| 1. | श्री.शेख मसुद शेख अमीन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 18.25% कमी दराने |
| 2. | श्री.मुजीबूर रहेमान खान | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 14.99% कमी दराने |
| 3. | श्री.सिद्दीकी जलिसोद्दीन मोहीजुद्दीन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 13.98% कमी दराने |
| 4. | मे.गुदगे कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 3.00% कमी दराने |

वरील तुलनात्मक तक्त्यानुसार श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तू संग्रहालयातील देखभाल दुरुस्तीची कामे करण्यासाठी सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 18.25% कमी दराची श्री.शेख मसुद शेख अमीन, औरंगाबाद यांची निविदा प्राप्त आहे.

सदर निविदाधारकांच्या प्राप्त झालेल्या दरास मा.प्रशासक तथा आयुक्त यांनी मा.स्थायी समिती समोर सादर करणेबाबत शिफारस केलेली आहे.

श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तू संग्रहालयातील देखभाल दुरुस्तीची कामे करण्यासाठी सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 18.25% कमी दराची श्री.शेख मसुद शेख अमीन औरंगाबाद यांची निविदा मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 463/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तू संग्रहालयातील देखभाल दुरुस्तीची कामे करण्यासाठी सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 18.25% कमी दराची श्री.शेख मसुद शेख अमीन औरंगाबाद यांची निविदा प्राप्त असून निविदा प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 464/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.13.07.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरामध्ये ज्या भागात जलवाहिन्या नाहीत अशा ठिकाणी महानगरपालिकेतर्फे ड्रम पध्दतीने टँकरद्वारे सशुल्क पाणी पुरवठा करण्यात येतो. यासाठी शहरामध्ये एन-5, एन-7 कोटला जलकुंभ व नक्षत्रवाडी बुस्टरपंप हाऊस या चार टँकर फिलींग पॉईंट वरुन टँकर भरण्यात येतात. सद्यस्थितीत शहरात टँकरद्वारे ड्रम पध्दतीने पाणी पुरवठा करण्याच्या निविदेच्या कामाची मुदत दि.07.07.2022 रोजी संपणार आहे.

करीता, पुढील एक वर्षाच्या कालावधीसाठी भाडेतत्वावर टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यासाठी अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. भाडेतत्वावरील टँकरची संख्या नागरीकांच्या मागणी नुसार कमी जास्त होते. सदर बाब विचारात घेता (अ) शहरासाठी साधारणपणे 5000 ली.क्षमतेचे 71 टँकर व 10000 ली.क्षमतेचे 6 टँकर असे एकुण 77 टँकर तसेच (ब) सातारादेवळाईसाठी 5000 ली.क्षमतेचे 4 टँकर, 12000 ली.क्षमतेचे 3 टँकर व 24000 ली.क्षमतेचे 3 टँकर असे एकूण 10 टँकर लागतील असा अंदाज गृहीत धरण्यात आला आहे. त्यानुसार शहर व सातारा देवळाई परिसर मिळून एकूण 87 टँकरद्वारे पुढील एका वर्षाच्या कालावधीसाठी ड्रम पध्दतीने टँकरद्वारे सशुल्क पाणी पुरवठा करण्याच्या कामाचे अंदाजपत्रक सध्याच्या निविदेच्या मंजुर दराप्रमाणे रु.6,57,08,925/- चे तयार करण्यात आले आहे.

नागरीकांकडून ड्रम पध्दतीने पाणी पुरवठा करतांना आगावू रक्कम विविध वॉर्ड कार्यालयांमध्ये जमा करुन घेण्यात येत असून या रक्कमेतून टँकरसाठी लागणारा खर्च प्रस्तावीत करण्यात येत आहे. सदर कामाच्या निविदेची वैधता तीन वर्षांकरीता राहील. लेखा विभागाने प्रत्येक वर्षी अंदाजपत्रक रक्कम एवढी तरतुद अर्थसंकल्पमध्ये ठेवावी. करीता, अंदाजपत्रक र.रु.6,57,08,925/- चा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 464/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहर व सातारा-देवळाई परिसररात ज्या भागात जलवाहिन्या नाहीत अशा ठिकाणी एकुण 87 टँकरद्वारे ड्रम पध्दतीने एक वर्षाच्या कालावधीत सशुल्क पाणी पुरवठा करण्यासाठी तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक र.रु.6,57,08,925/- मान्यता देण्यात येते. सदर कामाच्या निविदेची वैधता तीन वर्षांकरीता राहील. लेखा विभागाने प्रत्येक वर्षी अंदाजपत्रक रक्कम एवढी तरतुद अर्थसंकल्पामध्ये ठेवावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 465/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.13.07.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.107 अंतर्गत अभिनंदन हौसिंग सोसायटी येथील महानगरपालिकेच्या खुल्या जागेत बॅडमिंटन हॉलचे अर्धवट काम पुर्ण करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2021-22 दरसुची नुसार र.रु.36,79,781/- चे तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकास दि.30.06.2022 अन्वये मान्यता दिलेली आहे.

सदर कामासाठी लागणारा खर्च अर्थसंकल्प 2022-2023 मध्ये स्पील ओव्हर-व्यापारी संकुले व इतर इमारती या लेखाशिर्षा अंतर्गत स्पील र.रु.37 लक्ष तरतुद उपलब्ध आहे.

करीता, सदरील कामाचे अंदाजपत्रक र.रु.36,79,781/- मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक 465/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.107 अंतर्गत अभिनंदन हौसिंग सोसायटी येथील महानगरपालिकेच्या खुल्या जागेत बॅडमिंटन हॉलचे अर्धवट काम पुर्ण करणे या कामाचे अंदाजपत्रक र.रु.36,79,781/- तयार करण्यात आले असून सदर अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 466/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.13.07.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.107 अंतर्गत साईवृंदावन कॉलनी येथील महानगरपालिकेच्या खुल्या जागेत बॅडमिंटन हॉलचे अर्धवट काम पुर्ण करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2021-22 दरसुची नुसार र.रु.36,79,781/- चे तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकास दि.30.06.2022 अन्वये मान्यता दिलेली आहे.

सदर कामासाठी लागणारा खर्च अर्थसंकल्प 2022-2023 मध्ये स्पील ओव्हर-व्यापारी संकुले व इतर इमारती या लेखाशिर्षा अंतर्गत स्पील र.रु.37 लक्ष तरतुद उपलब्ध आहे.

करीता, सदरील कामाचे अंदाजपत्रक र.रु.36,79,781/- मंजुरीबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक 466/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.107 अंतर्गत साईवृंदावन कॉलनी येथील महानगरपालिकेच्या खुल्या जागेत बॅडमिंटन हॉलचे अर्धवट काम पुर्ण करणे या कामाचे अंदाजपत्रक र.रु.36,79,781/- चे तयार करण्यात आले असून सदर अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 467/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.15.07.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, देशामध्ये व राज्यामध्ये कोव्हिड-19 या विषाणुचा प्रार्दुभाव झाल्यामुळे Pandemic ची साथ संपुर्ण जग, देश व राज्यामध्ये पसरली असून कोव्हिड-19 हा साथरोग नियंत्रित करण्याची आवश्यकता आहे. औरंगाबाद शहरामधील कोव्हिड-19 विषाणु बाधित रुग्णांची सद्यस्थिती व त्यावरील उपाय योजना करण्यात येत आहे.

सन 2020-21 या आर्थीक वर्षात कोव्हिड-19 प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्यातकरीता जिल्हा नियोजन समिती मधुन जा.क्र./जिनिस/जिवायोनिवि/कोव्हिड-19/2020-21/450 दि.18.02.2021 या निधी वितरण आदेशामधील अखर्चित र.र.322.50 लक्ष यामधून अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद यांना 07 नग, जिल्हा आरोग्य वैद्यकीय अधिकारी, जिल्हा परिषद औरंगाबाद यांना 40 नग तसेच जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय व ग्रामिण रुग्णालय यांना 15 नग व महानगरपालिका औरंगाबाद यांना 08 नग असे एकूण 70 नग Solar D.C.Chest Refrigerator 240 Liter खरेदी करण्याकरीता जिल्हाधिकारी, अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन औरंगाबाद यांनी जा.,क्र./जिनिस/प्रमा-निवि/जिवायो/ 2021-22/922 दि.31.03.2022 प्रमाणे सुधारीत प्रशासकीय मान्यता दिलेली असून सदरील निधी लवकरात लवकर खर्च करुन त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करावयाचे आहे.

Solar D.C.Chest Refrigerator 240 Liter-70 नग खरेदी करण्याकरीता अंदाजित र.रु.2,42,41,000/- (अक्षरी दोन कोटी बेचाळीस लक्ष ऐक्केचाकीस हजार फक्त) खर्चाकरीता GeM पोर्टलवर Bid No:GEM/2022/B/2247000 Dated 08.06.2022 नुसार निविदा मागविण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झालेले आहेत.

| Sr.No. | Item | M/sAshvattas Life Science LLP,Nashik **(Rate Including All Taxes)** | M/s Numinex Green Energy LLP, Dhule **(Rate Including All Taxes)** | M/s Pridian Trading LLP, Dhule **(Rate Including All Taxes)** |
|---|---|---|---|---|
| 1. | Solar D.C.Chest Refrigeratoar 204 Liter-70 Nos | Rs.2,44,88,800/- L-2 | Rs,2,45,70,000/- L-3 | Rs.2,42,20,000/- L-1 |

Solar D.C.Chest Refrigeratoar 240 Liter-70 Nos नग करीता M/s Pridian Trading LLP, Dhule यांचे र.रु.2,42,20,000/- (रुपये दोन कोटी बेचाळीस लक्ष वीस हजार फक्त) हे दर इतर निविदा धारकांच्या तुलनेमध्ये कमी असून M/s Pridian Trading LLP Dhule यांचे रु.2,42,20,000/- (अक्षरी रुपये दोन कोटी बेचाळीस लक्ष वीस हजार फक्त) या दरास व येणाऱ्या खर्चास मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेच्या विचारार्थ प्रस्ताव सादर.

**<u>ठराव क्रमांक 467/202C/2:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कोव्हिड-19 प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्याकरीता GeM पोर्टल वरील निविदेद्वारे Solar D.C.Chest Refrigeratoar 204 Liter-70 Nos नग करीता M/s Pridian Trading LLP, Dhule यांचे र.रु.2,42,20,000/- (रुपये दोन कोटी बेचाळीस लक्ष वीस हजार फक्त) या दरास व येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 468/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.18.07.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरामध्ये उन्हाळी परिस्थितीत पाण्याची वाढीव मागणी लक्षात घेता, तात्काळ उपाययोजना करण्यासाठी हर्सुल जलशुध्दीकरण केंद्र येथे 02 नवीन 65 अ.श. सबमर्शिबल सेन्ट्रीफ्युगल पंप बसवून पंपींगद्वारे हर्सुल जेल येथील 10 लक्ष क्षमतेचा ई.एस.आर.मध्ये पाणी घेण्यासाठी तसेच अधिक ग्रॅव्हीटीच्या सहाय्याने दिल्लीगेट येथील संपमध्ये पाण्याची आवक वाढविण्याचे नियोजन आहे. सदरील कामासाठी अं.प.र.रु.30,56,731/- मान्यता मिळाल्यानंतर निविदा मागविण्यात आल्या. प्रथम निविदा मागविण्यात आल्या असता एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या असून त्यापैकी दोन निविदा तांत्रिकदृष्ट्या पात्र आहे. त्यांचे निविदा दर खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदाधारक एजन्सी | निविदा रक्कम | कमी/जास्त |
|---|---|---|---|
| 1. | मे.तिरुपती ईलेक्ट्रिकल सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद | 30,56,731.00 | अं.प.दराप्रमाणे |
| 2. | मे.श्री.ईलेक्ट्रिकल्स ॲण्ड रेफ्रिजिरेशन, औरंगाबाद | 31,57,067.55 | अं.प.दरापेक्षा 5% ने जास्त |

वरील प्रमाणे तुलनात्मक दृष्ट्या सर्वात कमी दराचे दरपत्रक मे.तिरुपती ईलेक्ट्रिकल सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांचे असून अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच र.रु.30,56,731/- च्या खर्चाचे आहे.

करीता, वरील प्रमाणे मे.तिरुपती ईलेक्ट्रिकल सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांची रक्कम रु.30,56,731/- खर्चाची सर्वात कमी दराची निविदा मान्यतेबाबतचे प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 468/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,हर्सुल जलशुध्दीकरण केंद्र येथील नवीन 65 अ.श. सबर्शिबल सेन्ट्रीफ्युगल पंप, पॅनल बोर्ड, ट्रान्सफॉर्मर व इतर अनुषंगीक उपकरणांचा पुरवठा करुन उभारणी करणे बाबतची मे. तिरुपती ईलेक्ट्रिकल सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांच्या अंदाजपत्राकीय दरानुसार रक्कम रु.3056731/- कमी दराच्या निविदेस मान्यता देण्यात येते. पुढील वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 469/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.18.07.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,श्री.मंगेश गुलाबराव जाधव, सहशिक्षक, प्राथमिक शाळा मिटमिटा, केंद्र बेगमपुरा यांनी त्यांच्या वडिलांच्या Osteoarthritis (UT)hip 2 Avascular necrosis या आजारावर (RT) HIP Replacment हा सर्जिकल उपचार दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल, पुणे येथे दि.18.10.2020 ते दि.23.10.2020 या कालावधीत उपचार केले असून आजारपणावर एकुण रक्कम रु.2,60731/- वैद्यकीय खर्च झालेला असून वैद्यकीय परतावा नियमानुसार देण्यासाठी प्रस्ताव दाखल केला होता.

सदरील आजार व उपचार विशिषोपचारपध्दती या शासनमान्य विशिष्ट उपचारामध्ये येतो. परंतु सदरील रुग्णालय विशिषोपचारासाठी शासनमान्य असलेल्या रुग्णालयांच्या यादीत समाविष्ठ नाही. त्यामुळे संबंधिताच्या वैद्यकीय परताव्यासाठी शिफारस करण्यात आली नाही आणि संबंधितांचा वैद्यकीय परतावा अदा करण्यासाठीचा प्रस्ताव फेटाळण्यात आलेला आहे.

तथापी शासन निर्णय वैखप्र-2011/प्र.क्र.333/11/राकावि-2 दि.16.11.2011 शासन परिपत्रक क्र. वैखप्र-2011/प्र.क्र.333/राकावि-2 दि.09.12.2011 व शासन परिपत्रक क्र. वैखप्र-2013/प्र.क्र.291/13/ राकावि-2 दि.11.10.2013 च्या शासन निर्णयान्वये आणि आरोग्य विभागाचे जा.क्र/मनपा/457/2013/ दि.14.05.2013 च्या परिपत्रकातील मुद्दा क्र.3 नुसार शासनाची मान्यता नसलेल्या खाजगी रुग्णालयाच्या महानगरपालिका वैद्यकीय देयक परतावा विनियमात असलेल्या 27 आकस्मिक व 5 गंभीर आजारावर उपचार केल्यास वैद्यकीय देयक परतावा मर्यादा रु.1,00,000/-पर्यंत विभागप्रमुख यांच्या मंजूरीने देय राहिल.

सदरील प्रकरणात अतिरिक्त आयुक्त यांचे दालनात दि.20.04.2022 रोजी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सदरील बैठकीत झालेल्या चर्चेनुसार फेर प्रस्ताव सादर करण्याचे निर्देशित करण्यात

आले आणि आरोग्य विभागाने सदर प्रकरणी प्रस्तावाची पडताळणी करुन नियमानुसार सक्षम प्राधिकारी यांचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्याचे सूचित करण्यात आले आहे. त्यानुसार प्रस्ताव पुन्हा सादर करण्यात आला आहे.

करिता विशिषोपचार या आजारावार शासनाची मान्यता नसलेल्या खाजगी रुग्णालयात उपचार घेणे अशी प्रकरणे यापूर्वीही सादर झालेली आहेत व भविष्यातही अशी प्रकरणे सादर होवू शकतात. त्यामुळे कर्मचाऱ्यांचे हित पाहता आरोग्य विभागाचे दि.14.05.2013 च्या परीपत्राकातील मुद्दा क्र.3 मध्ये नमुद केल्याप्राणे 27 आकस्मिक व 5 गंभीर आजारासाठी शासनाची मान्यता नसलेल्या खाजगी रुग्णालयात उपचार घेतल्यास रु.1,00,000/- पर्यंतच्या मर्यादेत वैद्यकीय परतावा देणेबाबत ठरविले गेले त्याचप्रमाणे विशिषोपचारा साठी शासनाची मान्यता नसलेल्या खाजगी रुग्णालयात उपचार घेतल्यास रु.1,00,000/- पर्यंतच्या कमाल मर्यादेत वैद्यकीय परतावा देणे बाबत प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 469/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,विशेषोपचार या आजारावर शासनाची मान्यता नसलेल्या खाजगी रुग्णालयात उपचार घेणे अशी प्रकरणे यापूर्वीही सादर झालेली आहेत व भविष्यातही अशी प्रकरणे सादर होवू शकतात. त्यामुळे कर्मचाऱ्यांचे हित पाहता आरोग्य विभागाचे दि.14.05.2013 च्या परीपत्रकातील मुद्दा क्र.3 मध्ये नमुद केल्याप्रमाणे 27 आकस्मिक व 5 गंभीर आजारासाठी शासनाची मान्यता नसलेल्या खाजगी रुग्णालयात उपचार घेतल्यास रु.1,00,000/- पर्यंतच्या मर्यादेत वैद्यकीय परतावा देणेबाबत ठरविले गेले त्याच प्रमाणे विशिषोपचारासाठी शासनाची मान्यता नसलेल्या खाजगी रुग्णालयात उपचार घेतल्यास रु.1,00,000/- पर्यंतच्या कमाल मर्यादत वैद्यकीय परतावा खर्च अदा करण्यास मान्यता देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 470/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.18.07.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका पाणी पुरवठा योजनेअंतर्गत हर्सुल जलशुध्दीकरण केंद्र येथे हर्सुल तलावावरुन ग्रॅव्हिटीने येणाऱ्या पाण्याला फिल्टर करुन ग्रॅव्हिटीच्या सहाय्याने दिल्ली गेट ते पंपगृह येथे पुरवठा केला जातो. तसेच दिल्ली गेट पंपगृहावरुन शहरातील विविध भागात पाणी पुरवठा केला जातो. सद्यस्थितीत या पंपगृहावरुन विविध भागामध्ये होणारा पाणी पुरवठा अपुरा पडत आहे. औरंगाबाद शहरामध्ये पाण्याची वाढीव मागणी लक्षात घेता, तात्काळ उपाय योजन करण्यासाठी हर्सुल जलशुध्दीकरण केंद्र येथे तलावामधुन अतिरिक्त पाईपलाईन टाकून 08 ते 10 एम.एल.डी.पाणी आणणे व सदरील पाणी उचलण्यासाठी अतिरीक्त 02 नवीन 65 अ.श.सबमर्शिबल सेन्ट्रीफ्युगल पंप बसविण्यात आले. तथापि दि.04.07.2022 रोजीच्या बैठकीतील चर्चेनुसार या पाईपलाईनद्वारे जास्तीचे जवळपास 15 एम.एल.डी. पाण्याची आवक होणार आहे. त्यामुळे सद्यस्थितीत बसविण्यात आलेले 65 अ.श.सबमर्शिबल क्षमतेचे पंपं 15 एम.एल.डी. पाणी उचलण्यासाठी कमी पडत असल्यामुळे या ठिकाणी नवीन 100 अ.श.क्षमतेचे हॉरिझोन्टल सबमर्शिबल पंप बसविण्यात यावे. असे निर्देश देण्यात आलेले आहेत.

सदरील पंप बसविणे आवश्यक आहे. पंप कार्यान्वीत करण्यासाठी DSR/MJP/PWD/Civil/Ele/ 2021-22 Aqua Machineries, या उत्पादक कंपनीच्या Budgetary Offer नुसार तसेच बाजारभावा प्रमाणे पंप पुरवठा करुन कार्यान्वीत करण्यासाठी अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून अंदाजपत्रकाप्रमाणे र.रु.48,64,184/- खर्च अपेक्षीत आहे. या कामासाठी होणारा खर्च हा सन 2022-23 च्या अर्थसंकल्प "मशिनरी व पंप दुरुस्ती" लेखाशिर्षकाच्या तरतुदीतून करण्यात येईल.

तरी हर्सुल जलशुध्दीकरण केंद्र येथील नवीन 100 अ.श.हॉरिझोन्टल सबमर्शिबल पंप व इतर अनुषंगीक उपकरणांचा पुरवठा करुन उभारणी करणे इ.कामाच्या अंदाजपत्रक र.रु.48,64,184/-चा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 470/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, हर्सुल जलशुध्दीकरण केंद्र येथील नवीन 100 अ.श. हॉरिझोन्टल सबमर्शिबल पंप व इतर अनुषंगीक उपकरणांचा पुरवठा करुन उभारणी करणे या अंदाजपत्रक र.रु.48,641,84/- च्या कामास मान्यता देण्यात येते. प्रस्तावीत उपकरणांचा पुरवठा करणे, बसविणे व चाचणी देणे बाबत पुढील वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 471/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.18.07.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दर चार वर्षांनी वर्ग-4 संवर्गातील स्त्री व पुरुष कर्मचाऱ्यांना प्रत्येकी चार वर्षानंतर हिवाळी प्रावरणं (स्त्री कर्मचाऱ्यांसाठी 1 वुलन स्वेटर व 1 चादर/ब्लँकेट व पुरुष कर्मचाऱ्यांसाठी 1 वुलन स्वेटर) देण्यात येतात. या वर्षी लेखानुदान 22-23 साठीची तरतुद ही "सफाई कर्मचाऱ्यांची साठी

गणवेश व तत्सम साहित्य खरेदी” या लेखाशिर्षात करण्यात आली आहे. सदर लेखाशिर्षात रु.70.00 लक्षची तरतुद करण्यात आलेली आहे. सदर वर्ग-4 संवर्गातील स्त्री व पुरुष कर्मचाऱ्यांची संख्या खालील प्रमाणे दर्शविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचारी | कर्मचाऱ्यांची संख्या |
|---|---|---|
| 1. | स्त्री कर्मचारी (1 वुलन स्वेटर व 1 चादर/ब्लँकेट) | **563** |
| 2. | पुरुष कर्मचारी व सुरक्षा रक्षक (1 वुलन स्वेटर) | **1962** |

उपरोक्त गणवेश विनियमा अंतर्गत झालेल्या तरतुदीनुसार प्रत्येक स्त्री कर्मचाऱ्यांसाठी 1 वुलन स्वेटर व 1 चादर/ब्लँकेट व पुरुष कर्मचाऱ्यांसाठी 1 वुलन स्वेटर या प्रमाणे हिवाळी प्रावरणे खरेदीचे अंदाजपत्रक तयार केले असून वर्ग-4 स्त्री व पुरुष हिवाळी प्रावरणे खरेदीसाठी अंदाजे खर्च रु.34,94,404/- (अक्षरी रुपये चौतिस लक्ष चौऱ्यांन्नव हजार चारशे चार फक्त) इतका अपेक्षित आहे. यासाठी “सफाई कर्मचारीसाठी गणवेश व तत्सम साहित्य खरेदी” या लेखाशिर्षातून अंदाजपत्रकास मंजुरी प्राप्त होणेस्तव. तसेच विहित निविदा पध्दतीचा अवलंब करुन साहित्य खरेदीचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 471/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वर्ग-4 संवर्गातील स्त्री व पुरुष कर्मचाऱ्यांना हिवाळी प्रावरणे (स्त्री कर्मचाऱ्यांसाठी 1 वुलन स्वेटर व 1 चादर/ब्लँकेट व पुरुष कर्मचाऱ्यांसाठी 1 वुलन स्वेटर) खरेदी करण्यासाठी प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे साहित्य पुरवठा करण्यासाठी “सफाई कर्मचारीसाठी गणवेश व तत्सम साहित्य खरेदी” या लेखाशिर्षातून रु.34,94,404/- च्या अंदाजपत्रकास मान्यता प्रदान करण्यात येते. विहित निविदा पध्दतीचा अवलंब करुन साहित्य खरेदी करण्यास मंजुरी प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 472/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.19.07.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.भरतकुमार मदनसिंग राठोड, औषध निर्माण अधिकारी, आरोग्य विभाग, महानगरपालिका औरंगाबाद यांनी स्वत:च्या आईच्या नामे श्रीमती लिलाबाई मदनसिंग राठोड यांच्या Covid-19 Pneumonia या आजारावर उपचारासाठी खाजगी रुग्णालय कृष्णा हॉस्पीटल व मेडीकवर हॉस्पीटल औरंगाबाद येथे उपचार केलेला असून र.रु.2,79,361/- इतका खर्च केला आहे.

अर्जदाराने आवश्यक विहित नमुन्यात माहितीसह सर्व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली असून Covid-19 या आजारावर उपचारार्थ एकूण केलेला खर्च र.रु.2,79,361/- इतका झाला असून त्यापैकी अनुज्ञेय नसलेली र.रु.33,834/- वजा जाता रु.2,45,527/- शिल्लक राहते. शिल्लक रक्कमेच्या 90 टक्के रु.2,20,974/- इतकी होते. एकुण खर्चाच्या 5 टक्के र.रु.13,968/- ही मनपा फंडात जमा करुन मंजुर देय र.रु.2,07,006/- संबंधीतास अदा करावयाची आहे.

संबंधीताने कृष्णा हॉस्पीटल व मेडीकवर हॉस्पीटल औरंगाबाद येथे उपचार घेतलेले आहे. महाराष्ट्र शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र.वैखप-/2020/प्र.क्र.66/राकावि-2, नवीन इमारत मंत्रालय मुंबई-32 दि.17.12.2020 नुसार परिशिष्ट अ शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटूंबीयांनी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या Covid-19 या आजारावर केलेल्या विशिष्ट खर्चावरील शासकीय रुग्णालय प्रमाणे प्रतिपुर्ती अनुज्ञेयतेसाठी शासान मान्यता दिलेली आहे. तसेच औरंगाबाद महानगरपालिकेच्या मा.सर्वसाधारण सभेचा विषय क्रमांक-65/2020 दि.10.12.2020 च्या ठरावा नुसार नमुद मुद्दा क्र.2 नुसार उपरोक्त आजारास वैद्यकीय परतावा देता येतो. तसेच उपरोक्त रुग्णालय DCH या प्रकारच्या Facility मध्ये मान्यताप्राप्त यादीत नमुद आहे. सदरच्या प्रस्तावास पडताळणी करुन वैद्यकीय प्रतिपुर्तीसाठी आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी शिफारस केलेली आहे. सदरच्या प्रस्तावास पडताळणी करुन वैद्यकीय प्रतिपुर्तीसाठी आरोग्य वैद्यकीय आधिकाऱ्यांनी शिफारस केलेली आहे.

करीता, श्री.भरतकुमार मदनसिंग राठोड, औषध निर्माण अधिकारी,आरोग्य विभाग, महानगरपालिका औरंगाबाद यांना प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेल्या रु.2,07,006/- (अक्षरी रुपये दोन लाख सात हजार सहा फक्त) संबंधीताच्या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सविनय सादर.

**<u>ठराव क्रमांक 472/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.भरतकुमार मदनसिंग राठोड, औषध निर्माण अधिकारी, आरोग्य विभाग, महानगरपालिका औरंगाबाद यांनी त्यांच्या कोव्हीड-19 या आजारावर खाजगी रुग्णालय कृष्णा हॉस्पीटल व मेडीकवर हॉस्पीटल औरंगाबाद येथे उपचार घेतलेला आहे. नियमाप्रमाणे एकुण रु.2,07,006/- खर्च अनुज्ञेय करण्यात आलेला आहे. सदर रक्कम संबंधीतास अदा करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 473/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.19.07.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, भीमनगर, भावसिंगपुरा उत्तर अंतर्गत पेठेनगर येथील कमल हॉसिंग सोसायटी रस्त्याचे डांबरीकरण करणे बाबत (Phase-1) या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन 2019-20 च्या SSR नुसार र.रु.27,59,841/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. त्यास मा.प्रशासक महोदय यांनी दि.18.06.2021 अन्वये मान्यता प्राप्त झालेली आहे. तसेच मा.स्थायी समिती ठराव क्र.176 दि.30.07.2021 अन्वये मान्यता प्राप्त झालेली आहे.

त्यानुसार सदरील कामास्तव रितसर ई-निविदा विभागामार्फत ई-निविदा मागविल्या असता, एकूण 03 निविदा दर भरुन प्राप्त झालेल्या आहेत. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. | मे.काकाजी बंडूजी पाथ्रीकर | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 17.50 % कमी दराने |
| 2. | मे.गुदगे कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 14.99 % कमी दराने |
| 3. | मस्कट कन्स्ट्रक्शन कंपनी | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 6.86 % कमी दराने |

तुलनात्मक दृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरानेक्षा 17.50% कमी दराची निविदा मे.काकाजी बंडुजी पाथ्रीकर यांची प्राप्त झालेली आहे. त्यास मा.प्रशासक महोदयांनी मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार मे.काकाजी बंडुजी पाथ्रीकर यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 17.50% कमी दराची निविदा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक 473/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, भीमनगर, भावसिंगपुरा उत्तर अंतर्गत पेठेनगर येथील कमल हॉसिंग सोसायटी रस्त्याचे डांबरीकरण करणे बाबत (Phase-1) या कामासाठी प्राप्त झालेली निविदा मे.काकाजी बंडुजी पाथ्रीकर यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 17.50% कमी दराच्या निविदेस मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 474/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.19.07.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, भीमनगर, भावसिंगपुरा उत्तर अंतर्गत पेठेनगर येथील कमल हॉसिंग सोसायटी रस्त्याचे डांबरीकरण करणे बाबत (Phase-2) या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन 2019-20 च्या SSR नुसार र.रु.30,32,081/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. त्यास मा.प्रशासक महोदय यांनी दि.18.06.2021 अन्वये मान्यता प्राप्त झालेली आहे. तसेच मा.स्थायी समिती ठराव क्र.177 दि.30.07.2021 अन्वये मान्यता प्राप्त झालेली आहे.

त्यानुसार सदरील कामास्तव रितसर ई-निविदा विभागामार्फत ई-निविदा मागविल्या असता, एकूण 03 निविदा दर भरुन प्राप्त झालेल्या आहेत. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. | मे.काकाजी बंडूजी पाथ्रीकर | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 17.50 % कमी दराने |
| 2. | मे.गुदगे कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 14.99 % कमी दराने |
| 3. | मस्कट कन्स्ट्रक्शन कंपनी | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 08.01 % कमी दराने |

तुलनात्मक दृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 17.50% कमी दराची निविदा मे.काकाजी बंडुजी पाथ्रीकर यांची प्राप्त झालेली आहे. त्यास मा.प्रशासक महोदयांनी मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार मे.काकाजी बंडुजी पाथ्रीकर यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 17.50% कमी दराची निविदा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक 474/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, भीमनगर, भावसिंगपुरा उत्तर अंतर्गत पेठेनगर येथील कमल हॉसिंग सोसायटी रस्त्याचे डांबरीकरण करणे बाबत (Phase-2) या कामासाठी प्राप्त झालेली निविदा मे.काकाजी बंडुजी पाथ्रीकर यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 17.50% कमी दराच्या निविदेस मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 475/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.19.07.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो कि, १५ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार औरंगाबाद महानगरपालिकेचा समावेश Milion Plus Cities मध्ये असल्याने सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षातील वातावरणातील हवेची गुणवत्ता (Air Quality) सुधारण्यासाठी बंधनकारक अनूदानातील पहिला हप्ता महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्रं.एफ.एफ.सी.-२०२०/प्र.क्र.८६/

नवि-४ मंत्रालय, मुंबई-३२ दि.०९.११.२०२० अन्वये रु.१६,००,००,०००/- महानगरपालिकेस वितरीत करण्यात आले आहेत.

तसेच वातावरणातील हवेची गुणवत्ता (Air Quality) सुधारण्यासाठी बंधनकारक अनूदानातील दुसरा हप्ता महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्रं.एफ.एफ.सी.-२०२०/प्र.क्र.३४/नवि-४ मंत्रालय, मूंबई-३२ दि.१२.०४.२१ अन्वये रुपये.१६,००,००,०००/- महानगरपालिकेस वितरीत करण्यात आले आहेत.

१५ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार औरंगाबाद महानगरपालिकेचा समावेश Milion Plus Cities मध्ये असल्याने सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षातील पाणी पुरवठा व व्यवस्थापनात सुधारणा व प्रभावी घनकचरा व्यवस्थापन (For improving conservation, supply and management of water and efficient solid waste management) साठी बंधनकारक अनुदानातील पहिला हप्ता महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाचा शासन निर्णय क्रं.एफ.एफ.सी.-२०२०/प्र.क्र.८९/नवि-४ मंत्रालय, मूंबई-३२ दि.१०.११.२१ अन्वये रु.१५,७५,७९,४१७/- महानगरपालिकेस वितरीत करण्यात आले आहेत.

तसेच पाणी पुरवठा व व्यवस्थापनात सुधारणा व प्रभावी घनकचरा व्यवस्थापन (For improving conservation, supply and management of water and efficient solid waste management) साठी बंधनकारक अनुदानातील दुसरा हप्ता महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाचा शासन निर्णय क्रं.एफ.एफ.सी.-२०२०/प्र.क्र.३३/नवि-४ मंत्रालय, मूंबई-३२ दि.१२.०४.२०२१ अन्वये रु.१५,७५,७९,४१७/- महानगरपालिकेस वितरीत करण्यात आले आहेत.

वरील नमूद केल्यानुसार औरंगाबाद महानगरपालिकेस एकूण रुपये ६३,५१,५८,८३४/- इतका निधी प्राप्त झालेला आहे. उपरोक्त १५ व्या वित्त आयोगात प्राप्त एकत्रित निधी रु.६३,५१,५८,८३४/- मधुन आयुक्त तथा प्रशासक, महानगरपालिका औरंगाबाद यांनी खालील कामांचे नियोजन मा.ना.श्री.सुभाष देसाई, मंत्री उद्योग, खनिकर्म, मराठी भाषा तथा पालकमंत्री, औरंगाबाद यांचे समक्ष सादर केले होते. या सर्व कामांमुळे शहराचा पाणी पुरवठा, ड्रेनेज व्यवस्था आणि शहरातील हवेची गुणवत्ता यात मोठया प्रमाणात सकारात्मक परिणाम दिसून येतील आणि नागरिकांचे जिवनमान उंचावण्यासाठी या कामांचा हातभार लागेल असा विश्वास व्यक्त करत मा.पालकमंत्री, औरंगाबाद यांनी सदर कामास सहमती दर्शविली.

मा.ना.श्री.आदित्यजी ठाकरे, मंत्री,पर्यावरण,पर्यटन आणि राजशिष्टाचार, महाराष्ट्र राज्य यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सींग द्वारे घेतलेल्या बैठकीत विद्युत प्रणालीवर चालणारे वाहन (EV) खरेदी करण्याची बाब १५ व्या वित्त आयोगातील समाविष्ठ करण्यात आलेल्या कामात अंतर्भूत करावी अशा सूचना दिलेल्या होत्या. त्यानूसार १५ व्या वित्त आयोगातील प्राप्त खालील कामांचा समावेश करण्यात आला आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| | (अ) घनकचरा व्यवस्थापनः | | |
| १. | रमानगर, रोजाबाग व शिवाजीनगर ट्रान्सफर स्टेशन उभारणे | :- | १०,३८,००,०००.०० |
| २. | बायो मायनिंग मशिन | :- | २,०६,५०,०००.०० |
| ३. | पडेगाव, चिकलठाणा येथील Leachate Treatment Soil Biotechnology वर आधारीत प्रक्रिया केंद्र उभारणे | :- | १,२०,००,०००.०० |
| | एकूण रक्कम (अ) | | १३,६४,५०,०००.०० |
| | (ब) ड्रेनेजः | | |
| १. | सुखनानदी, खामनदी, शहरातून वाहणा-या मुख्य नाल्यांमधुन वाहत असलेल्या मुख्य जलनिःसारण वाहिन्यांना ड्रेनेजचे क्रॉस कनेक्शन करणे | :- | ८,१७,५५,८५७.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| | | एकूण रक्कम (ब) | ८,१७,५५,८५७.०० |
| | (क) पाणी पुरवठा (यांत्रिकी) : | | |
| १. | औरंगाबाद शहर पाणी पुरवठा सुधारणा करण्यासाठी खरेदी करावयाचे पंपींग मशिनरी. | | |
| | a) ढोरकीन पंपगृह येथे १५० अ.श.क्षमतेचा एक नवीन व्हि.टी.पंप बसविणे | :- | ३३,५३,१९७.०० |
| | b) फारोळा रिसायक्लींग पंपगृह येथे दोन नवीन २५ अ.श.क्षमतेचे सबमर्शिबल मड पंप बसविणे | :- | १४,७०,४२६.०० |
| | c) ज्युब्लीपार्क पंपगृह येथे हनुमान टेकडी येथे संप भरण्यासाठी एक नवीन १०० अ.श. क्षमतेचा व्हि.टी.पंप बसविणे | :- | ४५,०३,८३७.०० |
| | d) गारखेडा (एस.एफ.एस.) येथील ७.५ लक्ष लिटर क्षमतेच्या संप येथे दोन नवीन १५० अ.श. क्षमतेचा व्हि.टी.पंप बसविणे | :- | ९१,४२,३६९.०० |
| | e) जुना फारोळा (५६ द.ल.ली.) पंपगृह येथील ४७५ अ.श. पंप तीन नग रेट्रोफिटींग करणे व नविन मोटर व स्टार्टर बसविणे. | :- | २,२४,९१,६६७.०० |
| | | एकूण रक्कम (क) | ४,०९,६१,४९६.०० |
| | (ड) पाणी पुरवठा (स्थापत्य) : | | |
| १. | क्रांतीचौक येथील अस्तित्वातील ११ लक्ष लि.क्षमतेच्या संपची दुरुस्ती करणे व २० लक्ष लि. क्षमतेचा उंचावरील जलकुंभ भरण्यासाठी व्यवस्था करणे | :- | ३८,७३,८४१.०० |
| २. | गारखेडा येथे ७.५ लक्ष लि.क्षमतेचा संप बांधणे | :- | ६४,०३,९४३.०० |
| ३. | वितरण प्रणालीतील विविध जलकुंभांच्या झडपा बदलण्याकरीता झडपांचा पुरवठा घेणे | :- | १,३१,६२,८६०.०० |
| ४. | गजानन मंदिर चौक ते सुतगिरणी चौक पर्यंत ४०० मि.मी.व्यासाची डी.आय.के. जलवाहिनी टाकणे | :- | ८७,०१,५८२.०० |
| ५. | ७०० मीमी व्याचाच्या जलवाहीनीवर सेक्शनींग करीता व्हॉल्व टाकणे व स्कावर व्हॉल्व बसविणे. | :- | ४९,४३,९०२.०० |
| ६. | ७०० व १२१९ मीमी व्यासाच्या जलवाहिनीवर टॅम्पर प्रुफ एअर व्हॉल्व व ग्लॅन्डलेस स्लूस व्हॅल्व बसविणे | :- | ३१,४०,२८१.०० |
| ७. | फारोळा जलशुध्दीकरण केंद्र येथील गाळणी हौदांच्या फिल्टर मेडीयाची दुरुस्ती करुन वाळूच्या थरांची उंची वाढविणे. | :- | ९८,८८,७३५.०० |
| | | एकूण रक्कम (ड) | ५,०१,१५,१४४.०० |
| | (इ) सभोवतालच्या हवेची गुणवत्ता : | | |
| १. | शहरातील उड्डाणपुलाखाली व प्रमुख पुलांवर व्हर्टीकल गार्डनची उभारणी करणे | :- | ९९,९५,८१६.०० |
| २. | मनपाच्या प्रमुख उद्यानातील कारंजाचे नुतनीकरण करुन तीन वर्ष देखभाल दुरुस्ती करणे | :- | १,९९,६५,६२५.०० |
| ३. | शहरातील मुख्य चौकामध्ये नविन कारंजाची उभारणी करुन तीन वर्ष देखभाल दुरुस्ती करणे | :- | २,९९,९९,०००.०० |
| ४. | औरंगाबाद शहरातील विविध मुख्य रस्त्यावर रस्ता दुभाजक, फुटपाथ बांधणे व दुभाजकात झाडे लावणे. (३१.६० कि.मी.) | :- | १९,९९,९६,०१९.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | नाला सफाई साठी आवश्यक मशिनरी खरेदी करणे | | |
| | a) पोकलेन-१३० (२ नग) | :- | ९६,००,०००.०० |
| | b) पोकलेन-२० (१ नग) | :- | २३,०४,०००.०० |
| | c) बॅकहो लोडर (४ नग) | :- | १,४६,८०,०००.०० |
| | d) टिप्पर- ८.५ घमी क्षमता (३ नग) | :- | ८६,२५,०००.०० |
| | e) टिप्पर- १४ घमी क्षमता (७ नग) | :- | २,४९,९०,०००.०० |
| ६. | रोड स्वीपींग मशिन (सहा नग) | :- | १,९६,५०,०००.०० |
| ७. | विद्युत प्रणालीवर चालणारे वाहन (EV) खरेदी करणे | :- | १,००,००,०००.०० |
| | **एकूण रक्कम (इ)** | | **३४,९८,०५,४६०.००** |
| | **एकूण रक्कम (अ+ब+क+ड+इ)** | | **६५,९०,८७,९५७.००** |

उक्त नमूद नूसार सभोवतालच्या हवेच्या गुणवत्तेसाठी केंद्र शासनाकडुन दोन टप्यात (रु.१६+१६ कोटी) म्हणजे रु.३२ कोटी प्राप्त झाले आहेत. या प्राप्त निधी पैकी छावणी कटक मंडळास रु.४८,४१,१६६/- इतका निधी वर्ग झालेला आहे. ऊर्वरीत रु.३१,५१,५८,८३४/- रक्कमे पैकी रु.२५,९९,५६,४६०/- इतक्या रक्कमेची शहरातील हवेची गुणवत्ता सुधारणेसाठी कामे कार्यादेशनूसार प्रगतीपथावर आहेत व मा.सर्वसाधारण सभा विषय क्रं.४३७/२०२२ दि.२९.०६.२०२२ च्या ठरावानुसार या प्राप्त निधीतील ऊर्वरीत र.रु.५.५२ कोटी EV Convergence plan साठी स्मार्ट सिटी विभागास वर्ग झाली आहे.

मा.सर्वसाधारण सभा विषय क्रं.१२०७/२०२१ दि.१३.१०.२०२१ नूसार (इ)सभोवतालच्या हवेची गुणवत्ता मधील अ.क्र.५ व ६ नुसार खालील नमूद तक्त्यातील कामे ज्याची अंदाजपत्रकिय र.रु.७,९८,४९,०००.०० होते.

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | नाला सफाई साठी आवश्यक मशिनरी खरेदी करणे | | |
| | A. पोकलेन-१३० (२ नग) | :- | ९६,००,०००.०० |
| | B. पोकलेन-२० (१ नग) | :- | २३,०४,०००.०० |
| | C. बॅकहो लोडर (४ नग) | :- | १,४६,८०,०००.०० |
| | D. टिप्पर- ८.५ घमी क्षमता (३ नग) | :- | ८६,२५,०००.०० |
| | E. टिप्पर- १४ घमी क्षमता (७ नग) | :- | २,४९,९०,०००.०० |
| ६. | **रोड स्वीपींग मशिन (सहा नग)** | :- | **१,९६,५०,०००.००** |
| | **एकूण रक्कम** | | **७,९८,४९,०००.००** |

सदरील रक्कम रु.७,९८,४९,०००.०० **"पाणी पुरवठा व्यवस्थापन व प्रभावी घनकचरा व्यवस्थापन"** या १५ व्या वित्त आयोगाच्या प्राप्त अनुदानातुन करणे तसेच या योजनेतून सर्व विभागांतर्गत होणा-या कामाच्या बचतीची रक्कम व जमा असलेल्या या खात्यातील मिळणारे व्याज अशी एकत्रित रक्कम देखील या योजनेवर प्रत्यक्ष स्थळावरील परिस्थिती व आवश्यकतेनुसार विविध कामांसाठी व अतिरिक्त बाबींसाठी वापरणे बाबतचा हा दुरुस्तीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 475/2022:-</u>**

प्रस्तावात नमूद केल्यानुसार १५ व्या वित्त आयोगाच्या एकूण प्राप्त निधीतुन मा.सर्वसाधारण सभा ठराव क्रं.४३७/२०२२ दि.२९.०६.२०२२ मधिल (इ) सभोवतालच्या हवेची गुणवत्ता मधील बाब क्र.५ व ६ मधील कामे ज्याची अं.प.र.रु.७,९८,४९,०००.०० ऐवढी आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | नाला सफाई साठी आवश्यक मशिनरी खरेदी करणे | | |
| | A. पोकलेन-१३० (२ नग) | :- | ९६,००,०००.०० |
| | B. पोकलेन-२० (१ नग) | :- | २३,०४,०००.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| | C. बॅकहो लोडर (४ नग) | :- | १,४६,८०,०००.०० |
| | D. टिप्पर- ८.५ घमी क्षमता (३ नग) | :- | ८६,२५,०००.०० |
| | E. टिप्पर- १४ घमी क्षमता (७ नग) | :- | २,४९,९०,०००.०० |
| ६. | रोड स्वीपींग मशिन (सहा नग) | :- | १,९६,५०,०००.०० |
| | | **एकूण रक्कम** | **७,९८,४९,०००.००** |

उक्त नमूद तक्त्यानुसार रक्कम रु.७,९८,४९,०००.०० ची कामे CPCB कार्यालयाच्या मार्गदर्शक तत्वानूसार सभोवतालच्या हवेची गुणवत्ता या कामामधुन वगळुन याच योजनेच्या **"प्रभावी पाणी पुरवठा व्यवस्थापन व घनकचरा व्यवस्थापन"** या १५ व्या वित्त आयोगाच्या प्राप्त अनुदानातुन करणे तसेच या योजनेतुन सर्व विभागांतर्गत होणाऱ्या कामाच्या बचतीची रक्कम व जमा असलेल्या या खात्यातील मिळणारे व्याज अशी एकत्रित रक्कम देखील या योजनेवर प्रत्यक्ष स्थळावरील परिस्थिती व आवश्यकतेनुसार विविध कामांसाठी व अतिरिक्त बाबींसाठी वापरणे व त्यातून या योजनेचा खर्च भागविण्यात यावा. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 476/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.20.07.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रधानमंत्री आवास योजना घटक क्र.3 (AHP) खाजगी भागीदारी तत्वावर आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी परवडणाऱ्या घरांचे गृहप्रकल्प उभारण्यासाठी मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांनी मौजे तीसगाव येथील गट क्रमांक-255/1 क्षेत्र 15 हेक्टर 05 आर, गट क्रमांक-227/1 क्षेत्र 86 हेक्टर 25 आर, मौजे सुंदरवाडी गट क्रमांक-9 क्षेत्र 4 हेक्टर 46 आर, गट क्रमांक-10 क्षेत्र 11 हेक्टर 32 आर येथील सरकारी जमिनी औरंगाबाद महानगरपालिकेस प्रदान केलेल्या आहेत.

सदरच्या जमिनीवर गृहप्रकल्प उभारण्याकरीता ई-निविदा प्रकाशित करुन पात्र विकासक मे.समरथ कन्स्ट्रक्शन जे.व्ही.यांची निवड करण्यात आली असून संबंधीत विकासकने सादर केलेले सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR's) सुकाणू अभिकरण, म्हाडा मुंबई, राज्यस्तरीय मुल्यमापन समिती (SLAC) यांच्यामार्फत शासन मान्यतेसाठी सादर करण्यात आले असता त्यास राज्य शासनाची राज्यस्तरीय मंजुरी व सनियंत्रण समिती (SLSMC) ची दि.21.03.2022 रोजी तसेच केंद्र शासनाच्या केंद्रीय मंजुरी व सनियंत्रण समितीची दि.30.03.2022 रोजी मंजुरी प्राप्त झालेली आहे.

सदर प्रकल्प हा नियोजित कालावधीत पुर्ण करावयाच्या असल्या कारणाने, औरंगाबाद महानगरपालिका त्या दृष्टिने पुढील कार्यवाही करीत असून आवश्क ती कार्यवाही करीत आहे. तीसगाव या क्षेत्रासाठी नियोजन प्राधिकरण म्हणुन औरंगाबाद महानगर प्रदेश विकास प्राधिकारण (AMRDA) व सुंदरवाडी य क्षेत्राकरीता शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ (CIDCO) हे नियोजन प्राधिकरण म्हणुन कार्यरत आहेत.

औरंगाबाद महानगरपालिका आजस्थितीमध्ये सिडको क्षेत्रासह औरंगाबाद शहर व वाढीव हद्द या क्षेत्राकरीता नियोजन प्राधिकरण म्हणुन कार्यरत आहे.

प्रधानमंत्री आवास योजनेचा प्रकल्प विहित कालमर्यादेत पुर्ण होणे आवश्यक असल्याकारणाने मौजे तीसगाव येथील गट क्रमांक-255/1 क्षेत्र 15 हेक्टर 05 आर, गट क्रमांक-227/1 क्षेत्र 86 हेक्टर 25 आर, मौजे सुंदरवाडी गट क्रमांक-9 क्षेत्र 4 हेक्टर 46 आर, गट क्रमांक-10 क्षेत्र 11 हेक्टर 32 आर या क्षेत्राकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम-40 मधील तरतुदीनुसार औरंगाबाद महानगरपालिका यांना "विशेष नियोजन प्राधिकरण" म्हणुन घोषित करणे आवश्यक आहे.

करीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम-40 मधील तरतुदीनुसार औरंगाबाद महानगरपालिका यांना विशेष नियोजन प्राधिकरण म्हणुन घोषित करण्याच्या प्रस्तावास तसेच शासन स्तरावर मान्यता होण्याच्या कार्यवाहीचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 476/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रधानमंत्री आवास योजना घटक क्र.3 खाजगी भागीदारी तत्वावर आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी परवडणाऱ्या घरांचे गृहप्रकल्प उभारण्यासाठी मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांनी मौजे तीसगाव येथील गट क्रमांक-255/1 क्षेत्र 15 हेक्टर 05 आर, गट क्रमांक-227/1 क्षेत्र 86 हेक्टर 25 आर, मौजे सुंदरवाडी गट क्रमांक-9 क्षेत्र 4 हेक्टर 46 आर, गट क्रमांक-10 क्षेत्र 11 हेक्टर 32 आर येथील सरकारी जमिनी औरंगाबाद महानगरपालिकेस प्रदान केलेल्या आहेत.

प्रधानमंत्री आवास योजनेचा प्रकल्प विहित कालमर्यादेत पुर्ण होणे आवश्यक असल्या कारणाने उक्त क्षेत्राकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम-40 मधील तरतुदीनुसार औरंगाबाद महानगरपालिका यांना "विशेष नियोजन प्राधिकरण" म्हणुन घोषित कारण्याच्या प्रस्तावास तसेच शासन स्तरावर मान्यता होण्याच्या कार्यवाहीचा प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 477/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.21.07.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रशासकीय ठराव क्र.175. दि.30.07.2021 नुसार कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2021/1072 दि.03.08.2021 अन्वयेश्री.अफसर सिद्दीकी, उपअभियंता (सेवानिवृत्त) यांना "सातारा देवळाई येथील विविध विकास कामांचे DPR च्या कामासाठी व महानगरपालिकेच्या प्रलंबित प्रकल्पांचा मंत्रालयीन स्तरावर पाठपुरावा करून मंजूर करून घेणे" या विवक्षित कामासाठी यांची सेवा 06 महिन्यांच्या कालावधीसाठी करार पध्दतीने, सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना दरमहा सेवानिवृत्ती पूर्वी मिळतअसलेल्या एकूण वेतनातून (मुळवेतन व महागाई भत्ता धरून) त्यांना आता मिळत असलेले एकूण निवृत्ती वेतन (महागाई भत्ता आणि अंशराशीकृत निवृत्ती वेतनासह) वजा केल्यानंतर होणारी रक्कम त्यांचे मासिक परिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल. परंतु या परिश्रीमिक रकमेची कमाल मासिक मर्यादा रु.40,000/- (रुपये चाळीस हजार) इतक्या मर्यादेत राहील, याअटीवर घेण्यातआलेलीआहे.

तथापी, उक्त आदेशाची मुदत दि.02.02.2022 रोजीसंपल्यानेतसेचउपअभियंता (जलनि:सारण) व शहरअभियंता यांनी सातारा-देवळाई Severage Project च्या मंजुरीसाठी तसेच मनपाच्या इतर शासन स्तरावरील बाबींच्या पाठपुराव्यासाठी पुढील 06 महिन्यांसाठी श्री.अफसर सिद्दीकी यांना मुदतवाढ देण्याबाबत हरकत नसल्याबाबत कळविलेआहे. त्यानुषंगाने संबंधितांस प्रशासकीय ठराव क्र.280 दि.09.02.2022 नुसार कार्यालयीनओदश जा.क्र.मनपा/आस्था-1/2022/144 दि.14.02.2022 नुसार 02 दिवसांचा तांत्रिक खंड देऊन दि.05.02.2022 पासून पुढील 06 महिन्यांच्या कालावधीसाठी दि.03.08.2021 च्याआदेशात नमुद अटी व शर्तीच्याअधिन राहून मुदतवाढ देण्यात आलेलीआहे.

तथापी, दि.14.02.2022 रोजीच्याआदेशाची मुदत दि.05.08.2022 रोजी संपणारअसून उपअभियंता (जलनि:सारण) व शहरअभियंता यांनी सातारा देवळाई व महानगरपालिकेच्या हद्दीतील Uncovered Area मध्ये जलनि:सारण वाहिन्या टाकण्याचे कामांसाठी DPR तयारकरणे व महानगरपालिकेच्या प्रलंबित प्रकल्पांचा मंत्रालयीन स्तरावर पाठपूरावा करून मंजूर करून घेणे या कामासाठी घेण्याबाबत मुदतवाढ देण्याबाबत कळविलेआहे.

करीता, श्री.अफसर सिद्दीकी, उपअभियंता(सेवावृित्त) यांना 02 दिवसांचा तांत्रिक खंड देऊन दि.08.08.2022 पासून पुढील 06 महिन्यांच्या कालावधीसाठी दि.03.08.2021 च्याआदेशात नमूद
अटी व शर्तीच्याअधिन राहून मुदतवाढ देण्याबाबत प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 477/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.अफसर सिद्दीकी, उपअभियंता (सेवावृित्त) यांना 02 दिवसांचा तांत्रिक खंड देऊन दि.08.08.2022 पासून पुढील 06 महिन्यांच्या कालावधीसाठी दि.03.08.2021 च्या आदेशात नमूद अटी व शर्तीच्या अधिन राहून सातारा-देवळाई व महानगरपालिकेच्या हद्दीतील Uncovered Area मध्ये जलनि:सारण वाहिन्या टाकण्याचे कामांसाठी DPR तयार करणे व महानगरपालिकेच्या प्रलंबित प्रकल्पांचा मंत्रालयीन स्तरावर पाठपूरावा करून मंजूर करून घेणे या कामासाठी घेण्याबाबत मुदतवाढ देण्यास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 478/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.22.07.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मा.आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे दि.18.12.2022 च्या पत्राच्या अनुषंगाने राज्य आरोग्य सोसायटी महाराष्ट्र राज्य यांच्या 15 व्या वित्त आयोगाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार औरंगाबाद महानगरपालिकेकरिता 12 ठिकाणी Health Wellness Center (HWC) याकरिता खाजगी किंवा महानगरपालिकेच्या मालकीच्या इमारतीमध्ये आरोग्य सेवा सुरु करण्याचे प्रस्तावित आहे. मालमत्ता विभागामार्फत जागेची प्रत्यक्ष स्थळ पाहणी करण्यात येऊन 10 ठिकाणी भाडे तत्वावरील इमारती व 2 मनपाच्या हर्षनगर व विटखेडा मालकीच्या इमारती उपलब्ध आहे. सदरील 2 इमारतीची दुरुस्ती 15 व्या वित्त आयोगाच्या प्राप्त निधीमधून व 15 वित्त आयोगाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार करण्यात येणार आहे.

मालमत्ता विभागामार्फत भाडे तत्वावरील इमारतीची रेडिरेकनरनुसार भाडे निश्चिती करुन देण्यात आलेली आहे. निश्चित करण्यात आलेले भाडे उपलब्ध होणा-या 15 व्या वित्त आयोगामार्फत अनुदानातून अदा करण्यात येणार आहे. खालील प्रमाणे भाडे निश्चित करण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | HWC चे नाव | जागा मालक | जागा (स्के.मि.) | प्रतिमाह भाडे | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | सुरेवाडी-हर्सुल | श्री.द्वारकादास हरणे | 72.41 | रु.22889-00 | |
| 2 | छत्रपतीनगर-हर्सुल | श्री.रामनाथ औताडे | 49.56 | रु.16160-00 | |
| 3 | सावित्रीनगर / चिकलठाणा | श्री.सी.डब्ल्यू.सोनवणे | 66.88 | रु.22010-00 | |
| 4 | राजनगर / मुंकुदनगर | श्रीमती सिमा संतोष जैस्वाल | 63.76 | रु.20760-00 | |
| 5 | न्यु.एस.टी.कॉलनी एन-2 सिडको, औरंगाबाद | श्री.आर.आर.घडमोडे | 98.25 | रु.41422-00 | |
| 6 | गुरुसाहनी नगर / एन-4 सिडको औंरगाबाद | सौ.वैशाली चंद्रकांत थोरात | 82.96 | रु.26224-00 | |
| 7 | रेणुकामाता मंदीर जवळील परिसर बीड बायपास सातारा | श्री.अजिंक्य अजय पाथ्रीकर | 89.28 | रु.27373-00 | |
| 8 | मिटमिटा / पडेगाव | श्री.महादू चिंतामण वाणी | 54.23 | रु.15976-00 | |
| 9 | बालाजी नगर | श्री.मनोज हुकुमचंद ठोले | 127.64 | रु.43601-00 | |
| 10 | व्यंकटेश नगर | श्री. रंगनाथ बी जाधव | 63.81 | रु.26990-00 | |

याव्यतिरिक्त प्रतिमाह लाईटबील उपलब्ध अनुदानातून (15 व्या वित्त आयोगातून) अदा करावयाचे आहे. तसेच इतर सर्व प्रकारचे टॅक्स भरण्याची जबाबदारी इमारत मालकाकडे राहील. प्रस्तावित केल्याप्रमाणे यांच्या मालकीची बांधीव इमारत आरोग्य केंद्रासाठी औरंगाबाद महानगरपालिकेस 15 व्या वित्त आयोगाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार लागेल तेवढया कालावधीसाठी व उपरोक्त तक्त्यामधील अ.क्र.5 मध्ये दर्शविल्यानुसार प्रतिमाह मासिक भाडे अदा करण्यात येईल. तसेच 11 महिन्यानंतर 10 टक्के भाडे वाढ करण्यात येईल. इमारत ताब्यात घेतल्यानंतर इमारतीची देखभाल व दुरुस्ती उपलब्ध अनुदानातून करावी लागणार आहे.

करिता संबंधित इमारत मालकासमवेत वरील अटी शर्तीच्या आधिन राहून रितसर करारनामा करुन घेण्याबाबत व सदरील उपरोक्त 10 इमारती आरोग्य केंद्राकरिता भाडे तत्वावर घेण्याबाबत व सदरील भाडे फक्त शासनामार्फत 15 व्या वित्त आयोगाच्या एनएचएम (NHM) मार्फत अध्यक्ष, जिल्हा आरोग्य समिती (मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद औरंगाबाद) यांच्याकडून उपलब्ध होणा-या अनुदानातून अदा केले जाईल. मनपा फंडावर कोणतेही आर्थिक दायित्व निर्माण करता येणार नाही. प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 478/2022:-**

प्रस्तावामध्ये दर्शविल्यानुसार तक्त्यामधील अ.क्र.1 ते 10 इमारती जिल्हा आरोग्य समिती 15 व्या वित्त आयोगामार्फत भाडे तत्वावर घेण्यास व प्रस्तावामधील रकाना क्र.5 मध्ये नमुद प्रतिमाह भाडे व 11 महिन्यानंतर 10 टक्के भाडेवाढ व 15 व्या वित्त आयोगाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार औरंगाबाद महानगरपालिकेस लागेल तेवढया कालावधीसाठी भाडे तत्वावर घेण्यासाठी मंजूरी देण्यात येते. तसेच विद्यूत देयक 15 व्या वित्त आयोग एनएचएम मार्फत व सर्व प्रकारचे कर इमारत मालकामार्फत अदा करण्यात यावे. सदरील भाडे 15 व्या वित्त आयोग एनएचएम (NHM) मार्फत उपलब्ध अनुदानातून अदा केले जाईल. महानगरपालिकेवर कोणत्याही प्रकारचे आर्थिक दायित्व राहणार नाही. सर्व संबंधित इमारतधारका समवेत करारनामा करण्यासाठी सर्वानुमते मंजूरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 479/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.22.07.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-2/2021/2092, दि.23.12.2021 रोजीच्या आदेशान्वये दि.03.11.2021 ते दि.01.05.2022 पर्यंत 06 (सहा) महिन्याची मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत मनपा आस्थापनेवरील वर्ग-4 संवर्गातील खालील कर्मचारी कार्यरत आहे.

| अ. क्र. | कर्मचाऱ्यांचे नांव (सर्वश्री./श्रीमती) | पदनाम | कार्यरत विभाग | ठराविक / दैनिक वेतन |
|---|---|---|---|---|
| 1. | चंद्रमणी समाधान गवई | दै.वे.चौकीदार | शिक्षण विभाग | रु.424/- |
| 2. | अय्युब खां सांडू खां | दै.वे.चौकीदार | शिक्षण विभाग | रु.424/- |
| 3. | विजय पंडितराव गायकवाड | दै.वे.चौकीदार | शिक्षण विभाग | रु.424/- |
| 4. | विजय लक्ष्मणराव देशपांडे | दै.वे.वॉचमन | भारतमाता मंदिर (सांस्कृतिक विभाग) | रु.424/- |
| 5. | कांताबाई अंबादास पटेकर | दै.वे.मजुर | प्रभाग क्र.08 | रु.424/- |

तसेच सातारा-देवळाई ग्रामपंचायत येथून औरंगाबाद महापालिकेत समाविष्ट करण्यात आलेले दैनिक वेतनावरील कर्मचारी

| अ. क्र. | कर्मचाऱ्यांचे नांव (सर्वश्री./श्रीमती) | पदनाम | कार्यरत विभाग | ठराविक / दैनिक वेतन |
|---|---|---|---|---|
| 6. | शेख सिराज शेख रसूल | पाणी पुरवठा मजुर | प्रभाग क्र.08 | रु.424/- |
| 7. | सुरेश कैलास काळे | सफाई मजुर | प्रभाग क्र.08 | रु.424/- |
| 8. | प्रकाश श्रीरंग चितळकर | सफाई मजुर | प्रभाग क्र.08 | रु.424/- |
| 9. | बाबासाहेब कारभारी सोनवणे | सफाई मजुर | प्रभाग क्र.08 | रु.424/- |
| 10. | नरेंद्र ओमप्रकाश घुसर | सफाई मजुर | प्रभाग क्र.08 | रु.424/- |
| 11. | रामभाऊ शंकर मामडे | स्मशानभुमी रक्षक | प्रभाग क्र.08 | रु.424/- |
| 12. | राहूल दादाराव शिनगारे | मजूर (आवक-जावकविभाग) | प्रभाग क्र.08 | रु.424/- |
| 13. | भास्कर दादाभाऊ जाधव | सफाई मजुर | प्रभाग क्र.08 | रु.424/- |

सहाय्यक आयुक्त, झोन क्र.08 यांचे जा.क्र./मनपा/वॉर्ड क्र.08/2307/2021, दि.26.11.2021 च्या अहवाला नुसार अनुक्रमांक 13 वरील श्री.भास्कर दादाभाऊ जाधव, दैनिक वेतन सफाई मजुर, झोन क्र.08 हे दि.25.06.2021 रोजी पासून विनापरवानगी सतत गैरहजर असल्याबाबत कळविले आहे. त्यानुसार संबंधीत कर्मचारी झोन कार्यालयात रुजू होण्यासाठी आल्यानंतर त्यांच्या मुदतवाढीबाबत विचार करण्यात येईल.

**ठराव क्रमांक 479/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, उपरोक्त 13 दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांना 02 दिवसांचा तांत्रिक खंड देऊन दि.03.05.2022 ते दि.30.10.2022 पर्यंत 06 महिन्याकरीता मुदतवाढ देण्यासाठीचा प्रस्तावास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 480/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.22.07.2022)**

प्रस्ताव सादर करण्या येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेत पुरेसे मन्युष्यबळ नसल्यामुळे विविध विभागासाठी लागणारे मन्युष्यबळ बाहयस्त्रोता मार्फत पुरवठा करण्यासाठी Labour Department /AMC/2022/15, Tender ID 2022/AMC-A 765094-1 हि ई- निविदा दि. ४/०२ / २०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आली. सदरील निविदेचा प्रसिध्दी कालावधी दि.04.02.2022 ते दि.07.03.2022 असा होता. सदरील कालावधी मध्ये एकुण ०९ निविदा प्राप्त झाल्या.

त्या खालील प्रमाणे.

| Sr.No. | Name of the Agency |
|---|---|
| 1 | Galaxy Multi Services, Prop. Ibrahim Shaikh Musa Shaikh, Add, Shop NO. 03. CTS No. 10041.Bukkalguda, Nizmoddin Road, Aurangabad-431001 Contact-9370708488 |
| 2 | Maharana Agency Security and labour Supply, Prop. Vishwanath Vijaysingh Pardesi Rajput, Add. Nr Amber Hotel, Narlibagh, Khadkeshwar, Aurangabad-431001Contact-9922556611 |
| 3 | Maxell HR pvt ltd, Shop no 9/10. Plot no 01. Radhika arcade, town centre, CIDCO Aurangabad. Prop Mr. Zishan Habib Max Contact-9503100185 |
| 4 | Ashok Enterprises, Prop. Ashok Ramraj Pal, B/2/10/5 Millennium tower, sector-9, Sanpada, Thane-19 |
| 5 | Abhijit Enterprises, Prop, Surendra Devid Thokal, Kamal Kunj Plot No. 14/B, Sangita Colony. Behind Nandanvan Colony, Aurangabad 431001 |
| 6 | Vidyut mandal maji apprentice sushiksit berojgar sanstha Itd. Prop Pradip Bhayyasaheb Deshmukh Sr no 14/15, Hivarkheda rd, near girija mangal karyalaya, bholeshwar colony, kannad, Aurangabad |
| 7 | ISF Services, 65. paritosh, MGM rd. behind noupoor cinema, cidco town centre, Aurangabad, 431001 Prop. Lekharaj Nehal Singh, Contact-9011063434 |
| 8 | SSS Facility Services, Prop. Ananta Vishamber Vathore, SN. No. 93/2, 93/5. F1 No. 1202/4A,9 Kalpataru Serenity. Manjri Bk Mahadeo Nagar, Hadapsar, Tq. Haveli Dist. Pune-412307. |
| 9 | Elixer Hospitality and Security Services, Prop. Lata Karbhari Jadhavar, Shop No. U.G.18 CTS No. 1482. Anand Plaza, Opp. Govt Doodh Dairy, Aurangabad-431001 |

प्राप्त झालेल्या निविदांचा तांत्रिक लिफाफा दि. १०/०३/२०२२ रोजी उघडण्यातआला. सदरील तांत्रिक लिफाफयाची निविदेतील अटीशर्ती प्रमाणे पडताळणी केली असता प्राप्त झालेल्या वरील एकुण-०९ निविदांपैकी ०४ निविदा प्रथम दर्शनी पात्र असल्याचे दिसुन आले.

त्यानुसार ०४ निविदा पात्र व ०५ निविदा अपात्र झाल्याने प्रारूप तुलनात्मक तक्ताप्रसिध्द करण्यात आला. तसेच प्रारूप तक्त्यावर निविदाधारकांना काही आक्षेप असल्यास ते दाखल करण्यात दोन दिवसांची मुदत देण्यात आली. दरम्यान पात्र निविदाधारकांमधील विदयुत मंडल माजी ॲप्रेंटिस सुशिक्षित बेरोजगार सहकारी संस्था मर्यादित यांनी निविदा मागे घेत असल्या बाबत कामगार विभागास लेखी अर्ज व ई मेल संदेशाव्दारे कळवले. संबंधित एजन्सीने अचानक निविदा मागे घेतली त्यामुळे या कार्यालयास शंका उत्पन्न झाल्याने संबंधित निविदाधारकाने निविदेसोबत जोडलेलीकागदपत्रे पुन्हा तपासण्यात आली. तसेच संबंधित एजन्सीने निविदेसोबत जोडलेले लेबर लायसन्स सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालय, अकोला यांचेकडे सत्यता पडताळणी साठी पाठवण्यात आले. त्यामध्ये संबंधित कार्यालयाने ते लायसन्स त्यांचे कार्यालयाने निर्गमित केले नसुन संबंधित एजन्सी विरुद्ध लायसन्स मध्ये खाडाखोड करुन शासनाची फसवणूक केली असल्याने कायदेशीर कारवाई करावी, असे लेखी कळवले. म्हणुन या बाबत सिटीचौक पोलीस स्टेशन, औरंगाबाद यांना संबंधित संस्थेवर गुन्हा नोंद करणे बाबत कळविण्यात आले आहे. तसेच विदयुत मंडल माजी ॲप्रेंटिस सुशिक्षित बेरोजगार सहकारी संस्था, मर्यादित यांना अपात्र करण्यात येऊन उर्वरीत ०३ एजन्सी तांत्रिक दृष्ट्या पात्र

राहिल्याने त्यांचा वित्तीय लिफाफा उघडण्यात आला. त्यानुसार त्यांनी एकुण ३० संवर्गाचे प्रतिमहा प्रति कामगार सादर केलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| Sr.No. | Name of the Agency | Qualified / Disqualified | Rates in Rupees/Month |
|---|---|---|---|
| 1 | **Galaxy Multi Services** Prop. Ibrahim Shaikh Musa Shaikh, Add. Shop No.03 CTS No. 10041, Bukkalguda, Nizmoddin Road, Aurangabad-431001 Contact-9370708488 | Qualified | 7,11,691/- |
| 2 | **Maharana Agency Security and labour Supply** Prop. Vishwanath Vijaysingh Pardesi Rajput. Add.Nr. Amber Hotel, Narlibagh, Khadkeshwar, Aurangabad-431001 Contact-9922556611 | Qualified | 6,55,324/- |
| 3 | **Ashok Enterprises** Prop. Ashok Ramraj Pal, B/2/10/5 Millennium tower, sector-9, Sanpada, Thane-19 Contact-9930868534 | Qualified | 16,50,904/- |

निविदापत्रातील अनुसुचि-०८ मधील विविध ३० संवर्गाबाबत दर मागविण्यातआलेले होते.

त्यामध्ये गॅलेक्सी मल्टीसव्हीसेस यांचे दर अनुक्रमांक 15 च्या संवर्गासाठी सर्वात कमी आहेत.

महाराणा एजन्सी सेक्युरीटी ॲण्ड लेबर सप्लाय यांचे दर अनुक्रमांक 11 व 15 मधील संवर्ग सोडुन इतर संवर्गासाठी सर्वात कमी आहेत.

तसेच अशोक एंटरप्रायजेस यांचे दर अनुक्रमांक ११ च्या संवर्गासाठी सर्वात कमीआहेत.

त्यामुळे निविदापत्रातील अट क्र.15 नुसार वरील तीन निविदा धारकांना त्या त्या संवर्गातील सर्वात कमी दराच्या (L-1) निविदा धारकाच्या दराने महानगरपालिकेस सेवा देण्यास तयार असल्यास तशा देकाराच्या सहमती बाबत या कार्यालयास कळवावे असे कळविण्यात आले होते. त्यानुसार संबंधित तीनही निविदा धारकांनी ते त्या त्या संवर्गातील सर्वात कमी दराच्या निविदा धारकाच्या दराने (L-1) महानगरपालिकेस सेवा देण्यास तयार असले बाबतचा आपला देकार या कार्यालयास कळविला आहे..

यामध्ये वरील तीन निविदा धारकांनी सादर केलेले संवर्ग निहाय दर तपासले असता काही संवर्गाचि दर हे किमान वेतन कायद्याची पूर्तता करु शकणार नाही असे दिसुन येत आहे. तथापि निविदा पत्रातील अट क्र.२९ व 35 नुसार किमान वेतन कायदा व इतर सर्व अनुषंगीक अस्तित्वातील कामगार कायद्यांचे पालन करण्याची जबाबदारी निविदा धारकांची आहे अशी स्पष्ट तरतूद आहे. तसेच निविदा पत्रातील परिशिष्ट ०८ मध्येही या बाबींचा स्पष्ट उल्लेख केलेला आहे. या बाबत निविदा समितीने संबंधित निविदा धारकांना विचारणा केली असता सर्व निविदाधारकांनी वरील बाब मान्य असल्याचे सांगितले. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण-७ मधील कलम-२ (२) नुसार The Commissioner shall not be bound to accept any tender which may be made in pursuance of such notice, but may accept, subject to the provision of clause (c) of section 73, any of the tenders so made which appears to him, upon a view of all the circumstances, to be the most advantageous अशी स्पष्ट तरतुद आहे. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक हित व शासनाने आस्थापना खर्चावर घालुन दिलेली मर्यादा लक्षात घेता प्राप्त झालेले दर हे महानगरपालिकेच्या आर्थिक हिताचे असुन मान्य करणे योग्य आहे, असे समितीचे मत झाले आहे.

त्यामुळे औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये पुढील ०३ वर्षाकरीता तसेच आवश्यकता असल्यास पुढील ०२ वर्षा करीता महानगरपालिकेच्या मान्यतेने विविध विभागामध्ये आवश्यकते नुसार मन्युष्यबळ पुरवठा करण्याकरीता येणाऱ्या खर्चास वित्तीय व प्रशासकीय मान्यता देऊन कार्यादेश देण्याचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

**ठराव क्रमांक 480/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार पात्र तीन निविदा धारकांनी त्या त्या संवर्गातील सर्वातकमी दराच्या (L-1) निविदा धारकाच्या दराने महानगरपालिकेस सेवा देण्यास तयार असले बाबतचा आपला देकार कळविल्याने त्यांचे दर (L-1) नुसार खालील प्रमाणे आहेत.

| Sr.No. | Name of the Agency | Rates in Rupees/Month |
|---|---|---|
| 1 | **Galaxy Multi Services** Prop. Ibrahim Shaikh Musa Shaikh, Add. Shop No.03 CTS No.10041,Bukkalguda, Nizmoddin Road, Aurangabad-431001 Contact-9370708488 | 6,55,324/- |
| 2 | **Maharana Agency Security and labour Supply** Prop.Vishwanath Vijaysingh Pardesi Rajput. Add.Nr.Amber Hotel, Narlibagh, Khadkeshwar, Aurangabad-431001 Contact-9922556611 | 6,55,324/- |
| 3 | **Ashok Enterprises** Prop.Ashok Ramraj Pal, B/2/10/5 Millennium tower, sector-9, Sanpada, Thane-19 Contact-9930868534 | 6,55,324/- |

त्यानुसार औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये पुढील ०३ वर्षाकरीता तसेच आवश्यकता असल्यास महानगरपालिकेच्या मान्यतेने पुढील ०२ वर्षा करीता विविध विभागामध्ये आवश्यकते नुसार मन्युष्यबळ पुरवठा करण्याकरीता येणाऱ्या खर्चास वित्तीय आणि प्रशासकीय मान्यता देण्यात येते. उक्त कामासाठी कार्यादेश देऊन पुढील वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 481/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.22.07.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.19 हिलाल कॉलनी येथे खाम नदीच्या पात्रालगत नागरीकांची घरे बांधलेली आहेत. सदर नदी शहरातील प्रमुख नद्यांपैकी एक असून तिचे पात्र रुंद आहे. सदर वसाहतीचा भाग नदी पात्राकडे उताराचा असल्याने व खुला असल्याने पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी झाल्यास लगत असलेल्या नागरी वसाहती मध्ये पावसाचे व पुराचे पाणी शिरते. त्यामुळे या भागातील नागरीकांची गैरसोय होते. या कामाच्या मंजुर अंदाजपत्रकास मा.स्थायी समितीची मान्यता घेण्यात आली व तशी निविदा काढण्यात आली होती.

तथापि, वर्ष 1 जुलै 2017 पासून भात सरकारने कर संरचनेची पुर्ण रचना करुन वस्तु व सेवा कर (GST) प्रणाली नव्याने लागू केली आहे. मात्र कामाचे अंदाजपत्रक पुर्वीची कर संरचना विचारात घेऊन तयार केलेले असल्याने अदांजपत्रकाने GST ची तरतुद करण्यात आलेली नव्हती. त्यामुळे या नंतर विभागाने अंदाजपत्रकामध्ये GST ची तरतुद करुन सा.बां.बां.दरसुची सन 2017-18 नुसार सुधारित अंदाजपत्रक तयार करुन याच आर्थिक मर्यादेत मंजुरी घेतली आहे. या कामाची पुन्हा नव्याने निविदा काढली यामध्ये एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या ज्याचा तपशिल खालील नमुद प्रमाणे आहे. यातील सर्वाधिक कमी दराची निविदा ही श्री.मुजीब मुसा यांची अंदाजपत्रकीय दराने प्राप्त झाली असून त्यास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | भरणा केलेले दर |
|---|---|---|
| 1. | मुजीब मुसा | अंदाजपत्रकीय दराने |
| 2. | जागीरदार सबाहुद्दीन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 4% जास्त दराने |
| 3. | मे.धनी कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5% जास्त दराने |

या प्राप्त निविदेस उप विभागाने मा.स्थायी समितीची मान्यता घेण्याचे अनावधानाने राहून गेले व उप विभागाने या कामाचा कार्यादेश जारी केला. त्यानुसार काम हाती घेण्यात आले. मात्र या मध्ये कंत्राटदाराचा दोष नाही. सदर बाब निदर्शनास आल्यानंतर विभागाने कंत्राटदार यांच्या निविदेस कार्योत्तर मान्यतेचा प्रस्ताव मार्च-2020 मध्ये मंजुरीसाठी सादर केला होता. अशा प्रकरणाची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी त्यावेळी संबंधीत तत्कालीन कार्यकारी अभियंता श्री.सिकंदर अली व (सध्या सेवानिवृत्त) व श्री.पी.एल.विटेकर, उप अभियंता (वॉर्ड क्र.1) (मुदत पुर्व सेवा निवृत्ती) यांना योग्य समज देण्यात येऊन प्रकरण कार्योत्तर मंजुरीसाठी सादर करण्यात आले होते. तथापि, तद्नंतर मनपा निवडणुकीची आचार संहिता लागू झाल्याने या बाबीस मान्यता घेण्याचे राहून गेले. आता मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने व प्रशासकीय कालावधी लागू असल्याने महाराष्ट्र

महानगरपालिका अधिनियमाचे कलम 73 (क), कलम 452(2)(क) अन्वये मान्यतेचे अधिकार प्रशासक यांचेकडे शासनाने निहित आहेत.

आता प्रथम व दरम्यान देयकापर्यंत यासाठी अर्थसंकल्प सन 2020-2021 मध्ये आवश्यक आर्थीक तरतुद करण्यात आलेली आहे. जेणे करुन मनपावर निर्माण झालेले आर्थीक दायित्व पुर्ण करता येईल.

करीता या कामाची प्राप्त झालेली सर्वाधिक कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दराची प्राप्त निविदा श्री.मुजीब मुसा यांची निविदेस मान्यता देऊन या कामाचे नोंदविण्यात आलेले प्रथम व दरम्यान देयक “जैसे थे” स्वरुपात प्रथम व अंतिम करुन देयक र.रु.33,25,065/- अदा करण्यास व निविदेस कार्योत्तर मंजुरी देणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 481/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सदर कामाचे प्रथम व अंतिम देयक र.रु.33,25,065/- अदा करण्यास व निविदेस कार्योत्तर मंजुरी देण्याबाबतच्या प्रस्तावा मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 482/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.22.07.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 481 (ई), (फ) आणि (आय) नुसार सादर करण्यात येते की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीची शहानुरवाडी येथील सर्व्हे नं.12/पी ही मिळकत बी.ओ.टी. तत्वावर विकसीत करण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या.त्यामध्ये तीन निविदाधारकांनी सहभाग नोंदविला होता. त्यामध्ये मे.श्रीहरी असोसिएट प्रा.लि.औरंगाबाद यांनी रु.30,60,000/- प्रति वर्ष व दर तीन वर्षांनी 12 टक्के वाढ करुन महानगरपालिकेस देण्यासाठी ठराव पारीत झालेला आहे. मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.724 दि.20.04.2012 अन्वये आरक्षण क्र.262 ही जागा ज्याचे एकुण क्षेत्रफळ 10000 चौ.मी. आहे. या क्षेत्रफळावर युरोपियन मार्केट व आठवडी बाजार तयार करण्यासाठी 30 वर्षाच्या भाडेपट्टा कालावधीसाठी निविदा मंजुरी देण्यात आली.

त्यानुसार कन्सेशन ॲग्रीमेंट दि.01.08.2012 रोजी करण्यात आले असून संबंधीत एजन्सीने महानगरपालिकेकडे प्रकल्प पुर्ण झाल्यानंतर दि.09.09.2015 रोजी रु.30,60,000/- रक्कमेचा भरणा केला आहे. तथापि, विकासक सन-2013 पासून सदर जागेचा उपभोग घेत असल्याने त्यांच्याकडून दि.08.07.2022 पर्यंतची रु.3,53,76,714/- एवढी भाडेपट्ट्याची रक्कम विकासकाकडे थकीत आहे. त्यासाठी संबंधीत विकासक यांना उक्त रक्कमेचा भरणा करण्यासाठी वेळोवेळी कळविण्यात आलेले आहे. परंतु विकासकाकडून थकीत रक्कम भरणा संदर्भाने कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही. त्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 81-ब (1) (अ) (एक), 81-ब (1) (ब) मधील तरतुदीनुसार नोटीस देऊन जागा परत घेण्यासाठी दि.18.05.2022 रोजी मालमत्ता विभागाकडून कार्यवाही करण्यात आली आहे.

प्रकरणात मालमत्ता विभागाच्या या नोटीस विरोधात विकासक यांनी मा.जिल्हा न्यायालयात म्युनिसिपल अपिल क्र.1/2022 दि.07.06.2022 नुसार दावा दाखल करुन दाद मागितली असता, दि.16.06.2022 रोजी मा.जिल्हा न्यायालयाने महानगरपालिकेने केलेल्या कार्यवाहीच्या विरोधात तात्पुरता स्थगिती आदेश दिलेला आहे.

प्रकरणी महानगरपालिकेच्या नवीन मुख्य प्रशासकीय इमारतीसाठी जागेचा शोध घेतांना असे दिसुन आले की, सदर बी.ओ.टी.प्रकल्पाच्या जागेवर मुख्य प्रशासकीय इमारत बांधता येऊ शकते. त्यामुळे सदर जागा विकासकाकडून महानगरपालिकेकडे परत घेण्याचे ठरले आणि प्रकरणी न्यायालयीन प्रकरण विचारात घेऊन विकासकासोबत बैठक घेऊन ही बाब त्यांच्या समोर मांडण्यात आली होती. त्या अनुषंगाने संबंधीत विकासक यांनी प्रकल्प कामावरील केलेला खर्च महानगरपालिकेकडून मिळण्यासाठी दि.31.05.2022 तसेच दि.24.06.2022 रोजी पत्र देऊन सदरील प्रकल्पासाठी जेवढे काम करण्यात आले आहे. तेवढे काम करण्यासाठी आजमितीस महानगरपालिकेस कमीत कमी रु.750 ते 775 लक्ष इतका खर्च येईल. त्यानुसार महानगरपालिकेने ना-हरकत प्रमाणपत्र व प्रकल्प उभारणीसाठी लागणारा खर्च विचारात घेऊन महानगरपालिकेने त्यांना रु.475 लक्ष दिल्यास सदर जागा व त्यावरील केलेले बांधकाम, शेड इ.महानगरपालिकेस विनाअट देण्यात येईल असे नमुद केले आहे.

सदर जागा ही महानगरपालिकेच्या दृष्टिने अत्यंत मोक्याच्या ठिकाणी असल्याने सदर जागेचा वापर महानगरपालिकेच्या नवीन प्रशासकीय इमारतीसाठी होऊ शकत असल्याने सदर जागेचे व प्रकल्पाचे मुल्यांकन करण्यासाठी शहर अभियंता विभागामार्फत दि.27.06.2022 रोजी इंजि.प्रमोद यु.सावंत (सावंत ॲण्ड असोसिएट्स) यांना मुल्यांकन करुन मिळण्यासाठी कळविण्यात आले त्यानुसार इंजी.प्रमोद यु. सावंत (सावंत

ॲण्ड असोसिएट्स) यांनी दाखल केलेले मुल्यांकन व विकासक यांच्याकडील थकीत रक्कम व विकासकाने मागणी केलेली रक्कम इ.चा तपशिल खाली नमुद प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| अ) प्रकल्पाच्या जागेचे मुल्यांकन रक्कम रुपये | :- 25,10,00,000/- |
| ब) प्रकल्पाचे विकास कामाचे मुल्यांकन रक्कम रुपये | :- 4,70,69,414/- |
| क) महानगरपलिकेने विकासकाकडे मागणी केलेली थकीत रक्कम रुपये | :- 3,56,76,714/- |
| ड) विकासकाने मागणी केलेली रक्कम रुपये | :- 4,75,00,000/- |
| इ) विकासकाचा भविष्यातील (23 वर्ष) नफा/उत्पन्न रक्कम रुपये | :- 5,52,00,000/- |

प्रकल्पात केलेली गुंतवणूक रु.4,70,69,414/- अधिक विकासकाचा भविष्यातील (23 वर्ष) निव्वळ नफा रु.5,52,00,000/- असे एकूण रु.10,22,69,414/- मधुन महानगरपालिकेचे येणे असलेले रु.3,56,76,714/- वजा जाता निव्वळ देय र.रु.6,65,92,700/- आहे. परंतु विकासकाशी समक्ष चर्चा व वाटाघाटी/तडजोड अंती रु.4,50,00,000/- (रुपये चार कोटी पन्नास लक्ष मात्र) विकासकास देण्याचे ठरले व सदर रक्कमेबाबत विकासकाने देखील लेखी संमती दिली आहे.

त्यानुसार सदर जागा ही महानगरपालिकेच्या दृष्टिने अत्यंत मोक्याच्या ठिकाणी असल्याने व महानगरपालिकेच्या नवीन प्रशासकीय इमारतीसाठी उपयुक्त असल्याने न्यायालयीन प्रकरण परत घेण्याच्या अटीवर विकासकास वरील मुल्यांकनानुसार त्यांनी केलेल्या खर्चामधुन महानगरपालिकेचे विकासकाकडे देय असलेले भाडे र.रु.3,56,76,714/-वजा जाता र.रु.6,65,92,700/- ऐवजी तडजोडी अंती ठरलेली र.रु.4,50,00,000/- त्यांना अदा करणे आणि सदर 10000 चौ.मी. जागा आणि त्यावर केलेली विकास कामे महानगरपलिकेच्या ताब्यात घेऊन विकासकासोबत करण्यात आलेला बी.ओ.टी.करार रद्द करण्यासाठीचा प्रसताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सविनय सादर.

**<u>ठराव क्रमांक 482/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रकल्प विकासक मे.श्रीहरी असोसिएट प्रा.लि.यांनी न्यायालयीन प्रकरण परत घेण्याच्या अटीवर आणि त्यांच्या समवेतचा बी.ओ.टी.करार रद्द करण्यासाठी विकासकाचे संमती दिल्यानंतर प्रकल्प विकासक यांनी केलेल्या खर्चामधून महानगरपालिकेचे विकासकाकडे देय असलेले भाडे रु.3,56,76,714/- वजा जाता रु.6,65,93,700/- ऐवजी तडजोडी अंती ठरलेली र.रु.4,50,00,000/- विकासक यांना अदा करणे आणि सदर 10000 चौ.मी. जागा आणि त्यावर केलेली विकास कामे महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्याच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 483/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.25.07.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेस मराठवाडा विकास कार्यक्रम 2007 अंतर्गत प्राप्त निधी र.रु.6.25 कोटी व अधिक महानगरपालिकेने टाकलेली र.रु.6.87 कोटी मधुन डॉ.सलीम अली सरोवर येथील 5 एम.एल.डी.एस.टी.पी.प्लॅन्ट दि.1 मे 2013 रोजी पासून चाचणी व संचलन झाल्यानंतर कार्यान्वीत करण्यात आलेला आहे.

सदरील 5 एम.एल.डी.क्षमतेचा एस.टी.पी.प्लॅन्ट दि.1 मे 2013 रोजी कार्यान्वीत झाल्या पासून वरील कामाचे मुळ कंत्राटदार एजन्सी मे.ॲक्काटेक सोल्युशन प्रा.लि.पौंड रोड, पुणे यांच्या मार्फत निविदेतील अटी व शर्ती नुसार पुढील पाच वर्षे म्हणजेच 1 मे 2018 पर्यंत सदर एस.टी.पी.प्लॅन्टचे संचलन व अनुषंगीक दुरुस्ती करण्यात आलेली आहे. तद्रंतर सन-2018 पासून ते 20.12.2021 पर्यंत सुध्दा सदर मुळ कंत्राटदारामार्फत एस.टी.पी.प्लॅन्टचे संचलन व दुरुस्ती करण्यात आलेली आहे.

तथापि, दि.21.12.2021 पासून उपरोक्त एस.टी.पी.प्लॅन्ट मधील Air Blower, Dissovle Oxygen Optical Sensor, Chlorination System, Channel Gete with Actuater, Mechanical Coarses & Fine Screen With Allied equipments नादुरुस्त आहेत. तसेच सदर एस.टी.पी.प्लॅन्ट मधील Diffuser System, Decanter व सर्व पंप नादुरुस्त असल्याने त्याचे Spares खरेदी करणे, बसविणे व चाचणी घेऊन कार्यान्वीत करणे गरजेचे आहे.

करीता, Spares खरेदी करणे, बसविणे व चाचणी घेऊन कार्यान्वीत करणे आवश्यक आहे. करीता वरील सर्व उपकरणांची खरेदी करणे तसेच आवश्यक विद्‌युत व यांत्रिकी उपकरणांची दुरुस्ती करणे या कामासाठी प्राप्त उत्पादक कंपनीच्या बजेटरी ऑफर, दरपत्रक व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण या विभागाच्या सन 2021-22 विद्‌युत व यांत्रिकी दरसुची नुसार अंदाजपत्रक बनविण्यात आले असून र.रु.1,87,85,021/- चा खर्च अपेक्षीत आहे. या कामासाठी होणारा खर्च हा सन 2022-23 च्या अर्थसंकल्प मलनि:स्सारण व्यवस्थापन अंतर्गत "एस.टी.पी.वार्षिक देखभाल दुरुस्ती लेखाशिर्षकाच्या तरतुदीतून करण्यात येईल.

तरी वरील प्रमाणे कामासाठी Spares खरेदी करणे, बसविणे व चाचणी घेऊन कार्यान्वीत करणे इ.कामाच्या अं.प.र.रु.1,87,85,021/- रक्कमेचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 483/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, डॉ.सलीम अली सरोवर येथील 5 एम.एल.डी.एस.टी.पी.प्लॅन्ट येथील आवश्यक विद्‌युत, यांत्रिकी उपकरणे बदलणे, आवश्यक दुरुस्ती करणे व चाचणी देणे बाबत कामास मान्यता देण्यात येते. प्रस्तावित उपकरणांचा पुरवठा करणे, बसविणे व चाचणी देणे बाबत पुढील वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 484/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.26.07.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.रमेश मनाजी सोनवणे, मलेरिया मजुर, मलेरिया विभाग, महानगरपालिका औरंगाबाद यांनी स्वत:च्या पत्नीच्या नामे श्रीमती सिंधुताई रमेश सोनवणे Breast Cancer या आजारावर उपचारासाठी खाजगी रुग्णालय कमलनयनबजाज हॉस्पीटल, औरंगाबाद येथे उपचार केलेला असून र.रु.1,72,692/- (अक्षरी एक लाख बहात्तर हजार सहाशे ब्यान्नव फक्त) इतका खर्च केला आहे.

अर्जदाराने आवश्यक विहीत नमुन्यात माहितीसह सर्व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली असून Breast Cancer या आजारावर उपचारार्थ एकूण केलेला खर्च र.रु.1,72,692/- इतका झाला असून त्यापैकी अनुज्ञेय नसलेली र.रु.30,116/- वजा जाता रु.1,42,576/- शिल्लक राहते व शिल्लक रक्कमेच्या 90 टक्के र.रु.1,28,318/- इतकी आहे. एकुण निव्वळ देय र.रु.1,19,972/- इतकी असून अग्रिम र.रु.1,50,000/- वजा जाता रु.30,028/- संबंधीताकडून मनपा फंडात भरुन घ्यावयाची आहे.

संबंधीताने कमलनयन बजाज हॉस्पीटल औरंगाबाद येथे उपचार घेतलेले आहे. महराष्ट्र शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्ण्य क्र.वैखप्र-2011/प्र.क्र.33/11/राकावि-2, मंत्रालय मुंबई-32 दि.16.11.2011 नुसार परिशिष्ट-अ शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटूंबीयांनी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या या आजारावर केलेल्या विशिष्ट खर्चावरील शासकीय रुग्णालयाप्रमाणे प्रतिपुर्ती अनुज्ञेयतेसाठी शासन मान्यता दिलेली आहे. सदरच्या प्रस्तावास पडताळणी करुन वैद्यकीय प्रतिपुर्तीसाठी आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी शिफारस केलेली आहे.

करीता, श्री.रमेश मनाजी सोनवणे, मलेरिया मजुर, मलेरिया विभाग, महानगरपालिका औरंगाबाद यांना प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेल्या र.रु.30,028/- संबंधीताकडून मनपा फंडात जमा करुन घ्यावयाच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 484/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.रमेश मनाजी सोनवणे,मलेरिया मजुर,मलेरिया विभाग, महानगरपालिका औरंगाबाद यांनी स्वत:च्या पत्नीच्या नामे श्रीमती सिंधुताई रमेश सोनवणे Breast Cancer या आजारावर उपचारासाठी खाजगी रुग्णालय कमलनयन बजाज हॉस्पीटल, औरंगाबाद येथे उपचार केलेला आहे. एकूण केलेला खर्च र.रु.1,72,692/- इतका झाला असून एकूण खर्चाच्या 5% र.रु.8,346/- ही मनपा फंडात जाम करुन उर्वरित निव्वळ देय र.रु.1,19,972/- इतकी असून अग्रिम र.रु.1,50,000/- वजा जाता रु.30,028/- संबंधीताकडून मनपा फंडात भरुन घ्यावयाची आहे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 485/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.29.07.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, 'उपअभियंता (यांत्रिकी)' संवर्गातून 'कार्यकारी अभियंता (स्थापत्य)' संवर्गातील रिक्त पदे पदोन्नतीने भरणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 54(1) अन्वये गठीत केलेल्या निवड समितीची बौठक दि.10.05.2022 रोजी घेण्यात आली. सद्य:स्थितीत कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) संवर्गात एकूण (02) पदे मंजूर असून सर्व पदे रिक्त आहेत.

रिट याचिका क्र.5156/1988 व रिट याचिका क्र.5045/1997 श्री.सखाराम पानझडे विरुध्द मनपा मध्ये मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी या संदर्भात तांत्रिक संवर्गातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण होण्या संदर्भातील तपशिल नमूद आहे. तथापि,औरंगाबाद महानगरपालिकेच्या सेवाभरती नियम दि.16.05.1994 मधील तरतूदीनुसार वयाची 45 वर्षे पूर्ण झाल्यानंतर व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्याची तरतूद आहे. त्यानुसार औरंगाबाद महानगरपालिकेने खालील अधिकाऱ्यांना व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट दिलेली आहे. उपअभियंता संवर्गातून कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) या संवर्गात पदोन्नती देण्यासाठी संबंधितांच्या सेवाविषयक व व्यावसायिक परीक्षेसंदर्भातील बाबी इ.पडताळणी समितीसमोर करण्यात आलेले आहे. त्यामुळे पदोन्नती व सेवाविषयक तपशीलाच्या अनुषंगाने

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 51(4) च्या अधिन राहून समिती एकमताने खालील अधिकाऱ्यांच्या तदर्थ (Adhoc) पदोन्नतीसाठी मान्यता प्रदान करीत आहे. तसेच संबंधित अधिकाऱ्यांच्या वयाच्या 50/55 नंतर सेवेत ठेवण्याबाबतचे पुनर्विलोकनाबाबत कार्यवाही करण्यात आलेली नाही.

उपअभियंता (यांत्रिकी) संवर्गातील कार्यरत अधिकाऱ्यांना सेवा ज्येष्ठता, शैक्षणिक अर्हता, गोपनीय अहवाल, विभागीय चौकशी इ. सेवाविषयक बाबीं विचारात घेता, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) पदावरील रिक्त पदांची संख्या तसेच कामाची निकड लक्षात घेता खालील अधिकाऱ्यांना खुल्या प्रवर्गातून 'कार्यकारी अभियंता (स्थापत्य)' या पदावर वेतनश्रेणी (एस-23) 67700-208700 (7 वा वेतन आयोग) मध्ये मा.उच्च न्यायालय,मुंबई यांनी रिट याचिका क्र.2797/2015 मध्ये दि.04.08.2017 रोजी दिलेल्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका क्र.28306/2017 च्या निर्णयाच्या अधिन राहून तसेच सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र.बीसीसी 2018/प्र.क्र.366/16-ब. दि.07.05.2021 मधील सुचनांनुसार निव्वळ तदर्थ (Adhoc) स्वरुपात पदोन्नती देणेबाबत तसेच औरंगाबाद महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम 2021 मधील नियम 6 नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 45 अंतर्गत येणारी पदे तसेच वर्ग-1 ची इतर सर्व पदे पदोन्नतीने भरतांना, सर्वसाधारण सभेच्या ठरावानंतर त्यास शासनाची पूर्वमंजूरी आवश्यक राहील,अशी तरतूद असून त्यानुसार मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेवून तसा प्रस्ताव मा.राज्य शासनाकडे मान्यतेस्तव पाठविणेबाबत समिती शिफारस केल्यानुसार,मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेण्यासाठी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

| अ.क्र. | सेवा ज्येष्ठता क्रमांक | अधिकाऱ्यांचे नांव (सर्वश्री) | मूळ जात प्रवर्ग | पदोन्नतीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|
| 1. | 1 | देविदास कडुबा पंडीत | खुला | खुला |

**<u>ठराव क्रमांक 485/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) पदावरील रिक्त पदांची संख्या तसेच कामाची निकड लक्षात घेता खालील अधिकाऱ्यांना खुल्या प्रवर्गातून 'कार्यकारी अभियंता (यांत्रिकी)' या पदावर वेतनश्रेणी (एस-23) 67700-208700 (7 वा वेतन आयोग) मध्ये मा.उच्च न्यायालय,मुंबई यांनी रिट याचिका क्र.2797/2015 मध्ये दि.4/8/2017 रोजी दिलेल्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका क्र.28306/2017 च्या निर्णयाच्या अधिन राहून तसेच सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र.बीसीसी 2018/प्र.क्र.366/16-ब. दि.07.05.2021 मधील सुचनांनुसार निव्वळ तदर्थ (Adhoc) स्वरुपात पदोन्नती देणेबाबत तसेच औरंगाबाद महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम 2021 मधील नियम 6 नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 45 अंतर्गत येणारी पदे तसेच वर्ग-1 ची इतर सर्व पदे पदोन्नतीने भरतांना, सर्वसाधारण सभेच्या ठरावानंतर त्यास शासनाची पूर्वमंजूरी आवश्यक राहील,अशी तरतूद असून त्यानुसार मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेवून तसा प्रस्ताव मा.राज्य शासनाकडे मान्यतेस्तव पाठविणेबाबत समिती शिफारस केल्यानुसार,मा.सर्वसाधारण सभेची मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

| अ.क्र. | सेवा ज्येष्ठता क्रमांक | अधिकाऱ्यांचे नांव (सर्वश्री) | मूळ जात प्रवर्ग | पदोन्नतीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|
| 1. | 1 | देविदास कडुबा पंडीत | खुला | खुला |

**<u>प्रस्ताव क्रमांक 486/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.29.07.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, 'सहाय्यक अभियंता' संवर्गातून 'उप अभियंता (स्थापत्य)' संवर्गातील रिक्त पदे पदोन्नतीने भरणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 54(1) अन्वये गठीत केलेल्या निवड समितीची बैठक दि.01.07.2022 रोजी घेण्यात आली. सद्य:स्थितीत उप अभियंता (स्थापत्य) संवर्गात एकूण (25) पदे मंजूर असून (06) पदे भरण्यात आले असून (19) पदे रिक्त आहेत.

रिट याचिका क्र.5156/1988 व रिट याचिका क्र.5045/1997 श्री.सखाराम पानझडे विरुध्द मनपा मध्ये मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी या संदर्भात तांत्रिक संवर्गातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण होण्यासंदर्भातील तपशिल नमूद आहे. तथापि, औरंगाबाद महानगरपालिकेच्या सेवाभरती नियम दि.16.05.1994 मधील तरतूदीनुसार वयाची 45 वर्षे पूर्ण झाल्यानंतर व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्याची तरतूद आहे. त्यानुसार औरंगाबाद महानगरपालिकेने अशा अधिकाऱ्यांना व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट दिलेली आहे. सहाय्यक अभियंता संवर्गातून उप अभियंता (स्थापत्य) या संवर्गात पदोन्नती देण्यासाठी संबंधितांच्या सेवाविषयक व व्यावसायिक परीक्षेसंदर्भातील बाबी इ.पडताळणी समितीसमोर करण्यात आली आहे. त्यामुळे पदोन्नती व सेवाविषयक तपशीलाच्या अनुषंगाने

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 51(4) च्या अधिन राहून समिती एकमताने खालील अधिकाऱ्यांच्या तदर्थ (Adhoc) पदोन्नतीसाठी मान्यता प्रदान करीत आहे. तसेच संबंधित अधिकाऱ्यांच्या वयाच्या 50/55 नंतर सेवेत ठेवण्याबाबतचे पुनर्विलोकनाबाबत कार्यवाही करण्यात आलेली नाही.

सहाय्यक अभियंता संवर्गातील कार्यरत अधिकाऱ्यांची सेवा ज्येष्ठता, शैक्षणिक अर्हता, गोपनीय अहवाल, विभागीय चौकशी इ. सेवाविषयक बाबीं विचारात घेता, उप अभियंता (स्थापत्य) पदावरील रिक्त पदांची संख्या तसेच कामाची निकड लक्षात घेता खालील अधिकाऱ्यांना खुल्या प्रवर्गातून 'उपअभियंता (स्थापत्य)' या पदावर वेतनश्रेणी (एस-20) 56100-177500 (7 वा वेतन आयोग) मध्ये मा.उच्च न्यायालय,मुंबई यांनी रिट याचिका क्र.2797/2015 मध्ये दि.04.08.2017 रोजी दिलेल्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका क्र.28306/2017 च्या निर्णयाच्या अधिन राहून तसेच सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र.बीसीसी 2018/प्र.क्र.366/16-ब. दि.07.05.2021 मधील सुचनांनुसार निव्वळ तदर्थ (Adhoc) स्वरुपात पदोन्नती देणेबाबत तसेच औरंगाबाद महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम 2021 मधील नियम 6 नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 45 अंतर्गत येणारी पदे तसेच वर्ग-1 ची इतर सर्व पदे पदोन्नतीने भरतांना, सर्वसाधारण सभेच्या ठरावानंतर त्यास शासनाची पूर्वमंजूरी आवश्यक राहील,अशी तरतूद असून त्यानुसार मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेवून तसा प्रस्ताव मा.राज्य शासनाकडे मान्यतेस्तव पाठविणेबाबत समिती शिफारस केल्यानुसार,मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेण्यासाठी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

| अ.क्र. | सेवा ज्येष्ठता क्रमांक | अधिकाऱ्यांचे नांव (सर्वश्री) | मूळ जात प्रवर्ग | पदोन्नतीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|
| 1. | 2 | भगवानसिंग केसरसिंग परदेशी | विजाअ | खुला |
| 2. | 3 | दिगंबर गणपत निकम | अज | खुला |
| 3. | 4 | विजय कारभारी गोरे | अजा | खुला |
| 4. | 5 | वसंत रामदास भोये | अज | खुला |
| 5. | 6 | अरुण शेकुजी मोरे | अजा | खुला |
| 6. | 7 | सुहास पुरुषोत्तम जोशी | खुला | खुला |
| 7. | 8 | अनिल अण्णासाहेब तनपुरे | खुला | खुला |
| 8. | 9 | कारभारी पुंडलिक घुगे | भजड | खुला |
| 9. | 10 | शशिकांत सर्वोत्तम पाटील | इमाव | खुला |
| 10. | 11 | गोविंदा प्रल्हाद पाटे | खुला | खुला |
| 11. | 12 | देवेंन्द्र त्रिंबकराव डेंगळे | अजा | खुला |
| 12. | 13 | बाळासाहेब पांडूरंग शिरसाट | अजा | खुला |
| 13. | 15 | संजय मुरलीधरराव कोंबडे | खुला | खुला |

**<u>ठराव क्रमांक 486/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, उपअभियंता (स्थापत्य) पदावरील रिक्त पदांची संख्या तसेच कामाची निकड लक्षात घेता खालील अधिकाऱ्यांना खुल्या प्रवर्गातून 'उपअभियंता (स्थापत्य)' या पदावर वेतनश्रेणी (एस-20) 56100-177500 (7वा वेतन आयोग) मध्ये मा.उच्च न्यायालय,मुंबई यांनी रिट याचिका क्र.2797/2015 मध्ये दि.04.08.2017 रोजी दिलेल्या निर्णया विरोधात राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका क्र.28306/2017 च्या निर्णयाच्या अधिन राहून तसेच सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र.बीसीसी 2018/प्र.क्र.366/16-ब. दि.07/05/2021 मधील सुचनांनुसार निव्वळ तदर्थ (Adhoc) स्वरुपात पदोन्नती देणेबाबत तसेच औरंगाबाद महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम 2021 मधील नियम 6 नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 45 अंतर्गत येणारी पदे तसेच वर्ग-1 ची इतर सर्व पदे पदोन्नतीने भरतांना, सर्वसाधारण सभेच्या ठरावानंतर त्यास शासनाची पूर्वमंजूरी आवश्यक राहील,अशी तरतूद असून त्यानुसार मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेवून तसा प्रस्ताव मा.राज्य शासनाकडे मान्यतेस्तव पाठविणेबाबत समिती शिफारस केल्यानुसार,मा.सर्वसाधारण सभेची मान्यता देण्यात येते. वौधानिक कार्यवाही व्हावी.

| अ.क्र. | सेवा ज्येष्ठता क्रमांक | अधिकाऱ्यांचे नांव (सर्वश्री) | मूळ जात प्रवर्ग | पदोन्नतीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|
| 1. | 2 | भगवानसिंग केसरसिंग परदेशी | विजाअ | खुला |
| 2. | 3 | दिगंबर गणपत निकम | अज | खुला |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 3. | 4 | विजय कारभारी गोरे | अजा | खुला |
| 4. | 5 | वसंत रामदास भोये | अज | खुला |
| 5. | 6 | अरुण शेकुजी मोरे | अजा | खुला |
| 6. | 7 | सुहास पुरुषोत्तम जोशी | खुला | खुला |
| 7. | 8 | अनिल अण्णासाहेब तनपुरे | खुला | खुला |
| 8. | 9 | कारभारी पुंडलिक घुगे | भजड | खुला |
| 9. | 10 | शशिकांत सर्वोत्तम पाटील | इमाव | खुला |
| 10. | 11 | गोविंदा प्रल्हाद पाटे | खुला | खुला |
| 11. | 12 | देवेंन्द्र त्रिंबकराव डेंगळे | अजा | खुला |
| 12. | 13 | बाळासाहेब पांडूरंग शिरसाट | अजा | खुला |
| 13. | 15 | संजय मुरलीधरराव कोंबडे | खुला | खुला |

**<u>प्रस्ताव क्रमांक 487/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.29.07.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, 'सहाय्यक अभियंता' संवर्गातून 'उप अभियंता (यांत्रिकी)' संवर्गातील रिक्त पदे पदोन्नतीने भरणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 54(1) अन्वये गठीत केलेल्या निवड समितीची बैठक दि.01.07.2022 रोजी घेण्यात आली. सद्य:स्थितीत उप अभियंता (यांत्रिकी) संवर्गात एकूण (04) पदे मंजूर असून (01) पदे भरण्यात आले असून (03) पदे रिक्त आहेत.

रिट याचिका क्र.5156/1988 व रिट याचिका क्र.5045/1997 श्री.सखाराम पानझडे विरुध्द मनपा मध्ये मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी या संदर्भात तांत्रिक संवर्गातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण होण्या संदर्भातील तपशिल नमूद आहे. तथापि,औरंगाबाद महानगरपालिकेच्या सेवाभरती नियम दि.16.05.1994 मधील तरतूदीनुसार वयाची 45 वर्षे पूर्ण झाल्यानंतर व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्याची तरतूद आहे. त्यानुसार औरंगाबाद महानगरपालिकेने अशा अधिकाऱ्यांना व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट दिलेली आहे. सहाय्यक अभियंता संवर्गातून उप अभियंता (यांत्रिकी) या संवर्गात पदोन्नती देण्यासाठी संबंधितांच्या सेवाविषयक व व्यावसायिक परीक्षेसंदर्भातील बाबी इ.पडताळणी समितीसमोर करण्यात आली आहे. त्यामुळे पदोन्नती व सेवाविषयक तपशीलाच्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 51(4) च्या अधिन राहून समिती एकमताने खालील अधिकाऱ्यांच्या तदर्थ (Adhoc) पदोन्नतीसाठी मान्यता प्रदान करीत आहे. तसेच संबंधित अधिकाऱ्यांच्या वयाच्या 50/55 नंतर सेवेत ठेवण्याबाबतचे पुनर्विलोकनाबाबत कार्यवाही करण्यात आलेली नाही.

सहाय्यक अभियंता संवर्गातील कार्यरत अधिकाज्यांची सेवा ज्येष्ठता, शौक्षणिक अर्हता, गोपनीय अहवाल, विभागीय चौकशी इ. सेवाविषयक बाबीं विचारात घेता, उप अभियंता (यांत्रिकी) पदावरील रिक्त पदांची संख्या तसेच कामाची निकड लक्षात घेता खालील अधिकाऱ्यांना खुल्या प्रवर्गातून 'उपअभियंता (यांत्रिकी)' या पदावर वेतनश्रेणी (एस-20) 56100-177500 (7 वा वेतन आयोग) मध्ये मा.उच्च न्यायालय,मुंबई यांनी रिट याचिका क्र.2797/2015 मध्ये दि.04.08.2017 रोजी दिलेल्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका क्र.28306/2017 च्या निर्णयाच्या अधिन राहून तसेच सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र.बीसीसी 2018/प्र.क्र.366/16-ब. दि.07.05.2021 मधील सुचनांनुसार निव्वळ तदर्थ (Adhoc) स्वरुपात पदोन्नती देणेबाबत तसेच औरंगाबाद महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम 2021 मधील नियम 6 नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 45 अंतर्गत येणारी पदे तसेच वर्ग-1 ची इतर सर्व पदे पदोन्नतीने भरतांना, सर्वसाधारण सभेच्या ठरावानंतर त्यास शासनाची पूर्वमंजूरी आवश्यक राहील,अशी तरतूद असून त्यानुसार मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेवून तसा प्रस्ताव मा.राज्य शासनाकडे मान्यतेस्तव पाठविणेबाबत समिती शिफारस केल्यानुसार,मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेण्यासाठी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

| अ.क्र. | सेवा ज्येष्ठता क्रमांक | अधिकाऱ्यांचे नांव (सर्वश्री) | मूळ जात प्रवर्ग | पदोन्नतीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|
| 1. | 1 | अमोल बाबुराव कुलकर्णी | खुला | खुला |
| 2. | 2 | सचिन कृष्णराव वाईकर | खुला | खुला |
| 3. | 3 | दत्तात्रय परशुराम गायकवाड | इमाव | खुला |

**ठराव क्रमांक 487/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, उप अभियंता (यांत्रिकी) पदावरील रिक्त पदांची संख्या तसेच कामाची निकड लक्षात घेता खालील अधिकाऱ्यांना खुल्या प्रवर्गातून 'उपअभियंता (यांत्रिकी)' या पदावर वेतनश्रेणी (एस-20) 56100-177500 (7 वा वेतन आयोग) मध्ये मा.उच्च न्यायालय,मुंबई यांनी रिट याचिका क्र.2797/2015 मध्ये दि.04.08.2017 रोजी दिलेल्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका क्र.28306/2017 च्या निर्णयाच्या अधिन राहून तसेच सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र.बीसीसी 2018/प्र.क्र.366/16-ब. दि.07.05.2021 मधील सुचनांनुसार निव्वळ तदर्थ (Adhoc) स्वरुपात पदोन्नती देणेबाबत तसेच औरंगाबाद महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम 2021 मधील नियम 6 नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 45 अंतर्गत येणारी पदे तसेच वर्ग-1 ची इतर सर्व पदे पदोन्नतीने भरतांना, सर्वसाधारण सभेच्या ठरावानंतर त्यास शासनाची पूर्वमंजूरी आवश्यक राहील,अशी तरतूद असून त्यानुसार मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेवून तसा प्रस्ताव मा.राज्य शासनाकडे मान्यतेस्तव पाठविणेबाबत समिती शिफारस केल्यानुसार,मा.सर्वसाधारण सभेची मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

| अ.क्र. | सेवा ज्येष्ठता क्रमांक | अधिकाऱ्यांचे नांव (सर्वश्री) | मूळ जात प्रवर्ग | पदोन्नतीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|
| 1. | 1 | अमोल बाबुराव कुलकर्णी | खुला | खुला |
| 2. | 2 | सचिन कृष्णराव वाईकर | खुला | खुला |
| 3. | 3 | दत्तात्रय परशुराम गायकवाड | इमाव | खुला |

**प्रस्ताव क्रमांक 488/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.29.07.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रस्ताव सादर करण्यात येतो की, 'सहाय्यक अभियंता' संवर्गातून 'उप अभियंता (विद्युत)' संवर्गातील रिक्त पदे पदोन्नतीने भरणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 54(1) अन्वये गठीत केलेल्या निवड समितीची बैठक दि.01.07.2022 रोजी घेण्यात आली. सद्य:स्थितीत उप अभियंता (विद्युत) संवर्गात एकूण (04) पदे मंजूर असून सर्व पदे रिक्त आहेत.

रिट याचिका क्र.5156/1988 व रिट याचिका क्र.5045/1997 श्री.सखाराम पानझडे विरुध्द मनपा मध्ये मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी या संदर्भात तांत्रिक संवर्गातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण होण्या संदर्भातील तपशिल नमूद आहे. तथापि, औरंगाबाद महानगरपालिकेच्या सेवाभरती नियम दि.16.05.1994 मधील तरतूदीनुसार वयाची 45 वर्षे पूर्ण झाल्यानंतर व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्याची तरतूद आहे. त्यानुसार औरंगाबाद महानगरपालिकेने अशा अधिकाऱ्यांना व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट दिलेली आहे. सहाय्यक अभियंता संवर्गातून उप अभियंता (विद्युत) या संवर्गात पदोन्नती देण्यासाठी संबंधितांच्या सेवाविषयक व व्यावसायिक परीक्षेसंदर्भातील बाबी इ.पडताळणी समितीसमोर करण्यात आली आहे. त्यामुळे पदोन्नती व सेवाविषयक तपशीलाच्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 51(4) च्या अधिन राहून समिती एकमताने खालील अधिकाऱ्यांच्या तद्र्थ (Adhoc) पदोन्नतीसाठी मान्यता प्रदान करीत आहे. तसेच संबंधित अधिकाऱ्यांच्या वयाच्या 50/55 नंतर सेवेत ठेवण्याबाबतचे पुनर्विलोकनाबाबत कार्यवाही करण्यात आलेली नाही.

सहाय्यक अभियंता संवर्गातील कार्यरत अधिकाऱ्यांची सेवा ज्येष्ठता, शैक्षणिक अर्हता, गोपनीय अहवाल, विभागीय चौकशी इ. सेवाविषयक बाबी विचारात घेता, उप अभियंता (विद्युत) पदावरील रिक्त पदांची संख्या तसेच कामाची निकड लक्षात घेता खालील अधिकाऱ्यांना खुल्या प्रवर्गातून 'उपअभियंता (विद्युत)' या पदावर वेतनश्रेणी (एस-20) 56100-177500 (7 वा वेतन आयोग) मध्ये मा.उच्च न्यायालय,मुंबई यांनी रिट याचिका क्र.2797/2015 मध्ये दि.04.08.2017 रोजी दिलेल्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका क्र.28306/2017 च्या निर्णयाच्या अधिन राहून तसेच सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र.बीसीसी 2018/प्र.क्र.366/16-ब.दि.07.05.2021 मधील सुचनांनुसार निव्वळ तदर्थ (Adhoc) स्वरुपात पदोन्नती देणेबाबत तसेच औरंगाबाद महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम 2021 मधील नियम 6 नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 45 अंतर्गत येणारी पदे तसेच वर्ग-1 ची इतर सर्व पदे पदोन्नतीने भरतांना, सर्वसाधारण सभेच्या ठरावानंतर त्यास शासनाची पूर्वमंजूरी आवश्यक राहील, अशी तरतूद असून त्यानुसार मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेवून तसा प्रस्ताव मा.राज्य शासनाकडे मान्यतेस्तव पाठविणे बाबत समिती शिफारस केल्यानुसार,मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेण्यासाठी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

| अ.क्र. | सेवा ज्येष्ठता क्रमांक | अधिकाऱ्यांचे नांव (सर्वश्री) | मूळ जात प्रवर्ग | पदोन्नतीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|
| 1. | 1 | श्रीमती मोहिनी सुनिल वारभुवन | अजा | खुला |
| 2. | 2 | श्री.राधेशाम चंद्रकांतराव जोशी | खुला | खुला |

**<u>ठराव क्रमांक 488/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, उप अभियंता (विद्युत) पदावरील रिक्त पदांची संख्या तसेच कामाची निकड लक्षात घेता खालील अधिकाऱ्यांना खुल्या प्रवर्गातून 'उपअभियंता (विद्युत)' या पदावर वेतनश्रेणी (एस-20) 56100-177500 (7 वा वेतन आयोग) मध्ये मा.उच्च न्यायालय,मुंबई यांनी रिट याचिका क्र.2797/2015 मध्ये दि.04.08.2017 रोजी दिलेल्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका क्र.28306/2017 च्या निर्णयाच्या अधिन राहून तसेच सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र.बीसीसी 2018/प्र.क्र.366/16-ब दि.07.05.2021 मधील सुचनांनुसार निव्वळ तदर्थ (Adhoc) स्वरुपात पदोन्नती देणेबाबत तसेच औरंगाबाद महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम 2021 मधील नियम 6 नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 45 अंतर्गत येणारी पदे तसेच वर्ग-1 ची इतर सर्व पदे पदोन्नतीने भरतांना, सर्वसाधारण सभेच्या ठरावानंतर त्यास शासनाची पूर्वमंजूरी आवश्यक राहील,अशी तरतूद असून त्यानुसार मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेवून तसा प्रस्ताव मा.राज्य शासनाकडे मान्यतेस्तव पाठविणेबाबत समिती शिफारस केल्यानुसार,मा.सर्वसाधारण सभेची मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

| अ.क्र. | सेवा ज्येष्ठता क्रमांक | अधिकाऱ्यांचे नांव (सर्वश्री) | मूळ जात प्रवर्ग | पदोन्नतीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|
| 1. | 1 | श्रीमती मोहिनी सुनिल वारभुवन | अजा | खुला |
| 2. | 2 | श्री.राधेशाम चंद्रकांतराव जोशी | खुला | खुला |

**<u>प्रस्ताव क्रमांक 489/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.29.07.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, 'अधिक्षक' संवर्गातून ' सहाय्यक आयुक्त' संवर्गातील रिक्त पदे पदोन्नतीने भरणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 54(1) अन्वये गठीत केलेल्या निवड समितीची बैठक दि.01.07.2022 रोजी घेण्यात आली. सद्य:स्थितीत सहाय्यक आयुक्त संवर्गात पदोन्नतीची एकूण (11) पदे मंजूर असून सर्व पदे रिक्त आहेत.

अधिक्षक संवर्गातील कार्यरत खालील कर्मचाऱ्यांच्या वयाच्या 50/55 नंतर सेवेत ठेवण्याबाबतचे पुनर्विलोकना बाबत कार्यवाही करण्यात आलेली नाही. तथापि कर्मचाऱ्यांची सेवा ज्येष्ठता, शैक्षणिक अर्हता, गोपनीय अहवाल, विभागीय चौकशी इ. सेवाविषयक बाबीं विचारात घेता, सहाय्यक आयुक्त पदावरील रिक्त पदांची संख्या तसेच कामाची निकड लक्षात घेता, विहित केलेल्या अटी व शर्तींच्या अधिन राहून खालील कर्मचाऱ्यांना खुल्या प्रवर्गातून 'सहाय्यक आयुक्त' या पदावर वेतनश्रेणी (एस-16) 44900-142400 (7 वा वेतन आयोग) मध्ये मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्र.2797/2015 मध्ये दि.04.08.2017 रोजी दिलेल्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका क्र.28306/2017 च्या निर्णयाच्या अधिन राहून तसेच सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र.बीसीसी 2018/प्र.क्र.366/16-ब.दि.07.05.2021 मधील सुचनांनुसार निव्वळ तदर्थ (Adhoc) स्वरुपात पदोन्नती देणेबाबत तसेच औरंगाबाद महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम 2021 मधील नियम 6 नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 45 अंतर्गत येणारी पदे तसेच वर्ग-1 ची इतर सर्व पदे पदोन्नतीने भरतांना, सर्वसाधारण सभेच्या ठरावानंतर त्यास शासनाची पूर्वमंजूरी आवश्यक राहील, अशी तरतूद असून त्यानुसार मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेवून तसा प्रस्ताव मा.राज्य शासनाकडे मान्यतेस्तव पाठविणे बाबत समिती शिफारस केल्यानुसार,मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेण्यासाठी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

| अ.क्र. | सेवा ज्येष्ठता क्रमांक | अधिकाऱ्यांचे नांव (सर्वश्री) | मूळ जात प्रवर्ग | पदोन्नतीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|
| 1. | 1 | सविता अनंत सोनवणे | अज | खुला |
| 2. | 2 | अभय अशोकराव प्रामाणिक | खुला | खुला |

**<u>ठराव क्रमांक 489/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सहाय्यक आयुक्त पदावरील रिक्त पदांची संख्या तसेच कामाची निकड लक्षात घेता, विहित केलेल्या अटी व शर्तींच्या अधिन राहून खालील कर्मचाऱ्यांना खुल्या प्रवर्गातून 'सहाय्यक आयुक्त' या पदावर वेतनश्रेणी (एस-16) 44900-142400 (7 वा वेतन आयोग) मध्ये मा.उच्च न्यायालय,मुंबई यांनी रिट याचिका क्र.2797/2015 मध्ये दि.04.08.2017 रोजी दिलेल्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा.सर्वोच्च

न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका क्र.28306/2017 च्या निर्णयाच्या अधिन राहून तसेच सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र.बीसीसी 2018/प्र.क्र.366/16-ब. दि.07.05.2021 मधील सुचनांनुसार निव्वळ तदर्थ (Adhoc) स्वरुपात पदोन्नती देणेबाबत तसेच औरंगाबाद महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम 2021 मधील नियम 6 नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 45 अंतर्गत येणारी पदे तसेच वर्ग-1 ची इतर सर्व पदे पदोन्नतीने भरतांना, सर्वसाधारण सभेच्या ठरावानंतर त्यास शासनाची पूर्वमंजूरी आवश्यक राहील,अशी तरतूद असून त्यानुसार मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेवून तसा प्रस्ताव मा.राज्य शासनाकडे मान्यतेस्तव पाठविणेबाबत समितीने शिफारस केल्यानुसार, मा.सर्वसाधारण सभेची मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

| अ.क्र. | सेवा ज्येष्ठता क्रमांक | अधिकाऱ्यांचे नांव (सर्वश्री) | मूळ जात प्रवर्ग | पदोन्नतीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|
| 1. | 1 | सविता अनंत सोनवणे | अज | खुला |
| 2. | 2 | अभय अशोकराव प्रामाणिक | खुला | खुला |

**<u>प्रस्ताव क्रमांक 490/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.29.07.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-1/2020/934. दि.11.09.2020 अन्वये, श्री.सुभाष मोटे,शाखा अभियंता (सेवानिवृत्त) यांना "झोन क्र.6 कार्यालयातंर्गत येणाऱ्या नवीन मालमत्तांना कर आकारणी, मालमत्ता कराबाबत आक्षेप प्रकरणे व मालमत्ता कर वसुली" या विवक्षित कामासाठी यांची सेवा 06 महिन्यांच्या कालावधीसाठी करार पध्दतीने, सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना दरमहा सेवानिवृत्तीपूर्वी मिळत असलेल्या एकूण वेतनातून (मूळ वेतन व महागाई भत्ता धरुन) त्यांना आता मिळत असलेले एकूण निवृत्तीवेतन (महागाई भत्ता आणि अंशराशीकृत निवृत्तीवेतनासह) वजा केल्यानंतर होणारी रक्कम त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल. परंतु या पारिश्रमिक रकमेची कमाल मासिक मर्यादा रु.40,000/- (रुपये चाळीस हजार) इतक्या मर्यादेत राहील,या अटीवर घेण्यात आलेली आहे.

तथापि उक्त आदेशानुसार सदरची मुदत ही दि.10.03.2021 रोजी संपल्याने व झोन कार्यालयात त्यांचे जागेवर कोणीही तांत्रिक कर्मचारी सद्यस्थितीत उपलब्ध नाही. तसेच झोन अधिकारी यांनी कर निर्धारक व संकलक यांचेमार्फत सादर केलेल्या अहवालानुसार श्री.सुभाष मोटे यांनी मालमत्ता करासंदर्भात सोपविण्यात आलेली कामे योग्य प्रकारे पार पाडली असून त्यांच्या सेवेची कार्यालयास आवश्यकता आहे. त्यानुषंगाने त्यांना प्रशासकीय ठराव क्र.106. दि.23.03.2021 नुसार कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2021/486. दि.23.03.2021 अन्वये उक्त विवक्षित कामासाठी दि.11.09.2020 च्या आदेशातील अटी व शर्तीनुसार दि.12.03.2021 पासून पुढील 06 महिन्यांच्या कालावधीसाठी करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आली होती.

तथापि सदर मुदत दि.12.09.2021 रोजी संपलेली असल्याने व झोन अधिकारी यांनी दिलेल्या अहवालानुसार श्री.सुभाष मोटे यांनी त्यांचेकडे सोपविण्यात आलेली कामे योग्य प्रकारे पार पाडली असून या कालावधीत त्यांचे काम समाधानकारक राहीले आहे. तसेच कर निर्धारक व संकलक यांनी तांत्रिक कर्मचाऱ्यांची गरज असल्याने 06 महिन्यांसाठी मुदतवाढ देणेबाबत शिफारस केली होती. त्यानुषंगाने त्यांना प्रशासकीय ठराव क्र.241. दि.17.12.2021 नुसार कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2021/1615. दि.20.12.2021 अन्वये उक्त विवक्षित कामासाठी दि.11.09.2020 रोजीच्या आदेशातील अटी व शर्तीनुसार आदेश निर्गमनाच्या दिनांकापासून (आदेश दि.20.12.2021) पुढील 06 महिन्यांच्या कालावधीसाठी करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आलेली आहे.

तथापि दि.20.12.2021 रोजीच्या आदेशाची मुदत दि.20.06.2022 रोजी संपलेली असल्याने व झोन अधिकारी यांच्या अहवालानुसार श्री.सुभाष मोटे यांनी त्यांचेकडे सोपविण्यात आलेली कामे योग्य प्रकारे पार पाडली असून या कालावधीत त्यांचे काम समाधानकारक राहीले आहे. तसेच कर निर्धारक व संकलक यांनी तांत्रिक कर्मचाऱ्यांची गरज असल्याने त्यांना पुढील मुदतवाढ देणेबाबत शिफारस केली आहे.

करिता, श्री.सुभाष मोटे, शाखा अभियंता (सेवानिवृत्त) यांना दोन दिवसांचा तांत्रिक खंड देऊन उक्त विवक्षित कामासाठी दि.11.09.2020 रोजीच्या आदेशातील अटी व शर्तीनुसार दि.23.06.2022 पासून पुढील 06 महिन्यांच्या कालावधीसाठी करार पध्दतीने नियुक्तीस मुदतवाढ देण्याबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 490/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.सुभाष मोटे, शाखा अभियंता (सेवानिवृत्त) यांना 02 दिवसांचा तांत्रिक खंड देऊन दि.23.06.2022 पासून पुढील 06 महिन्यांच्या कालावधीसाठी दि.11.09.2020 च्या आदेशात नमूद

अटी व शर्तीच्या अधिन राहून "झोन क्र.6 कार्यालयातंर्गत येणाऱ्या नवीन मालमत्तांना कर आकारणी,मालमत्ता कराबाबत आक्षेप प्रकरणे व मालमत्ता कर वसुली" या कामासाठी मुदतवाढ देण्यास मंजूरी देण्यात येते. वौधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 491/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.29.07.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचे दि.08.02.2022 च्या आदेशान्वये मौजे हर्सुल ता.जि.औरंगाबाद येथील गट नंबर-216 मधील 1.00 हेक्टर 02 आर सरकारी जमीन सर्वांसाठी घरे संकल्पनेवर आधारीत प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत घटक क्रमांक-3 (AHP) ची अंमलबजावणी करणे करीता औरंगाबाद महानगरपालिकेस प्रदान करण्यात आलेली आहे.

औरंगाबाद शहर मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) सन-1991 नुसार प्रस्तावीत क्षेत्र हे ना विकास क्षेत्रात (ग्रीन झोन) मध्ये समाविष्ट आहे. तसेच प्रस्तावीत क्षेत्र 45.00 मी.रुंद विकास योजना रस्त्याने अंशत: बाधीत आहे. रस्त्याने बाधीत क्षेत्र वगळून निव्वळ उर्वरित क्षेत्र 8430.00 चौ.मी.इतके शिल्लक राहत आहे.

महाराष्ट्र शासनाची अधिसुचना टिपीएस-1818/ सीआर-236 /18/ Sec-20(3)/ यु.डी.-13 दि.02.12.2020 रोजी पासून संपुर्ण महाराष्ट्र राज्यात एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन (UDCPR) नियमावली लागू करण्यात आलेली आहे. सदर नियमावलीतील नियम क्रमांक-14.4.1 (ii) नुसार ना विकास क्षेत्रामध्ये "प्रधानमंत्री आवास योजना प्रकल्पाकरीता सकल भुखंडावर 1.00 इतका चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय असेल" असे नमुद आहे.

सदरील जमीन/जागा ही मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्याकडून प्राप्त झालेल्या इतर जमिनीच्या तुलनेत कमी क्षेत्राची असल्याने या जागेवर जास्त घरकुल उपलब्ध व्हावे व क्षेत्रावर 2.5 चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय होणे करीता सदरचे ना विकास क्षेत्र हे रहिवासी क्षेत्रात समाविष्ट करणे बाबत घरकुल विभागाची मागणी आहे.

मंजुर विकास योजनेनुसार सदरील प्रस्तावाखालील क्षेत्र ना-विकास क्षेत्रात समाविष्ट असून या क्षेत्रावर 2.5 चटई क्षेत्र निर्देशांकाने बांधकाम करणेसाठी सदर क्षेत्राचे रुपांतर रहिवासी क्षेत्रात करणे आवश्यक आहे.

वरील बाब लक्षात घेता, प्रस्तावीत मिळकतीमधून 45.00 मी.रुंदीचा विकास योजना रस्त्याने बाधीत क्षेत्र वगळून उर्वरित 84.30 आर (8430.00 चौ.मी.) क्षेत्रावर महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम-1966 चे कलम-37 अन्वये ना-विकास क्षेत्रातील जागा रहिवासी क्षेत्रात समाविष्ट करण्याचा गौण फेरबदल प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 491/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचे दि.08.02.2022 च्या आदेशान्वये मौजे हर्सुल ता.जि.औरंगाबाद येथील गट नंबर-216 मधील 1.00 हेक्टर 02 आर सरकारी जमीन सर्वांसाठी घरे संकल्पनेवर आधारीत प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत घटक क्रमांक-3 (AHP)ची अंमलबजावणी करणे करीता औरंगाबाद महानगरपालिकेस प्रदान करण्यात आलेली आहे.

महानगरपालिकेस प्रदान करण्यात आलेले क्षेत्र औरंगाबाद शहर मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) सन-1991 नुसार ना-विकास क्षेत्रात समाविष्ट असून अंशत: 45.00 मी.रुंद विकास योजना रस्त्याने बाधीत आहे.

सदरील जमीन/जागा ही मा.जिल्हाधिकारी, औरंगाबादइ यांच्याकडून प्राप्त झालेल्या इतर जमिनीच्या तुलनेत कमी क्षेत्राची असल्याने या जागेवर जास्त घरकुल उपलब्ध व्हावे व ना-विकास क्षेत्रावर 2.5 चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय होणे करीता सदरचे ना विकास क्षेत्र हे रहिवासी क्षेत्रात समाविष्ट करणे बाबत घरकुल विभागाची मागणी आहे.

प्रस्तावीत मिळकतीमधून औरंगाबाद शहर मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) सन-1991 नुसार 45.00 मी.रुंदीचा विकास योजना रस्ता प्रस्तावीत असून सदर रस्त्याचे बाधीत क्षेत्र वगळून उर्वरित 84.30 आर (8430.00 चौ.मी.) क्षेत्रावर महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम-37 अन्वये ना-विकास क्षेत्रातील जागा रहिवासी क्षेत्रात समाविष्ट करण्याचा गौण फेरबदलाच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 492/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.29.07.2022)**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम 481 (आय) नुसार मा. सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दिनांक 05/10/2008 रोजी मे.रॅमके इन्व्हायरो इंजिनिअर्स लि. यांचेसोबत कचरा संकलन व वाहतुकीचे कामासाठी 10 वर्षाच्या कालावधी करीता रू.108.5 कोटी रकमेचा करार करण्यात आला होता.

मे. रॅमके कंपनी सोबत सदरील करार झाल्यानंतर निवीदेप्रमाणे कंपनीस अदा करावयाच्या रकमेबाबत महानगरपालिका आणि कंपनीमध्ये देयकाच्या अदाईबाबत वाद उत्पन्न झाल्यामुळे कंपनीने दिनांक 03/12/2011 च्या नोटीसच्या अनुषंगाने कंपनीसोबत झालेल्या मनपाचा करारनामा रद्द करण्याची नोटीस मनपास दिली. तद् नंतर प्रकरणात आरब्रीस्टेशन ॲण्ड कन्सोलेशन ॲक्ट 1996 नुसार प्रकरणी लवाद स्थापित करण्यात आला. लवादासमोर साक्षीपुरावा आणि युक्तीवादा अंती दिनांक 05/07/2018 रोजी महानगरपालिकेच्या विरोधात निकाल पारित झालेला आहे. या निकालात महानगरपालिकेचा 34,21,92,113/- रुपये व्याजासह देण्याचा प्रतिदावा फेटाळण्यात आला आहे.

सदरील निकालाप्रमाणे महानगरपालिकेने रॅमके कंपनीस खालील प्रमाणे रक्कम अदा करण्याचे लवादाचे आदेश आहेत.

1. रू.11,54,17,816/- अधिक 15 टक्के प्रतिवर्ष व्याज दि.18/12/2011 ते लवादाचा निर्णय पारित झालेल्या दि.05.07.2018 पर्यंत.
2. रू.2,39,56,372/- अधिक 09 टक्के प्रतिवर्ष व्याज दि.15/06/2012 ते लवादाचा निर्णय पारित झालेल्या दि 05/07/2018 पर्यंत.
3. उपरोक्त दोन्ही रकमांवर दिनांक 05/07/2018 पासून प्रत्यक्ष रक्कम अदा होईपर्यंत @ 9 टक्के दराने व्याज देय राहील.
4. लवादाचा खर्च रू. 75 लक्ष कंपनीस अदा करावा असे मा.लवादाने दिनांक 05/07/2018 रोजी आदेश पारित केले आहे.

तद् नंतर या निकालाच्या विरोधात मनपाने मा.जिल्हा न्यायालयात अपिल सिव्हील MA 208/2018 दाखल केले. सर्व युक्तवादानंतर मा. जिल्हा न्यायालयाने, दि.24.03.2022 रोजी लवादाने पारित केलेला निकाल कायम केला आहे. त्यानुसार दि.17.06.2022 पर्यंत उपरोक्त नमुद केलेली र.रु.37,09,44,743/- महानगरपालिकेने रॅमके कंपनीला द्यावयाची आहे. या रकमेवर प्रतिदिन रू.67,413/- इतके व्याज चालु आहे. प्रकरणात सर्व बाबींचा विचार केला असता, मनपावर कंपनीस रक्कम अदा करण्याचे आर्थिक दायित्व आहे. तथापी महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करता कंपनीशी वाटाघाटी अंती केवळ मुळ रकमेवर अवॉर्ड घोषित रकमेचे व्याज आणि व्यवसायाचे नुकसान झाल्यापोटी अदा करावयाच्या रकमेवर महानगरपालिका कोणतेही व्याज देणार नाही. तसेच मुळ रकमेवर लवादाच्या निर्णयापासून प्रत्यक्ष रक्कम अदा करेपर्यंत निकालाप्रमाणे देय असलेले व्याज महानगरपालिका देणार नाही. तसेच कंपनीस लवादाचा खर्च देखील महानगरपालिका देणार नाही हे निश्चीत करण्यात आले त्यानुसार मा.जिल्हा न्यायालयाच्या निर्णयानुसार लवादाचा निर्णय/अवार्ड घोषित होईपर्यंत निवीदेनुसार महानगरपालिकेस कंपनीने केलेल्या कामाप्रमाणे देय असलेले असलेली रक्कम रू.11,54,17,816/- वर दिनांक 18/12/2011 ते 05/7/2018 पर्यंत येणारे व्याज देण्यात येईल तसेच व्यावसायीक नुकसानापोटी निर्धारित केलेली रक्कम बिनव्याजी देण्याचे प्रस्तावित करण्यात येते. याप्रमाणे देय असलेली रक्कम रुपये 22,88,75,110 + 2,39,56,372/- असे एकुण रु. 25,28,31,482/- ऐवजी एकत्रित रक्कम रू.25 कोटी देण्याचे निश्चीत करण्यात आले. सदर रक्कम ही ठराविक रक्कम असून कंपनीस प्रत्यक्ष रक्कम अदा होई पर्यंत या रकमेवर कुठलेली व्याज देण्यात येणार नाही असे निश्चीत करण्यात आले.

करिता प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मा.लवादाने आणि मा.जिल्हा न्यायालयाने पारित केलेल्या निकालानुसार कंपनीस देय असलेल्या रकमेपैकी तडजोडी अंती, निवीदेतील अटी व शर्तीनुसार केलेल्या कामाचा मोबदला आणि कंपनीचे झालेल्या व्यावसायीक नुकसानीपोटी रक्कम रुपये 25 कोटी अदा करण्याचे प्रस्तावित करण्यात येते. यानुसार एकुण रक्कम रू.25,00,00,000/- (रूपये पंचविस कोटी फक्त) रॅमके कंपनीस अदा करण्याचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर

**<u>ठराव क्रमांक 492/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार रॅमके कंपनीसोबत तडजोडी अंती आणि या प्रकरणातील सर्व न्यायालीयन प्रकरणे रॅमके कंपनी व महानगरपालिका यांनी मागे घ्यावीत व या प्रकरणात कुठल्याही न्यायालयात पुन्हा दाद मागता येणार नाही या अटीस अधिन राहून रक्कम रू.25,00,00,000/- (अक्षरी रूपये पंचविस कोटी फक्त) अदा करण्यास मान्यता प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही करण्यात यावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 493/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.29.07.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरातील पाण्याच्या स्त्रोतांचे पुर्न:जीवन व बळकटीकरण करणेच्या अनुषंगाने केंद्र व राज्य शासनाच्या सुचना River City Alliance (RCA) अंतर्गत शासनाने अंमलबजावणी करण्याच्या सुचना दिल्या आहेत. या अंतर्गत शहरातील खाम नदी, सुखना नदी, ऐतिहासिक कमल तलाव व शहरातील इतर नैसर्गिक पाण्याच्या स्त्रोतांचे पुर्न:जीवन, बळकटीकरण आणि संवर्धन करण्याचे निश्चित करण्यात आले असून, या संबंधी प्रस्तावाचे अमृत मिशन २.० अंतर्गत प्राथमिक स्वरूपाची माहिती केंद्र शासनाच्या अमरीत सरोवर (Amrit Sarovar) या पोर्टलवर ऑनलाईन प्रणालीव्दारे भरण्यात आली आहे. त्यामध्ये कमल तलावासह खाम नदी या योजनांचा समावेश आहे.

शासनाने हाती घेतलेल्या देशातील विविध शहरातील पाण्याच्या स्त्रोतांचे पुर्न:जीवन व बळकटीक करण्यासाठी अमरीत सरोवर प्रोग्राम अंतर्गत व अर्बन रिव्हर मॅनेजमेंट प्लान (URBAN RIVER MANAGEMENT PLAN) या कार्यक्रमातंर्गत शहरातील नैसर्गिक पाण्याच्या स्त्रोतांचे बळकटीकरण करणेसाठी विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी तज्ञ तांत्रिक संस्थेची नेमणूक करणे व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून घेणे या बाबीस अधिकचा कालावधी लागणे अपेक्षित आहे. सदर योजने अंतर्गत कमल तलावाच्या प्रकल्पास राज्यशासनाने तत्वत: मान्यता प्रदान केली आहे. तथापी यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करण्याकरीता शासनाने कालमर्यादा घालून दिली असून कमल तलावाचा विस्तृत प्रकल्प अहवाल जुलै-२०२२ अखेर शासनाला सादर करणे आवश्यक आहे.

सदर प्रकल्पासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारची नियुक्ती करून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी वेळेची मर्यादा विचारात घेऊन शहरातील पर्यावरण विषयक तज्ञ संस्था मे.इकोसत्व एन्व्हायरमेंटल सोल्युशन प्रा.लि.यांची विना निविदा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील प्रकरण ५ मधील २ (२) नुसार मा.स्थायी समितीला असलेल्या अधिकारात या कामी नेमणूक करणे योग्य वाटते.

यासाठी नॅशनल इन्स्टीट्युट ऑफ अर्बन अफेयर्स (NIUA) हि शासनाची संस्था या क्षेत्रातील तज्ञ संस्था असून सदर संस्थेकडे देशभरातील पाणी स्त्रोतांची विस्तृत माहिती उपलब्ध आहे. त्यास्तव सदर संस्थेची मदत घेऊन यासाठीचा विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करणे योग्य वाटते.

यासाठी शासनाची तज्ञ संस्था नॅशनल इन्स्टीट्युट ऑफ अर्बन अफेयर्स (NIUA) च्या मदत घेऊन व त्यांना या कामी सहाय्य करणेसाठी त्यांच्या माध्यमातून मे.इकोसत्व एन्व्हायरमेंटल सोल्युशन प्रा.लि. यांची नेमणूक करूनयासाठीचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून घेता येईल.

या संबंधीचा विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी नॅशनल इन्स्टीट्युट ऑफ अर्बन अफेयर्स या केंद्र शासनाच्या संस्थेच्या अधिपत्याखालील आप-आपसातील समन्वयाने स्थानिक पातळीवर मे.इकोसत्व एन्व्हायरमेंटल सोल्युशन प्रा.लि. काम करण्यास तयार आहे. तसे लेखी पत्र त्यांनी या कार्यालयात सादर केले आहे. या कामामध्ये शहरातील नैसर्गिक पाण्यांच्या स्त्रोतांचे सर्व्हेक्षण करणे, विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करणे, त्यासाठी शासनाकडे उपलब्ध असलेली माहिती नॅशनल इन्स्टीट्युट ऑफ अर्बन अफेयर्स या अंगीकृत संस्थेकडून घेणे व आप-आपसातील समन्वयाने परिपूर्ण विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करणे ही जबाबदारी मे.इकोसत्व एन्व्हायरमेंटल सोल्युशन प्रा.लि. यांची राहील.

यासाठी मे.इकोसत्व एन्व्हायरमेंटल सोल्युशन प्रा.लि. या शहरातील तज्ञ संस्थेस शासन निर्णय संकीर्ण-२०१८/प्र.क्र.५४/नवि-१६ मंत्रालय मुंबई -३२ दि.०४ जुन २०१८ निर्णयानुसार प्रकल्प अहवाल तयार करणे, शासनास सादर करणे अनुदान प्राप्त करणेसाठी महानगरपालिकेस सहाय्य करणे व संपुर्ण निविदा पुर्व व निविदा पश्चात कामे करणे यासाठी एकुण प्रकल्प किंमतीच्या

जास्तीत जास्त २% मानधन अनुज्ञेय करण्यात आले आहे. परंतु याबाबत मे.इकोसत्व एन्व्हायरमेंटल सोल्युशन प्रा.लि. यांना विचारणा केली असता त्यांनी सदर काम २% ऐवजी १.९०% (GST सह) मानधनावर काम करण्यास तयार असल्याचे नमुद केले आहे. या संपुर्ण प्रक्रियेमध्ये नॅशनल इन्स्टीट्युट ऑफ अर्बन अफेयर्स (NIUA) ही शासन अंगीकृत संस्था Monitoring Authority स्वरूपाने काम करणार असून त्यांना या कामी मे.इकोसत्व एन्व्हायरमेंटल सोल्युशन प्रा.लि. ही तज्ञ पर्यावरण विषयक संस्था Knowledge Partner म्हणून सहाय्य करणार आहे. या प्रकल्पासाठी ठरविण्यात येत असलेले एकुण सेवामुल्य १.९०% पैकी १०% सेवामुल्याची रक्कम नॅशनल इन्स्टीट्युट ऑफ अर्बन अफेयर्स (NIUA) ला द्यावी अशी त्यांनी विनंती केली आहे.

सदर प्रकल्पासाठी शासनाकडून अमृत २.० (Amrit Sarovar) अंतर्गत अमृत सरोवर या योजनेअंतर्गत ३०% (मनपा हिस्सा), ४५% (राज्य शासन अनुदान) २५% (केंद्र शासन अनुदान) आर्थिक आकृतीबं निश्चित करण्यात आला आहे. या योजनेच्या अनुषंगाने १५ जुलै २०२२ रोजी Zoom Meeting पार पडली असून या बैठकीत ठरल्यानुसार शहरातील पाण्याचे स्त्रोत ज्यामध्ये खाम नदी, सुखना नदी, ऐतिहासिक कमल तलाव व शहरातील इतर नैसर्गिक पाण्याच्या स्त्रोतांचे पुर्न:जीवन, बळकटीकरण आणि संवर्धन करणेच्या प्रकल्पांचा समावेश आहे, त्यापैकी कमल तलावाच्या प्रकल्पास राज्य शासनाकडुन तत्वत: मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे.

तरी उक्त बाबी विचारात घेता खाम नदी, सुखना नदी, ऐतिहासिक कमल तलाव व शहरातील इतर नैसर्गिक पाण्याच्या स्त्रोतांचे पुर्न:जीवन, बळकटीकरण, संवर्धन आणि पुर्न:जीवन करणे, यासाठी नॅशनल इन्स्टीट्युट ऑफ अर्बन अफेयर्स या शासन अंगीकृत संस्थेच्या मदतीने व या संस्थेच्या मार्गदर्शनाखाली शहरातील पर्यावरण विषयक बाबींची तज्ञ संस्था मे.इकोसत्व एन्व्हायरमेंटल सोल्युशन प्रा.लि. यांचेकडून विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करून घेणे, त्यांचेकडुन निविदापुर्व व निविदा पश्चात कामे करून घेणे यांचा समावेश असेल. त्यास्तव त्यांची नियुक्ती करणेसाठी त्यांना एकुण प्रकल्प किंमतीच्या १.९०% रक्कम अदा करणे व या १.९०% रक्कमेपैकी १०% रक्कम Monitoring charges (overheads) NIUA कडे जमा करणे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ५ (२) (२) नुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारात त्यांची नेमणूक करणे, तसा त्रिपक्षीय करार महानगरपालिका औरंगाबाद - मे.इकोसत्व एन्व्हायरमेंटल सोल्युशन प्रा.लि. व नॅशनल इन्स्टीट्युट ऑफ अर्बन अफेयर्स (NIUA) मध्ये करणे, या प्रकल्पासाठी शासनाने आखुन दिलेल्या आर्थिक आकृतीबंधानुसार एकुण प्रकल्प किंमतीच्या ३०% मनपा हिश्याच्या स्वरूपात रक्कम टाकणेसाठी अर्थसंकल्प २०२२-२०२३ मध्ये आर्थिक तरतुद करणे, यास मंजुरी प्रदान करणेसह या प्रकल्पाच्या अनुषंगाने आवश्यक ते निर्णय घेणे व त्यात बदल करणे या बाबतचे सर्व अधिकार आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांना प्रदान करणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्रमांक 493/2022:-**

प्रस्तावात नमुद केल्यानुसार, शहरातील पाण्याचे स्त्रोत असलेले खाम नदी, सुखना नदी, ऐतिहासिक कमल तलाव व शहरातील इतर नैसर्गिक पाण्याच्या स्त्रोतांचे पुर्न:जीवन, बळकटीकरण, संवर्धनआणि पुर्न:जीवन करणे, या उपाय योजना, त्यासाठी येणारा खर्च कळुन येणेसाठी या क्षेत्रातील पर्यावरण विषयक तज्ञ संस्था इकोसत्व इन्व्हायरमेंटल प्रा.लि. यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणुन विना निविदा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील प्रकरण ५ मधील २ (२) नुसार स्थायी समितीला असलेल्या अधिकारा अन्वये प्रकल्प किंमतीच्या २% ऐवजी १.९०% दराने (GST सह) प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी नेमणूक करणेस, यातील एकुण सेवा मुल्य रक्कमेपैकी १०% एवढी सेवा मुल्याची रक्कम Monitoring Aurthority या स्वरूपाने काम करण्याचा मोबदला म्हणुन नॅशनल इन्स्टीट्युट ऑफ अर्बन अफेयर्स (NIUA) ला अदा करणे, यासाठी महानगरपालिका- मे.इकोसत्व एन्व्हायरमेंटल सोल्युशन प्रा.लि. व नॅशनल

इन्स्टीट्युट ऑफ अर्बन अफेयर्स (NIUA) असा त्रिपक्षीय करार करणेस, शासनाने निश्चित केलेल्या आर्थिक आकृती बंधानुसार ३०% रक्कम महानगरपालिकेने आर्थिक सहभाग म्हणून टाकणे आवश्यक असल्याने त्यासाठी तरतुद मनपा अर्थसंकल्प २०२२-२३ मध्ये करणे, तसेच सदर प्रकल्पाच्या देखभाल दुरूस्तीसाठी ५ वर्षाकरीता आवश्यक रक्कमेची आर्थिक तरतुद मनपा अर्थसंकल्प २०२२-२३ मध्ये करणेसह, या कामाच्या अनुषंगाने आवश्यक ते निर्णय घेणे व गरजे नुसार योग्य ते फेरबदल करणेचे सर्व अधिकार आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांचेमध्ये निहीत करण्यास मंजुरी प्रदान करण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 494/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.29.07.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेतील नगर रचना विभागात सध्या कार्यरत तांत्रिक कर्मचाऱ्यांची संख्या अत्यंत कमी असून सदरील कामे पार पाडण्यासाठी उपलब्ध तांत्रिक कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त ताण निर्माण होत आहे. नगर रचना विभागात संपूर्ण शहरातील विकास योजना अंमलबजावणी करणे तसेच भूसंपादन प्रकरणे व मा. न्यायालयीन प्रकरणात कालमर्यादेत कार्यवाही होणे आवश्यक आहे.

नगर रचना विभागात कार्यरत असलेले श्री.कारभारी पुंडलिकराव घुगे, उप अभियंता हे दि.31.07.2022 रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यांचा सदर विभागातील प्रत्यक्ष कामांचा अनुभव असल्याने त्यांच्या सेवेचा लाभ होऊ शकतो.

करीता, "नगर रचना विभागातील भु-संपादन प्रकरणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणी करणे" या विवक्षित कामाकरीता श्री.कारभारी पुंडलिकराव घुगे, उपअभियंता (सेवानिवृत्त) यांची नियुक्ती विहित अटी व शर्तीच्या अधिन राहून प्रथमत: 06 महिन्यांच्या कालावधीकरीता करार पध्दतीने सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना दरमहा सेवानिवृत्तीपुर्वी मिळत असलेल्या एकूण वेतनातून (मुळ वेतन व महागाई भत्ता धरुन) त्यांना आता मिळत असलेल्या एकूण निवृत्तीवेतन (महागाई भत्ता आणि अंशराशीकृत निवृत्तीवेतनासह) वजा केल्यानंतर होणारी रक्कम त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणुन निश्चित करण्यात येईल.

करीता प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 494/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, "नगर रचना विभागातील भु-संपादन प्रकरणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणी करणे" या विवक्षित कामाकरीता श्री.कारभारी पुंडलिकराव घुगे, उपअभियंता (सेवानिवृत्त) यांची नियुक्ती विहित अटी व शर्तीच्या अधिन राहून प्रथमत: 06 महिन्यांच्या कालावधीकरीता करार पध्दतीने सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना दरमहा सेवानिवृत्तीपुर्वी मिळत असलेल्या एकूण वेतनातून (मुळ वेतन व महागाई भत्ता धरुन) त्यांना आता मिळत असलेल्या एकूण निवृत्तीवेतन (महागाई भत्ता आणि अंशराशीकृत निवृत्तीवेतनासह) वजा केल्यानंतर होणारी रक्कम त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणुन निश्चित करण्यात येईल. प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक495/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.29.07.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र. 311/2022, दि.14.03.2022 अन्वये औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीचे असलेले उस्मानपुरा येथील संत एकनाथ रंगमंदिराचे नुतनीकरण झाले असुन ध्वनी प्रणाली विद्युतीकरण वातानुकुलीत व्यवस्था आसन व्यवस्था इ.जतन करणे देखभाल, दुरुस्ती, स्वच्छता इ. करणे करीता सदरील रंगमंदिराची काळजी घेणेसाठी या क्षेत्राची जाण असणाऱ्या व्यक्ती/ संस्थेची नियुक्ती करणेसाठी ठराव मंजुर झालेला आहे.

सदरील प्रकरणी प्रथम स्वारस्य प्रगटन (E.O.I.) मागविण्यात आले होते. त्यामध्ये निश्चित झालेल्या रकमेनुसार निविदा प्रक्रीया राबविण्यात आली असता एकुण सहा निविदाधारकांनी या प्रक्रीयेत भाग घेतला आहे. निविदेतील अटी शर्तीनुसार तांत्रिक लिफाफा प्रमाणे चार निविदाधारक पात्र आहे. या सर्वांचे आर्थीक लिफाफे उघडले असता, खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहे.

| अ.क्र. | नांव | रक्कम रु. |
|---|---|---|
| 01. | Pardeshi Advertisers | र.रु.19,00,000/- |
| 02. | Nittito Exim India LTD | र.रु.18,00,00/- |
| 03. | Fiza Exhibitors | र.रु.17,00,000/- |
| 04. | Shivraj multi Services | र.रु.16,01,000/- |

उपरोक्त प्रमाणे सर्वाधिक दर हे परदेशी ॲड्स (श्री. राजु प्यारेलाल परदेशी) यांचे र.रु.19,00,000/- (जी.एस.टी.) वगळुन प्राप्त झाले असल्याने यांची संत एकनाथ रंगमंदिराची काळजी घेण्यासाठी दहा वर्षांचा ठेका देण्याचे प्रस्तावित करण्यात येते. यामध्ये सदरील रंगमंदिर, उपहारगृह, वाहनतळ,विश्रामगृह, इ.ची काळजी घेणे देखभाल दुरुस्ती करणे समाविष्ट असेल. प्राप्त निविदेच्या मुळ रु.19,00,000/- (जी.एस.टी.वगळुन) रकमेवर दर तीन वर्षांनी 12 टक्के वाढ राहिल.

करीता परदेशी ॲड्स (श्री.राजु प्यारेलाल परदेशी) यांची संत एकनाथ रंगमंदिर व परिसरातील उपहारगृह, वाहनतळ, विश्रामगृह, इ. काळजी घेणे, नागरीकांना सदरील रंगमंदिर उत्तम सेवा देणे साठी दहा वर्षांच्या कालावधी करता चालविणेसाठी काळजीवाहक म्हणुन नियुक्ती करण्याचा प्रस्ताव निविदेच्या अटि शर्तीस अधिन राहुन सादर करण्यात येतो. कारीता उपरोक्त प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 495/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, परदेशी ॲड्स (श्री. राजुप्यारेलाल परदेशी) यांचे सर्वाधीक दर रक्कम रु.19,00,000/- (जी.एस.टी.वगळून) प्राप्त झाले आहे. त्याअनुषंगाने परदेशी ॲड्स (श्री.राजू प्यारेलाल परदेशी) यांना संत एकनाथ रंगमंदिराची काळजी घेणे साठी दहा वर्षाचा ठेका देणे साठी मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाहि व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 496/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.29.07.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेकडे 28 कार व 12 जीप अशी एकूण 40 वाहने असून सदरील वाहने विविध विभागा अंतर्गत संबंधीत अधिकाऱ्यांच्या वापरात आहेत. या व्यतिरिक्त महानगरपालिकेस विविध कामांसाठी जसे की, मुंबई/पुणे शासकीय दौरे, बाहेरुन येणाऱ्या अभ्यांगतासाठी आरोग्य मोहिम तसेच आगामी सार्वत्रिक निवडणुक इ.कामासाठी वेळोवेळी वाहने किरायाने घ्यावी लागतात. चालु आर्थिक वर्ष सन 2022-23 मध्ये महानगरपालिकेच्या विविध कामकाजा करीता कार/जीप वाहने किरायाने घेण्यासाठी वार्षिक करार करणे आहे. त्या करीता र.रु.30.00 लक्ष खर्चाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

सदरील खर्च "वाहन इंधन" या लेखाशिर्षातून करण्यात येणार आहे. अंदाजपत्रकीय खर्चास मान्यता मिळाली तर कार/जीप वाहने किरायाने घेण्यासाठी ई-टेंडरद्वारे निविदा मागवून वार्षिक दर करार करण्यासाठी एजन्सी निश्चित करण्यात येईल.

करीता, महानगरपालिकेच्या विविध कामांसाठी वेळोवेळी कार/जीप वाहने किरायाने घेण्या करीता वार्षिक दर करार करुन एजन्सी निश्चित करण्यासाठी येणारा अपेक्षीत खर्च रु.30.00 लक्षचे अंदाजपत्रक मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 496/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या विविध कामांसाठी वेळोवेळी कार/जीप वाहने किरायाने घेण्याकरीता वार्षिक दर करुन एजन्सी निश्चित करण्यासाठी येणाऱ्या अपेक्षीत खर्च रु.30.00 लक्षचे अंदाजपत्रकास मान्यता प्रदान करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 497/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.29.07.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, MIDC चिकलठाणा येथे सॅम इंजिनिअरींग ते श्री इंटरप्राईजेस ते हमसफर ट्रॅव्हल्स वर्कशॉप ते मनपा हद्दीपर्यंत सिमेंट रस्ता तयार करणे व बॉक्स कल्व्हर्ट तयार करण्याच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2021-2022 च्या दरसुची नुसार र.रु.1,47,39,276/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील काम मनपा अर्थसंकल्प सन 2022-2023 मधील लेखाशिर्ष विकास योजने अंतर्गत रस्ते मजबुतीकरण करणे या लेखाशिर्षामधून प्रस्तावीत आहे. सदरील कामास दि.30.06.2022 रोजी मान्यता देण्यात आलेली आहे.

करीता अंदाजपत्रक र.रु.1,47,39,276/- चा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 497/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, MIDC चिकलठाणा येथे सॅम इंजिनिअरींग ते श्री इंटरप्राईजेस ते हमसफर ट्रॅव्हल्स वर्कशॉप ते मनपा हद्दीपर्यंत सिमेंट रस्ता तयार करणे व बॉक्स कल्व्हर्ट तयार करणे या कामाच्या र.रु.1,47,39,276/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 498/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.29.07.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.25 अंतर्गत व्हि.आय.पी रोड पासून ते नॅशनल शाळा ते मनपा शाळेपर्यंत कॉंक्रीटींग करणे कामाची निविदा मागितली असता, ठेकेदार मुजीब उर रहेमान खान यांच्याकडून अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच टेंडर र.रु.44,60,873/- पर्यंत भरलेली आहे. म्हणुन अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करण्यास व करार करण्यास मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ:-टेंडर क्र.2019_AMCA_435201_4

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नाव | वॉर्ड अभियंता कार्यालय क्र.03 |
| 2. | कामाचे स्वरुप | कॉंक्रीटींग करणे |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रक्कमेचे? मान्यतेचा ठराव? | होय,<br>र.रु.49,96,215/-<br>मा.स्थायी समिती सभेचे ठराव क्र.247 दि.28.02.2019 |
| | अ) त्यापैकी किती रक्कमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | रु.44,60,873/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रात टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | तात्कालीन ई-निविदा विभागामार्फत |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्यची मुदत | |
| | ब) टेंडर्स उघडण्याची मुदत | दि.09.09.2019 |
| 6. | एकुण किती टेंडर्स | 01 |

(त्यापैकी पात्र टेंडरदाराची माहिती खालील तक्त्यात द्यावी.)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| 1 | श्री.मुजीब उर रहेमान खान | रु.44,60,873/- | अंदाजपत्रक दराने |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | - |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | नवीन कॉंक्रीट रस्ते (शहरी भाग) |
| | अ) खर्चा साठी पुरेसी तरतुद उपलब्द आहे काय? | होय |
| | ब) सदर चे काम डिपॉजीट मधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| 9. | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे?<br>(डिपॉझिट रजिस्टर – पान क्रमांक द्यावा) | - |
| 10. | सोबत मान्य पुर्वगणनपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | मा.स्थायी समिती सभेचे ठराव क्र.247 दि.29.09.2019 |

या कामाचे अंदाजपत्रकीय र.रु.49,96,215/- चे तयार करण्यात आले होते. प्रस्तावीत कामाचा खर्चास मा.स्थायी समिती सभा दि.28.02.2019 ठराव क्र.247 नुसार मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. महानगरपालिकेच्या सन 2022-2023 च्या अर्थसंकल्पातील नवीन कॉंक्रीट रस्ते (शहरी भाग) या लेखाशिर्ष अंतर्गत Zone-03-Spill-Work P No.54 Sr.No.08 नुसार र.रु.50.00 लक्षची तरतुदी उपलब्ध आहे. प्रस्तावीत अंदाजपत्रकात रस्त्याचे मजबुतीकरण करून कॉंक्रीटींग करणे ह्या कामाचेसमावेश करण्यात आलेला आहे. प्रस्तावीत कामासाठी ई-निविदा प्रणालीद्वारे चौथ्या वेळेस निविदा मागविण्यात आले असता, फक्त एक

निविदा दर भरुन प्राप्त झाली. सदर निविदा मे.मुजीब ऊर रहेमान खॉन यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा आहे. सदर व निविदा दरास मा.स्थायी समिती सभेची कार्योत्तर मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 498/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.25 अंतर्गत व्हि.आय.पी.रोड पासून ते नॅशनल शाळा ते मनपा शाळेपर्यंत कॉंक्रीटींग करणे या कामासाठी प्राप्त झालेली एकमात्र निविदा मे.मुजीब ऊर रहेमान खॉन यांच्याकडून अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच र.रु.44,60,873/-पर्यंत काम करुन घेण्यास अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करण्यास/कपात करण्यास व करार करण्यात सर्वानुमते कार्योत्तर मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 499/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.29.07.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, **श्रीमती स्वाती बदीनाथ महाले** सहशिक्षिका जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भेंडाळा केंद्र कुंभार पिंपळगाव ता.घनसावंगी जिल्हा जालना, या शाळेवर सहशिक्षिका म्हणून सद्यस्थिती मध्ये कार्यरत असून औरंगाबाद महानगरपालिका येथे आस्थापनेवर वर्ग करून घेण्याची विनंती केली आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद जालना यांनी श्रीमती स्वाती बदीनाथ महाले यांना औरंगाबाद महानगरपालिकेत सेवा वर्ग करण्याबाबत ना-हरकत प्रमाणपत्र दिले आहे.

करिता श्रीमती स्वाती बदीनाथ महाले. सहशिक्षिका जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भेंडाळा केंद्र कुंभार पिंपळगाव ता. घनसावंगी जिल्हा जालना यांना औरंगाबाद महानगरपालिकेत शिक्षण विभागाच्या आस्थापनेवर सेवा वर्ग करण्यासाठी मा. सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 499/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार श्रीमती स्वाती बदीनाथ महाले. सहशिक्षिका जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भेंडाळा केंद्र कुंभार पिंपळगाव ता. घनसावंगी जिल्हा जालना यांना एकतर्फी आंतरजिल्हा बदलीने औरंगाबाद महानगरपालिका शिक्षण विभागाच्या आस्थापनेवर सेवा वर्ग करण्यास मान्यता देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 500/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.29.07.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, **श्रीमती शेख हुमेरा शिरीन फारुख अहेमद** सहशिक्षिका जि.प. शाळा तलावली उर्दू ता. भिवंडी जिल्हा ठाणे, या शाळेवर सहशिक्षिका म्हणून सद्यस्थितीमध्ये कार्यरत असून औरंगाबाद महानगरपालिका येथे आस्थापनेवर वर्ग करून घेण्याची विनंती केली आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद ठाणे यांनी श्रीमती शेख हुमेरा शिरीन फारुख अहेमद यांना औरंगाबाद महानगरपालिकेत सेवा वर्ग करण्याबाबत ना-हरकत प्रमाणपत्र दिले आहे.

करिता श्रीमती शेख हुमेरा शिरीन फारुख अहेमद सहशिक्षिका जि.प. शाळा तलावली उर्दू ता. भिवंडी जिल्हा ठाणे यांना औरंगाबाद महानगरपालिकेत शिक्षण विभागाच्या आस्थापनेवर सेवा वर्ग करण्यासाठी मा. सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 500/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार श्रीमती शेख हुमेरा शिरीन फारुख अहेमद सहशिक्षिका जि.प. शाळा तलावली उर्दू ता. भिवंडी जिल्हा ठाणे यांना एकतर्फी आंतरजिल्हा बदलीने औरंगाबाद महानगरपालिका शिक्षण विभागाच्या आस्थापनेवर सेवा वर्ग करण्यास मान्यता देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 501/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.29.07.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, **श्रीमती पद्मजा किशोर टाकळकर,** सहशिक्षिका जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोलदे केंद्र शिंदे ता. व जिल्हा नंदुरबार, या शाळेवर सहशिक्षिका म्हणून सद्यस्थितीमध्ये कार्यरत असून औरंगाबाद महानगरपालिका येथे आस्थापनेवर वर्ग करून घेण्याची विनंती केली आहे.

संबधित सहशिक्षिका यांचे सासरे **श्री. देशपांडे अनंतराव रंगनाथराव** यांना पक्षघात झालेला आहे. या अपंगत्वामुळे पलंगावर पडून असून त्यांचे डॉ. हेडगेवार रुग्णालय औरंगाबाद येथे उपचार चालू आहे. तसेच त्यांच्या सासूबाई यांना दोन हार्टअॅटॅक येवून गेले आहेत. त्यांची सेवा व देखभाल करण्यासाठी कोणीही नाही.

मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नंदुरबार यांनी श्रीमती पद्मजा किशोर टाकळकर यांना औरंगाबाद महानगरपालिकेत सेवा वर्ग करण्याबाबत ना-हरकत प्रमाणपत्र दिले आहे.

करिता श्रीमती पद्मजा किशोर टाकळकर सहशिक्षिका जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोलदे केंद्र शिंदे ता. व जिल्हा नंदुरबार यांना औरंगाबाद महानगरपालिकेत शिक्षण विभागाच्या आस्थापनेवर विशेष बाब म्हणून सेवा वर्ग करण्यासाठी मा. सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 501/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार **श्रीमती पद्मजा किशोर टाकळकर** सहशिक्षिका जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोलदे केंद्र शिंदे ता. व जिल्हा नंदुरबार यांना एकतर्फी आंतरजिल्हा बदलीने विशेष बाब म्हणून औरंगाबाद महानगरपालिका शिक्षण विभागाच्या आस्थापनेवर सेवा वर्ग करण्यास मान्यता देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 502/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.29.07.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.40, सिडको एन-8 येथील खुल्या जागेवर स्वातंत्र्यवीर विनायक दामोधर सावरकर संशोधन केंद्र उभारणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2021-2022 च्या SSR नुसार र.रु.2,53,08,094/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील काम मनपा अर्थसंकल्प सन 2022-2023 मधील स्वातंत्र्यवीर सावरकर संशोधन केंद्र उभारणे या लेखाशिर्षा मधून प्रस्तावीत आहे. सदरील कामास मान्यता देण्यात आलेली आहे.

करीता, अंदाजपत्रक र.रु.2,53,08,094/- चा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्रमांक 502/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.40, सिडको एन-8 येथील खुल्या जागेवर स्वातंत्र्यवीर विनायक दामोधर सावरकर संशोधन केंद्र उभारणे या कामाचे अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्रमांक 503/2022:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.29.07.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचे दि.08.02.2022 रोजीच्या आदेशान्वये मोजे हर्सुल जा.जि.औरंगाबाद येथील गट नं.216 मधील 1.00 हेक्टर 02 आर सरकारी जमीन सर्वांसाठी घरे संकल्पनेवर आधारित प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत घटक क्रमांक-3 (AHP) ची अंमलबजावणी करणे करीता औरंगाबाद महानगरपालिकेस प्रदान करण्यात आलेली आहे.

औरंगाबाद शहर मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) सन-1991 नुसार प्रस्तावीत क्षेत्र हे ना विकास क्षेत्रात (ग्रीन झोन) मध्ये समाविष्ट आहे. तसेच प्रस्तावीत क्षेत्र 45.00 मी.रुंद विकास योजना रस्त्याने अंशत: बाधीत आहे. रस्त्याने बाधीत क्षेत्र वगळून निव्वळ उर्वरित क्षेत्र 8430.00 चौ.मी.इतका शिल्लक राहत आहे.

महाराष्ट्र शासनाची अधिसुचना टिपीएस-1818/ सीआर-236/ 18/Sec-20(3) /यु.डी.-13 दि.02.12.2020 रोजी पासून संपुर्ण महाराष्ट्र राज्यात एकत्रीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन (VDCPR) नियमावली लागू करण्यात आलेली आहे. सदर नियमावलीतील नियम क्रमांक14.4.1 (ii) नुसार ना विकास क्षेत्रामध्ये "प्रधानमंत्री आवास योजना प्रकल्पाकरीता सकल भुखंडावर 1.00 इतका चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय असेल" असे नमुद आहे.

सदरील जमीन/जागा ही मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांच्याकडून प्राप्त झालेल्या इतर जमिनीच्या तुलनेत कमी क्षेत्राची असल्याने या जागेवर घरकूल उपलब्ध व्हावे व क्षेत्रावर 2.5 चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय होणे करीता सदरचे ना विकास क्षेत्र हे रहिवासी क्षेत्रात समाविष्ट करणे बाबत घरकुल विभागाची मागणी आहे.

मंजुर विकास योजनेनुसार सदरील प्रस्तावाखालील क्षेत्र ना विकास क्षेत्रात समाविष्ट असून या क्षेत्रावर 2.5 चटई क्षेत्र निर्देशांकाने बांधकाम करण्यासाठी सदर क्षेत्राचे रुपांतर रहिवासी क्षेत्रात करणे आवश्यक आहे.

वरील बाब लक्षात घेता, प्रस्तावीत मिळकतीमधून 45.00 मी.रुंदीचा विकास योजना रस्त्याने बाधीत क्षेत्र वगळून उर्वरित 84.30 आर (8430.00 चौ.मी.) क्षेत्रावर महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम-37 अनव्ये ना-विकास क्षेत्रातील जागा रहिवासी क्षेत्रात समाविष्ट करण्याचा गौण फेरबदल प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्रमांक 503/2022:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचे दि.08.02.2022 रोजीच्या आदेशान्वये मोजे हर्सुल ता.जि.औरंगाबाद येथील गट नं.216 मधील 1.00 हेक्टर 02 आर सरकारी जमीन सर्वांसाठी घरे संकल्पनेवर आधारित प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत घटक क्रमांक-3 (AHP) ची अंमलबजावणी करणे करीता औरंगाबाद महानगरपालिकेस प्रदान करण्यात आलेली आहे.

महानगरपालिकेस प्रदान करण्यात आलेले क्षेत्र औरंगाबाद शहर मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) सन-1991 नुसार ना-विकास क्षेत्र समाविष्ट असून अंशत: 45.00 मी.रुंद विकास योजना रस्त्याने बाधीत आहे.

सदरील जमीन/जागा ही मा.जिल्हाधिकारी औंरगाबाद यांच्याकडून प्राप्त झालेल्या इतर जमिनीच्या तुलनेत कमी क्षेत्राची असल्याने या जागेवर घरकूल उपलब्ध व्हावे व ना विकास क्षेत्रावर 2.5 चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय होणे करीता सदरचे ना विकास क्षेत्र हे रहिवासी क्षेत्रात समाविष्ट करणे बाबत घरकुल विभागाची मागणी आहे.

प्रस्तावीत मिळकतीमधून औरंगाबाद शहर मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) सन-1991 नुसार 45.00 मी.रुंदीचा विकास योजना रस्ता प्रस्तावीत असून सदर रस्त्याचे बाधीत क्षेत्र वगळून उर्वरित 84.30 आर (8430.00 चौ..मी.) क्षेत्रावर महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम-37 अन्वये ना-विकास क्षेत्रातील जागा रहिवासी क्षेत्रात समाविष्ट करण्याचा गौण फेरबदलाच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 504/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.29.07.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, 'आरोग्य अधिकारी (रुग्णालये)/ प्रतिबंधात्मक उपाय' संवर्गातून 'सहाय्यक आरोग्य अधिकारी' संवर्गातील रिक्त पदे पदोन्नतीने भरणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 54(1) अन्वये गठीत केलेल्या निवड समितीची बैठक दि.01.07.2022 रोजी घेण्यात आली. सद्य:स्थितीत सहाय्यक आरोग्य अधिकारी संवर्गात एकूण (01) पद मंजूर असून सद्यस्थितीत सदर पद रिक्त आहे.

मा.उच्च न्यायालय,मुंबई यांनी रिट याचिका क्र.2797/2015 मध्ये दि.04.08.2017 रोजी दिलेल्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका क्र.28306/2017 च्या निर्णयाच्या अधिन राहून तसेच सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र.बीसीसी 2018//प्र.क्र.366/16-ब. दि.07.05.2021 मधील सुचनांनुसार पदोन्नती द्यावयाची आहे. वैद्यकीय अधिकारी या पदावर कार्यरत अधिकाऱ्यांच्या वयाच्या 50/55 नंतर सेवेत ठेवण्याबाबतचे पुनर्विलोकनाबाबत कार्यवाही करण्यात आलेली नाही.

आरोग्य अधिकारी पदाच्या सेवा ज्येष्ठतेमध्ये डॉ.निता जयंत पाडळकर ह्या सेवाज्येष्ठ आहेत. त्या एम.बी.बी.एस.,डी.जी.ओ.अशी शैक्षणिक अर्हता धारण करतात. सेवा प्रवेश नियमात नमूद केलेली पदव्युत्तर पदवी धारण करत नसल्या तरी कोव्हिड-19 च्या आणीबाणीच्या परिस्थितीत आरोग्य वैद्यकीय अधिकारी या पदाचा कार्यभार अतिशय उत्कृष्टपणे सांभाळलेला आहे. तसेच त्या दि.30.09.2022 रोजी नियत वयोमानाने सेवानिवृत्त होणार आहेत. त्यांनी कोरोना काळात बजाविलेल्या उत्कृष्ट कामाची पावती म्हणून समितीने त्यांचे पदोन्नतीबाबत विचार केला. आरोग्य अधिकारी (रुग्णालये)/प्रतिबंधात्मक उपाय/वैद्यकीय अधिक्षक संवर्गातील कार्यरत अधिका-यांची सेवा ज्येष्ठता, शैक्षणिक अर्हता, गोपनीय अहवाल, विभागीय चौकशी इ. सेवाविषयक बाबीं विचारात घेता, सहाय्यक आरोग्य अधिकारी पदावरील रिक्त पदांची संख्या तसेच कामाची निकड लक्षात घेता डॉ.निता जयंत पाडळकर,आरोग्य अधिकारी (रुग्णालये/प्रतिबंधात्मक उपाय) यांना खुल्या प्रवर्गातून 'सहाय्यक आरोग्य अधिकारी' या पदावर वेतनश्रेणी (एस-23) 67700-208700 (7 वा वेतन आयोग) मध्ये निव्वळ तदर्थ (Adhoc) स्वरुपात पदोन्नती शिफारस केली आहे. औरंगाबाद महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम 2021 मधील नियम 6 नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 45 अंतर्गत येणारी पदे तसेच वर्ग-1 ची इतर सर्व पदे पदोन्नतीने भरतांना, सर्वसाधारण सभेच्या ठरावानंतर त्यास शासनाची पूर्वमंजूरी आवश्यक राहील,अशी तरतूद असून त्यानुसार मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेवून तसा प्रस्ताव मा.राज्य शासनाकडे मान्यतेस्तव पाठविणेबाबत समिती शिफारस केल्यानुसार,मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेण्यासाठी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 504/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सहाय्यक आरोग्य अधिकारी पदावरील रिक्त पदांची संख्या तसेच कामाची निकड लक्षात घेता डॉ.निता जयंत पाडळकर,आरोग्य अधिकारी (रुग्णालये/प्रतिबंधात्मक उपाय) यांना खुल्या प्रवर्गातून 'सहाय्यक आरोग्य अधिकारी' या पदावर वेतनश्रेणी (एस-23) 67700-208700 (7 वा वेतन आयोग) मध्ये मा.उच्च न्यायालय,मुंबई यांनी रिट याचिका क्र.2797/2015 मध्ये दि.04.08.2017 रोजी दिलेल्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका क्र.28306/2017 च्या निर्णयाच्या अधिन राहून,सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र.बीसीसी

2018/प्र.क्र.366/16-ब. दि.07.05.2021 मधील सुचनांनुसार निव्वळ तदर्थ (Adhoc) स्वरुपात पदोन्नती देण्याबाबत तसेच औरंगाबाद महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम 2021 मधील नियम 6 नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 45 अंतर्गत येणारी पदे तसेच वर्ग-1 ची इतर सर्व पदे पदोन्नतीने भरतांना,सर्वसाधारण सभेच्या ठरावानंतर त्यास शासनाची पूर्वमंजूरी आवश्यक राहील,अशी तरतूद असून त्यानुसार मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेवून तसा प्रस्ताव मा.राज्य शासनाकडे मान्यतेस्तव पाठविणेबाबत समिती शिफारस केल्यानुसार,मा.सर्वसाधारण सभेची मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>प्रस्ताव क्रमांक 505/2022</u>:-** **(प्रशासकीय प्रस्ताव दि.01.08.2022)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे भगवान महावीर स्तंभ, बाबा पेट्रोल पंप, दमडी महल समोरील, वाहतुक बेट, दिल्ली गेट, एन-1 सिडको पिरॉमिडच्या बाजुस असलेल्या हरीत पट्टयात, सिडको उड्डानपुलाखाली स्व.वसंतराव नाईक पुतळ्या समोरील बाजु, सम्राट अशोक स्तंभ (धुत हॉस्पीटल समोर) जुना मोंढा (जुना हौद), एकता चौक शहानुरमियॉ दर्गा चौक, मॉस्को कॉर्नर चौक याठिकाणी राष्ट्रीय कार्यक्रमांतर्गत 15 व्या वित्त आयोगातुन नविन कारंजे, रंगीत LED दिवे इत्यादी उभारणी साठी रक्कम रुपये 31,25,098/- चे अंदाजपत्रक प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव क्रमांक 505/2022:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे भगवान महावीर स्तंभ, बाबा पेट्रोल पंप, दमडी महल समोरील, वाहतुक बेट, दिल्ली गेट, एन-1 सिडको पिरॉमिडच्या बाजुस असलेल्या हरीत पट्टयात, सिडको उड्डानपुलाखाली स्व.वसंतराव नाईक पुतळ्या समोरील बाजु, सम्राट अशोक स्तंभ (धुत हॉस्पीटल समोर) जुना मोंढा (जुना हौद), एकता चौक शहानुरमियॉ दर्गा चौक, मॉस्को कॉर्नर चौक या ठिकाणी राष्ट्रीय कार्यक्रमांतर्गत 15 व्या वित्त आयोगातुन नविन कारंजे, रंगीत LED दिवे इत्यादी उभारणी साठी र.रु.31,25,098/- चे अंदाजपत्रक प्रस्तावास मान्याता देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**स्वाक्षरित/-**
**महापालिका सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद

**स्वाक्षरित/-**
**प्रशासक**
महानगरपालिका औरंगाबाद